# शब्द रुची

फेब्रुवारी २०१९
मूल्य १० रुपये
पृष्ठे ८०

वाचक विशेषांक

अतिथी संपादक : किरण येले



# यशाची शाश्वती, सोबत असता ‘उन्नती’!




## उन्नती - लघुउद्योजकांना जलद कर्ज

- स्मॉल बिझनेसमन
- प्रोफेशनल्स
- ट्रेडर्स
- रिटेलर्स

महिला उद्योजकांना
व्याजदरात ०.१०% सवलत

अधिक माहितीसाठी ९०२९०५००३२ या नंबरवर मिस्ड कॉल द्या.

सारस्वत बँक

100 Years Young

सारस्वत को-ऑपरेटिव्ह बँक लि. (शेड्युल्ड बँक)

मिले यहाँ, दोनो जहाँ

www.saraswatbank.com

विवेकशील विचार, व्यापक संवाद, कलात्म
जाण आणि सजग समाजभान अर्थात शब्दरुची

ग्रंथाली वाचक चळवळीचे मासिक

# शब्द रुची

वाचक विशेषांक

फेब्रुवारी २०१९, वर्ष सहावे
अंक दहावा, मूल्य १० रु.

संपादक : **सुदेश हिंगलासपूरकर**
कार्यकारी संपादक : **डॉ. वीणा सानेकर**
अतिथी संपादक : **किरण येले**
मुखपृष्ठ : **सतीश भावसार**

---

**कार्यालयीन संपर्क**
**कॉम्प्युटर युनिट – योगिता मोरे, अनिरुद्ध गद्रे**
granthaliruchee@gmail.com
**जाहिरात प्रसिद्धी – धनश्री धारप**
granthaliad@gmail.com
**वितरण – हरिप्रसाद जयस्वाल**

---

**केवळ वार्षिक वर्गणी स्वीकारली जाईल.**
**वार्षिक वर्गणी २५० रुपये**
**डिमांड ड्राफ्ट, म.ऑ. 'ग्रंथाली' नावे**

---

पत्रव्यवहार/वर्गणी पाठवण्याचा पत्ता
ग्रंथाली, १०१, १/बी विंग, 'द नेस्ट', पिंपळेश्वर को-ऑप.
हौसिंग सोसायटी, टायकलवाडी, स्टार सिटी सिनेमासमोर,
मनोरमा नगरकर मार्ग, माटुंगा (प), मुंबई ४०००१६
☎ २४२१६०५० / २४३०६६२४
granthaliruchee@gmail.com
www.granthali.com

---

**ऑफिस वेळ : सकाळी १२ ते सायं. ६**
**संपर्क/फोन/पुस्तके खरेदी करण्यासाठी**

---

**अंकात प्रसिद्ध झालेली मते ज्या त्या व्यक्तीची. 'ग्रंथाली' चळवळीचे 'शब्द रुची' हे व्यासपीठासमान मासिक आहे. त्यात सर्व छटांच्या विचारांना स्थान आहे. मात्र त्याच्याशी 'ग्रंथाली' विश्वस्त संस्था व तिचे विश्वस्त सहमत आहेत असे नव्हे.**

## अनुक्रम

गोची : वाचन आणि वाचकांची / ६
**किरण येले**
वाचनसंस्कृती श्रीमंत होती म्हणणे धाडसाचे / १६
**अजय कांडर**
ही एक सर्जनशील कला आहे / २०
**डॉ. लतिका भानुशाली**
वाचणारे विजयी होवोत / २२
**सागर सुभाष अचलकर**
साहित्यिकांचं सामाजिक वर्तन वाचकावर परिणाम घडवतं!/ २४
**शशी त्रिभुवन**
पुस्तकांची परिक्षणं महाबोअर / २६
**भारत निलख**
पालकाची भूमिका महत्त्वपूर्ण / २८
**भाग्यश्री शिंदे**
सोशल मीडियातील लोक पुस्तक वाचताना दिसत नाहीत/ २९
**तनुजा ढेरे**
वेळ घालविण्यासाठी केलेलं वाचन, वाचन नव्हे! / ३०
**निरुता भाटवडेकर**
एक-एक वाचक जोडावा... / ३२
**अक्षय प्रभाकर वाटवे**
लोकसहभागातून वाचनसमृद्धीकडे / ३५
**प्रा. डॉ. फू.ला. बागूल**
वाचन आणि माझ्यात अंतर पडत गेलं! / ३८
**सचिन वानखडे**
वाचकांची संख्या रोडावत आहे! / ४०
**प्रा. श्वेतल अनिल परब**
वाचाल तर वाचाल! रियली? / ४२
**धनंजय गांगल**
जगण्याचं प्रयोजन सापडले! : श्याम जोशी / ४५
**मुलाखतकार किरण येले**
**'मला आवडलेलं पुस्तक' स्पर्धेतील विजेते लेख / ५६**
अजूनही नव्याने शिकविणारे पुस्तक / **सागर कुलकर्णी**
मुखपृष्ठ पाहिलं अन्..../ **आसावरी काकडे**
Wings of Fire मराठी अनुवाद 'अग्निपंख / **प्रणव उन्हाळे**
चीनचा साम्राज्यवाद : नवीन रेशिम रोड / ६१
**डॉ. अनंत पां. लाभसेटवार**
**पुस्तकप्रकाशन** / ६४ **पुरस्कार भाषण** / ६८
**पत्रसंवाद** / ७२
ग्रंथपान – **मेहता पब्लिशिंग हाऊस** / ७४
ग्रंथाली ग्रंथपाने – **चांगदेव काळे** / ७५

## संपादकीय

**मा**झा एक तरुण वाचकमित्र कामानिमित्त नेदरलँडम ध्ये आहे. एक दिवस त्यानं तिथनं संदेश पाठवला की इथे मेट्रो ट्रेन वा बसमध्ये दहा पैकी सहा जणांच्या हातात पुस्तक असतं. त्यावेळेस मी ट्रेनमध्येच होतो. मी आसपास पाहिलं तर दहापैकी सहा जण मोबाईल पाहात होते.

एखाद्या संस्कृतीत एखादं कृतीवैशिष्ट्य अचानकच येत नाही किंवा नामशेष होत नाही. ती हळूहळू होत गेलेली प्रक्रिया असते. आपण नेहमीच परिसंवाद आणि चर्चेत वाचनाचं उदात्तीकरण वाचणाऱ्यांपुढेच करत आलो आणि वाचकाला गृहित धरत आलो. वाचकानं यावं, कार्यक्रम परिसंवाद, चर्चा ऐकावी, मान डोलवावी, टाळ्या वाजवाव्यात आणि निघून जावं ही अपेक्षा ठेवली. आपण वाचकाला बोलतं केलं नाही. त्याच्या अपेक्षा, त्याच्या गरजा, त्याच्या अडचणी काय आहेत हे जाणून घेण्याचा प्रयत्न केला नाही. 'ग्रंथाली'च्या दिनकर गांगल यांनी मात्र ४४ वर्षांपूर्वी 'वाचकदिन' सुरू केला, ही बाब उल्लेखनीय आहे.

'वाचक कमी होत आहेत' अशी ओरड सगळेच करताना दिसतात पण मग वाचक निर्माण करण्याची जबाबदारी कुणाची? कुणी काम करतंय का यावर? कवी लेखकही मानधन घेऊन श्रोते निर्माण करत आहेत. टिव्हीपुढे बसलेला श्रोता आणि कार्यक्रमात बसलेला श्रोता यातली दरी यामुळे मिटत आहे. साहित्यविषयक कार्यक्रमातील श्रोत्यांनाही आता करमणूक लागू लागली आहे.

फारुख काझी, अलिबागच्या सुजाता पाटील, नगरचे भाऊसाहेब चासकर, नांदेडचे शिवा आंबुलगेकर यासारखी मंडळी यात स्वत:च पदरमोड करुन हे काम करतही आहेत. पण ही संख्या वाढायला हवी. गेली तीन वर्षे मानधन न घेता मी स्वत: एक योजना काही शाळात राबवीत आहे. या योजनेप्रमाणे महिन्याच्या एका शनिवारी मी ठरलेल्या शाळेत जातो आणि मुलांना माझं काही ऐकवत नाही, व्याख्यानही देत नाही, 'वाचा' म्हणून तर अजिबातच सांगत नाही. मी त्यांना सांगतो की मी तुमचं ऐकायला आलो आहे. तुम्ही ऐकलेल्या कथा कविता मला ऐकायच्या आहेत. मग मुले त्यांनी ऐकलेल्या गोष्टी ऐकवू लागतात. त्यांना मंचाचं आणि सगळी मुलं आणि मोठी माणसं, शिक्षक आपलं ऐकत आहेत अप्रूप वाटू लागतं. लहानांनी ऐकायचं आणि मोठ्यांनी बोलायचं हा नियम इथे नेमका उलट होत असतो. ते गोष्टी ऐकवत राहतात. पण एक दिवस असा येतो की त्यांच्याकडच्या गोष्टी संपतात. ते हळूच सांगतात की मला पुढच्यावेळी गोष्ट सांगायची आहे आणि माझ्याकडे तर गोष्ट नाही. आता कृती करण्याची पाळी माझी असते. अशा वेळी माझ्या पोतडीतलं गोष्टीचं पुस्तक मी त्याला देतो. आता वाचणं ही 'त्याची' गरज बनलेली असते 'माझी' नाही. पुस्तक देताना नियम हा असतो की पुस्तकातल्या गोष्टी वाचून आवडलेली गोष्ट मुलांनी स्वत:च्या शब्दात सांगायची आणि विसरायला झालं तर स्वत:च पुढे बनवायची. तीन वर्षानंतर मुलं आता स्वत:च कथा रचून सांगू लागली आहेत छान वाचन करू लागली आहेत. या मुलांपैकी ज्यांना गोष्ट सांगण्याचं तंत्र कळलं ती मुलं दहा वर्षानंतर चांगले लेखक कवी झालेले असतील आणि इतर चांगले वाचक.

या अंकाचा विषय 'वाचक' असल्याने वाचकाला काय अडचणी आहेत हे जाणून घेण्याचा प्रयत्न या अंकात केला आहे. या अंकासाठी आम्ही 'वाचन खरंच कमी होत आहे की वाढत आहे? कमी होत असेल तर कारणे काय आणि वाढत असेल तर वाचक प्रगल्भ झाला आहे का?' या विषयावर लेख मागवले अाणि भरघोस प्रतिसाद लाभला. पण अनेक लेख वाचनाचे उदात्तीकरण करणारे किंवा स्वत:चे वाचन सांगणारे असल्याने ते नाकारावे लागले. या अंकात नव्या पिढीचे चांगले वाचक-कवी अजय कांडर, सागर अचलकर, भारत निलख यांच्या लेखात जो सखोल विचार जाणवतो तो संबंधितांनी लक्षात घेतला तर वाचन वाढण्यास मदत होईल. तसे करणारे निरुता भाटवडेकर, श्वेतल परब, तनुजा ढेरे, शशी त्रिभुवन, प्रा. डॉ. फू. ला. बागूल यांचे लेख आणि धनंजय गांगल यांचा 'वाचाल तर वाचाल' रियली? या लेखातून न वाचल्याने काहीही बिघडत नाही असा जो एक मतप्रवाह आहे त्यांचाही विचार व्हावा. या विचाराचा प्रतिवाद करताना

मी इतकंच सांगेन की 'वाचल्यानेच प्रगती होते' हे आपल्या बाबासाहेबांच्या अनुयायांनी दाखवून दिले आहे.

या अंकाच्या निमित्ताने स्वत:चं सगळं पणाला लावून ज्यांनी ही वाचक वाढवण्याची आणि ग्रंथजतनाची जबाबदारी यशस्वीपणे पेलली, त्या मराठी स्वायत्त विद्यापीठ बदलापूरचे स्थापक श्याम जोशी यांचे विचार आम्ही जाणून घेतले. श्याम जोशी हा माणूस म्हणजे 'जुनून' आहे. चालतं-बोलतं विद्यापीठ आहे आणि अशा माणसाचं मोल वेळीच जाणून, त्याला लागेल त्या सोयी सुविधा पुरवत त्यांच्या सोबत कामाला उभं राहायला हवं.

या अंकासाठी लेख देणारे आणि स्पर्धेत भाग घेणारे सारे स्पर्धक तसेच अंकाच्या कल्पनेस तातडीनं होकार देणारे सुदेश हिंगलासपूरकर, अंकाला सुंदर मुखपृष्ठ देणारे सतीश भावसार, अंकाला साहाय्य करणारे चांगदेव काळे, वीणा सानेकर आणि 'ग्रंथाली' समुहाचे आभार.

वाचक विशेषांक निमित्ताने 'मला आवडलेले पुस्तक' ही स्पर्धा आयोजित केली होती. या स्पर्धेस चांगला प्रतिसाद लाभला. राज्यभरातून अनेक लेख आले. अनेक वाचकांनी चांगल्या प्रकारे पुस्तकांतील कथानकाचे सविस्तर वा संक्षिप्त विवरण केले. त्यातून पुस्तकाविषयी वेगळा विचार करणारे आणि लेखात कथाविवेचनापेक्षा, विचार मांडणाऱ्या लेखांचा पुरस्कारासाठी विचार केला गेला. या निकषावर उतरलेल्या पहिल्या तीन स्पर्धकांचे लेखही आम्ही येथे देत आहोत.

**– किरण येले**
भ्रमणध्वनी : ९८६९२६०७८०
kiran.yele@gmail.com

[redacted]

ग्रंथाली




[redacted]



# गोची : वाचन आणि वाचकांची

**किरण येले**

**या** घटनेला काही वर्षे झालीत. मित्राला एक पुस्तक हवं होतं. ते दिल्यावर तो म्हणाला. 'काही पिशवी वगैरे असेल तर दे नं रे.' मी म्हटलं, 'अरे, पिशवी कशाला? असंच ने की हातात.' तर तो म्हणाला, 'अरे, बरं नाही दिसत असं उघड्यावर नेणं.' मी गंमतीत म्हटलं, 'अरे पुस्तक म्हणजे काय दारू आहे का, काळ्या पिशवीत लपवून न्यायला? छान हातात न्यावं. प्रवासात वेळ मिळाला तर वाचावं. कुणी चाळायला मागितलं तर द्यावं. वाईट काय त्यात?' तर म्हणाला, 'तसं नाही रे. आपण वाचतो या गोष्टीचं उगाच प्रदर्शन कशाला मांडायचं म्हणून म्हटलं. पिशवी दे.'

मी म्हटलं, 'उलट आता जाणीवपूर्वक 'गर्व से कहो' किंवा 'आय लूज वेट' चे बिल्ले छातीवर लावतात. तसं 'आम्ही वाचतो' हे अभिमानानं सांगायला हवं.'तुम्हीही वाचा' याचा आग्रह धरायला हवा. आणि तेही मराठी पुस्तकं विकली जावी वा मराठीचा प्रसार व्हावा म्हणून नाही तर वाचनानं समाजात आलेली मरगळ, अंधश्रद्धा, बाबा लोकांचे फुटलेले पेव. जाऊ देत आपल्याला काय करायचंय? ही प्रवृत्ती किंवा आयुष्य एकदाच मिळते म्हणून जेवढं मिळेल तितकं जगून पाहून अन मजा करून घ्यायला हवी.अशा विचारांचे प्रस्थ वाढत चाललेय, त्याला आळा घालण्यासाठी.

[redacted]

तो म्हणाला, 'म्हणजे नेमके काय करायला हवे?'

'म्हणजे आपण वाचक, लेखक, प्रकाशक आणि पुस्तकविक्रेते यांनी लोक वाचत नाहीत म्हणून फक्त तक्रार करण्याऐवजी वाचनाचं थोडं मार्केटिंग करायला हवं. सुजाण वाचकांनीही आपलं वाचन आपल्यापुरतेच न ठेवता इतरांनी वाचावं म्हणून प्रयत्न करायला हवेत. हेही एक प्रकारचे महत्त्वाचे समाजकार्यच ठरेल.'

मग तो गेल्यावर लक्षात आलं की खरंच आता 'वाचनसंकृती'चा जाणीवपूर्वक प्रसार करण्याची परिस्थिती आली आहे आणि तेही पुस्तके खपावीत म्हणून नाही तर लोकांची हरवलेली संवेदनशीलता परतावी, लोकांच्या जाणिवा समृद्ध व्हाव्यात. लोकांत सामाजिक व उत्क्रांतीभान यावे म्हणून.

पूर्वीच्या काळी.म्हणजे १९६०-७० पर्यंत लोकांचं वाचन असायचं. लोकांना कविता आवडायच्या आणि विशेष म्हणजे त्या त्यांना पाठ असायच्या. लोक कथा-कादंबऱ्या वाचायचे. लेख वाचायचे. वृत्तपत्रातले अग्रलेख वाचायचे. हे चित्र हळूहळू बदलले. लोक कवितेपासून दूर जाऊ लागले. कथा, कादंबऱ्या, ललित लेख, सामाजिक लेख या सगळ्याच लेखनप्रकारांपासून वाचक दुरावत गेला. लेख, कवी, प्रकाशक आणि समाजहितचिंतक, सारेच 'लोक वाचत नाहीत', 'वाचनसंस्कृती कमी झाली' असा धोशा लावू लागले. वाचकांना व लोकांना दोषी ठरवू लागले. पण मला वाटतं 'भाकरी करपते' म्हणून 'भाकरीला' दोष देण्यात अर्थ नाही. ती 'का करपते' या गोष्टीवर विचार व्हायला हवा. सारासार व गांर्भीयाने केलेल्या चर्चातून, विचारातून अंमलात येऊ शकतील असे ठोस निर्णय घ्यायला हवेत आणि ते अंमलात आणायलाही हवेत. तर्कनिष्ठ अभ्यास केला तर 'वाचन का कमी झाले' याबाबत काही मुद्दे लक्षात येतात ते विचारात घ्यावे लागतील.

### १. वैचारिकतेकडून व्ययशक्तीकडे समाजाचा प्रवास

१९६०-७० च्या दशकापर्यंत लोकांत सांस्कृतिक आणि सामाजिक बांधिलकीची भावना असण्याची टक्केवारी आजच्यापेक्षा जास्त होती. देशास स्वातंत्र्य मिळून २-३ दशके झाली होती. देशासाठी आपण काही करायला हवे. या विचारांचे पारडे, 'स्वतःची प्रॉपर्टी बनवायला हवी'च्या विचारांपेक्षा जड होते. पूर्वी 'मोठे होणे' म्हणजे 'विचाराने मोठे होणे', 'व्यासंगाने मोठे होणे' होते. त्यासाठी नियमित सकस वाचन करणे आणि सामाजिक चळवळीत स्वतःचे योगदान देणे महत्त्वाचे मानले गेले होते. व्यक्ती 'श्रीमंत नसला तरी चालेल पण सुसंस्कृत हवा' ही त्यावेळच्या समाजाची

मानसिकता होती. व्यक्तीच्या समाजविषयक आणि साहित्यविषयक व्यासंगातून त्याचे स्थान मनात निश्चित होत असे.

मात्र ही परिस्थिती बदलली. लोकांचा कल 'श्रीमंत' होण्याकडे झुकू लागला आणि लोक श्रीमंत होण्यासाठी लागणारे वाचन करू लागले. जनरल नॉलेजची पुस्तके, बँकाच्या परीक्षाची पुस्तके, श्रीमंत बनवणाऱ्या कोर्सेसची पुस्तके, आध्यात्माची पुस्तके, शेअरबाजाराची पुस्तके यांचा खप वाढला. शेअरबाजाराच्या शिक्षण वर्गास गर्दी होऊ लागली. राजकारणात व सामाजिक चळवळीत निस्वार्थी कार्यकर्त्यांचे प्रमाण घटले. सामाजिक चळवळींचा ऱ्हास होऊ लागला. राजकीय पक्षात कार्यकर्त्यांची संख्या वाढली ती कमावण्याच्या व ओळखीचा फायदा करून घेण्याच्या इराद्याने. आता पूर्वीची वैचारिक क्षमतेची अट 'व्ययशक्ती' या नव्याने शिरकाव झालेल्या बाबीमुळे बदलली. आता वर्तन कसेही असले तरी 'व्ययशक्ती' जबरदस्त असली पाहिजे, हा व्यक्तीच्या समाजातल्या स्थानाचा महत्त्वाचा नियम झाला. यामुळे वाचनापेक्षा व्ययशक्ती वाढवण्यावर भर आला.

**२. बदलत्या परिस्थितीचा अदमास घेतला नाही**

पूर्वी आधुनिक दृकश्राव्य माध्यमे व इतर मनोरंजन माध्यमांच्या अनुपस्थितीत लोकांकडे कार्यालयीन व प्रापंचिक कार्यानंतरचा वेळ, वाचन, आप्तांच्या भेटी, सामाजिक कार्य याकरता असायचा आणि याचबरोबर 'वेळ महत्त्वाचा आहे तो वाया दवडता कामा नये' ही मानसिकताही होती. म्हणूनच कदाचित बहुतांशी साहित्य नाटक, कला, या कलाप्रकारातनं निखळ मनोरंजन न करता संदेश देण्याकडे कल असायचा. 'कलावाद की जीवनवाद' हा वादही होताच. देश तंत्रप्रगत झाल्यावर, दशकभरात कित्येक मनोरंजनाची साधने आली. जुनी होती ती आणिक प्रगत झाली. त्यात यंत्रकाळात लोकांचे स्थलांतरीत होणे वाढले. निवासाच्या ठिकाणापासून कार्यस्थानाची ठिकाणे दूर गेली. दिनक्रम धावपळीचे होऊ लागले. आणि धावपळीच्या जीवनात लोकांना निखळ मनोरंजन महत्त्वाचे वाटू लागले. सामाजिक बांधिलकी एव्हाना कमी झालीच होती. स्वदेशी विचारातला देशाचा विचार गळून फक्त 'स्व' उरला होता. समाजाचा विचार जाऊन, 'माझा' हा विचार रूजू लागला होता. 'स्व आणि माझं' ला जास्तीत जास्त सुखी आणि आनंदी कसे करता येईल याचा विचार आणि जाहिराती येऊ लागला होत्या. त्यामुळे श्रीमंत होऊन स्वतःला सुखी करण्यासाठी अवांतर वाचनापेक्षा तो वेळ, नवे तंत्रशिक्षण घेण्यात, आणखी शालोपयोगी अभ्यास करण्यात, पालक, विद्यार्थी, शिक्षक व शाळांनीही जोर देण्यास सुरुवात केली. त्यातूनही मुलांचा साहित्य वाचनाचा वेळ, शैक्षणिक पुस्तके वाचनास वापरण्याचा आग्रह होऊ लागला. पालकांनीही त्याच प्रकारची पुस्तके पुरवून, ट्युशन क्लासेस लावून साहित्य वाचनास प्रतिकूल स्थिती व मानसिकता निर्माण केली.

समाजाचा घटक असलेल्या व्यक्तींना आता, स्वतःसाठी वेळ काढावा ही गोष्ट महत्त्वाची वाटू लागली. त्यातनंच समर्पित व्यक्ती उपलब्ध न झाल्यामुळे सामाजिक चळवळी क्षीण होऊ लागल्या. समाज 'नंतर', 'माझं आधी' या संकल्पनेमुळे समाजासाठी माझा वेळ आणि माझे पैसे कुणी देईनासे झाले. आणि काहींनी या चळवळीलाच अर्थाजनाचं साधन बनवलं त्यामुळे सामाजिक चळवळी कुपोषित होऊ लागल्या. चळवळीतले समर्पित लोक कमी झाल्यामुळे त्या अनुषंगाने होणारं वाचनही रोडावलं.

सामान्य माणूसही अधिक पैसे मिळवताना आलेल्या ताणतणावापासून आणि थकव्यापासून काही घटका विसावा मिळावा, तो वेळ आनंदात जावा, म्हणून विचारांना व मेंदूला त्रास न देणारी आणि तो ताण घालवणारी निर्बुद्ध करमणूक पाहण्याकडे कल ठेवू लागला. वैचारिक नाटक पाहण्यापेक्षा मॉलमधे जाणे, विनोदी नाटक, सिनेमा, ब्युटी पार्लर, टिव्हीवरील चटपटीत मालिका, यात हा माणूस वेळ घालवू लागला आणि प्रौढ वाचक वाचनापासून दूर गेला.

बरं या संपूर्ण उलथापालथीच्या कालावधीत वाचन महत्त्वाचे आहे हे जाणणाऱ्या मंडळींनी या बदलत्या परिस्थितीवर ठोस उपाययोजना केल्याचे दिसत नाही.

प्रौढ वाचक वाचनापासून दूर जात असतानाच 'उदयाचा वाचक' म्हणून ज्यांच्याकडे पाहिलं जायला हवं होतं त्या शालेय विद्यार्थ्यांचं अवांतर वाचनही कमी झालं याचं पहिलं कारण जिथे वाचनाचे महत्त्व मनावर बिंबवले जायला हवं होतं तिथल्या बहुतांशी शिक्षकांचंच अवांतर वाचन कमी झालं.

माझं म्हणणं होतं की यालाही कारण पुन्हा श्रीमंत होण्यामागची मानसिकताच आहे. पूर्वीच्या काळात 'गुरूजी' होणं ही अनेकांच्या मनातली महत्त्वाकांक्षा होती. देशाची सेवा करण्याचा तो एक महत्त्वाचा मार्ग होता. 'अध्यापन' हे एक व्रत होतं. अध्यापनाला आणि अध्यापन करणाऱ्याला एक सामाजिक प्रतिष्ठा होती. पण नंतरच्या काळात जेव्हा समाजाचा कल ज्ञानाकडून पैशाकडे सरकल्यावर ही अध्यापनाला असलेली सामाजिक प्रतिष्ठा लोप पावली आणि मुले 'गुरूजी' होण्याऐवजी डॉक्टर, इंजिनियर, पायलट होण्याची स्वप्ने पाहू लागली. या विभागात प्रवेश मिळविण्यासाठी चढाओढ सुरू झाली. वैद्यकीय आणि तांत्रिकी विभागातील चढाओढीत प्रवेश न मिळालेले तरुण शेवटचा पर्याय म्हणून अध्यापन क्षेत्रात आली. ही तरुण मंडळी समर्पित नसल्यामुळे त्यांचं वाचन कमी होतं आणि पर्याय म्हणून शिक्षणक्षेत्रात पडल्यामुळे त्यांचे विद्यादानही पाडल्यासारखंच होतं. या शिक्षकांनी मग अधिक अर्थाजनासाठी क्लासेस काढले. ज्यात जास्त टक्केवारीची हमी दिली गेली आणि ती टक्केवारी गाठण्यासाठी दिवसाचा संपूर्ण वेळ मुलांना पाठ्यपुस्तकाच्या घाण्याला जुंपलं गेलं. याच शिक्षकांनी किवा त्यांच्या आप्तांनी मग अभ्यासाच्या घाण्याला जुंपलेल्या मुलांना विरंगुळा म्हणून सुट्टीतील 'पर्सनॅलिटी डेव्हलपमेंट' क्लासेस.छंदवर्ग शिबिरे सुरू केले. अर्थातच हे छंदवर्ग वा शिबिर म्हणजे मुलांच्या अंगी स्पर्धाजगतात पैसा आणि प्रसिद्धी काबीज करण्याचा पाया आहे, असे पालकांच्या मनावर बिंबवले गेले. गंमत म्हणजे या

छंदवर्गात वा शिबिरात वाचनवर्ग अभावानेच होता.

यामुळे मुलांच्या शैक्षणेतर वाचनास खीळ बसली आणि या सगळ्याचा परिणाम म्हणून 'उद्याचा वाचक' असणारी एक संपूर्ण पिढीच नामशेष झाली.

'वाचनाने आणि संस्काराने व्यक्ती मोठी होते' हे त्यावेळी प्रत्येक घरातले विचार होते. साहजिकच वाचनाची परंपरा वारसपद्धतीप्रमाणे चालत आलेली होती. प्रत्येक घरात किमान धार्मिक ग्रंथ तरी असायचेच. बहुतेक घरात पारायणे चालायची. ती ऐकायला आसपासची माणसे आवर्जून जायची. म्हाताऱ्या मुखात अभंग असायचे. किर्तने चालायची. ओव्या गायल्या जायच्या. झोपाळयावर बसून कविता म्हटल्या जायच्या. सकाळ संध्याकाळ ऋचा गायल्या जायच्या. प्रार्थना म्हटल्या जायच्या. लग्नगीते गायली जायची. जन्मगीतेही असायची.

यंत्रकाळात ही परिस्थिती बदलली.निवासापासून कार्यस्थान खूप दूर गेले आणि हे चित्र बदलू लागले. तिन्हीसांजेला फक्त मुलांनी प्रार्थना म्हणण्याइतकेच वाचन व पाठांतराची प्रकिया साचून राहिली. घरातल्या कर्त्या पुरुषांनाही गाव सोडून शहरात आल्यामुळे व कामासाठी दूर जावे लागल्यामुळे, त्यांच्या पालकांनी लावलेली वाचन सवय नियमित राखणे अवघड होऊ लागले. त्यामुळे साहजिकच त्यांच्या पाल्यांवरही वाचनाचे संस्कार होणे दुरापास्त झाले. वाचनाची आवड निर्माण होण्यासाठी समोर सतत आकर्षक रंगीत पुस्तके असणे, कुणीतरी वाचत असणे, वाचलेल्या गोष्टी कविता मुलांना सांगत असणे, या गोष्टी थांबल्या. परिणामतः मुलांमधे पुस्तकांविषयी उत्सुकता व जवळीक होणे थांबले.

### ३. आध्यात्मिक आणि धार्मिक पुस्तकांचा रेटा

वाचनाअभावी प्रौढ वर्ग आपली विचारक्षमता हरवून बसल्यामुळे अनेक धार्मिक गुरूंचा अचानक उदय झाला. यांत्रिकीकरणामुळे माणूस गावापासून दूर गेला होताच. त्यामुळे आणि आधुनिक जीवनशैलीमुळे विभक्त कुटुंबपद्धती आली. विभक्त कुटुंबपद्धतीमुळे एकत्र कुटुंबपद्धतीत राहिलेल्या माणसांना एकटेपणा जाणवू लागला. एकटेपणामुळे आणि इतर कारणामुळे नैराश्य जाणवू लागले. नैराश्यावस्थेतल्या माणसाला मानसिक आधार द्यायला घरात बुजूर्ग माणसे राहिली नाहीत. आणि यामुळेच अशी आधार देणारी माणसे तो आधार बाहेर शोधू लागला. यामुळे अनेक आध्यात्मिक आणि धार्मिक गुरूंचा उदय झाला. या गुरूंना भरघोस शिष्यपरिवार लाभू लागला. समाजातही आर्थिक आणि सामाजिक स्तरावर माणसामाणसांत चढाओढ सुरू झाली होतीच. दुसऱ्यापेक्षा आपल्याकडे कमी आहे, या भावनेने दुसऱ्यापेक्षा आपण वरचढ ठरण्यासाठी आणि काही शांती मिळविण्यासाठी, तर काही आलेल्या नैराश्य व दुःखातून बाहेर पडण्यासाठी गुरूंकडे जाऊ लागले. आणि मग गुरूंनी सांगितलेली आध्यात्मिक गुहये आणि धार्मिक बाबी समजून घेण्यासाठी गुरूंच्या आध्यात्मिक आणि धार्मिक पुस्तकांचा रेटा वाढला. त्यात या नव्या गुरूंचे चरित्र, प्रवचने आणि त्यांनी सांगितलेला धर्माचा अर्थविषयक पुस्तके प्रकाशित होऊ लागली आणि भक्त व शिष्यगणांना ही पुस्तके व प्रवचने वाचणे अनिवार्य झाले.

### ४. अनुवादित पुस्तकांचा रेटा

याच काळात वैश्विकीकरणामुळे इतर भाषातली पुस्तके अनुवादित होऊन येऊ लागली. या पुस्तकांतही मानसशास्त्रीय प्रकियेतून 'स्व'ची प्रगती (Personality development) व्यवसाय स्पर्धेत स्वतःचे सादरीकरण (Presentation) समूहात स्वतःचे महत्व व वेगळेपण ठसवण्याचे कसब (Self Importance and Confidence) व अशा विषयावर पुस्तके येऊ लागली. ही पुस्तके 'श्रीमंत होणे' या बाबीस पूरक असल्यामुळे साहजिकच प्रचंड खपली गेली. याच काळात परदेशी साहित्याचा अनुवाद केलेली पुस्तकेही बाजारात आली. त्यातल्या कितीतरी पुस्तकांचा.पर्यायाने त्यातल्या साहित्याचा दर्जा.भारतीय साहित्यापेक्षा कमी होता तरी केवळ जाहिरातबाजीमुळे व चर्चेमुळे तीही प्रचंड प्रमाणात विकली गेली.

मागे माझ्या एका मित्राने फोन केला म्हणाला, ''अरे किरण 'Who moved' वाचलेस का?'' मी म्हटलं, ''नाही.'' तर म्हणाला, ''अरे आवर्जून वाच. 'ग्रेट' पुस्तक आहे.'' मी ते आधीच वाचलेलं होतं म्हणून त्याला म्हटलं, ''अरे मी ते वाचलंय आणि तद्दन भंपक पुस्तक आहे. अशा कितीतरी गोष्टी भारतीय साहित्यात पंचतंत्र आणि इसापनितीद्वारे आधीच सांगून ठेवल्यात.'' पाश्चात्त्य साहित्य अभ्यासायला हवेच पण तिथल्या परिप्रेक्षाच्या पातळीवर ते तपासूनही घ्यायला हवे. त्या साहित्याचा त्याच्या निर्मितीकालातील सामाजिक परिस्थिती व सद्यकालीन परिस्थिती दोन्ही मापून पहायला हवे. 'जे जे पाश्चात्त्य ते ते सुंदर' ही मानसिकता हल्ली साहित्यवाचन व अनुवादातही दिसू लागलेय.

एकदा अनंत सामंतांशी बोलताना मी म्हटले मला हॅरी पॉटरपेक्षा प्रकाश संतांचा लंपन आवडतो. कारण हॅरी पॉटरमधे लेखिकेने कल्पनाविलासाने अदभुत गोष्टी अदभुत प्रदेश पात्रे रंगवलीत, जे निश्चितच सुंदर आहे. पण अशा खूप गोष्टी हातिम ताई, अरेबियन नाईटस, अलादिन, अलिबाबा आणि ४० चोर, सिंहासन बत्तिशी, सिंदबादमधून भारतीयांनी वाचल्यात. ऐकल्यात व पाहिल्यात. मला जे. के. रोलिंगच्या कल्पनाशक्तीला दाद द्यावीशी वाटते. तिने रंगवलेला हॅरी पॉटर आणि त्याचे जादुई स्कूल अफलातून वाटते. पण या सगळयात हॅरी पॉटर जवळचा वाटत नाही. याउलट प्रकाश संतांचा 'लंपन' हा मनाच्या आतल्या गोष्टी बोलतो, उलगडण्याचा प्रयत्न करतो, ज्या प्रत्येक भारतीय आणि विदेशी मुलाच्या भावविश्वात नेहमी येतात. प्रत्येक प्रौढाने त्याच्या बालपणात पौगंडावस्थेत अनुभवलेल्या असतात म्हणूनच मग लंपन आपल्याला आपला वाटत जातो किंवा आपणच लंपन होत जातो.

एकूणच विचार करता खूपदा पाश्चात्त्य साहित्य आणि चित्रपट नेहमी बाह्य गोष्टींविषयी बोलते आणि भारतीय साहित्य व चित्रपट आंतरिक बाबींचा, आत्म्याचा, मनाचा वेध घेण्याचा प्रयत्न करते.

भारतीय आणि विशेषतः मराठी वाचक माणसांनाही याच गोष्टीचे वेध आहेत. धार्मिक ग्रंथांतून आणि साहित्यातूनही, गीताअध्यायांपासून जे कृष्णमूर्तींपर्यंत सारेच आत्मोन्नतीचा मार्ग सांगतात. आत्म्याचा व एका अदृश्य अनामिक शक्तीचा वेध घेण्याचा, तिला जाणून घेण्याचा प्रयत्न करण्याचा मार्ग सांगतात. पाश्चात्त्य धर्मग्रंथ त्या शक्तीला शरण जाऊन तिने सांगितलेली वचने पाळण्याचे आवाहन करतात. साहित्यातही हेमिंग्वेच्या कोळ्याचा लढा रात्रभर नियतीरूपक माशाशी चालतो. 'जोनाथन द सिगल'मधला सीगल आकाशापर्यंत भिडण्याचा समुहातून वेगळा विचार करत स्वतःतल्या कमतरतेवर मात करतो पण जीएंच्या कथेतले प्रत्येक पात्राचा लढा, पु.भा. भावेंच्या कथेतल्या प्रत्येक पात्राचा, तेंडुलकरांच्या नाटकातल्या प्रत्येक पात्राचा लढा हा आतल्या जाणिवांचा असतो. आतल्या कुरूपतेशी असतो, आतल्या 'स्व'चा प्राक्तनाशी असतो. भारतीय साहित्यात आंतरिक जाणिवांचे विवेचन जास्त येते. पाश्चात्य साहित्य नेमके याच्या उलट आहे. काही अपवाद आहेत हे मान्य.

'जे जे पाश्चिमात्त्य ते ते सुंदर' या नियमाने साहित्येतर पुस्तकांचेही अनुवाद येऊ लागले आणि वाचकांनी आपण काहीतरी वेगळं आणि पाश्चात्य साहित्य वाचतोय या सुखद कल्पनेने ते विकत घेतले. हा 'हू मूव्हड'सारख्या पुस्तकांचा फुगा नंतर फुटला पण परिणाम असा झाला की त्या काळात वाचकाच्या पुस्तक खरेदीच्या यादीतील एका देशी चांगल्या साहित्यिक पुस्तकाची जागा अशा पुस्तकांनी घेतली होती.

## ५. नवोदित आणि प्रस्थापित कवींनी केलेल्या चुका

हे झालं वाचन आणि वाचक कमी होण्यासंबंधी. पण असलेल्या वाचकांचीही काही कारणामुळे गोची झाली. कवितेच्या वाचनाबाबत वाचक दुरावत चालला असताना ही परिस्थिती आणखी बिकट केली ती नवोदित उत्साही कवींच्या आग्रही, अस्थायी आणि असमयीच्या काव्यलादनामुळे.

शिक्षणाच्या प्रसारामुळे व कवितेत मुक्तछंदाच्या आगमनामुळे नव्या वाचकांना कविता लिहिणे सोपे वाटू लागले. त्यातले खूपजण कविता लिहू लागले. मग आपण लिहिलेल्या कवितांचा कस न जोखता, त्यांतल्या गुणावगुणांचा अभ्यास न करता, पूवसुरींच्या कविता न अभ्यासताच, स्वतःच्या कविता भेटेल त्याला, भेटेल त्या ठिकाणी कविता ऐकवू लागले. कवितासंग्रह छापूही लागले. या प्रकाराने नियमित वाचक चक्रावला. पूर्वी 'कवी दिसतो कसा आननी' अशी परिस्थिती Hour Glass तासवाटिका उलटे करून ठेवावे तशी बदलली होती. सगळीकडे वाचक कमी व कवी आणि कवितासंग्रह जास्त दिसू लागले. कवितेचा नियमित वाचक जेव्हा हे कवितासंग्रह विकत घेऊन वाचू लागला तेव्हा त्यातील अपरिपक्व कविता वाचून तो हादरला. त्याने नव्या कवितांची तुलना जुन्या कवींसोबत केली आणि त्याला नव्या कविता अगदीच अपरिपक्व आणि टाकाऊ वाटू लागल्या. त्याने सरसकट सगळ्या नव्या कवींच्या कवितांना वाईट ठरवून टाकले आणि नव्या कवींच्या कवितासंग्रहाकडे पाठ फिरवली. यामुळे कवितेचा नियमित वाचक दुरावला.

या गोंधळात आणखी भर टाकली ती जुन्या मान्यवर कवींनी. कवितेच्या क्षेत्रात ज्यांना कवितेचा नियमित वाचक आदर्श मानत होता अशा मान्यवर कवींनी, त्यांचे शिष्यत्व स्वीकारलेल्या किंवा त्यांची स्तुतीपुजा करणाऱ्या किंवा प्रस्तावनेसाठी भरघोस पैसे देणाऱ्या नव्या कवींच्या कविताविषयक गांभीर्याची चाचपणीही न करता त्यांच्या संग्रहास सहज प्रस्तावना लिहून देण्यास सुरुवात केली. यामुळे वाचकांची मात्र फसवणूक झाली. कवितेच्या नियमित वाचकांना या नव्या कवींच्या कवितांची ओळख नव्हती. अनेक कवी त्यांच्यासाठी नवे होते. त्यांनी कधीच प्रमुख दिवाळी अंकात किंवा नियतकालिकात वा अनियतकालिकात यांच्या कविता वाचल्या नव्हत्या. पण नियमित वाचकांसाठी हे मान्यवर कवी प्रमाणस्थानी होते. अशा मान्यवर कवींचा शब्द कवितेच्या नियमित वाचकांसाठी प्रमाण होता. या मान्यवर कवींनी ज्या कवितांना चांगलं म्हणून प्रस्तावना लिहिली आहे त्या कविता चांगल्याच असणार यावर त्याची श्रद्धा होती. त्यामुळे कवितेचा नियमित वाचक अशा मान्यवर कवींच्या प्रस्तावना वाचून पुस्तक विकत घेऊ लागला आणि कवितासंग्रह वाचून निराश होऊ लागला. त्याच्या मनात नव्या कवी आणि कवितांविषयीची विश्वासार्हता तर संपलीच पण प्रस्तावना लिहून देणाऱ्या प्रस्थापित कवींबाबतची विश्वासार्हताही संपली. कवितेचा नियमित वाचक या नव्या कवितांपासून, नव्या कवीपासून तर दूर गेलाच पण खोटी प्रस्तावना लिहून देणाऱ्या प्रस्थापित कवीपासूनही दूर जाऊ लागला. अशी खोटी प्रस्तावना लिहून देणारे कवी, जे त्याच्यासाठी आदर्श होते, ज्यांच्या कवितेतला आदर्शवाद त्याला भावला होता, त्याला तडा गेला. यामुळे त्या कवीसोबत त्याच्या कवितेतला आदर्शवाद आणि ती कविता त्याला खोटी वाटू लागली आणि नव्या कवींच्या कवितांसोबतच अशा दिग्गज जुन्या कवींच्या कवितासंग्रहांचीही मागणी कमी होऊ लागली. यामुळे विक्रीच होणं कमी झाल्यावर काही ग्रंथविक्रेत्यांनी कोणतेही कवितासंग्रह विक्रीसाठी ठेवणे बंद केले.

## ६. जुजबी किंवा अजिबातच वाचन न करणारे साहित्यिक

वाचनसंस्कृतीच्या उतरत्या भाजणीला आणखी एक गोष्ट कारणीभूत ठरली आणि ती म्हणजे वाचन न करणारे साहित्यिक. पूर्वसुरींच्या लेखक-कवींचे वाचन अफाट असायचे. विषयाचे ज्ञान, आकलन, वैचारिक आणि तात्त्विक बैठक पक्की असायची. पण खूपदा जाणवते की नव्या पिढीतल्या बहुतांशी लेखक कवींचे वाचनच मुळात तोकडे आहे. त्यामुळे अशा जमिनीत पेरणार काय आणि उगवणार काय? मग जे काही उगवते ते वाचकाला पचत नाही.

काही लेखक-कवींना तर 'मला वाचायला वेळच मिळत नाही यार' हे काहीही खंत न वाटता बोलतानाही ऐकलंय. मागे एका कवयित्रीचा फोन आला. तिनं सांगितलं की 'अमुक अमुक

ब्लॉगस्पॉट'वर माझ्या कविता टाकल्यात त्या वाच.' मी तिला विचारलं, 'इंटरनेटवर जगभरातल्या लेखक कवींचे नाटककारांचे साहित्य त्यांच्या जीवनविषयक माहितीसह उपलब्ध आहेत. जॉ पॉल सार्त्र, जॉ पॉल जिने, बर्टोड रसेल, दस्तयेवस्की, ताओ ते चिंग, खलील जिब्रान, रविंद्रनाथ टागोर, टॉलस्टॉय, व्हर्जिनिया वुल्फ ते फर्नांडो पेसो, सिल्व्हिया प्लाथसारख्या आहेत तू कुणाचं काही वाचलंयस का?' तर ती म्हणाली, 'तितका वेळ नाहीय माझ्याकडे.' मी म्हटलं, 'नेटवर कविताकोश डॉट ओआरजी, साहित्यकोश डॉट ओआरजी सारखी अप्रतिम साईट आहे ज्यावर जगभरातल्या साहित्याचे हिंदी अनुवाद आहेत, माहीत आहे का? तर म्हणाली, 'हो पण अजून पाहिलं नाहीय.' मी म्हटलं, 'इतकं सगळं नेटवर पडलंय की ते वाचायचं म्हटलं तर एक जन्म पुरणार नाही. पण ते वाचण्याचं सोडून तुम्ही स्वतःच्याच प्रेमात कसं राहू शकता?' स्वतः काहीही न वाचणारे हे तथाकथित लेखक कवी मात्र आपली पुस्तके छापून ती इतरांनी वाचावी म्हणून प्रचंड आग्रही असतात.

**७. नव्या माध्यमांचा उपयोग**

सध्या 'व्हॉट्सॲप' हे एक अत्यंत उपयुक्त साधन वाचकांसाठी उपलब्ध झाले आहे. परंतु या साधनाचा उपयोग कशासाठी होताना दिसतो, तर त्यावर स्वतःच्याच कवितांचे फड रंगलेले असतात.



'मी सध्या काय वाचतो आहे' याविषयी खूप कमी सदस्य पोस्ट टाकतात. याचा अर्थ असा होतो की अशा समूहातले सदस्य एकतर वाचत नसावेत किंवा आपण जे काही वाचतो आहे त्याचं मूल्यांकन त्यांना करता येत नसावं. माझ्याकडल्या अनेक व्हॉट्सॲप समूहांपैकी पालघर तालुक्यातील संतोष संखे नावाच्या मित्राचा, 'ऋतुगंध' नावाचा समूह असा आहे ज्यावर मी कोणतं पुस्तक वाचलं यावर टिपण्णी असते या समूहावर आपण कोणतं पुस्तक सध्या वाचतो आहे आणि ते पुस्तक कसं आहे हे मांडण्याची चढाओढच असते. या समूहात वर्जेश सोलंकी, फ ेलिक्स रोडिक्ससह, विवेक कुडू, नागेश कांगणे यासारखे नव्या पिढीचे लेखक कवी आहेत पण वाचक अधिक आहेत.

'कविता अनुदिनी' हा एक चांगला व्हॉट्सॲप समूह आहे ज्यावर दर दिवशी एका कवितेवर चर्चा केली जाते. अमेरिकेत स्थायिक असलेले मंदार फडके ही व्यक्ती सदर चालवते. याव्यतिरिक्त हिंदीतील दोन समूह असे आहेत ज्यांचा आदर्श इतर समूहांनी ठेवायला हवा. हिंदीतील साहित्यिकांनी बनवलेल्या या समूहापैकी पहिला समूह 'बिजुका'. या समुहाचे सात विभाग असून सातही समूहात हिंदी मराठी भाषेतील मान्यवर साहित्यिकांची उपस्थिती आहे. याप्रमाणेच 'दस्तक' नावाचा समूह असून त्याचे 'दस्तक महाराष्ट्र', 'दस्तक बिहार', 'दस्तक दिल्ली' असे इतर राज्यातही समूह आहेत. या दोन्ही समुहाचे विशेष हे आहे की कुणीही साहित्यिक मग तो कितीही मोठा असला तरीही तो थेट समूहावर कोणतीही पोस्ट टाकू शकत नाही. त्याला टाकायचा संदेश तो समूह संचालकाला पाठवतो. समूह संचालकाला तो संदेश योग्य वाटला तरच तो संदेश रविवारीच समुहावर दिसतो शनिवार आणि रविवार हे दोन दिवस सगळ्यांसाठी खुले असतात. या दोन दिवशी एखादा सामाजिक विषय चर्चेसाठी घेण्यात येतो आणि सगळे त्यावर व्यक्त होत राहतात. दर सोमवारी समूह संचालक समुहावर एखाद्या कवीच्या कविता वा लेखकाची कथा वा साहित्य नाव न देता टाकतो आणि मग त्या साहित्यावर चर्चा होत राहते. आठवडाभर ही चर्चा चालते आणि शुक्रवारी त्या साहित्यिकाचे नाव जाहीर होते. या अशा माध्यमामुळे वाचकांना काय वाचावे, कोणते लेखक वाचावेत, याची दिशा मिळते.

फेसबुक या माध्यमाचाही अशा पद्धतीने सकारात्मक उपयोग होतोय तो 'विनम्र भाबल' या वाचकाकडून. विनम्र भाबल हा सहजसुंदर अभिनय करणारा अभिनेता आहे. 'माझे पती सौभाग्यवती' या मालिकेत आणि 'रेडू'सारख्या चित्रपटात आपण त्याने केलेल्या सुंदर भूमिका पाहिल्या आहेत. विनम्र जितका चांगला नट आहे तितकाच चांगला वाचक आहे. त्याने फेसबुकवर 'वाचनवेडा' नावाचं एक पेज तयार केलं असून त्यावर सगळे वाचक आपण वाचलेल्या पुस्तकाविषयी पोस्ट टाकत असतात यामुळे वाचकाला नव्याने आलेल्या पुस्तकात कोणती पुस्तके वाचावीत हे कळतं.

**८. वाचकांच्या गरजेनुसार पुस्तकांच्या किमती**

आणखी एक घटक पुस्तकापासून वाचकांना प्रामुख्याने कवितेच्या वाचकाला दूर नेण्यासाठी कारणीभूत ठरला तो म्हणजे पुस्तकाच्या किंमती. सोप्या झालेल्या पुस्तक छपाईप्रक्रियेमुळे आणि नव्याने बाजारात प्रविष्ट झालेल्या प्रकाशन संस्थांमुळे नव्या कवी-लेखकांच्या सोबतच जुन्या व प्रस्थापित लेखकांचे कस नसलेले साहित्यही येऊ लागले. नियमित वाचक असे कस नसलेले साहित्य महागडी किंमत देऊन विकत घेतल्यावर निराश होऊ लागला. त्यामुळे पुस्तके खरेदी करून वाचणाऱ्या वाचकांनी त्यांना वाचावीशी वाटलेली पुस्तके वाचनालयातून वाचण्यास सुरवात केली. एखादे पुस्तक प्रसिद्धीस आल्यावर त्यावर परिक्षणे व चर्चा झाल्यावरच लोक ते पुस्तक स्वतःच्या संग्रहासाठी विकत घेऊ लागले. म्हणजेच वाढलेल्या किंमतीमुळे लोक आता चांगलं असेल तरच पुस्तक खरेदी करू लागले.

मला नेहमी हिंदी पुस्तक प्रकाशकांचे अप्रुप वाटते. रेल्वे स्टॉलवर मला कैफी आझमी, निदा फजली, मीर, गालिब, प्रेमचंदपासून आताच्या धुमिल, मोहन राकेश, कमलेश्वर, राजेंद्र यादव, मृदुला गर्गपर्यंत सगळ्यांचे साहित्य ५० रुपयात मिळतात.

रेल्वे स्टॉलवर त्यांचा खप फिल्मफेअरच्या बरोबरीने होतो याचा हेवा वाटत असतानाच लक्षात येतं की हे प्रकाशक-साहित्यिक 'कंटेन्ट' महत्त्वाचा मानतात. लेआऊट, कागद, छपाई सगळ्या गोष्टी दुय्यम म्हणूनच कदाचित ती पुस्तके स्वस्त असतात. तीच पुस्तके चांगला लेआऊट, कागद छपाई, वापरून हार्डबाऊंडही काढतात म्हणजे ज्याला संग्रहासाठी पुस्तक हवे वाटते त्याने हार्डबाऊंड घ्यावे. मराठीत मात्र असा पर्याय नाही. मला आठवतंय कॉलेजमधे असताना पैसे नसल्यानं कित्येक पुस्तके मी किंमती पाहून विकत घेण्याचे टाळलेय. आज मराठी म्हणवणाऱ्या महाराष्ट्रातल्या कोणत्याही रेल्वेस्टॉलवर किंवा बस डेपोच्या स्टॉलवर गेलात तर तिथे ९० टक्के हिंदी आणि इंग्रजी साहित्याची पुस्तके दिसतात. मराठी प्रकाशकांनी या गोष्टीचा धंदेवाईक दृष्टीने विचार करायला हवा.

प्रवासात माणसाला विरंगुळा हवा असतो. अशी व्यक्ती वाचक असेलच असं नाही. त्याचा कल मासिके घेण्याचा असतो पण अशा वेळेस एखादं मुखपृष्ठ वा पुस्तकाचं नाव त्याला आकर्षित करू शकतं. पण त्यावेळेस त्या पुस्तकाची किंमत जर कमी असेल तरच तो ते पुस्तक विकत घेईल. हा नियमित वाचक नसतो. हाच नियमित वाचक करायला हवा. अशा वेळी आपण कागदाची प्रत इत्यादीवर भर न देता त्याला लगेच घ्यावंसं वाटेल अशा किमतीत ते पुस्तक दिल्यास विक्री वाढेल. हे वेळ जपण्यासाठी वाचणारे नियमित वाचक होतीलही. ज्या दिवशी रेल्वे स्टॉलवर ९० टक्के मराठी लेखकांची पुस्तके दिसतील तो दिवस मराठी साहित्यासाठी सुवर्णदिन असेल.

### ९. पुस्तक प्रकाशन आणि विक्री

वाचकांची गोची होण्यास कारणीभूत ठरलेला आणखी एक घटक म्हणजे 'सी ग्रेड' पुस्तके खरेदी करणारी काही वाचनालये आणि ग्रंथपाल. पुस्तक प्रकाशन ज्ञानदानाचं कार्य आहे या भावनेनं पुस्तक प्रकाशित करणाऱ्या संस्थांपेक्षा दुर्दैवाने अशा प्रकाशन संस्थांची संख्या जास्त आहे ज्यांचे ध्येय फक्त पैसे कमावणे हेच आहे. अशा 'सी ग्रेड' प्रकाशन संस्था अनेक नव्या लेखक-कवींना गाठतात. त्यांच्याशी टक्केवारी ठरवतात आणि मग त्यांच्याच पैशातून पुस्तके छापून त्यातील काही प्रती लेखक-कवींना देतात आणि व्यवहार पूर्ण करतात. पण खरा व्यवहार त्यानंतर सुरू होतो. सगळ्या अनुदानित वाचनालयांचं त्याच्या वार्षिक पुस्तक खरेदीच बजेट ठरलंलं असत. आणि ज्या वाचनालयाला अशा खरेदीत काळंबेरं करायचं असतं अशा वाचनालयाशी या 'सी ग्रेड' प्रकाशंन संस्थांचे व्यवहार ठरलेले असतात. असे 'सी ग्रेड' प्रकाशक आपली न खपणारी, लेखकाच्या पैशातूनच छापलेली पुस्तके अशा वाचनालयाला विकतात. यामुळे वाचनालयाचे पदाधिकारी, प्रकाशक यांना आर्थिक फायदा होतो लेखकाचे पुस्तक प्रकाशित होते. परंतु वाचकांच्या पदरी सी ग्रेड लेखकांची पुस्तके पडतात. परंतु अशी पुस्तके वाचल्यावर वाचक निराश होतात आणि नवे लेखक जर इतकं वाईट लिहीत असतील तर जुन्याच लेखकांची पुस्तके पुन्हा वाचतो असं म्हणत ही वाचक मंडळी पुन्हा जुन्याच साहित्यिकांकडे वळतात. यामुळेच कदाचित ग्रंथालयातील काही काही वाचकांना वर्जेश सोलंकी, मंगेश नारायणराव काळे, पी. विठ्ठल, विनायक येवले, संतोष पवार माहीत नाही. अजय कांडर, प्रवीण बांदेकर, आनंद विंगकर, आनंद जातेगावकर, नितीन रिंढे, निखिलेश चित्रे, प्रतीक पुरी, हृषिकेश गुप्ते, अवधूत डोंगरे, रश्मी कशेळकर, एकनाथ आव्हाड, अनुराधा नेरूरकर, स्वप्नील शेळके, कल्पना दुधाळ, संदेश ढगे अशी अनेक नावे माहीत नसतात.

कधी कधी असेही होते की काही वाचनालये चांगल्या लेखकांची पुस्तकेही आणतात पण वाचक जेव्हा अशा नव्या लेखक कवींची पुस्तके मागतात तेव्हा काही ग्रंथपालांचेच वाचन नसल्याने त्यांना हे लेखक कवी माहीत नसतात. त्यांच्यासाठी ही नावे नवी असतात किंवा त्यांना पुस्तके शोधण्याचा कंटाळा येतो आणि मग असे ग्रंथपाल ते पुस्तक आमच्याकडे नाही म्हणून सांगतात. अशावेळी एखाद्या ग्रंथपालाच्या कृतीमुळे वाचकाला तर विन्मुख परतावे लागतेच पण ग्रंथालय आणि इतर ग्रंथपालाचेही नाव खराब होते.

### १०. पुस्तक विक्रेते


हा मुद्दा वाचकांच्या अनुषंगाने किती महत्त्वाचा आहे हे मांडण्यासाठी मी तुमच्यापुढे आधी दोन उदाहरणे ठेवतो.

उदाहरण एक : आपण अनेक वेळा साड्यांच्या वा कपड्यांच्या दुकानात खरेदीसाठी जातो. दुकानात शिरताच स्वागत होतं आणि विक्रेता विचारतो काय हवंय? आपण आपल्याला साडी वा शर्टपीस वा शर्ट वा पँट हवीय सांगतो. दुकानदार रंग विचारतो. आपण एक रंग सांगतो आणि दुकानदार त्या रंगाच्या दहा-बारा किंवा असतील तितक्या शेडस समोर मांडतो. आणि त्या कपड्यांचं वैशिष्ट्य सांगत सुटतो.

उदाहरण दोन : नुकतंच 'महाअनुभव' मासिकाचे संपादक आनंद अवधानी यांनी त्यांच्या बाबतीत घडलेला एक किस्सा सांगितला. त्यांचा मित्र आणि त्यांनी भेटीची जागा पुण्यातील एका पुस्तकाच्या दुकानापाशी ठरवली. आनंद अवधानी जेव्हा त्या ठिकाणी गेले तेव्हा मित्राचा निरोप आला की त्याला यायला थोडा उशीर होत आहे. आता अर्धा-एक तास काय करायचे, म्हणून अवधानी त्या पुस्तकाच्या दुकानात शिरले आणि पुस्तके चाळू लागले. जवळपास तासभर आनंद अवधानी दुकानात पुस्तके चाळत होते. पण या एक तासात दुकानातील विक्रेत्याला एकदाही त्यांना कोणते पुस्तक हवे आहे किंवा ते कोणती पुस्तके चाळताहेत याची चौकशी करण्याची गरज वाटली नाही. आपण एखाद्या मराठी पुस्तकाच्या दुकानात जातो आणि तिथला कुणी ढुंकूनही आपल्याकडे पाहात नाही. वाचक ही व्यक्ती सामान्य ग्राहक नसते. ती व्यक्ती अनेक पुस्तके वाचून एक वैचारिकता आलेली असते. समाजात घडणाऱ्या अनेक गोष्टींवर त्यांचे स्वत:चे विचार असतात,

त्यांची तात्त्विक आणि वैचारिक बैठक पक्की झालेली असते. या ग्राहकांत अनेक प्राध्यापक, शिक्षक आणि मान्यवर व्यक्ती असतात. कपड्यांच्या दुकानातल्या ग्राहकापेक्षा या ग्राहकाची पात्रता नेहमीच आदरणीय विभागात मोडणारी असते. आणि हा आदरणीय ग्राहक जेव्हा त्याच्या आवडत्या दुकानात शिरतो तेव्हा त्याच्याकडे कुणी ढुंकूनही पाहात नाही. मग हा ग्राहक दुकानाच्या काउंटरवर जातो. त्याला हवं असलेलं पुस्तक सांगतो आणि पुस्तक विक्रेता त्याला हवं असलेलं पुस्तक काढून त्याच्यापुढे टाकतो. हो टाकतोच. साड्या, कपडे, दागिने ज्या अदबीने, नजाकतीने आणि आपल्या समोर ठेवली जातात त्या अदबीने खरंतर पुस्तके का ठेवली जात नाहीत, हा प्रश्न मला नेहमी पडतो. पुस्तकांविषयीचा अनादर विक्रेत्याच्याच मनात असेल तर तो साहजिकच पाहणाऱ्यांच्या मनातही घर करणारच.

आता कुणी म्हणेल साड्या, कपडे मळतात आणि दागिने महाग असतात म्हणून तसे अदबीनं ठेवले जातात, तर माझ्या मते पुस्तकेही अनुचित प्रकारे हाताळल्याने मळतात आणि पुस्तके तर खूपच अमूल्य असतात. कपडे आणि दागिन्यांमुळे शरीर उजळून निघतं आणि पुस्तकांमुळे विचार उजळून निघतात. कपडे, दागिने शरीरावरून उतरवले की आपण पुन्हा होते तसे दिसू लागतो. परंतु पुस्तक वाचून संपल्यावर आपण अधिक सुंदर दिसू लागतो. ग्रंथविक्रीच्या साखळीतला पुस्तकविक्रेता हा दुवा नेहमीच दुर्लक्षित राहिला. आपण त्याकडे लक्षच दिलं नाही. त्याला नीट प्रशिक्षित केलं नाही.



स्ट्रँड बुक स्टॉल नावाचे एक ग्रंथदुकान मुंबईच्या फोर्ट भागात अनेक वर्षे चालू होते. या दुकानाचा लौकिक असा होता की इंग्रजी भाषेतील कोणत्याही पुस्तकाची मागणी तुम्ही त्यांच्याकडे केलीत की ते पुस्तक तुमच्यासाठी आणण्याचा आटोकाट प्रयत्न त्या दुकानाचे मालक करीत असत. या दुकानाच्या मालकांचं नाव होतं शानभाग. शानभाग हे स्वतः चांगले वाचक होते. त्यांना विविध पुस्तके वाचण्यात रस होता. त्यामुळे स्ट्रँड बुक स्टॉलमध्ये कुणी एक पुस्तक मागितलं की त्या लेखकाची इतर पुस्तके शानभाग त्या वाचकाला सुचवायचे. त्या पुस्तकातील कथेचा गोषवारा सांगायचे आणि मग एक पुस्तक घ्यायला आलेला वाचक पिशवी भरून पुस्तके न्यायचा. शानभाग होते तोवर हे दुकान पुस्तके आणि ग्राहकांनी भरलेलं होतं. पण शानभाग गेले आणि ही परिस्थिती बदलली. ग्राहकांची सँख्या रोडावली आणि काही वर्षातच हे स्ट्रँड बुक स्टॉल बंद करावं लागलं. लक्षात घेण्यासारखं आहे की काळ तोच होता, वाचक तोच होता, पुस्तकाचे दुकानही तेच होते फक्त पुस्तक विक्रेता बदलला आणि दुकान बंद पडलं.

शानभाग जे काम करीत होते तसंच काम मराठीत पुस्तक पेठ पुण्याचे संजय भास्कर जोशी, नाशिकचे निखिल दाते इत्यादी मंडळी करीत आहेत. यांना तुम्ही एका लेखकाचं पुस्तक विचारा ही मंडळी त्या लेखकाची दहा पुस्तके तुमच्यापुढे ठेवतील आणि त्या पुस्तकाचा गोषवारा सांगतील. पुस्तक पेठेत जाऊन संजय भास्कर जोशी यांना जेव्हा एखादा ग्राहक एखादे पुस्तक मागतो तेव्हा संजय भास्कर जोशी त्या वाचकाच्या आवडीची इतर पुस्तके काढून त्या पुस्तकांत काय कंन्टेट आहे, कशी रूचकता आहे ते सांगत सुटतात. कधी त्याचा इगो सुखावत, तर कधी ''अरे तुम्ही हे वाचलं कसं नाही?'' म्हणत अनेक पुस्तकं त्यांना सुचवितात आणि मग एक पुस्तक घ्यायला गेलेला वाचक दहा पुस्तके घेऊन तिथून बाहेर पडतो.

कपड्यांच्या दुकानात, साड्यांच्या दुकानातल्या विक्रेत्याला विचारलंत तर तो ते कापड कॉटन आहे सिल्क आहे हे सांगू शकतो त्या कपड्याची वैशिष्ट्ये सांगू शकतो दागिन्यांच्या विक्रेत्याला विचारलंत तर त्या डागाचं वैशिष्ट्ये सांगू शकतो चप्पलशूजच्या दुकानाचा विक्रेता त्या चप्पलेचं लेदर कोणतं आहे हे सांगू शकतो पण मराठीत असे पुस्तक विक्रेते आहेत ज्यांना पुस्तकात नेमकं काय आहे हे सांगता येत नाही. ते फक्त पुस्तकाचं नावं सांगितल्यावर तुमच्यापुढे पुस्तक फेकतात आणि बिल बनवतात.

### ११. अनाकलनीय लिहिण्याचा आलेला ट्रेंड

१९६०-७० पर्यंत मराठी वाचक कवितेचे बोट धरून होता. त्या काळात शिक्षकांनाही कविता शिकवायला आवडायचे. या काळातली जुनी माणसे अजुनही कविता शिकवताना रंगून जाणाऱ्या शिक्षकांच्या आठवणी सांगतात. त्यावेळी शिक्षक कवितांचे अर्थ त्यातल्या प्रतिमा, प्रतिके यांचा उलगडा करत उदाहरणे देत कवीला काय म्हणायचे हे कवितेतल्या शब्दांपलीकडे जाऊन शिकवित आणि विद्यार्थ्यांना कवितेची एक वेगळीच अनुभुती मिळे. कविता समजल्यावर एखादे कोडे वा गणित उलगडल्याचा आनंद होई. मग त्या अर्थाचा नाद धरत ती मुले तालावर कविता गुणगुणत घरी येत. अंगणातल्या झोपाळयावर बसून आई-बाबांना त्या कवितेचा अर्थ सांगत. पुन्हा नव्याने शिकत. नवा अर्थ मिळवत. पण हे थांबले ते नव्याने रूजू झालेल्या शिक्षकांच्या कवितेबाबतच्या औदासिन्यामुळे. बरोबरच आलेल्या शैक्षणिक स्पर्धेमुळे आणि स्वतःस उत्तराधुनिक म्हणवून घेणाऱ्या तथाकथित कवींच्या कवितांमुळे. या नव्या पिढीतील साहित्यिकांना नवं काहीतरी दयायचं होतं किंवा आपण काहीतरी वेगळं लिहितोय हे दाखवायचं होतं. जुन्या चौकटी त्यांना मोडायच्या होत्या. जुन्या साच्यांची मोडतोड करून त्यांना स्वतःचे नवे साचे बनवायचे होते. पण यासाठी लागणारी तयारी त्यांच्याकडे नव्हती. नव्या साच्यासाठी लागणारी स्वतःची सामग्री त्यांच्याकडे नव्हती.

त्या स्वतःच्या वेगळ्या शैलीवर लागणारी हुकूमत त्यांच्याकडे अजून आलेली नव्हती. आणि महत्त्वाचं म्हणजे या शैलीविषयी वाचकाचं काय मत आहे हे आजमावून घेण्याची त्यांची इच्छा नव्हती. त्यांनी ते समजून घेण्यासाठी कधी प्रयत्नही केले नव्हते. मग अशा कवी कथाकार आणि कादंबरीकारांनी आपण किती वेगळं लिहितोय हे दाखवण्यासाठी लिहिण्यास सुरवात केली आणि ते स्वतःच प्रकाशित करण्यास सुरुवात केली. अशा साहित्यिकांच्या समीक्षक मित्रांनी अशा पुस्तकांची वृत्तपत्र-मासिकांतून जोरदार वाखणणी केली आणि वाचकाची दिशाभूल झाली. वाचकाने हे काहीतरी वेगळं आहे म्हणून त्या पुस्तकांची खरेदी केली आणि मुद्दाम अनाकलनीय लिहिलेल्या कविता, कथा, लेख त्याला समजेनासे झाले. आणि सरसकट सगळे नवे साहित्यिक हे भंपक आहेत असे म्हणत तो वाचक पुन्हा जुन्या लेखकांकडेच चालता झाला. परिणामी असे भंपक लेखक-कवी-साहित्यिक कालांतराने बाद झालेच पण यामुळे असलेला वाचकही बाद झाला.

**१२. लिहिण्याआधी वाचक समजून घेण्याचा अभाव**

नाटक सिनेमा आणि मालिकालेखनाच्या वाईट बाजू जशा आहेत तशाच चांगल्या बाजूही काही आहेतच. त्यातली एक महत्त्वाची चांगली बाजू ही की इथे आजचं चांगलं काम उद्या मरणार असतं. त्याचा मृत्यू ठरलेला असतो त्यामुळे उद्याही तुम्हाला चांगलंच द्यावं लागतं. तुम्ही तुमच्या एका चांगल्या कामावर आयुष्यभर लेखक म्हणून जगू शकत नाही. जे द्यायचं आहे ते आज आत्ता आणि चांगलंच.



आता या 'चांगलं' या शब्दाची व्याख्या प्रत्येक जण वेगवेगळी करेल आणि ती अनेकवेळा रास्तही आहेच पण मालिका नाटक आणि सिनेमा करताना आधी आपण हे कुणासाठी करतोय हे समजून घेणं ही पहिली अट असते. आपला निर्धारित प्रेक्षक कोण आहे हे समजून घेतलं जातं त्याचे विचार, त्याची विचार करण्याची पद्धत समजून घेतली जाते.

ग्रंथलेखनाच्या बाबतीत लेखकाने स्वतःच्या मनास वाटेल तेच लिहावं हेच गृहितक असलं तरी ते वाचणारा वाचक कुठेतरी असतोच आणि शेवटी आपण लिहिलेलं त्याच्याकडेच जाणार असतं हेसुद्धा लक्षात घेण्याची गरज आहे. वाचकशरणता नसावी वाचकाच्या मागणीनुसार पुरवठा नसावा पण वाचक हा समाजाचा घटक असतो त्यामुळे वाचकभिमुखता असावीच. वाचकाच्या मानसिकतेचा अभ्यास नसणं म्हणजे समाजाचाच अभ्यास नसणं.

मागे एका मित्राने विचारलं माझा कवितासंग्रह कसा वाटला. मी म्हटलं मी ट्रेनमध्ये वाचत होतो तर शेजारी बसलेल्या पुस्तक न वाचणाऱ्या मित्राने घेतला आणि तो ते पुस्तक वाचू लागला. काही वेळाने परत देताना मी त्याला विचारलं की कशा वाटल्या कविता. तर तो म्हणाला नुसती यादी. यात कविता कुठेय?

हे ऐकताच तो कवीमित्र म्हणाला, 'आम्ही अशा मूर्ख लोकांसाठी लिहितच नाही. तू त्याला कशाला दिलंस वाचायला.'

मी म्हटलं, 'अरे उलट अशा लोकाचंच मत महत्त्वाचं असतं. आणि तुला अशा लोकांनी वाचू नये वाटतं तर मग तू हजार पुस्तके का छापलीस? तुझ्यामते मराठीत इंटेलेक्चुअल लोक पाचशेच्या पुढे नाहीत.'

नारायण सुर्वे त्यांच्या 'जाहीरनामा'मध्ये लिहीतात की हया पृथ्वीच्या उपखंडात आपण राहणारे लोक हे गर्दीतच राहतो वावरतो आणि एखाद्या दिवशी गर्दीतूनच स्मशानाकडे वळतो. तेव्हा पाण्यातील खोली कळायची असेल तर पाण्यात उतरावे. निव्वळ किनाऱ्यावर उभे राहून पाण्याच्या पातळीविषयी वायफळ तर्कवितर्क करण्यात काय हशील आहे.

**१३. ज्या समाजासाठी लिहितात त्या समाजात काम करणारे साहित्यिक किती आहेत?**

वाचकांची कमी ही दुरावस्था फक्त मराठीत नसून इतर भारतीय भाषांतही थोड्याफार फरकाने आहेच. आणि वाचकसंख्या कमी असण्याची कारणेही थोडयाफार फरकाने तीच आहेत. बंगाल आणि केरळ राज्यात परिस्थिती काही प्रमाणात सकारात्मक आहे. बंगाल, केरळ आणि महाराष्ट्र या तीन राज्ये आजवर नेहमी सांस्कृतिक आणि सामाजिक चळवळीत अग्रेसर राहिली याचे कारण या राज्यातील लोकांचे प्रगल्भ वाचन आणि लेखन. पण माझ्या या महाराष्ट्रातील लोकांच्या वाचन आणि लेखनाविषयक अभिमानाला टाचणी लावली ती काही वर्षापूर्वी केरळहून साहित्य अकादमीची प्रवासवृत्ती घेऊन महाराष्ट्रात अभ्यासासाठी आलेल्या नव्या पिढीच्या जयचंद्रन या कवीने. कवी जयचंद्रन हा केरळ राज्यात सर्वपरिचित असलेल्या सुर्या टीव्हीत कार्यरत होता. प्रथम भेट झाल्यानंतर जयचंद्रनने विचारले की मराठीतले किती आणि कोणते लेख, राजकारण आणि सामाजिक चळवळीत सक्रीय आहेत. आणि मी सटपटलो. जी नावे आठवली ती सांगितली. तसं तो म्हणाला केरळमधे फक्त ५ वर्षात केरळ कोणत्याही यांत्रिकीकरणाशिवाय प्रगत, स्वावलंबी व आर्थिकदृष्ट्या सबळ झाला. याचे कारण राजकारणात आणि सामाजिक चळवळीत लेखक आणि कवी अतिशय सक्रीय होते. आज केरळ राजकारणातले कवी लेखकांचे प्रमाण कमी झाले असले तरी सामाजिक चळवळीत मात्र ते टिकून आहे. आजही कोणताही सामाजिक वा राजकीय प्रश्न उद्भवला की लेखक कवींचे बाईटस चॅनेलवाले तत्परतेने घेतात.त्यांच्या सामाजिक कार्यामुळे त्यांच्या शब्दांना वजनही असते. लोकांना त्यांचे विचार प्रतिक्रिया महत्त्वाच्या वाटतात ते त्यांना 'फॉलो' करतात म्हणून राजकारणीही

या लेखक कवींना वचकून असतात. या सर्व कारणामुळे अगदी तळागाळातला माणूस ही या लेखक कवींना ओळखत असतो मानत असतो. त्यामुळे त्याच्या रोजच्या जगण्यातल्या प्रश्नांना सामोरा जाणारा लिहिणारा त्यांचे प्रतिनिधित्व करणारा माणूस त्यांना आपला वाटतो.मग तो काय लिहितो हेही ते वाचू लागतात. अशा तऱ्हेने आमच्याकडे एखादा लेखक कवी तळागाळापर्यंत पोचतो. तुमच्याकडे असे किती लेखक कवी आहेत?

**१४. सरकारी पुस्तक विक्रीकेंद्राची गरज**

आधुनिकीकरणासोबत अनेक गावांचा विकास झाला शहराची स्मार्ट सिटी झाली. या स्मार्ट सिटी आणि आधुनिक शहर व गावात अत्याधुनिक सुविधांच्या उपलब्धतेचा विचार केला गेला. त्यात रस्ते, वीज, पाणी, उड्डाणपूल, वायफाय, थिएटर, मल्टीप्लेक्स उदयाने यांचा विचार केला गेला. पण वाचनालये आणि पुस्तक विक्री केंद्रांचा विचार केला गेला नाही. आज मुंबईसारख्या देशाची आर्थिक राजधानी असलेल्या शहरातही पुस्तक घ्यायचे असल्यास दादर आणि गिरगाव ही दोनच ठिकाणे आहेत. तर ठाणे जिल्ह्यात ठाणे, डोंबिवली, बोरिवली येथे दुकाने आहेत. बोरिवलीचे शब्द बुक गॅलरी बंद झाली. शहरांचा विकास झाला शहराच्या वेशी विस्तारल्या लोकसंख्या वाढली पण त्या सरासरीने सरकारी वाचनालये वाढली नाहीत असे दिसते. सरकारी पुस्तक विक्री केंद्र तर चर्नीरोडला आहे तिथेच नवी शहरे आणि नगरपरिषद, नगरपाालिका निर्माण झाल्या पण त्यातील अनेक शहरात ग्रंथालये निर्माण झाली नाहीत. सिटीज, मेट्रोपोलिटन सिटीज झाल्या पण त्यातली वाचनालये आधुनिक झाली नाहीत. नव्या शहरात काही जागा सरकारने व्यायामशाळा, मैदान, मंदिर, शाळा इत्यादीसाठी राखीव ठेवल्या पण पुस्तक विक्री केंद्रासाठी सोय केली गेली नाही. वास्तविक आताशा प्रत्येक शहरात एक इमारत असण्याची गरज आहे. जिथे पुस्तके संदर्भासाठी चाळता येतील. नव्या शहरात लागलीच देशी विदेशी दारूचे बार आले.वाईन शॉप झाले, अत्याधुनिक बॉडी फिटनेस सेंटर्सही झाली. पण बुक डेपो झाले नाहीत. प्रत्येक नगरपालिकेच्या ठिकाणी पुस्तक विक्री केंद्र सरकारने उघडल्यास वाचकांना पुस्तकांसाठी नेटवर अवलंबून राहावे लागणार नाही आणि नगरपाालिकेत येणाऱ्या नागरिकांनाही पुस्तके चाळण्याची आणि विकत घेण्याची सवय लागेल. शहरातले नागरिक बुद्धीने स्मार्ट झाले तरच शहर स्मार्ट झाले असे म्हणता येईल अन्यथा अशा शहरांना निर्बुद्ध नागरिकांचे चकचकीत शहर म्हणणे योग्य होईल.

**१५. हे काम करावे लागेल**

शेवटी एक महत्त्वाचा मुद्दा या सगळ्याच बाबतीत लक्षात येतो मांडावासा वाटतो तो डेडिकेशनचा. १९६०-७० पर्यंतचा काळ राजकारणापासून चित्रपट गीत संगीत व इतर कला या क्षेत्रातही सुवर्णकाळ होता कारण प्रत्येक क्षेत्रात प्रत्येक व्यक्ती डेडिकेटेड होती. मुगल-ए-आझम बनवताना के. आसिफला तानसेनने गायलेल्या गाण्यासाठी बडे गुलाम अली हवे होते. त्याने त्याची इच्छा नौशादसाहेबांकडे प्रदर्शित केली. नौशाद साहेबांना बडे गुलाम अलींचा चित्रपटासाठी न गाण्याचा नियम माहित होता. त्यांनी तसे सांगितले पण के. आसिफ हट्ट धरून बसल्यावर नौशादसाहेब रोज बडे गुलाम अली खाँ साहेबांकडे जाऊ लागले. खाँ साहेबांचा रियाज चालू असायचा. नौशादजी बसून रहायचे. रियाज संपला की इतरच कुठल्या तरी विषयावर बोलणे व्हायचे. नौशादसाहेबांचा 'सिनेमासाठी गा' सांगण्याचा धीर व्हायचा नाही. ते परतले की के. आसिफचा हमखास फोन 'काय झाले'. शेवटी एकदा बडे गुलाम अली खाँ साहेबांनी स्वतःच नौशाद साहेबांना विचारले की, 'क्या बात है रोज आके बैठते हो, काय हवंय.' नौशादसाहेब घाबरले. शेवटी बडे गुलाम अलींनी आग्रह केल्यावर त्यांनी चाचरत सिनेमाची ऑफर सांगितली तसे बडे गुलाम अलींनी जवळच डग्गा नौशाद साहेबांना फेकून मारला. नेम चुकल्याने ते बचावले. पळाले. पण तरीही के. आसिफने हट्ट सोडला नाही. नौशादना परत पाठवले. नौशादही अहं न बाळगता पुन्हा बडे गुलाम अली खाँकडे गेले. शेवटी बडे गुलाम अली खाँनी एक युक्ती केली. दोघांनी आपल्यामागे लागणे बंद करावे म्हणून एकदा ते नौशादना म्हणाले, 'कितना पैसा दोगे.' नौशादसाहेब ठरल्याप्रमाणे म्हणाले, 'आप कहिए.' बडे गुलाम अली खाँ म्हणाले, 'तीस हजार'. या चित्रपटाला संगीत देणाऱ्या नौशाद साहेबांना त्यावेळी कंपनी पगार देत होती महिना पाचशे रुपये. रात्री के. आसिफने फोन केल्यावर त्यांना रक्कम सांगताच तो म्हणाला, 'बस तीस हजार... माँगा तो क्या माँगा.'

हिंदी लेखक कवी लेखनास 'काम' म्हणून संबोधतात. 'काम कर रहा हूँ। काम अच्छा हुआ।' त्यातून त्यांचे डेडिकेशन झोकून देणे स्पष्ट होते. मराठीतले प्रामुख्याने नव्या पिढीतले काही कवी किती डेडिकेटेड आहेत.हे त्यांच्या वाचनावरून समजते.

मागे लोकांनी एक चारोळ्यांचे पुस्तक विकत घेऊन वाचले. एकमेकांना भेट म्हणून दिले. काही नवकवींनी धडाधड चारोळीसंग्रह प्रचंड खप झाला पण त्याच संग्रहाचा दुसरा भाग आला तेव्हा लोकांनी प्रतिसाद दिला नाही. म्हणजेच लोकांना चांगले-वाईट कळते. चांगले असेल तर लोक वाचतातच आणि ते कालातीत असेल तर टिकूनही रााहिते. जरुरी आहे ते लेखन किंवा कवितालेखनाकडे छंद म्हणून न पाहता लेखनाप्रती निष्ठा जपण्याची.

आपण आता वाचकाला काही कळत नाही. वाचक वाचत नाहीत. हे ओरडणे सोडून ठोस विचाराने लेखन आणि वाचन या विषयावर कृती करायला हवी असे वाटते.


भाकरीशिवाय दुसरा प्रकार माहीत नसणाऱ्या भारतीयांना मॅकडोनाल्डने पिझ्झा बर्गरची सवय लावली आहे. घरात दंड बैठका मारणाऱ्या देशी तरुणांना विदेशी कंपन्यांनी हेल्थ सेंटर्सचा पॉवर योगाची नवी कॉन्सेप्ट पचनी पाडली आहे. पाणी पाजणे हे सर्वश्रेष्ठ पुण्यदान मानणाऱ्या देशात पाणीही विकू लागले आहे. तेव्हा वाचक कुठून आणि कसा निर्माण करायचा याचा विचार आता सर्व


स्तरावर व्हायला हवा. वाचक कमी होत असेल तर ती वाढवण्याची जबाबदारी लेखक, कवी, साहित्यिक, प्रकाशक, पुस्तक विक्रेते यांची आहे त्याविषयी ओरडणे सोडून प्रत्येकाने समूहात आणि वैयक्तिक पातळीवर योजनाबद्ध प्रयत्न गांभीर्याने प्रयत्न करायला हवेत. तसे झाले तर परिस्थिती बदलायला वेळ लागणार नाही.

महाराष्ट्रात काही साहित्य संस्था आहेत ज्या वर्षभर दर्जेदार साहित्य पुढे आणण्याचे नवे लेखक-कवी घडविण्याचे काम करत असतात. परंतु या बाबत एक गोष्ट लक्षात येते की लेखक कवींबरोबरच सुजाण वाचक निर्माण व्हावेत असा जाणीवपूर्वक प्रयत्न केल्याचे दिसत नाही. वाचन संस्कृती कमी होतेय याचा अंदाज येताच खरंतर सगळ्या साहित्यिक संस्थांनी, प्रकाशकांनी, विक्रेत्यांनी, संपादकांनी, लेखक, कवींनी, सामाजिक संस्थांनी एकत्र येऊन या विषयावर काही उपाय करायला हवे होते. ग्रंथाली प्रामाणिकपणे तळागाळांत पुस्तके पोहोचवण्याचा प्रयत्न करीत असते. अगदी आजही शाळेत पुस्तकपेटी पोहोचविण्यासारखे उपक्रम करीत आहे पण महाराष्ट्रभर पसरलेल्या या साहित्यसंस्थांना वाचनवृद्धीसाठी काही योजना अमलात आणाव्या लागतील. फक्त संमेलने भरवून आपण श्रोते निर्माण करीत आहोत हे गेल्या अनेक वर्षात झालेल्या संमेलनातून दिसले आहे. त्यामुळे यापुढे प्रत्येक साहित्यिकाने वाचक निर्माण करण्याची जबाबदारी घेऊन तशा योजना आखल्यास वाचक आणि वाचन नक्की वाढेल. नाहीतर आजवर प्रस्थापित कवी लेखकांच्या मुलाखती, परिसंवाद आणि मनोरंजनाचे कार्यक्रम घेण्यापलीकडे नव्या पिढीत वाचन रूजवण्यासाठी काही होत नसल्याने आहे तोच जुना वाचक आणि विशेषतः संस्थेचे सभासद कार्यक्रमास उपस्थित राहिल्याने कार्यक्रमाची नुसती नोंद होण्यापलीकडे काही हाती लागत नाही..

आपल्याकडे महाराष्ट्रात प्रत्येक गल्लीत एक गणेशोत्सव एक नवरात्रोत्सव, एक दहिहंडी मंडळ, एक सत्यनारायण महापुजा मंडळ अशी मंडळे असतात. या सामाजिक संस्था आपल्याकडे वर्षभर गणेशोत्सव, नवरात्रोत्सव, कोजागिरी इत्यादी खूप कार्यक्रम करत असतात त्यात नाटक, वाद्यवृंद, फॅन्सी ड्रेस मग मुलांसाठी निबंध, चित्रकला, स्मरणशक्ती स्पर्धा घेतल्या जातात. मला वाटतं यासोबतच वाचन स्पर्धा, साहित्य स्पर्धाही घेतल्या जाव्यात. ज्याचे वाचन व आकलन जास्त त्यांना प्रोत्साहन द्यावे. अनेक नवनव्या योजना प्रत्येकांनी राबविल्या तर महाराष्ट्रातली पुढची पिढी नुसती करियरमधेच नाही तर एकूणच वैचारिकतेत व मानसिकतेत व सांस्कृतिक वर्तुळात प्रगल्भ होईल.

**– किरण येले**
भ्रमणध्वनी : ९८६९२६०७८०






# आपल्याकडील वाचनसंस्कृती श्रीमंत होती म्हणणे धाडसाचे

**अजय कांडर**

**ले**खक नेमके आपल्या साहित्यात काय लिहितो, समाज एकसंध राहावा म्हणून आपल्या लेखनातून कोणती जोखीम तो पत्करतो याच्याशीही वाचक म्हणून आपले देणेघेणे हवे. एवढी समज वाचक म्हणून आपली वाढत नसेल, तर आपला भवताल आणि आपले जगणेही आपल्याला डोळसपणे वाचता आले नाही असे समजायला हवे. याला आजची वाचन संस्कृतीबद्दलची उदासीनता जबाबदार असून त्याबद्दल काही प्रश्न पडताना त्याची उत्तरेही शोधायला हवीत!

[redacted]

दर काळात ग्रंथ वाचकांची संख्या कमी कमी होत जात असल्याचा आरोप होत आहे. पण ज्या काळात साहित्य ग्रंथ वाचले जातात ते तरी समकालीन जीवनानुभव देणारे वाचले जातात का हा खरा प्रश्न आहे. बहुसंख्येने ग्रंथ वाचन करणे आणि त्याच्याशी आपल्या जगण्याचा अन्वयार्थ लावणे या अर्थाने आपल्याकडील वाचन संस्कृती फार श्रीमंत होती असे म्हणणे फारच धाडसाचे ठरेल. बदलत्या जगण्याबरोबर साहित्य लेखनही बदलत असते. प्रगल्भ लेखक त्याच जगण्याला शब्दबद्ध करत पुढे त्याची कथा, कादंबरी, कविता करतो. पण अशा लेखनाला त्या त्या काळात सर्व स्तरातील वाचकांकडून प्रतिसाद मिळतोच असे नाही. त्यामुळे लेखकाबरोबर वाचकही प्रगल्भ होत जायला हवा. हे एकदा समजून घेतले की अशा भाषा आणि त्या भाषेतील साहित्यप्रेमाच्या दिवसांचा तकलादूपणा काय असतो आणि तो फक्त राजकीय शायनिंग पुरताच कसा मर्यादित असतो हेही लक्षात येते. त्यामुळेच 'काय वाचले पाहिजे, काय नको, याबाबत वाचकही साक्षर होण्याची गरज निर्माण झाली आहे. आपण जे वाचतो, त्याचे आपल्या जगण्याशी प्रयोजन काय, असा प्रश्न वाचकाला पडायला हवा. असे झाले नाही तर आपण जे वाचतो ते म्हणजे एक पाण्याचा बुडबुडा ठरण्याची शक्यता अधिक राहते. ग्रंथवाचन म्हणजे त्या त्या काळाचे प्रश्न समजून घेणे. आणि तो गुंता सोडविण्यासाठी माणूस म्हणून आपण अधिक समृद्ध होत जाणे. या विचाराची प्रक्रिया आपल्या डोक्यात वाचक म्हणून ग्रंथवाचना आधीपासूनच सुरू रहायला हवी किंवा आपण त्यासाठी ग्रंथ वाचनाचा आस्वाद घेत असतो, एवढा तरी विचार आपल्या मनात पक्का झालेला असायला हवा. असे झाले नाही तर आपले वाचन एक मनोरंजन ठरू शकते. वाचनात आपल्या मनाची एकाग्रता जेवढी महत्त्वाची असते किंबहुना त्याहीपेक्षा कितीतरी पटीत आपण का वाचतो? कशासाठी वाचतो? त्यातून आपल्याला कोणता विचार स्वीकारायचा आहे, आदी विचार चिंतन महत्त्वाचे असते. मात्र तेच होत नसल्याने वाचन हे एक वेळकाढू साधन बनून जाते. मग अशा प्रकारच्या वाचनातून हाती काहीच सापडत नसल्यामुळे वाचकाला एका ठरावीक मर्यादेनंतर ग्रंथ वाचनाच्या सवयीचा कंटाळाही येण्याची शक्यता असते. कविता, कथा साहित्याचा प्रारंभ मौखिक परंपरेतूनच झाला. अनेक लोकगीते मौखिक परंपरेतून शेकडो वर्षे आपल्यापर्यंत पोहचली. आपल्याकडे शिक्षण आणि लेखन संस्कृती एकाचवेळी सुरू झाल्याची काही उदाहरणे सापडतात. सावित्रीबाई फुले यांनी महिलांसाठी शिक्षणाची दारे खुली केली. मुक्ता साळवे या मुलीला गोणपटात बांधून तिच्या वडिलांनी सावित्रीबाईंच्या शाळेत आणले. पुढे मुक्ताने बालपणीच निबंध लिहिला. डॉ. आनंदीबाई जोशी या पहिल्या महिला डॉक्टर, पण प्रत्यक्षात डॉ. रखमाबाई सावे यांनी या देशात डॉक्टर म्हणून पहिली रुग्ण सेवा केली. मात्र वाचक म्हणून बहुसंख्येने याची माहिती नसते. म्हणूनच वाचकांनी साक्षर होण्याची गरज निर्माण झाली आहे. आपल्या वाचनातून जे आपल्यापर्यंत येते त्याला आपल्या जगण्याचा अर्थ लावता यायला हवा. हे या अर्थानेच असते. ते लक्षात येत नसल्याने वयाच्या पन्नाशीनंतरही आपण १८-२० वयात जे ठरावीक लेखकांचे लेखन वाचत होतो अशाच लेखकांच्या कथा-कादंबऱ्यात वाचक म्हणून आपण अडकलेलो असतो. आपण ज्या लेखकाचे लेखन वाचतो त्या लेखनातील जीवन जाणिवा आपल्या नाहीत. आपण फक्त वाचावे आणि ते त्यांचे जगणे आहे, असे संबोधून आपल्या जगण्याला त्या लेखन अनुभवाशी स्वतःला पडताळून पाहण्याची विचारप्रक्रिया आपल्यात

सुरू न ठेवणे म्हणजे वाचक म्हणून आपण आपल्यालाच पुनज्जीवित न करणे होय! वास्तविक वाचक म्हणून लेखकाने जे अनुभव विश्व लेखनात मांडले आहे ते आपण समजून घेताना माणूस वेगवेगळ्या स्तरात जगत असला तरी त्या जगण्याच्या मुळाशी दुःख-वेदना, अपार करुणा असल्याची भावना जोपर्यंत आपल्या मनात रुजण्याची प्रक्रिया सतत चालू ठेवत नाही तोपर्यंत ते त्यांचे जगणे, असे म्हणून अमुक एका समाजाचे चरित्र आणि चारित्र्य म्हणूनच आपण त्या लेखनाकडे पाहत राहणार. वाचक म्हणून आपण घडत जाताना आपल्या मनात विविध प्रकारची विचार प्रक्रिया सतत चालू रहायला हवी. यातूनच मग लेखकाच्या विचार संस्कृतीशी आपली बांधीलकी वाढत जाते. लेखकाची विचार संस्कृती म्हणजे लेखक प्रत्यक्ष लिहितो आणि त्या लिहिण्याची भूमिका जाहीरपणे घेतो याच्याशी आपले वाचक म्हणून किंवा एक माणूस म्हणून काय नाते असते, असा प्रश्न सतत वाचकाच्या मनात निर्माण व्हायला हवा. तसा प्रश्न आपल्या मनात वाचक म्हणून निर्माण होत नसेल तर एकूण समाजाशी आपले माणूस म्हणून काही देणेघेणे नाही, याचा 'संधी कोपरा' आपल्या मनात कुठेतरी दडून बसला आहे, असे आपणच आपल्याला समजून सांगायला हवे. लेखकाची विचार संस्कृती ही एकूण माणसाकडून माणसाकडे जाणारी हवी. लेखकाच्या लेखनात त्याची बिजे दिसत नसतील आणि आपल्या लेखनातून लेखक भेदाच्या भिंती उभ्या करत असेल तर तो लेखक म्हणून दुबळा आहे असे बोट दाखवण्याची समजही वाचकात वाढायला हवी. लेखकाच्या विचार संस्कृतीशी वाचक म्हणून आपण बांधीलकी ठेवतो तेव्हाच आपल्यात अशी समज निर्माण होण्याची शक्यता असते. लेखकाने लिहावे, त्याने जाहीर भूमिका घ्यावी, त्याने समाजासाठी लढावे आपले काय त्याच्याशी? आपण त्याचे लिखित साहित्य वाचावे, त्याने समाजातील अंतर्विरोध मांडले त्यातील प्रत्यक्ष जगण्याशी आपले काही देणेघेणे नाही असे समजून आपण ग्रंथांचा जर आस्वाद घेत असू तर आपल्या मेंदूची इयत्ता पहिली ते पहिलीच राहिली असेच समजायला हवे!

[redacted]

अर्थात हा सगळा विचार वाचन करून त्या वाचनातून आपण काय मिळवलं या संदर्भातील आहे. परंतु यापलीकडे जाऊन विचार केला गेल्यास खरंच चांगल्या वाचनसंस्कृतीसाठी आज तशा प्रकारचा भवताल निर्माण केला जातो आहे का? गांभीर्याने विचार केल्यावर याचे नकारात्मक उत्तर येईल. उत्तराच्या मुळाशी गेल्यावर आपल्याला अनेक गोष्टी जाणवतात. त्याचा आपण वाचन प्रेमी म्हणून अधिक सखोल, सजगपणे विचार करण्याची गरज निर्माण झाली आहे. वाचन असो किंवा कोणतीही गोष्ट निव्वळ विचारांच्या पातळीवर स्वीकारायची असेल तर तसा भवताल असणे किंवा तो निर्माण करणे हे अतिशय गरजेचे असते. मराठी वाचन संस्कृतीचा एकूण इतिहास पाहता समाजाच्या सर्व स्तरात वाचनाचा जाणून-बुजून भवताल निर्माण करण्यासाठी कसोशीने प्रयत्न केला गेला आहे, असे काही दिसत नाही. समजा तसे झाले असते तर आजही ग्रामीण भागात किंवा शहरी भागातही एकाद्या मोठ्या कुटुंबात अपवादात्मक नव्या पिढीतून एखादा वाङ्मयीन लेखन लिहू लागतो किंवा वाचनसंस्कृतीशी जोडून घेऊ पाहतो तेव्हा समाजाच्या इतर स्तरातून सोडून द्या, खुद्द त्यांच्या घरातूनच त्याला या सगळ्याच्या विरोधाला सामोरे जावे लागते. आपण मात्र याचा गांभीर्याने विचार न करता ग्रामीण भागात वाचन संस्कृती वाढायला पाहिजे, असे म्हणत राहतो आणि दुसऱ्या बाजूला एखाद्या गावात ग्रंथालय सुरू झालं असेल तर तिथे वाचकांची संख्या मात्र वाढली नाही, असा विरोधी सूर लावतो. आता प्रश्न असा राहतो की हा असा भवताल कसा बदलायचा? कोणत्याही गोष्टीला सकारात्मक प्रतिसाद देण्यासाठी आणि त्यातही प्रगल्भ वाचन संस्कृती निर्माण करण्यासाठी भवताल बदलणे तशी सोपी गोष्ट नाही. मात्र तरीही या बाबतीत काही प्रयत्न होत राहिल्यास ते अशक्य आहे असंही म्हणता येत नाही. वाचनसंस्कृतीबद्दल ग्रामपातळीवर विविध कार्यक्रम राबविणे हा एक यातला नेहमीचाच भाग झाला. परंतु असा प्रयत्न करून फार काही फरक पडलेला आहे असंही नाही. यासाठी आता वाचन संस्कृतीकडे जाण्यासाठी आधी विचारांच्या पातळीवर परस्पर संवाद वाढवीत जाणे, ही गोष्ट सतत होत राहिली पाहिजे. म्हणजे जी मुलं शिकलेली आहेत, ज्याना किमान दैनंदिन जीवनात ज्या घडामोडी घडत आहेत त्याबद्दल उत्सुकता आहे, अशांचा एक गट निर्माण करता येऊ शकतो. असे काही गट एखाद्या भागात तयार झाले तर आठवड्यातून, पंधरा दिवसातून, किंवा महिन्याभरात एकत्र येऊन आजूबाजूच्या घडणाऱ्या घटनांबद्दल चर्चा करता येते. त्या घटनांवर वृत्तपत्रात किंवा माध्यमातल्या कुठल्याही ठिकाणी कसं विश्लेषण केलं गेलं आहे याबद्दल त्या घटनेच्या मुळाशी जाऊन सविस्तर त्या गटांमध्ये साधकबाधक विचार मांडले जाऊ शकतात. यातून आजूबाजूला घडणाऱ्या बऱ्या वाईट घटनांबद्दलची त्यांच्यात जाणीव निर्माण केली जाऊ शकते. यातून तो गट पुस्तकाकडे आणि त्यातही तशा गंभीर घटनांवर लिहिल्या गेलेल्या ग्रंथाकडे वळविणे सहज शक्य होईल.

जी जी ज्ञानसाधने आहेत ती वाचनसंस्कृतीला पूरक ठरतात. असं आजवर आपण समजत आलोय. मात्र आज अशा ज्ञानसाधनांमध्ये वाचनसंस्कृतीबद्दल कमालीची उदासीनता दिसून येते आहे. आणि याबद्दल तिथल्या जबाबदार लोकांना ना खेद ना खंत, अशी सगळी बिकट परिस्थिती आहे. अगदी उदाहरण घ्यायचे म्हटल्यास याबाबत आपल्याला शाळा, माध्यमिक विद्यालये आणि महाविद्यालये यांचा विचार करता येऊ शकतो. शैक्षणिक वाटचालीत वाचन संस्कृती विद्यार्थी जोडला गेला तर तो चांगला विचार करू शकतो. एवढेच काय समाजातील काय वाईट, काय चांगलं हे ठरविण्याची त्याची मानसिकता याच काळात घडू शकते. परंतु असा विचार आताच्या या शैक्षणिक पातळ्यांवर होताना दिसत नाही. काही महाविद्यालयांमध्ये

तर वाङ्मय मंडळांची स्थापनाही होत नाही. याचे कारण म्हणजे खुद्द मराठी विषयाच्या प्राध्यापकांची भाषेबद्दलची आणि त्या भाषेतील साहित्याबद्दलची उदासीनता. ज्या महाविद्यालयात साहित्याचा विषय घेऊन मुलं पदवीधर होण्याची स्वप्न पाहतात त्याच महाविद्यालयात साहित्यविषयक विशेष गांभीर्यपूर्वक फारसे कार्यक्रम होऊ नये आणि झाले तर अगदीच हौसेच्या पातळीवर अशातून त्या महाविद्यालयातील किमान भाषेचे विद्यार्थी भविष्यात चांगल्या साहित्य वाचनाकडे किंवा एकूणच वाचनाकडे कसे वळतील, असा प्रश्न सहज उपस्थित होतो. प्राथमिक शाळा आणि माध्यमिक शाळा यांच्याबद्दल अपवाद वगळता फार काही वाचनसंस्कृतीबद्दल बोलायलाच नको. माध्यमिक शाळेचे शिक्षक साहित्यविषयक उपक्रम आपल्या शाळांमध्ये अपवादात्मक राबवताना दिसतात तर प्राथमिक शाळेतील शिक्षक यांचीही अशीच परिस्थिती आहे. या दोन्ही स्तरावरून वाचनसंस्कृतीसाठी फार काही प्रयत्न होत आहेत अशी आजची परिस्थिती नाही. मात्र यालाही काही अपवाद गोष्टी आहेत आणि त्याचं अनुकरण शाळाशाळांत होणं अतिशय गरजेचे आहे. आपल्याकडे वाचन संस्कृती उपक्रम शाळाशाळांनी राबविणे म्हणजे शासनाच्या आदेशाचे पालन करणे एवढ्याच आज्ञाधारक पद्धतीने शिक्षक कार्यक्रम राबवताना दिसतात परंतु महाराष्ट्रातील अपवादात्मक काही अशा शाळा पाहण्यात आल्या आहेत की, शासनाच्या आदेशापलीकडे जाऊन विद्यार्थी वाचनाकडे वळावा म्हणून स्वतंत्रपणे उपक्रम राबवत आहेत. या पार्श्वभूमीवर या शैक्षणिक पातळ्यांवर असे वाचनसंस्कृतीचे उपक्रम राबवून विद्यार्थी वाचनाकडे कसा वळेल याचा इथे विचार करता येईल. आता सगळ्या प्राथमिक शाळांमध्ये 'किशोर'सारखं मासिक सुरू करण्यात आलं आहे. ही खूपच खूप चांगली घटना आहे. आणि तिचं आपण स्वागत करायला हवं. काही ग्रामीण भागातील शाळांनी आपल्या शाळेच्या आवारात वाचन कट्टा निर्माण केला आहे. तिथे दिवसातून एक तास वाचनासाठी मुलांना दिला जातो. मुलं वाचन झाल्यावर आपण वाचन केलेल्या ग्रंथावर चर्चा करतात. एवढेच नाही तर वाचलेल्या ग्रंथावर शाळेमध्ये दर आठवड्याला वक्तृत्व स्पर्धा घेतली जाते. तर दुसऱ्या बाजूला शिक्षक नवनवीन आलेले ग्रंथ स्वतः वाचून त्याच्या संदर्भातली माहिती मुलांना नियमित देतात आणि त्याबद्दलची मुलांची मते जाणून घेतात. आणि आपण वाचलेले पुस्तक मुलांना हवे असेल तर त्यांना ते वाचायलाही देतात (अर्थात यासाठी आधी शिक्षकांनी वाचले पाहिजे) वाचनसंस्कृतीच्या वाढीसाठी असे उपक्रम शाळा-महाविद्यालयांमध्ये राबविणे सहज शक्य आहे.

[redacted]

वाचनसंस्कृतीच्या वाढीसाठी ग्रंथालय हा महत्त्वाचा घटक मानला जातो. परंतु आज अशी परिस्थिती निर्माण झाली आहे की वाचन संस्कृतीचा अडथळा ग्रंथालयेच ठरण्याची जास्त शक्यता दिसते आहे. अनुदान लाटण्यासाठी ग्रंथालयांची गावोगाव निर्मिती करण्यात येत आहे का? अशी परिस्थिती सार्वत्रिक दिसते आहे. ज्या ग्रंथालयांनी आपल्या ग्रंथालयात नवनवीन उत्तमोत्तम पुस्तके ठेवावीत त्या जागी किलोने विक्रीस उपलब्ध असणारी पुस्तके ठेवली जात आहेत. अर्थात महाराष्ट्रातील सर्वच ग्रंथालयांबदल हे विधान करता येत नाही. काही अपवादात्मक ग्रंथालये चांगलं काम करतायेत. परंतु ती ग्रंथालये म्हणजे ग्रंथालय चळवळ वाचन संस्कृती पुढे घेऊन जाणारा आजचा चेहरा आहे असे मात्र म्हणता येणार नाही. ग्रंथालयात चांगली पुस्तक येण्यासाठी ग्रंथपाल अभ्यासू पाहिजे. त्याला स्वातंत्र्य दिले गेले पाहिजे किंवा ग्रंथालय व्यवस्थापन कमिटीही अभिजात साहित्याची आवड असणारी हवी. मात्र अलीकडल्या काळात काही ग्रंथालयांवर साहित्यप्रेमी किंवा साहित्यिक यांची वर्णी न लागता राजकीय व्यक्तींनी ग्रंथालये ताब्यात घेतलेली दिसतात. यामागे ग्रंथालयांची भरभराट व्हावी असा त्यांचा अजिबात हेतू नाही, आपल्या शहरातील अनेक संस्था आपल्या ताब्यात असाव्यात एवढाच एक हेतू त्यांचा असतो. पुस्तक त्यांनी वाचणे ही खूप दूरची गोष्ट, पण अगदी चार पुस्तकांची नावे सांगा असं जरी विचारलं तरी त्यांना काही सांगता येणार नाही. अशा व्यक्तींच्या अधिकारात ग्रंथालये असतील तर वाचनसंस्कृतीला ग्रंथालय चळवळीच्या माध्यमातून कसं काय बळ मिळेल? असा प्रश्न उपस्थित होतोच. दुसऱ्या बाजूला अनेक ग्रंथालयांवर असणारे पदाधिकारी हे त्या त्या शहरातील स्थानिक पातळीवर लुडबुड करणारे असतात. त्यामुळे चांगली ग्रंथनिवड तर सोडूनच द्या परंतु वर्षभराचे साहित्यिक उपक्रम ग्रंथालयामार्फत राबवले जातात ते म्हणजे एक हौशीचाच मामला असतो. आधी राजकीय मंडळींच्या ताब्यातून ग्रंथालयांची सुटका करून घेण्याची गरज आहे. त्याचबरोबर स्थानिक पातळीवरचे सामाजिक, सांस्कृतिक पुढारी समजणारे वर्षानुवर्ष आपल्या शहरातील, गावातील ग्रंथालयांच्या कमिटीवर ठाण मांडून बसले आहेत त्यांना दूर करायला हवे. आणि ग्रंथालय कमिटीवर त्या त्या शहरातील जगण्याची समज असणारे, साहित्य हा समाजाचा जगण्याचाच भाग असतो याची जाणीव असणारे चांगले वाचक किंवा त्या शहरातील अभिजात साहित्याचा आग्रह धरणारे तशी भूमिका घेऊन वावरणारे साहित्यिक यांना स्थान द्यायला हवे. यातून ग्रंथालयांसाठी दरवर्षी होणारी किलोच्या भावाची ग्रंथ खरेदी थांबेल आणि दुसरीकडे पुढील वर्षभर चांगले उपक्रम ग्रंथालयामार्फत राबवले जातील.सध्या शासकीय नियमानुसार काही ठराविक उपक्रम ग्रंथालयांना राबवावेच लागतात. मग कोटा पूर्ण करण्याच्या उद्देशाने कोणतेही उपक्रम साहित्य रसिकांविना आयोजित होणं बंद होईल. मेंदूने एक रेषीय विचार करू नये म्हणून ही ज्ञानमंदिरे आपल्या ताब्यात घेण्यासाठी एक सकारात्मक राजकारण खेळण्याची कधी नव्हे एवढी आज गरज निर्माण झाली आहे!

**– अजय कांडर**

भ्रमणध्वनी : ९४०४३९५१५५




## डेमोक्रसीज इलेव्हन

**भारतीय क्रिकेटची महान गाथा**

भारतीय क्रिकेटचा आलेख उंचावत नेणाऱ्या ११ आदर्श क्रिकेटपटूंच्या कारकिर्दीचा आवर्जून वाचावा असा लेखाजोखा...

मूळ लेखक - राजदीप सरदेसाई । अनुवाद - मेघना ढोके
पृष्ठसंख्या - ५१२ । किंमत - ₹ ५९५

---

क्रिकेटमध्ये करिअर करू इच्छिणाऱ्या तरुणांसाठी पथदर्शक ठरेल अशी सचिन तेंडुलकरची आत्मकथा..

## चेस युअर ड्रीम्स

मूळ लेखक - सचिन तेंडुलकर । अनुवाद - दीपक कुळकर्णी
पृष्ठसंख्या - २४० । किंमत - ₹ २९५







## रिटर्न ऑफ अ किंग

अफगाणिस्तानातील पहिली ब्रिटिश स्वारी उधळून लावणाऱ्या मोहिमेचा रंगतदार इतिहास...


मूळ लेखक - विल्यम डॅलरिंपल । अनुवाद-अंजनी नरवणे, सुनीति काणे
पृष्ठसंख्या - ५२० । किंमत - ₹ ५९५

---

आयुष्य उध्वस्त झालेला मायकेल स्टारबक्समध्ये काम करु लागतो आणि त्याला जगण्याचं नवं सूत्र गवसतं..
स्टारबक्सनं मायकेलला दिलेला हा यशाचा फॉर्म्युला...

## हाऊ स्टारबक्स सेव्हड माय लाइफ

मूळ लेखक - मायकेल गेट्स गिल । अनुवाद - नीला चांदोरकर
पृष्ठसंख्या - २७२ । किंमत - ₹ ३२०







## प्र ति रू प

मनाच्या सैरभैर अवस्थेतही अंतर्मनाचा अंतर्वेध घ्यायला लावणारं आणि 'शमन्स' जमातीमधील आध्यात्मिक उन्नतीची शिकवण रुजवणारं.. सत्यघटनेवर आधारित कथन..


मूळ लेखक - प्रिया कुमार । अनुवाद - स्वाती काळे
पृष्ठसंख्या - १५६ । किंमत - ₹ १९५

---

थोडं वास्तव, थोडी कल्पना... या दोन्हींचं मिश्रण असलेल्या आगळ्यावेगळ्या वैशिष्ट्यपूर्ण कथा...

## तरंग

लेखक - कल्याणीरमण बेन्नूरवार
पृष्ठसंख्या - २०८ । किंमत - ₹ २५०





---

मेहता पब्लिशिंग हाउस

Email: sales@mehtapublishinghouse.com
www.mehtapublishinghouse.com
Follow us on
http://www.facebook.com/mehta.publishinghouse

Mehta eBooks
950+ Marathi books Available as e-Book
WhatsApp us on 9420594665

Available on :
Printed book - Flipkart and amazon
E-book - play.google.com/store/books
www.amazon.in/b?node=15513892031



# वाचन ही एक सर्जनशील कला आहे

**डॉ. लतिका भानुशाली**

**ले**खक आणि प्रकाशक यांना जोडणारा महत्त्वाचा दुवा म्हणजे वाचक होय. लेखक-पुस्तक-वाचक-प्रकाशक या परस्परपूरक संस्था समाज घडविण्याचे महत्त्वाचे काम करत असतात. शिक्षित समाजाचा सगळा डोलारा, साहित्य विश्वाचा संपूर्ण पसारा आणि त्यातून निर्माण होणारी विचार धारा, सांस्कृतिक विश्व हे सर्व घटक बहुतांशी 'वाचक' या घटकांवर अवलंबून असतात.

वाचन प्रक्रिया ही अत्यंत गुंतागुंतीची प्रक्रिया आहे. भारताच्या विशेषतः महाराष्ट्राच्या संदर्भात बोलायचे झाले तर सरकारी शाळांची परिस्थिती दयनीय आहे. खरंतर विद्यार्थी जस जसा वरच्या पातळीवर जातो तस तशी त्याची वाचन क्षमता विकसित व्हायला पाहिजे. हे जर घडले नाही तर विद्यार्थी कोणत्याही विषयाचे आकलन करण्यास असमर्थ ठरतो आणि एकूणच शिक्षित विश्वातून बाहेर फेकला जातो.

हा वाचक कसा घडतो हे पाहणे गरजेचे आहे. विकसित मेंदूच्या आधारे मानवाने भाषेचा विकास केला. मग ती भाषा वाचता येणाऱ्या वाचकांचा जन्म झाला. वाचन म्हणजे केवळ अक्षर ओळख नाही. लहान बालक सर्वात आधी त्याची मातृभाषा बोलायला लागतो. मग त्याला भाषेच्या छापील स्वरूपाची ओळख करून दिली जाते. त्याला आधी अक्षर ओळख होते. मग अक्षरांचे काना, मात्रा, वेलांटी, उकार, त्याची उच्चारण पद्धती याची ओळख होते. त्यासाठी प्रत्येक भाषेत वेगवेगळी चिन्हे असतात. ही ओळख झाली की बालक शब्दांचे वाचन करायला लागते. त्यावेळी बहुतांशी वाचन हे 'प्रकट वाचन' म्हणज मोठ्याने वाचणे या प्रकारात मोडते.

जेव्हा बालकाला छापील रुपाचा परिचय होऊन प्रकट वाचनाकडे वाटचाल होते तेव्हा हळूहळू तो मूक वाचनाकडे वळतो. या पुढचा टप्पा हा अत्यंत महत्त्वाचा असतो. हा टप्पा म्हणजे चिंतनशील वाचनाचा टप्पा होय.

लहान वयात जर या गोष्टींकडे लक्ष दिले नाही तर आठवी-नववीच्या पातळीवर अपेक्षित असलेले वाचनकौशल्य आत्मसात करण्यास ही मुले असमर्थ ठरतात. यामागे अनेक सामाजिक-मानसिक-बौद्धिक कारणे आहेत. विद्यार्थी जसजसा वरच्या वर्गात जातो तसतशी त्याची वाचन क्षमता विकसित व्हायला पाहिजे. दुर्दैवाने बहुतांश विद्यार्थी स्वतःहून हे कौशल्य आत्मसात करू शकत नाहीत. प्राथमिक स्तरावर वाचन, माध्यमिक स्तरावर वाचनाचे आकलन आणि महाविद्यालीन स्तरावर या दोहोंविषयी आवड निर्माण होणे अशा टप्प्याटप्प्याने प्रगती घडून येणे अपेक्षित असते.

[redacted]

विद्यार्थ्याची स्वतःची विचारशक्ती आणि शिक्षकाने त्याच्यात जागृत केलेली चिकित्सक वृत्ती या दोहोंचा योग्य संगम घडला की वाचक घडण्याची प्रक्रिया योग्य दिशेने सुरू होते.

वाचन कौशल्यात संपूर्ण व्यक्तिमत्त्व विकास अपेक्षित आहे. हे कौशल्य एका रात्रीत विकसित होऊ शकत नाही तर हे प्रयत्नपूर्वक प्राप्त करावे लागणारे कौशल्य आहे. 'सुजाण पालकत्व' हे इतर शारीरिक कौशल्यापेक्षा भिन्न कौशल्य आहे. त्यासाठी अनुभव व प्रयत्न या दोहोंची सांगड घालावी लागते.

एकदा का बालकाने अक्षर, शब्द, वाक्य ओळखणे, आकलन करणे व त्यावर स्वतःच्या प्रतिक्रिया व्यक्त करणे इतकी प्रगती केली म्हणजेच प्राथमिक वाचनकौशल्य अवगत झाले की या वाचकाचे चिंतनशील वाचकात रूपांतर होणे गरजेचे आहे. नेमक्या याच वेळी शाळेतील शिक्षक, घरातील जबाबदार व्यक्ती, ग्रंथपाल, साहित्य संस्था, प्रकाशन संस्था यांनी योग्य मार्गदर्शन करणे आवश्यक असते. कोणाच्याही मार्गदर्शनाशिवाय असे कौशल्य आत्मसात करणारे विद्यार्थी विरळ असतात. सर्वसाधारण विद्यार्थ्याचे असे कौशल्य विकसित होण्यासाठी खूप मेहनत घ्यावी लागते.

उत्कृष्ट वाचक होण्यासाठी वाचलेल्या गोष्टींचे आकलन होणे गरजेचे असते. नुसते आकलन उपयोगाचे नाही. कारण वाचलेला भाग विस्मृतीत गेला तर त्या वाचनाला काही अर्थ उरत नाही. जे वाचले ते बारकाव्यांसहित दुसऱ्यांपर्यंत पोहचवता आले पाहिजे. गुणवत्तापूर्वक वाचन हे अनेक गोष्टींवर अवलंबून आहे. उदाहरणार्थ, शारीरिक-मानसिक स्वास्थ्य, त्याच्या आवडीचे विषय, त्याची

बुद्धिमत्ता, संवेदनशीलता, अनुभव समजून घेण्याची प्रगल्भता, पुरेशी एकाग्रता, भावनिक विकास, विषय आणि भाषेचे पूर्वज्ञान इत्यादी.

ज्याच्या बुद्धिमत्तेचा चांगला विकास झालेला असतो त्याला शब्दांचे अर्थ पटकन कळतात. तो अनेक प्रकारचे वाचन करतो. शब्दसंग्रहाचा विपुल साठा त्याच्याकडे असतो. शब्दांना असणारे सामाजिक-राजकीय-सांस्कृतिक संदर्भ त्याला कळायला लागतात. याचाच अर्थ त्याचे प्रगल्भ वाचकात रूपांतर झाले.

ज्याप्रमाणे लेखक आपल्या कल्पनेच्या जोरावर प्रतिसृष्टी निर्माण करतो त्याचप्रमाणे वाचक 'वाचनकौशल्याच्या' आधारे तेच कल्पनाविश्व पुन्हा निर्माण करून त्यात रमतो. विचारांचे अनुबंध उलगडतो. म्हणूनच वाचन ही एक सर्जनशील कला आहे.

वाचनाचे व्यक्तिगत फायदे आहेत. तसेच त्याचे सामाजिक फायदेदेखील आहेत. ज्या समाजात साक्षरतेचे प्रमाण कमी असते अशा समाजात गुन्हेगारी, दंगली वाढीस लागतात. साधारणः वाचन कौशल्यात मागे असणारे लोक बेकार तर होतातच कधी कधी ते गुन्हेगारी प्रवृत्तीकडे वळण्याची शक्यता असते.

म्हणूनच लोकशाहीच्या यशस्वीतेसाठी वाचन, लेखन, सामान्य गणिती ज्ञान इत्यादी गोष्टी नागरिकांना येणे गरजेचे असते. कारण विचारी जनताच स्वच्छ प्रतिमा असणाऱ्या नेत्यांना निवडून देऊ शकते. आताच्या यंत्रयुगाच्या, संगणकाच्या दुनियेत वाचन येत नसलेला माणूस विकासापासून दूर फेकला जातो. वाचन दुर्बलतेमुळे तीव्र निराशा, असुरक्षितता, दुरावलेले नातेसंबंध, अनपेक्षित उपद्रवी वर्तन, इत्यादी मानसिक रोग होऊ शकतात. वाचनाअभावी भावनिक विकास होत नाही. अशी माणसे मग 'माणूस' म्हणून आपली संवेदनशीलता हरवून बसतात. 'वाचनदुर्बलता हेच मुलांच्या शाळा गळतीचे प्रमुख कारण आहे.' चांगले शिक्षक बनण्यासाठीही वाचनकौशल्य विकसित असलेच पाहिजे. संयमित विचारांचे नागरिक देशाच्या संतुलित विकासासाठी महत्त्वपूर्ण योगदान देतात. म्हणूनच युवा शक्ती सुसंस्कारित व सुशिक्षित व्हावी यासाठी समाजाच्या प्रत्येक घटकाकडून प्रयत्न होणे गरजेचे आहे. कारण हेच युवक लोकशाहीचे, भविष्याचे आधारस्तंभ आहेत. युवकांना आशयपूर्ण, संतुलित वाचनाकडे वळवणे हे पालकांचे, शिक्षकांचे, लेखकांचे, संपादकांचे, समाजसंस्थांचे, राजकीय संस्थांचे राष्ट्रीय कर्तव्य आहे.

[redacted]

ग्रंथ हे गुरू आहेत, ते आयुष्याला वळण लावतात हे जरी सत्य असले तरी कधी कधी ते वाममार्गाकडे, वाम विचारांकडे वळवणारे हितशत्रूही ठरू शकतात. ग्रंथ शत्रू की मित्र, हे तो ग्रंथ कोणत्या हेतूने लिहिला आहे यावर अवलंबून आहे. त्याचा आशय काय आहे यावर अवलंबून आहे. आजच्या जाहिरात-बाजीच्या युगात आणि प्रचारकी थाटाच्या बाजारू युगात कोणीही आपले भलेबुरे विचार मोहक कल्पनेच्या, मोहक भाषेच्या आडून खपविण्याचा प्रयत्न करतो. याचे समाजावर गंभीर परिणाम होतात.

चिरंतन मूल्यांचे वारसा जपणारे अभिजात, दर्जेदार साहित्य कोणते, पोकळ-सवंग विचारांचा प्रसार करणारे साहित्य कोणते याची पारख करण्याची जबाबदारी वाचकांचीच आहे. उगाचच बोलबाला करून उत्कृष्ट साहित्य म्हणून एखादी साहित्यकृती वाचकांच्या डोक्यावर मारली तरी २००-४०० वर्षांनंतर कोणते साहित्य टिकणार आहे हे त्या साहित्याच्या गुणवत्तेवरच अवलंबून आहे. संत ज्ञानेश्वर, संत तुकाराम यांच्या काळात साहित्याचा बोलबाला करणारी कोणतीही यंत्रणा अस्तित्वात नव्हती तरी अस्सल गुणवत्तेच्या जोरावर आज ८०० वर्षांनंतरही हे साहित्य अक्षर साहित्य ठरले आहे.

चिकित्सक विचार करण्याची पात्रता येण्यासाठी एकूणच वाचन दांडगे असावे लागते. उघड्या डोळ्यांनी जगाचा अनुभव घेण्याची संवेदनशीलता असावी लागते. चिकित्साप्रधान वाचक हा समतोल सामाजिक विकासासाठी महत्त्वाचा ठरतो. त्यासाठी वाचकाची भूमिका पूर्वग्रहदूषित व नकारात्मक नसावी तर स्वागतशील असावी. सारासार विचारशक्ती त्याला वापरता आली पाहिजे. साहित्यातील कच्चे धागे, बलस्थाने या दोन्हींचा त्याला वस्तुनिष्ठ विचार करता आला पाहिजे. स्वतःच्या विचारसरणीत दोष आढळला तर तो मान्य करून दुसऱ्याचे मत ग्राह्य मानण्याइतका मनाचा मोठेपणा त्याच्याकडे असावा. असे वाचकच समाजाला संतुलित, संयमित वैचारिक अधिष्ठान प्राप्त करून देतात.

साक्षरतेच्या टक्केवारीनुसार जवळजवळ पाऊण लोकसंख्या ही 'वाचक' या संकल्पनेत मोडते. पण साक्षर असणे आणि सुजाण वाचक असणे, अभिरुचीसंपन्न वाचक असणे या भिन्न गोष्टी आहेत.

फक्त व्यवहारापुरते वाचणारे लोक वाङ्मयीन पर्यावरण सुदृढ करू शकत नाही. काही वाचक फक्त वर्तमानपत्र वाचणे किंवा व्यवहारापुरते वाचणे, धार्मिक वाचन, मनोरंजनासाठी वाचन इतकेच मर्यादित वाचन करतात. अशा वाचकांचा ग्रंथ व्यवहाराच्या वृद्धीसाठी उपयोग होऊ शकत नाही. याचा पुढचा वाचकवर्ग वाङ्मयीन पर्यावरण समृद्ध करतो.

ज्या वाचकांच्या जोरावर प्रकाशन व्यवसाय चालतो ते वाचक घडविण्यासाठी प्रकाशकांचे सामाजिक योगदान काय हा कळीचा मुद्दा आहे. म्हणूनच योग्य पुस्तकांची, ग्रंथाची निर्मिती होणे, ते साहित्य वाचणारा सुजाण वाचक तयार होणे आणि त्याआधारे समाजाला वैचारिक अधिष्ठान प्राप्त करून देणारी व्यक्तिमत्त्वे घडणे हे देशाच्या- समाजाच्या, कुटुंबाच्या, व्यक्तीच्या अशा सर्वच पातळ्यांवर आवश्यक आहे.

**- डॉ. लतिका भानुशाली**
भ्रमणध्वनी : ९३२२२०७८७८




# वाचणारे विजयी होवोत

सागर सुभाष अचलकर

'**वा**चन आणि वाचक कमी झालेत का?' या प्रश्नाचं उत्तर जर द्यायचं झालं तर आणखी एक प्रश्न निर्माण होतो, तो म्हणजे नेमकी वाचकांची संख्या कोणत्या काळात समाधानकारक होती? मग कमी झालेत हा प्रश्नच कसा निर्माण होतो? पुस्तकांचा शोध जेव्हा लागला किंवा पुस्तकांची निर्मिती जेव्हापासून सुरू झाली तेव्हापासून ते आजतागायत एकूण लोकसंख्येच्या तुलनेत वाचकांची संख्या नेहमीच तुरळक होती आणि आहे. मुळात वाचनसंस्कृती आपल्या समाजात तळागाळापर्यंत पोहोचलीच नाही किंवा पोहोचवण्याचा फारसा विशेष असा प्रयत्न झालेला दिसून येत नाही. जे काही प्रयत्न झाले त्याला घवघवीत अपयश आल्याचं दिसून येतं.

नुकतीच प्रणव सखदेवची 'काळेकरडे स्ट्रोक्स' नावाची कादंबरी वाचनात आली त्यात समीर नावाचं म्हणतो की, 'मला जर का एखादी व्यक्ती आवडली नाही आणि जर का मला त्याला कटवायचं असेल तर मी त्यावर एक ट्रिक शोधून काढली आहे, मी मुद्दाम आमच्यातल्या कॉन्व्हरसेशनच्या सुरुवातीलाच एक प्रश्न विचारतो ज्यात नव्याण्णव टक्के वेळा समोरच्याला त्याचं उत्तर येत नाही आणि आपोआपच आमच्यातलं कॉन्व्हरसेशन पुढे सरकत नाही. मी विचारतो, 'विलास सारंग आणि तारकोव्हस्की माहितीये? आता विलास सारंग आणि तारकोव्हस्की हे नाव समोरच्याला माहीत नसणारच, त्यामुळे साहजिकच आमच्या संभाषणाला तिथेच ब्रेक लागणार.'

[redacted]

प्रसंग जरी पुस्तकातला असला तरी वास्तवाशी त्याचा अगदी जवळून संबंध आहे. वरील पुस्तकातला तो प्रसंग जरी गंमतीतला असला तरी त्यात 'नव्याण्णव टक्के' हा जो काही आकडा आलाय तो खूपच भीतीदायक आहे. म्हणजे एखाद्याला कटवण्यासाठी आपण पुस्तकाविषयी बोलायचं आणि त्यात नव्याण्णव टक्के वेळा आपल्याला यश यावं म्हणजे पुस्तकांविषयी इतकी अनुत्सुक माणसे आपल्या समाजात आहेत. माझ्या मित्रपरिवारातही असे असंख्य लोक आहेत ज्यांना धड दोन लेखकांची नावं सुद्धा माहीत नाहीत मग वाचनाची गोष्ट तर लांबच. मग मीही जेव्हा पुस्तकाविषयी बोलू पाहतो तेव्हा मलाही नाक मुरडलं जातं. का आपण पुस्तकाविषयी कुणाशीही गप्पा मारू शकत नाही? का आपल्याला पुस्तकांविषयी बोलायला नेहमी ठरावीक लोक लागतात? माझ्या घरी जो पेपरवाला, दूधवाला येतो त्यांच्याशी मी पुस्तकांबद्दल का बोलू शकत नाही? का त्या माणसांपर्यंत अजून पुस्तकं पोचली नाहीत? दूधवाला, पेपरवाला तर लांबच पण सो कॉल्ड सुशिक्षित म्हणवून घेणारे लोकसुद्धा वाचनाकडे गंभीरतेने पाहताना दिसत नाहीत.

मध्यंतरी प्रा. नितीन रिंढे लिखित 'लीळा पुस्तकांच्या' नावाचं सुंदर पुस्तक वाचनात आलं. त्यात त्यांनी एक खंत व्यक्त केली आहे जी खूपच गंभीर आहे. ते म्हणतात, 'शंभर वर्षापूर्वी मराठी पुस्तकाची एक आवृत्ती एक हजार प्रतींची असायची. शतकभरात शिक्षणाचं प्रमाण तीनचार पटींनी वाढूनही (आणि लोकसंख्येत वाढ होऊनही) आजही मराठी पुस्तकाची आवृत्ती हजार-पाचशे प्रतींचीच असते.' पुस्तकांचं मूल्य जाणून त्यांचं नीट संगोपन करणाऱ्या ग्रंथालयासारख्या व्यवस्था आम्हाला सर्वत्र उभ्या करता आल्या नाहीत. उलट या हेतूने पूर्वी स्थापलेल्या संस्था एव्हाना मोडकळीला आल्या आहेत. त्याचबरोबर एक सौंदर्यपूर्ण वस्तू म्हणून पुस्तकाकडे पाहण्याची दृष्टी तयार झाली नाही. शिक्षितांचं प्रमाण वाढूनही पुस्तकांच्या वाचकांचं, संग्रहकांचं प्रमाण त्या तुलनेत न वाढल्याने वाचकवर्ग अल्पसंख्य राहिला.

२. वाचक हा काही एका दिवसात तयार होणारा प्रकार नाहीये. वाचकाचे टप्पे असतात. ज्या त्या टप्प्यावर जे ते पुस्तक हाती लागत गेलं की, हळूहळू वाचक घडत जातो. म्हणजे वाचक घडण्याच्या प्रक्रियेत योग्य वेळी योग्य ते पुस्तक हाती लागणं खूप महत्वाचं असतं. म्हणजे सुरुवातीलाच जर का नेमाडेंचं एखादं पुस्तक वाचायला घेतलं तर कदाचित त्याला ते आवडणार नाही. वाचन फार डेंजर गोष्ट आहे, 'वो अपने बस की बात नही' असं

काहीसं त्याला वाटू शकतं. परंतु त्याच जागी व.पु., पु. लं., द. मा. (अजून बरेच आहेत) यांची पुस्तकं हाती लागत गेली तर पुढे त्याला वाचनाची गोडी लागण्याची शक्यता असते. आता ही गोष्ट प्रत्येकालाच लागू होईल असं नाही पण बऱ्याच लोकांच्या बाबतीत असंच होतं. म्हणजे सुरुवातीला जेव्हा वाचक नवीन असतो तेव्हा हलकं फुलकं वाचायला त्याला जास्त आवडतं. जास्त वैचारिक मारा जर का त्याच्यावर होऊ लागला तर कदाचित ते त्याच्या पचनी पडणं अवघड असतं.

आता योग्य वेळी योग्य पुस्तक हाती लागणं ही जबाबदारी कोणाची? तर सगळ्यात जास्त जबाबदारी असते ती पुस्तकविक्रेत्यांची आणि ग्रंथालयाची. जेव्हा एखादा माणूस ग्रंथालयात किंवा पुस्तकविक्रेत्याकडे जातो तेव्हा त्याचा नवखेपणा लक्षात घेऊन त्याच्या हाती योग्य पुस्तक जाईल याची काळजी घेतली पाहिजे. जर का असं झालं नाही तर कदाचित तो माणूस पुन्हा तिकडे फिरकण्याची शक्यता फार कमी असते. आता ही गोष्ट क्षुल्लक वाटत असेल पण माझ्या मते ही खूप महत्त्वाची गोष्ट आहे आणि याने वाचक वाढण्यास निश्चित मदत होईल अशी माझी खात्री आहे. त्याच बरोबर आपली वैयक्तिक जबाबदारीही तितकीच असली पाहिजे. जेव्हा एखादा मित्र आपल्याकडे पुस्तक मागायला येतो तेव्हा तेव्हा तो वाचनाच्या कुठल्या टप्प्यात आहे हे ओळखून त्याला त्या प्रकारचं पुस्तक देणं गरजेचं आहे. कारण काही पुस्तकं ही सगळ्यासाठी नसतात तर फक्त तयार वाचकांसाठीच असतात. पण एकदा का वाचनाची चटक लागली की, मग तो स्वतःच ठरवू लागतो की आपल्यासाठी कुठलं पुस्तक 'बेस्ट' आहे. मग हळूहळू त्याला त्याची आवड कळू लागते, कोणत्या विषयात रुची आहे हे कळू लागतं आणि मग तो त्या प्रकारची पुस्तकं शोधू लागतो आणि कधी 'अट्टल' वाचक बनतो ते त्याला सुद्धा कळत नाही.

मला वाटतं टीव्ही, मोबाईल फोन्स, इंटरनेट यांना दोष देत बसण्यापेक्षा वरील गोष्टीचा विचार आपल्याकडे होत नाही त्यामुळे वाचकांची संख्या कमी आहे असं मला वाटतं.


३. वाचनसंस्कृती वाढवण्यासाठी काय काय उपाययोजना करता येऊ शकते या विषयावर चर्चा करण्याआधी मला एक उदाहरण द्यावसं वाटतं. सोलापूरपासून ३८ किमी अंतरावर हत्तुरकुडलसंगम नावाचं एक गाव आहे. गावातल्या एका मंदिरात तुळईवर शिलालेख आहे. ज्येष्ठ संशोधक डॉ. आनंद कुंभार यांनी हे सिद्ध केलंय की, मराठीतील हा पहिला शिलालेख आहे आणि या शिलालेखाची सध्या सहस्त्राब्दी सुरू आहे. या शिलालेखाबद्दल बोलण्याचं कारण इतकंच की, या शिलालेखवर जो काही मजकूर आहे त्याचा अर्थ 'वाचणारे विजयी होवोत' असा होतो. हजार वर्षापूर्वी वाचनाचे महत्व पटवून देणारा हा शिलालेख वाचनासाठी प्रवृत्त करणारा तर आहेच पण शिलालेख बनवणाऱ्याची दूरदृष्टी लक्षात घेणे महत्त्वाचे आहे.

हा लेख लिहीत असतानाच व्हाट्सअपवर एक मेसेज आला. मेसेज वाचला आणि म्हटलं काय टायमिंग आहे मेसेजचा. कारण ज्या विषयावर लिहितोय त्याच संबंधित मेसेज होता. अमुक एका संस्थेने शालेय आणि महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी एक निबंध स्पर्धा आयोजित केली होती आणि निबंधाचा विषय होता. 'मला आवडलेलं पुस्तक'. मी म्हणलं किती छान विषय आहे हा. या निमित्ताने का होईना विद्यार्थी अवांतर वाचनाकडे वळतील का ? हा प्रश्न तर आहेच पण सुरुवात तरी नक्की चांगली होईल याची खात्री बाळगायला हरकत नाही.

वाचनसंस्कृती वाढवण्यासाठी ग्रंथालय हा घटक तर महत्त्वाचा आहेच पण त्यापेक्षा मला शाळा आणि महाविद्यालये हे घटक जास्त महत्वाचे वाटतात. शालेय वयात झालेले वाचनाचे संस्कार विद्यार्थ्यांमध्ये जास्त प्रभावीपणे रुजतात आणि कायमस्वरूपी राहतात. यात शाळा आणि महाविद्यालयाची नेमकी भूमिका काय तर, त्यांनी वाचनाचे महत्त्व पटवून देण्यासाठी सतत उपक्रमशील राहिलं पाहिजे. महिन्यातून एकदा तरी या विषयावर व्याख्यान ठेवलं पाहिजे. शाळेत महाविद्यालयात पुस्तक प्रदर्शन भरवली पाहिजेत. साहित्यिकांना शाळेत महाविद्यालयात बोलवून त्यांच्यात आणि विद्यार्थ्यांत संवाद घडवून आणला पाहिजे. कथाकथनाचे, कवितांचे कार्यक्रम किंवा इतर साहित्यिक कार्यक्रम आयोजित केले पाहिजेत. अशाने निश्चित थोडाफार तरी फरक पडण्याची शक्यता नाकारता येत नाही. यामुळे मुलांना लेखकांची नावे कळतील, नवनवीन पुस्तकांची माहिती होईल, कथाकथन, कवितांच्या कार्यक्रमामुळे त्यांच्यात साहित्याची गोडी निर्माण होईल. त्याचबरोबर विद्यार्थ्यांसाठी वेगवेगळ्या साहित्यिक स्पर्धा आयोजित करण्यात याव्यात. उदारणार्थ: साहित्य अभिवाचन, कवितावाचन. त्यानिमित्ताने मुलं नवनवीन साहित्य वाचतील, स्पर्धेत सादर करण्यासाठी कविता शोधतील, अभिवाचनासाठी कथा, कादंबऱ्यातुन उतारे शोधून काढतील, एकमेकात चर्चा करतील. अशा वेगळवेगळ्या उपक्रमातून आपण विद्यार्थ्यांना वाचनाची गोडी लावू शकतो. विद्यार्थ्यांच्या बाबतीत बोलण्याचं जास्त कारण हेच की, विद्यार्थीदशेत असतानाच वाचक घडवणं जास्त सोपं असतं. आणखी एक उदाहरण देणं जास्त महत्वाचं वाटतं ते म्हणजे. मागे तीन-चार वर्षापूर्वी सोलापुरात एका संस्थेने एक स्पर्धा आयोजित केली होती. त्यांनी अमुक एक पुस्तक ठरवलं होतं आणि स्पर्धकांना ते पुस्तक वाचून यायला सांगितलं होतं. स्पर्धेच्या दिवशी स्पर्धकांना त्या पुस्तकावर प्रश्न विचारले गेले आणि जो कुणी जास्तीत जास्त उत्तर देईल त्याला पारितोषिकं देण्यात आली. तर या स्पर्धेला उस्फुर्त असा प्रतिसाद मिळाला होता. परंतु ही स्पर्धा एकदाच झाली. अशा प्रकारच्या स्पर्धा नित्यनेमाने व्हायला हवेत. साहित्यिक संस्था, ग्रंथालय किंवा शाळा महाविद्यालयेही अशा प्रकारच्या स्पर्धा घेऊन लोकांना वाचण्यासाठी प्रवृत्त करू शकतात.

शेवटी थांबताना शिलालेखावर लिहिल्याप्रमाणे 'वाचणारे विजयी होवोत.' एवढंच म्हणावंसं वाटतं.

**– सागर सुभाष अचलकर**
भ्रमणध्वनी : ८७९३८७५४५६




# साहित्यिकांचं सामाजिक वर्तन वाचकावर परिणाम घडवतं!

**शशी त्रिभुवन**


**म**राठी साहित्याची लेखक परंपरा खूप विशाल, विस्तृत आणि विविधस्तरीय आहे. वेगवेगळ्या प्रादेशिक भाषिक गटांतील, जाती-समाजगटांतील आणि वैचारिक भूमिका विविधांगी असलेल्या अनेकविध लेखकांनी मराठी साहित्यातील ललित तसेच वैचारिक वाङ्मय समृद्ध केलेले आहे. दुर्गा भागवत, इरावती कर्वे, मालतीबाई बेडेकर अशा लेखिका जशा या प्रवासात भेटतात तसेच भावे, खाडिलकर, गं. त्र्यं. माडखोलकर, न. चिं. केळकर, नरहर कुरुंदकरपासून अत्रे, फडके, खांडेकर अशीही ही परंपरा मराठी साहित्याच्या इतिहासात दिसते. कालपरत्वे मराठीच्या विविध बोलींच्या परंपरा, इतिहास, रूढी त्या-त्या बोलींच्या लेखकांनी लिखित स्वरूपात पुढे आणल्या. देशीवाद, दलित साहित्य, ग्रामीण साहित्य, महानगरीय साहित्य, कामगार साहित्य असे काही साहित्य समूह आपसूक तयार झाले आणि त्या-त्या समूहातील लेखक त्यांच्या स्वविशिष्ट भूमिकेतून त्या गटांचे नेतृत्वही करू लागले. त्यांच्या वैचारिक, सामाजिक व राजकीय भूमिका अहमहमिकाने मांडू लागले, तात्त्विक मुद्यांवर भांडू लागले. मधल्या साठ ते ऐंशीच्या द्विदशकात अशी वैचारिक घुसळण झालेली मराठी साहित्याने पाहिली, मराठी वाचकांनीही ती अनुभवली आणि वाचक म्हणून आपली अभिरुची समृद्धसुद्धा केली.



परंतु पुढील टप्प्यावर ही साहित्यिक मंडळी पुण्या-मुंबईसारख्या धनिक शहरांतून स्थिरावली. महाविद्यालयात आणि विद्यापीठीय समित्यांत, शासकीय महामंडळे आणि अभ्यासविषयक समित्यांत यांची वर्णी लागली किंवा लावून घेतली गेली त्यामुळे कालपरत्वे यांच्या वैचारिक अधिष्ठानाचा घात झाला असे म्हणावेसे वाटते. आर्थिक सुस्थितीत कदाचित मेंदूलाही जडत्व आले की काय असे वाटणाऱ्या स्वतःच्या पूर्वीच्या मतांच्या विसंगत तर्क विधाने अशी साहित्यिक मंडळी विविध मंच-विचारपीठांवरून करू लागली आणि स्वतःसोबतच स्वतःच्या वैचारिक बांधीलकीचा बट्ट्याबोळ करू लागली. विचार आणि विधानातील ठामपणा बेफामपणाकडे झुकू लागला. काही लोकशाही आणि संविधानपूजक राजकीय पुढाऱ्यांचे भाट वा हुजरे होऊन व्यासपीठ बळकावू लागले.


ललित साहित्याचे आस्वादक वाचन करणारा माझ्यासारखा साहित्यिक सुरुवातीच्या भाबड्या वयात आणि टप्प्यावर थोर साहित्यिकांना देवघरात ठेवून पुजतो पण नंतर त्याचे पाय मातीचे दिसल्यावर वाचक म्हणून होणारी कुचंबणा तो कुणालाही सांगू शकत नाही. याचे पहिले उदाहरण म्हणून बालकवींचे नाव वाचनात आले, पुढे रणजित देसाई आणि ही यादी अशीच वाढत गेली...!


एवढं जीवाला स्पर्श करून लिहिणारा साहित्यिक माणूस म्हणून थोर असावा थोर वाटावा ह्या श्रद्धेला इथे पहिला तडा गेला. आणि ही तडतड पुढे वाढतच गेली. मानवी मूल्यांचे पुरस्कर्ते फक्त निर्जिव अक्षरांच्या जगात रमणारे पण वास्तवात नात्यातील माणसांना होरपळून टाकणारे हा हादरा भयंकर होता. सामाजिक दृष्टीने प्रतिष्ठित असणारी ही माणसे प्रत्यक्ष दैनंदिन वर्तनात षड्रिपूंचे सर्वच अवतार सोबत वागवणारी अशी आहेत. अर्थातच हेही पुढे समजुतीने समजून घेतले की शेवटी तीही माणसे आहेत. लिखाणातील विसंगती प्रत्यक्ष जीवनात अशी दिसून आली. साहित्य संमेलनाबाबत एक रसिक-वाचक म्हणून बोलायचे म्हटल्यास ती ती संमेलने अध्यक्षीय निवड, अध्यक्षांची भाषणे, स्वागताध्यक्षांची अभ्यासपूर्ण भाषणे यांसारख्या अनंत गोष्टींनी रसिकांच्या लक्षात राहिली. त्या संमेलनांना भारताचे स्वातंत्र्य, संयुक्त महाराष्ट्राचा लढा, बेळगाव सीमा प्रश्न, आणीबाणी, महाराष्ट्र राज्याची निर्मिती असेही तत्कालिक संदर्भ होतेच, आणि त्या त्या प्रश्नांचे भांडवल करून किंवा भांडवल होऊन अध्यक्षीय निवडी होऊन साहित्य संमेलने पार पडली. कधी कधी यातून चांगले लिहिणारे लेखक बाजूला फेकले गेले, त्यांच्या हयातभर अध्यक्ष होणे हे त्यांचे दिवास्वप्न राहिले.




यातली दया पवार, आनंद यादव अशी ठळक उदाहरणे सांगता येतील. आणखी इंदिरा संत, विंदा करंदीकर, विजय तेंडुलकर, चिं.वि. जोशी, भालचंद्र नेमाडे, बा.भ. बोरकर, मंगेश पाडगावकर अशी कितीतरी अव्वल दर्जाची साहित्यिक मंडळी अध्यक्ष बनू शकली नाहीत. मग हे असे का होते याचा विचार केला तर इथेही साहित्यबाह्य राजकारण आणि साहित्यिकांचे राजकारण अशा गोष्टींनी चांगल्या साहित्यिकांचा बळी घेतला असे म्हणता येते. वाचकांच्या मनावर अधिराज्य गाजवणाऱ्या कित्येक साहित्यिक मंडळींची विविध स्तरांवरील साहित्य संमेलनांची अध्यक्षपदे पदरात पाडून घेण्यासाठीची साठमारी बघितली की कसलेल्या राजकीय मंडळींना फिके पाडतील अशा त्यांच्या करामती आहेत असे वाटते. जगाला न्याय-स्वातंत्र्य-विश्वबंधुत्व-प्रेमाचा संदेश देणारी लेखणी ती यांचीच का असे प्रश्न सामान्य वाचकांच्या मनात उभे राहतात. कधीकधी अध्यक्षपद मिळवण्यासाठी आपली वैचारिक भूमिका सोईस्करपणे बाजूला ठेवून कळपात सामील होऊन ते पदरात पाडून घेतले जाते. एखाद्या लेखकाची साहित्यिक म्हणून असलेली प्रतिमा, त्यांची सामाजिक प्रतिमा, प्रत्यक्षातील वर्तन, वैचारिक भूमिका आणि त्यांचे लेखन सुसंगत वाटते अशी उदाहरणे हल्ली खूप दुर्मीळ झालीत. उमेदीच्या काळात काही विशिष्ट भूमिका घेऊन लिहिणारी ही मंडळी उतारवयात त्याच भूमिका-विचारांशी ठाम आहेत असेही दिसत नाही. इथे वाचक म्हणून एक गोष्ट अशीही मान्य आहे की अशा साहित्यिक मंडळींच्या तत्कालीन भूमिकेमुळे कदाचित समाजाचे अहित होत आहे, मानवी मूल्यांचे नुकसान होत आहे, माणूसपण भ्रष्ट होत आहे म्हणून त्यांनी भूमिका बदलली तर ते ठीक आहे. परंतु संविधानाचे अभ्यासक, थोर विचारवंत, जेष्ठ साहित्यिक समीक्षक अशी बिरुदे मिरवणारी काही मंडळी अगदीच 'हल्लीच्या मास्तरांना अकलेपेक्षा जास्त पगार झाले आहेत' अशी सपक, टाळ्यांची आणि उथळ मथळ्यांची विधाने एखाद्या विचारपीठावरून करतात तेव्हा अशा थोर साहित्यिक मंडळींची वाचकांच्या दृष्टीने किंमत शून्य होते. तसेच जेव्हा काही विशिष्ट कलाकृती-साहित्यकृतींबाबतीत जाणीवपूर्वक वाद उकरून काढले जातात, साहित्यबाह्य चर्चा घडवून चारित्र्यहनन केले जाते तेव्हाही अशी मानवी मूल्ये, संविधान आणि लोकशाही स्वातंत्र्याचा उद्घोष करणारी मंडळी मुकी होऊन बसतात तेव्हाही वाचकांना बसणारा धक्का सहन होण्यापलीकडील असतो. म्हणूनच या साहित्यिक मंडळींचा विचार, प्रतिमा, वर्तन, लेखन, वैचारिक भूमिका यांचा खूप खोलवर परिणाम खऱ्या वाचकांवर होतो, जगतानाची हिरवळीची बेटं म्हणून वाचक ज्या साहित्य आणि साहित्यिकांकडे मोठ्या आशेने पाहत असतो तिथं असे रखरखीत वाळवंट बघून मनातून हादरतो आणि सुन्न विषण्ण होतो. त्याची चांगुलपणावरची श्रद्धा डळमळीत होते हेही खरेच!

**– शशी त्रिभुवन**
भ्रमणध्वनी : ८२७५०३२८९७






# पुस्तकांची परीक्षणं महाबोअर

भारत निलख

**वा**चक कमी झालेत की नाही हे आपण कसं मोजायचं? तर मला वाटतं पुस्तकांचा ठराविक कालावधीतला खप पाहून हे ठरवता येऊ शकतं. उदा. २०१६ साली एकूण किती मराठी पुस्तकांची विक्री झाली हा आकडा थोड्या कष्टाने का होईना पण आपण प्रकाशकांकडून मिळवू शकतो. परंतु आपण असं काही न करता मोघमपणे वाचक कमी झालेत हे सर्रास बोलत असतो.

मी पुस्तकांच्या दुकानांना नियमित भेट देत असतो त्यावेळी विक्रेत्यांशीही बोलतो. विक्रेते म्हणतात की पूर्वी इतकी वाचकसंख्या राहिली नाही हे त्यांच्यापुरतं खरंही असेल. पूर्वी पुस्तकाच्या दुकानांची संख्या खूप मर्यादित होती. आता मात्र ही संख्या वाढतीये. एखादं दुकान बंद पडलं तरी इतर एक दोनांची भर पडते. प्रकाशकही आता पुस्तक विक्री करू लागले ठिकाणी आहेत. ऑनलाईन खरेदी वाढते आहे. अनेक वाचक ईबुक्सकडे ओढले गेले आहेत. या सर्वांचा एकत्रित परिणाम पाहता पूर्वी पुस्तकांच्या दुकानात जी गर्दी असायची ती आता विभागली गेली आहे. वाचक जर कमी झाले असते तर प्रकाशक संकटात सापडले असते. पण तसं होताना  नाही. प्रकाशकांची संख्या वाढतीये. प्रकाशकांकडील पुस्तकांच्या नवीन आवृत्त्या निघतायेत. अनेक नवीन पुस्तकं बाजारात येतायेत. या सर्वांवरून हे स्पष्ट होतं की वाचकसंख्या कमी झालेली नाही.

[redacted]

परंतु हा मुद्दाही तितकाच खरा आहे की वाचक म्हणावा त्याप्रमाणात वाढलाही नाही. समाधानकारकरित्या वाढला नाही. यामागे अनेक कारणे आहेत.


एखादा दुसरा अपवाद वगळला तर प्रकाशकांना अजूनही पुस्तकांचं नीट मार्केटिंग करता आलेलं नाही. पुस्तक हे एक 'प्रोडक्ट' आहे आणि ते वाचकांना 'अपील' होईल अशा स्वरूपात त्यांच्यासमोर घेऊन जाणे होत नाही. पुस्तकांच्या परिणामकारक जाहिराती करण्यात प्रकाशक कमी पडतात. अनेक प्रकाशक आजही तीस-चाळीस वर्षांचे जुने फॉण्टच वापरत आहेत. फेसबुकसारख्या जवळजवळ फ्री असलेल्या मिडीयाचा परिणामकारक पद्धतीने वापर केला जात नाही. लेखक-वाचक संवाद वरचेवर घडवणं हेही फायदेशीर ठरू शकतं. प्रकाशकांनी त्यांच्याकडील पुस्तके आणि लेखक यांची सतत कोणत्या ना कोणत्या माध्यमातून वाचकांना ओळख करून द्यायला हवी.

विक्रेते तर वाचक वाढविण्यासाठी कळीची भूमिका निभावू शकतात. परंतु विक्रेत्यांमध्ये याविषयी उदासीनता दिसून येते. तुम्ही कोणत्याही मोठ्या पुस्तकाच्या दुकानात जा, तिथे तुम्हाला चांगली सर्विस मिळणं अवघड असतं. पुस्तकांबद्दल माहिती असणारा, वाचकाच्या गरजेनुसार त्याला वेगवेगळ्या विषयांवरील पुस्तकं सुचवणारा स्टाफ तिथे नसतो. विक्रेत्यांनी वाचकांच्या गरजा लक्षात घेऊन काही अभिनव योजना आखायला हव्यात. तरुणांना पुस्तकांकडे कसं आकर्षित करता येईल यासाठी प्रयत्न करायला हवे. निमशहरी आणि ग्रामीण भागात पुस्तकं घेऊन जायला हवं. फक्त बक्कळ सवलती देऊन वाचक वाढत नाहीत हे लक्षात घेतलं पाहिजे.

वाचक वाढविण्याची मोठी जबाबदारी ही वाचकावरसुद्धा असते. वाचकाने नवीन वाचक घडविण्यासाठी महत्त्वाचे योगदान द्यायचे असते. आपण जसे मुलांना सणाला नवीन कपडे घेतो, तशी पुस्तके घेतो का? नातेवाईक, मित्रमैत्रिणी यांना वाढदिवस भेट म्हणून पुस्तकं देतो का? आपल्या मुलांना पुस्तकाच्या दुकानात घेऊन जातो का? वाचलेल्या पुस्तकांबद्दल; आवडत्या न आवडत्या किंवा नव्या जुन्या लेखकांबद्ल कोणाशी बोलतो का? एखादं पुस्तक वाचून आपल्याला काय वाटलं? त्यातून काय मिळालं? हे कधी कोणाबरोबर शेअर करतो का? नवीन आशय, नवीन विषय

असलेली पुस्तकं आपण माहीत करून घेतो का? या प्रश्नांची प्रामाणिक उत्तरं शोधणं गरजेचं आहे.

पुस्तक किंवा लेखक वाचकाला उलगडून दाखवणे हे काम समिक्षकाचं असतं. किती समिक्षक हे काम उत्साहाने, आनंदाने आणि गांभीर्याने करतात? किती समिक्षक एखाद्या पुस्तकाकडे किंवा लेखकाकडे स्वच्छ, पूर्वग्रहविरहीत आणि गटा-तटांच्या पलिकडे जाऊन पाहू शकतात? समीक्षकांकडून एखाद्या साहित्यकृती वर साधकबाधक चर्चा का घडवून आणली जात नाही? हे प्रश्न महत्त्वाचे आहेत. वृत्तपत्रात येणारी पुस्तकांची परीक्षणं 'महाबोअर असतात. सोप्या भाषेत आपण पुस्तक परिक्षणं करणं गरजेचं आहे.




समकालीन लेखकांनी जुन्या पिढीच्या कॉप्या न करता, गांभीर्यपूर्वक लिहिलं पाहिजे.

शासनाने पुस्तकाचं गाव म्हणून भिलार गावाला ओळख दिलीय. याचा मराठी साहित्याला कितपत उपयोग होईल ही शंकाच आहे. शासनाने अशा प्रतिकात्मक गोष्टी करण्यापेक्षा शासकीय आणि शाळा, महाविद्यालयातील ग्रंथालयांचं नीट व्यवस्थापन करणे, प्रकाशक, विक्रेते यांना त्यांच्या कामात सहकार्य आणि पाठिंबा देणे गरजेचे आहे.

या सर्व गोष्टी करणं अवघड नक्की आहे. पण वाचक काही आभाळातून पडणार नाही. तो आपल्या सर्वांना मिळून घडवावा लागेल. त्यासाठी परिश्रम घ्यावे लागतील. तुम्हाला ती गोष्ट माहिती असेल... एका गावात कोणीच चप्पल वापरत नव्हतं... तर वाचकाच्या बाबतीत हीच गोष्ट लागू होते. मराठी वाचकाच्या सध्याच्या परिस्थितीकडे नकारात्मकतेने न पाहता वाचक वाढविण्यासाठी मोठी संधी आहे या सकारात्मक दृष्टीने पाहिलं पाहिजे.

**– भारत निलख**
भ्रमणध्वनी : ८८०५०३९८०२






# पालकाची भूमिका महत्त्वपूर्ण

**भाग्यश्री शिंदे**


'**वा**चाल तर वाचाल' यात थोडासा बदल केला तर 'वाचाल तर वाचेल' असं पालक आणि मुले यांच्या बाबतीत म्हणावंसं वाटतं. पालक म्हणून आपण ज्या ज्या कृती करत असतो, त्यांचं अनुकरण आपली मुले करत असतात. म्हणून पालक जर वाचन करत असेल तर मुलालाही आपसूकच वाचनाची सवय लागेल. आज बरेच पालक आपल्या पाल्याविषयी तक्रार करत असतात की, 'तो/ती वाचताच नाही'. पण तसं वातावरण नसेल तर मुलंही कसं वाचेल? त्याला/तिला आपले पालक कधीच पुस्तक वाचताना दिसले नाहीत तर आपण वाचायला हवे हे त्याला उमगणारच नाही. बहुतेक पालक आपल्या पाल्याला वाचनाचे महत्त्व, उपयोग पटवून देतात, बरीचशी पुस्तकेही आणून देतात पण पोकळ सांगण्याने मुलांना वाचनाची गोडी लागणे अशक्यच. याउलट जर पालकही जर मुलांसोबत वाचन करण्यास बसत असेल तर मुलंही आपोआप वाचनास बसेल. आपल्या मुलाने पुस्तकं वाचली पाहिजे असं जर वाटत असेल तर पालकाला त्यासाठी जाणीवपूर्वक तसे प्रयत्न करायला हवे. कोणत्याही गोष्टीची सवय होण्यासाठी आधी तिची आवड निर्माण होणे गरजेचे असते, तसंच वाचनाच्या बाबतीत पुस्तकं वाचली पाहिजेत असं वाटत असेल तर वाचनाची गोडी मुलांना लागायला हवी. यात पालकाची भूमिका महत्त्वपूर्ण ठरते. केवळ पुस्तक उपलब्ध करून दिल्याने मुल वाचणार नाही तर पालक म्हणून आपणही त्यासोबत बसलं पाहिजे. सुरुवातीला आपण वाचून दाखवून ते ऐकते, त्यातल्या काही गोष्टी मुलाला आवडल्या तर तो ते पुन्हा ऐकवण्यास सांगते, पुन्हा ते आपण वाचून ऐकवले तर मुलाला आपणही वाचावे असे वाटू लागते. आणि मूल वाचनाकडे प्रेरित होते. हे वाचन करू शकणाऱ्या मुलांच्या बाबतीत. पण अगदी लहान वयोगटातल्या मुलांनाही आपण वाचनाची आवड निर्माण करू शकतो. सध्या विविध चित्रांची पुस्तके उपलब्ध आहेत. पाच वर्षे वयोगटापर्यंतचे मूल चित्रवाचन चांगल्या प्रकारे करू शकते. सुरुवातीला ते फक्त चित्रातील वस्तूंची नावे सांगेल, एकेक वस्तूचे स्वतंत्र वर्णन करेल, त्यानंतर त्या सर्व गोष्टींचा एकत्र मेळ करून गोष्ट सांगेल किंवा चांगले चित्रकथनही करेल. पण हे करताना पालकाचे योग्य दिशेने मार्गदर्शन गरजेचे आहे, त्यातूनच मुलाला लहानपणापासूनच वाचनाचा कंटाळा न येता ते आनंददायी वाटेल.

वयाच्या प्रत्येक टप्प्यावर वाचनाची आवड बदलत जाईल, यासाठी मुलाला आवडेल, रुचेल, पचेल असं योग्य साहित्य उपलब्ध करून देणं हे पालकांचं काम आहे. परंतु हे करताना मुलालाही तेवढंच स्वातंत्र्य देणं गरजेचं आहे, त्याला जी पुस्तके आवडतील अशी पुस्तके त्याला निवडू द्यावीत. नाहीतर बरेच पालक 'हे तुझ्या कामाचं नाही, त्यापेक्षा हे वाच' असं सांगून सरसकट सामान्य ज्ञानाची, व्याकरणाची, किंवा इंग्लिश स्पिकिंगची अशी पुस्तकं वाचण्याचा आग्रह धरतात. नाहीतर केवळ गोष्टींची पुस्तकं, पौराणिक कथांची पुस्तके यांवर जास्त भर असतो, कारण एकतर आपण स्वतः लहानपणी ती वाचलीत म्हणून नाहीतर सारेच वाचतात म्हणून. पण पूरक वाचनाची गोडी लागावी यासाठी मुलाला आवडत्या विषयाची पुस्तके वाचनास उपलब्ध करून देणे गरजेच आहे. मग यात विविध साहित्यप्रकाराची रुची लागणं आवश्यक आहे. जर आपल्या पाल्याला कविता, गाणी आवडत असतील तर तीही पुस्तकं आपण उपलब्ध करायला हवीत. सर्व प्रकारची मग कथा, कविता, कादंबरी, नाट्यवर्णन, ललित, निसर्गवर्णन, संशोधनविषयक किंवा समीक्षणात्मक असो सर्व प्रकारचे लेखन ज्यात आपल्या पाल्यास आवड वाटेल असे वाचण्यास उपलब्ध करून दिले तरच मुल वाचनाकडे आकर्षित होईल. मग यासाठी पालक म्हणून एक मार्गदर्शक, प्रेरक होणं गरजेचं आहे.

आपली वाचनसंस्कृती टिकून राहावी यासाठी अनेक स्तरावर विविध प्रयत्न चालू असतात. पण जेव्हा ही सुरुवात लहान वयोगटापासून आणि आपल्या प्रत्येक घरापासून होत असेल तर निश्चितच वाचनाची ही बीजे घट्ट रुजतील आणि पुढे त्यांची जोपासनाही काळजीपूर्वक होईल. पालकांनीही यासाठी प्रामाणिक प्रयत्न करणे आवश्यक आहे. वाचनाच्या या मार्गाने आपल्या मुलाचा केवळ बौद्धिक विकासच नाही तर सामाजिक, भावनिक असा सर्वांगीण विकास होईल. त्याचप्रमाणे पालकत्वही अधिक प्रगल्भ होण्यास हातभार लागेल.

**– भाग्यश्री शिंदे**

भ्रमणध्वनी : ९४०३११६३०३




# सोशल मीडियातील लोक पुस्तक वाचताना दिसत नाहीत!

**तनुजा ढेरे**

**ए**क वाचक म्हणून मी जेव्हा आजुबाजूला पाहते तेव्हा लोक सतत मोबाईलमधे आयपॅड वा लॅपटॉपमधे डोकावताना दिसतात. घड्याळाच्या काट्यावर चालणाऱ्या या जगात लोक इतके या इंटरनेटच्या विळख्यात अडकत आहेत की खऱ्या पुस्तकाची दुनियाच विसरून जात आहेत. खरंतर आजच्या मुलांना बालकविता म्हणजे काय? बालकवी कोणते? चांगले कथाकार? इथंपासूनचे प्रश्न आहेत. आजच्या तरुणांना जुन्या-नव्या पिढीतले लेखक कोणते, किती वाचले असे विचारले तर काय उत्तर येईल, ह्यांना कसं वळवता येईल वाचनाकडे हे पाहयला हवं. दर्जेदार बालसाहित्याकडे मुलांना वळवलं तर नक्कीच उद्याचा सुदृढ वाचक वर्ग निर्माण होईल.


खरंतर एक वाचक म्हणून विचार केला तर जेव्हा आपण आजुबाजूला पाहतो तेव्हा सोशल मीडियावरील पोस्ट्स वाचनीय असतील तर नक्कीच वाचणारा एक वर्ग आपल्याला दिसतो. परंतु हा वर्ग तसं पुस्तक हातात घेऊन वाचताना फार कमी आढळतो. काही चिकित्सक व अभ्यासक असतील व त्यांना सांगितले की तू हे पुस्तक वाच, ते वाच, तो संदर्भ पाहा तर शंभरात एखादी व्यक्ती ते पुस्तक विकत घेऊन वाचेल. प्रत्येकजण आपल्या सोईनुसार जमेल तसं काहीना काही प्रमाणात वाचत असतो. ते वाचताना ते वाचन कुठल्याही प्रकाराचे असू शकते. अगदी सोशल मीडियापासून ब्लॉग ते विकिपिडीयावरील माहितीपर लेख सुद्धा. एखाद्या सिनेमापासून, दिल्लीपासून ते गल्लीपर्यंतच्या चमचमीत बातम्या सुद्धा. मला इथे एक मुद्दा मांडावासा वाटतोय की सोशल मीडियावरले लेख कधी कधी चटपटीत खमंग मनोरंजनपर असतात किंवा तात्कालिक त्या कालावधीचं निदर्शन करताना एक तात्कालिक विधान करणारे असतात. तेवढ्या काळापुरतं मर्यादित अस्तित्व असतं त्या लेखनाचं. त्यातील काही व्यक्ति-लेखक जाणीवपूर्वक विविध विषय हाताळताना वैशिष्ट्यपूर्ण लेखन करताना आपल्या दिसतात. यात ते पुस्तक वाचनावरही भर देतात.

[redacted]

एक वाचक व लेखक या भूमिकेतून मी जेव्हा आजच्या साहित्याकडे पाहते तेव्हा आजचे बोटावर मोजण्याइतके साहित्यिक व त्यांचे लेखन व वर्तन यामधे मला सुसंगती वाटते. त्यांची वैचारिक भूमिका त्यांचा अभ्यास, साहित्याबद्दलची निष्ठा व वर्तन यात विसंगतता असं नाही म्हणता येईल पण आजकाल मी किती हुशार व बुद्धिवंत आहे दाखवण्याकडे कल वाढला आहे. सोशल मीडिया व अनेक प्रसार माध्यमामुळे स्वप्रसिद्धी मिळते, एक वलय निर्माण होते. या वलयातून बाहेर येण्यास लेखक तयार होत नाही. यात वास्तवाचे भान विसरून चटपटीत-खमंग-आकर्षक लेखन करून आपला वाचक वर्ग तयार करताना कधी कधी स्वतःचं अस्तित्व विसरून भान हरपून गेलेले लेखक ही मला इथे दिसतात. तर काही लेखक पडद्याआड राहून वा अधूनमधून समोर येऊन आपली वैचारीक भूमिका मांडताना साहित्यिकाची भूमिका ठाम मांडताना दिसतात. त्यांच्या लिखाणाची ठोस बाजू मांडतात. नवोदितांना दिशा देण्याचं काम करताना उत्तम साहित्यकृलाकृती म्हणजे नेमकं काय त्यांच्या अभिव्यक्तीमधून आपल्याला आढळतं. या लेखकवर्गाचा विशिष्ट असा वाचक वर्ग आहे व नक्कीच त्यांच्या लिखाणाचा वाचकाच्या प्रतिमेवर परिणाम दिसून येतो. आता सोशल माध्यमं हाताशी असल्याकारणाने जो तो पहिलं लिहितो व प्रसिद्धीच्या मागे लागतो. पण वाचनाकडे हे लोक हे वळलेले दिसत नाहीत.

कॉलेजजीवन संपले व लग्नानंतर मुलं होईपर्यंतचा मधला काळ यात जास्ती पुस्तक वाचन झाले नाही. वाचनापासून पूर्णच लांब होते असेही नाही. मधल्या काळात तशी बरीच पुस्तके वाचली. पण ती ही घरगुती विषयाची. मात्र जसा जसा वेळ मिळत गेला पुढे परत मी रिकाम्या वेळेत वाचनाकडे वळले. टेबलाशी, बेडजवळ, गाडीत, पर्समधे एकतरी पुस्तक असतेच. आता महिन्यातून कमीत कमी पाच ते दहा पुस्तकाची खरेदी करतेच. वाचनाने चार भितींतलं माझं जगणं बरंचसं समृद्ध केलंय. मुंबईसारख्या या महानगरीत राहताना धावपळीच्या, घाईगडबडीच्या जगण्यात ही पुस्तकं मानसिक समाधानाबरोबरच एकलकोंडेपणाही कमी करतात असं म्हटलं तर चूक होणार नाही.

**– तनुजा ढेरे**
भ्रमणध्वनी : ९९३०१७४०१०




# वेळ घालवण्यासाठी केलेलं वाचन, वाचन नव्हे!

निरुता भाटवडेकर

*दिसामाजी काही तरी ते लिहावे*
*प्रसंगी अखंडित वाचित जावे।।*

समर्थ रामदास स्वामींनी रचलेल्या वरील ओळी वाचनाचं महत्त्व अधोरेखित करतात. 'वाचाल तर वाचाल' ह्या उक्तीमध्ये जगण्यासाठी वाचन किती महत्त्वाचे आहे, हेच सांगितले आहे.

**वाचन म्हणजे काय..? ते कशासाठी करायचे..?**

वाचन म्हणजे मनाची उदासी घालवण्यासाठी किंवा फावला वेळ आहे म्हणून केलेले वाचन नव्हे,..तर उत्तमात्तोम साहित्यकृतीचं वेळ काढून केलेलं वाचन होय.. बरणीमधील लोणचं जसं मुरायला ठेवतात तसं पुस्तके व वाचन आयुष्यात मुरायला हवीत. वाचन कधी ज्ञानार्जनासाठी केलं जातं, करमणुकीसाठी केलं जातं, एखादा विषय घेऊन त्यासंबंधित ही वाचन केलं जातं. ह्यापैकी शालेय पाठ्यपुस्तक व अभ्यासासाठीचे वाचन, हे सोडून द्यावे लागेल.. आपल्या आवडीच्या विषयात केलेलं वाचन खरं वाचन. अशा वाचनातून आपल्या ज्ञानात भर पडते, अनुभव विस्तारतो, आनंद मिळतो. पुस्तकांना मित्र म्हटलं आहे ते त्याचसाठी. आपला हा मित्र आपल्याकडून काही मागत नाही, कधी रागवत नाही. ह्या मित्राने आपल्याला नेहमीच काहीतरी दिलंय. म्हणूनच ते हवंहवंसं वाटतं. वाचनाने आपल्या जाणिवा विस्तारतात, आपण संतुलित होत जातो. वाचनाच्या विविध पद्धती आहेत. काही भराभर वाचत जातात, काही वाचक पुस्तक वाचतात व नंतर त्याचा आस्वाद घेत, खाणाखुणा करत पुन्हा वाचत जातात.

**वाचन कमी झालेय का...?**

वाचन करायला तो समाज आधी शिक्षित असायला हवा. ह्या निकषानुसार आधीच्या काळापेक्षा आता शिक्षणाचा प्रसार झाला आहे. त्यामुळं वाचनाचाही टक्का वाढला आहे.

आजचं जग हे फास्ट ट्रॅकवर धावत आहे, त्यामुळे वाचकाची आवडही काळानुरूप बदलली आहे. पटकन वाचून होणाऱ्या कथा, कादंबऱ्या, सेल्फ-हेल्प प्रकारामधील पुस्तके वाचण्याकडे तरुणाईचा कल दिसतो.

पण हीच पिढी जेव्हा आयुष्यात स्थिरावते, तेव्हा गंभीर वाचनाकडे वळते. आत्मचरित्र, पर्यटन, चरित्र, मुलाखत बाजाचे लिखाणाकडे ह्या सर्वाचा ओढा होत जातो. पुस्तके चवीचवीने वाचणारे वाचक आहेत.. एखाद्या पुस्तकाविषयी कळलं व ते संग्रही हवं असल्यास ते मिळवण्याची धडपड करणारे वाचकही आहेत. आपलं बुक-शेल्फ आपल्या आवडीच्या पुस्तकांनी सजवणारे वाचक आहेत. काही वेळेस ते शेल्फवरील पुस्तक वाचणार नाहीत, पण पुस्तक विकत नक्की घेतील. वाचक तयार करावा लागतो. विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची आवड निर्माण लागेल. ह्या सर्वाची सुरुवात विद्यार्थी चवथी-पाचवीत असतानाच व्हावी. शिक्षणामधील स्पर्धेमध्ये विद्यार्थी साहित्यापासून लांब जातो. शाळेत काही विद्यार्थी तरी वाचनाची आवड असणारे असतात. ह्यांना कायमस्वरूपी वाचनाकडे वळवायला हवे. ह्या घडवण्यामागे शिक्षक-पालक दोघांचा सहभाग आवश्यक आहे. घरात कोणी वाचणारा असेल तर त्याचा प्रभाव पडतोच. (दादर सार्वजनिक वाचानालयातर्फे दर वर्षी १ मे ते १३ जून दरम्यान मोफत बालवाचन कक्ष चालू असतो. तसेच १४ नोव्हेंबर रोजी मुलांसाठी वाचन वाढीसाठी उपक्रम केले जातात. असे उपक्रम सगळीकडे व्हायला हवे असे कार्यक्रम समितीच्या कार्यवाह उल्का सहस्त्रबुद्धे म्हणतात.)

वाचन वाढीसाठी गुरू मिळणे केव्हाही चांगले. हे गुरू आपल्याला काय वाचावे हे सांगेल. काही काळापूर्वी महाराष्ट्र टाईम्स ह्या वृत्तपत्राने पुस्तकांचा परिचय देणारी यादी प्रसिद्ध केली होती व ग्रंथालीने ही परिचय पुस्तिका प्रसिद्ध केली होती. महाराष्ट्र शासनाचे मासिक असलेले 'लोकराज्य'नेही वाचन विशेषांक काढला होता व तो संग्राह्य होता. ह्या सर्व प्रयत्नांचे सर्वांनी स्वागतच केले होते. हे प्रयत्न दर वर्षी व्हायला हवेत. ज्यायोगे काय वाचावं, या बऱ्याच जणांना पडलेल्या प्रश्नाचं उत्तर मिळू शकेल.

हल्ली व्हॉटस्अप व फेसबुकच्या काळात वाचावयास वेळच मिळत नाही असं म्हणणारे महाभाग असतात. माझ्या मते ही एक लाट आहे. काही वर्षानंतर ही साधनं वापरण्याचं प्रमाण कमी होईल आणि हा समूह वाचनाकडे वळेल. कारण वाचन शाश्वत आहे. पण ह्या सोशल माध्यमांचा अनेकांनी चांगला वापर करून घेतला आहे.

अमृत देशमुख, जो स्वतः ला बुक-गाय (Book-Guy) म्हणून घेतो. तो दर आठवड्याला त्याला आवडलेला एखाद्या पुस्तकातील उतारा त्याचा आवाजात रेकॉर्ड करून ग्रुपमध्ये सर्वांना पाठवतो.. त्याच्या फेसबुक पानावरही तो लिहितो. माध्यमांचा असाही चांगला वापर करता येतो. ज्या व्यक्ती वाचतात व त्यांना काही आवडलं असेल तर ही वाचकमंडळी त्या पुस्तकाविषयी फेसबुक आवर्जून लिहितात. लेखकही आपल्याला, आपल्या पुस्तकांवर मिळालेल्या प्रतिक्रिया फेसबुकवर सांगत असतो. विविध वाचनालये, प्रकाशने ह्या माध्यमांचा वाचनवाढीसाठी वापर करत असतात.

ह्यामुळेच मला म्हणावेसे वाटते की, ह्या सगळ्या स्पर्धेमध्येही वाचनसंस्कृती ताठ मानेने उभी आहे.

**काही निरीक्षणे वाचन वाढीची....**

महाराष्ट्र राज्यातर्फे महाबळेश्वर नजीक 'भिलार' हे पुस्तकाचे गाव पहिल्यांदाच वसवले गेले आहे. त्याला प्रतिसाद मिळतो आहे. अशी संकल्पना आकारास येणे, ही चांगली गोष्ट म्हणायला हवी.

शिवाजी पार्क, दादर येथील 'वसंत वाचनालय' हे ग्रंथालय आज पन्नास वर्षाहून अधिक वर्ष सातशे वाचकांची वाचनाची भूक भागवत आहे. वाचनालयाचे सर्वेसर्वा वसंत सावरकर ह्यांच्या मते, वाचक संख्या कधी कमी झाली नाही.. साधारणपणे वयाच्या चाळीशी नंतर बऱ्याचजणांचे वाचन वाढतं. काही कारणास्तव ५-६ वाचक कमी झाले तरी नवीन सदस्याची भर पडत असते.

माहीम सार्वजनिक वाचनालयाचे संदीप पेडणेकर यांच्या मते ह्यावर्षी वाचक संख्या वाढली आहे. याचे कारण ह्या वाचनालयामार्फत, वाचकांना घरपोच पुस्तक देण्याचीही सोय आहे हे असू शकेल. ह्या वाचनालयाचे एक सभासद थेट पुण्याहून येतात.


गेले तीन वर्ष 'चला वाचूया' हा निखळ वाचनानंद देणारा अभिवाचनाचा उपक्रम श्रीनिवास नार्वेकर चालवतात. साहित्यातील उत्तमोत्तम उतारे अतिथी मान्यवर, श्रोतृवर्गाला वाचून दाखवतात. हे वाचन झाल्यावर वाचक ज्यातून ह्या उताऱ्यांचे वाचन झाले आहे, ती पुस्तके आवर्जून वाचतात. ह्या उपक्रमास आता तरुणांचीही गर्दी होऊ लागली आहे. पुण्यातील लोकांच्या आग्रहाखातर ह्या उपक्रमाची सुरुवात नुकतीच पुण्यातही झाली आहे...

वाचनवाढीसाठी जेव्हा एखाद्या पुस्तकाची दुसरी आवृत्ती बाजारात येते तेव्हा त्या आवृत्तीची किंमत कमी ठेवता येईल का? ह्याचा जरूर विचार ह्यावा. कधीतरी लेखकांनी पुस्तकाचा आशय माध्यमांवर जाहीर करावा व पुस्तक वाचकांना देण्यासाठी सुचवावे.

आपल्या जीवनातील काही गोष्टी अमर असतात. लिखित साहित्य हे त्यामधील एक. पुस्तक एक वारसा आहे पुढील पिढीसाठी. नवीन लेखक लिहीत आहेत, दिवाळी अंक बाजारात येत आहेत, वाचानाळू मंडळी ह्या जगात आहेत, वाचनरुपी सुगंध सर्वांचाच घरात दरवळत राहील ह्याची खात्री आहे...

**- निरुता भाटवडेकर**

भ्रमणध्वनी : ९८२०६ २२७०२






# एक-एक वाचक जोडावा...

अक्षय प्रभाकर वाटवे

संपर्क-संवाद-प्रसारण-प्रकाशन आदींच्या संक्रमण काळातून सध्या आपण जात आहोत. एकूण साहित्यव्यवहारात अनेक महत्त्वाचे बदल घडून येत आहेत. तंत्रज्ञानाच्या जोरावर मोफत आणि जागतिक पातळीवर निर्माण झालेली खुली साहित्यिक व्यासपीठे दिवसेंदिवस अधिक फोफावत असल्याने एका बाजूला लिहिणाऱ्या नव्या मंडळींचा आणि जोडीने वाचणाऱ्या मंडळींचा आकडा भरमसाठ वाढतो आहे. तर दुसऱ्या बाजूला पारंपरिक छापील पुस्तक प्रकाशन आणि विक्री व्यवसाय उतरणीला लागल्याचीदेखील चर्चा आहे.

या पृष्ठभूमीवर वाचन संस्कृती, वाचनाचे प्रमाण (संख्यात्मक आणि गुणात्मक) याचा आढावा घेत असताना, वाचनाचे प्रमाण कशाच्या आधारावर ठरवावे हा मुद्दा सापेक्ष आहे. या अनुषंगाने मला,

१. वाचक, ग्रंथालयातून पुस्तके आणून वाचत नसतील; मात्र प्रत्यक्षात पुस्तके विकत घेऊन वाचत असतील, तर वाचन कमी झाले असे म्हणावे का?

२. वाचक, छापील पुस्तके वाचण्याऐवजी, इंटरनेटवर उपलब्ध असेलेले साहित्य (कथा, ब्लॉग, माहितीपर लिखाण इ. सर्व प्रकारचे लेखन) वाचत असतील, तर वाचन कमी झाले असे म्हणावे का?

३. वाचक, फक्त वृत्तपत्रे आणि समाज माध्यमांवरून - मोबाइल रीडिंग (विशेषतः फेसबुक आणि व्हॉट्सअप ब्लॉगद्वारे प्रसारित होणारे लिखाण वाचत असतील, तर काय निष्कर्ष काढावा?

माझ्या माहितीप्रमाणे 'मीडिया रीसर्च युझर कौन्सिल' वाचनाची काही सर्वेक्षणे करते. (ते खास करून वृत्तपत्र आणि मासिके वगैरे बाबतीत आहे असे समजते) मात्र त्यांचा डेटा खुल्या स्वरूपात उपलब्ध नाही. काही खासगी संस्था, माध्यम समूह स्वतः साठी अशी पाहणी करतात, असेही ऐकण्यात आले आहे. मात्र, त्याचेदेखील तपशील सर्वांसाठी जाहीर केले जात नाहीत. त्यामुळे सरसकट वाचनाचे प्रमाण ठरवणे, हे पुस्तकाच्या खरेदी-विक्री व्यवहारावर आणि ग्रंथालयच्या सदस्य संख्येत होणाऱ्या वाढीवर किंवा घटेवर अवलंबून आहे, असे म्हणता येईल. मात्र, याच विधानाला जोडून पुढचा मुद्दा उपस्थित होतो तो असा की, अशा प्रकारची आकडेवारी काढायची झाल्यास किती संस्थांना यात सहभागी करून घ्यायचे? आणि किती संस्था प्रत्यक्ष सहभागी होतील? असे गृहीत धरू की, खरेच अशा प्रकारचे सर्वेक्षण झाले आणि त्यातून आशादायी आकडेवारी समोर आली, तरी प्रत्यक्षात प्रत्येक व्यक्ती काय वाचते आणि त्याचे परिणाम काय होतात, हा एक मुद्दा शिल्लक राहतो. तसेच, वर उल्लेखित क्रमांक दोन आणि तीन हे प्रश्नदेखील अनुत्तरित राहातात. म्हणजे, जी मंडळी छापील स्वरूपाच्या साहित्याव्यतिरिक्त जे वाचतात त्यांचे काय? त्यामुळे वाचन कमी झाले आहे हे विधान कोण, कोणत्या भूमिकेतून आणि कोणत्या व्यासपीठावरून करतो आहे याला सर्वात अधिक महत्त्व आहे, असे मला वाटते; ते यासाठी की, जी व्यक्ती किंवा संस्था किंवा कोणीही अशा प्रकारचे भाष्य करत असेल; ती तिच्या स्वतःच्या दृष्टिकोनातून हा निष्कर्ष काढत असते. कदाचित 'वाचन कमी झाले आहे', असा निष्कर्ष काढणाऱ्यांना वाचन म्हणून 'जे' महत्त्वाचे वाटते; 'ते' वाचक वाचत नसतील. म्हणजे, जे तुम्हाला हवे, ते वाचक वाचत नाही; याचा अर्थ, 'वाचनाचे प्रमाण घटले' असा घेतल्यासारखं होईल. हे काही योग्य वाटत नाही.

वाचनसंस्कृती कमी झाली आहे किंवा नाही यावर शिक्कामोर्तब करण्यात वेळ खर्ची घालण्यापेक्षा एकूणच वाचकसंख्या गुणात्मक आणि संख्यात्मक पद्धतीने कशी वाढवता येईल, ह्यावर अधिक भर द्यायला हवा. बदलती माध्यमे, त्याचे प्रभाव आणि त्यांचा सुनियोजित वापर या सगळ्याचा विचार करून मला पुढील मांडणी करावीशी वाटते.

ज्या वाचनाचा ऊहापोह आपण करत आहोत ते वाचन म्हणजे, छापील साहित्य विकत घेऊन त्याचे वाचन? की, ग्रंथालयातून साहित्य आणून त्याचे वाचन? की इतर सर्व माध्यमांद्वारे लिखित स्वरूपात प्रसारित होणारा मजकूर? यातले नेमके कशाचे प्रमाण वाढवायचे आहे, हेही ठरवावे लागेल. हे ठरवत असताना

फुकट आणि विकत हा मोठा परिणाम करणारा घटक आहे, हे विसरून चालणार नाही. थोडक्यात, वाचनाचे प्रमाण कमी झाले आहे की वाढले आहे किंवा कसे? हे ठरवणे जितके गुंतागुंतीचे आहे, तितकेच किंबहुना त्याहूनही वाचणाऱ्यांची संख्या वाढवणे हे अधिक गुंतागुंतीचे आहे.

मुख्यत्वे करून छापील साहित्य विक्री आणि ग्रंथालयांमधून होणारे पुस्तकांचे वितरण हे प्रमाण वाढवण्याचे आव्हान समोर आहे असे दिसते. दुसरे असे की, वाचनाबद्दल जागृती निर्माण करणे. हे करण्याची जबाबदारी कोणाची? तर मला असे वाटते की, आज जी व्यक्ती लेखन-वाचन व्यवहारात सक्रिय आहे, त्या प्रत्येकाची ही जबाबदारी आहे. त्यातूनही यात जर अग्रक्रम ठरवायचा झाला, तर लेखक, प्रकाशक, पुस्तक विक्रेते, साहित्य विषयक संस्था-ग्रंथालये आणि सामान्य वाचक असा क्रम लावता येऊ शकेल. हे करताना आधुनिक तंत्रज्ञानाचा पुरेपूर वापर करून नियोजनबद्धरीत्या वाचकसंख्या नक्की वाढवता येऊ शकते.

मला वाटते की, काळाची पावले ओळखून सोशल मीडिया मार्केटिंगचा नीट वापर केला, समाजमानसात वाचनाची गरज निर्माण केली, तर आपोआप आपले ईप्सित साध्य होईल. त्याकरिता

[redacted]

**१. लेखकाच्या बाबतीत** – समाज माध्यमांचा वापर करून स्वतःची माध्यम प्रतिमा आणि वाचकवर्ग तयार करणे. यात फक्त फेसबुक अकाऊंट पुरते मर्यादित न राहता आणि निव्वळ 'पुस्तक विकत घ्या' हे सांगण्यापुरते माध्यमांचा मर्यादित वापर न करता; स्वतःची वेबसाइट तयार करण्यापासून ते नियमित ब्लॉग लिहिणे, वाचकांना गुंतवून ठेवता येईल अशा कल्पना लढवणे, लिहीत असलेल्या साहित्यकृतीबाबत नेमकेपणाने आपल्या वाचकांशी बोलणे. असे काही प्रयोग करून पाहता येतील. 'मला सोशल मीडिया वेळखाऊ वाटतो'. किंवा तत्सम शेरेबाजी करून माध्यमांच्या ताकदीला कमी लेखू नये. त्याचबरोबर फक्त समाजमाध्यमांपूरते मर्यादित न राहता, शक्य होईल तेव्हा आपल्या पुस्तकातील आशयाच्या अनुषंगाने काही प्रत्यक्ष भेटीगाठी करणे वगैरे नियोजन करता येऊ शकते. काही कार्यक्रम-सादरीकरण करता येऊ शकते. 'हे सगळं करायचं म्हटल्यावर मग आम्ही लेखन कधी करायचं?' असा प्रश्नदेखील काहींना पडू शकतो किंवा, 'आपणच आपली टिमकी काय वाजवायची?' असंही वाटू शकतं. पण बदलत्या काळानुरूप ह्या गोष्टी निःसंशय अवश्यक आहेत. (शंका असलेल्या मंडळींनी निःसंकोच मला संपर्क साधावा.)

**२. प्रकाशक** – पुस्तकनिर्मिती प्रक्रियेत नवे प्रयोग करणे. उदा., आज जगभरात डिजिटल पुस्तकांना चांगला प्रतिसाद मिळतो आहे. डिजिटल बुक्स प्रकाशित होत आहेत, ऑडिओ बुक्समध्ये प्रयोग केले जात आहेत. ऑडिओ-व्हिडिओ या माध्यमांचा कल्पकतेने वापर करता येऊ शकतो. उदा. एकाच पुस्तकाचे जर ऑडिओ बुक, इबुक आणि छापील पुस्तक अशा तिन्ही माध्यमांचा विचार केला, तर नक्कीच वाचक संख्येत फरक पडू शकतो. (अर्थात, सगळीच पुस्तके सगळ्याच माध्यमाकरिता योग्य असतात असे नाही) या नवमाध्यमातील तज्ज्ञ मंडळींचे मार्गदर्शन घेता येऊ शकते.

पारंपरिक विक्री पद्धतीच्या जोडीने पुस्तक अधिक वाचकांपर्यंत पोहोचवण्यासाठी त्याच्या प्रमोशनचे काय नवे 'फंडे' शोधून काढता येतील, याकडे लक्ष द्यायला हवे. प्रसंगी काही ठिकाणी (उदा., ग्रामीण भागांतील शाळा-महाविद्यालये) काही पुस्तके मोफत देऊन, काही लेखकांच्या भेटीगाठी घडवून किंवा सवलतीच्या दरात पुस्तके उपलब्ध करून देऊन किंवा दुर्गम भागात जिथे थेट विक्री होत नाही तिथे पदरमोड करून पुस्तके नेण्याचा प्रयत्न करून नव्या मंडळींना वाचनाची 'चटक' लागेल का? हे पाहायला हवे. ग्राहकांशी अर्थात वाचकांशी थेट संपर्क ठेवणे, नवीन आलेल्या पुस्तकांबद्दलची माहिती त्यांना देणे, ऑनलाइन खरेदी ह्या अशा योजना म्हणजे प्रकाशनाच्या दृष्टीने प्रमोशन आणि मार्केटिंगचा एक भाग असायला हव्यात. ही एक प्रकारची गुंतवणूकच आहे, हेही ध्यानात घ्यायला हवे.

**३. पुस्तक विक्रेते** – याबाबत काही सुचवण्याऐवजी मला पुण्यातील काही प्रमुख पुस्तक विक्रेत्यांचा आवर्जून उल्लेख करावासा वाटतो. (मी पुण्यात राहात असल्याने पुण्यातला विक्रेत्यांचा उल्लेख करतो आहे.) राठीवडेकर यांचे अक्षरधारा बुक गॅलरी, योगेश नांदुरकर यांचे रसिक साहित्य, संजय भास्कर जोशी यांची पुस्तक पेठ, आणि इतरही काही मंडळीदेखील आहेत; मात्र या तिघांचा उल्लेख आवर्जून केला, कारण ही मंडळी फक्त पुस्तक विक्रीचा धंदा करत नाहीत, तर तो करता करता वाचन संस्कृती वाढावी; म्हणून अनेक प्रकारे प्रयत्नशील असतात. अक्षरधारा बुक गॅलरीने पुस्तक विक्री व्यवसायात यंदा रौप्यमहोत्सवी वर्षात पदार्पण केले आहे. आज त्यांच्याकडे विक्रीसाठी ४० हजार पुस्तके उपलब्ध आहेत. प्रदर्शने लावणे, पुस्तके खरेदीसाठी वेगवेगळ्या योजना आखणे, पुस्तकांचा 'मान्सून सेल', मेंबरशिप देणे यांसारख्या कल्पना ते लढवताना दिसतात आणि विशेष म्हणजे प्रत्येक वाचकाशी प्रत्यक्ष संवाद साधण्याचा त्यांचा प्रयत्नदेखील असतो. आर्थिक स्थित्यंतराचे परिणाम इतर व्यवसायाप्रमाणे यांनाही सहन करावे लागले. मात्र, त्यामुळे खचून न जाता थोडी कळ सोसून अक्षरधारा पुस्तक वितरणात भक्कमपणे उभी आहे. रसिक साहित्यदेखील अशाच प्रकारचे काम सुरू आहे. एका वर्षाच्या आत पुण्यापाठोपाठ नाशिकमध्ये शाखा उघडणाऱ्या पुस्तक पेठेच्या संजय भास्कर जोशी यांचा उत्साह दांडगा आहे. साहित्याची आणि व्यवहारची उत्तम जाण असलेल्या संजय जोशी यांच्या फेसबुक वॉलवरून फेरफटका मारला, तर लक्षात येईल की पुस्तक विक्रीत आणि वाचन चळवळ म्हणून वाढवण्यात सोशल मीडियाचा कसा वापर करून घेता येईल.

जोशी अक्षरशः वाचकाला पुस्तक पेठेपर्यंत खेचून आणतात. या सगळ्यांच्या प्रत्येक प्रयत्नाला कदाचित शंभर टक्के यश मिळत असेल-नसेल; पण आज महाराष्ट्रभरात पुस्तके खरेदीकरिता ही नावं विश्वासनीय आहेत.

**४. साहित्यविषयक काम करणाऱ्या संस्था आणि ग्रंथालये –** मला वाटते गुणात्मक आणि संख्यात्मक दोन्हीदृष्ट्या वाचकसंख्या वाढवण्यात कामात या दोन घटकांचा महत्त्वाचा वाटा आहे. या मागचे कारण म्हणजे अशा संस्थांपाशी वाचकांचा असलेला 'डेटा'. तो जर नसेल, तर सगळ्यात पहिल्यांदा अशा संस्थांनी त्यांच्या कार्यक्रमांना उपस्थित राहणाऱ्या, त्यांच्या ग्रंथालयाचे वाचक असलेल्या किंवा ग्रंथालयात क्वचित भेट देणाऱ्या मंडळींची नावे, मोबाइल नंबर आणि ईमेल आयडी अशी माहिती तातडीने गोळा करायला हवी. असलेली माहिती अद्ययावत ठेवायला हवी. शक्य असल्यास त्यांना कोणत्या प्रकारचे साहित्य आवडते, त्याची स्वतंत्र नोंद ठेवता येऊ शकते. इथे आधुनिक तंत्रज्ञान विशेष मदतीला येते. हे काम निगुतीने केले, तर वाचन आणि साहित्य व्यवहारातील एक उत्तम संभाव्य वाचक आणि ग्राहक यांचा अद्ययावत डेटाबेस तयार होतो.

मोठी, नामवंत ग्रंथालये सोडल्यास आज किती ग्रंथालये त्यांच्या सदस्यांशी नियमित संपर्क ठेवून आहेत? मेसेज, फोन कॉल किंवा ईमेल द्वारे नव्या पुस्तकांविषयी किंवा एखादा वाचक ज्या प्रकारची पुस्तके वाचतो त्या व्यतिरिक्त इतर प्रकरातील पुस्तकांविषयीची आवश्यकता आणि उत्सुकता निर्माण करणारी अशी माहिती त्यांच्यापर्यंत पोहोचवली जाते? हे असे घडत नसेल, तर घडायला हवे. घडत असेल, तर त्याचे प्रमाण वाढायला हवे आणि उत्तम प्रमाणात अशा प्रकारचा संवाद होऊनदेखील वाचकसंख्या वाढत नसेल, तर मग संवादाची पद्धत बदलायला हवी. नियमित उपक्रम, कार्यक्रम राबवण्याबरोबरच त्यातले नावीन्य कसे टिकून राहील, याकडेही लक्ष दिले पाहिजे. असे छोटेखानी उपक्रम राबवण्यासाठी महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना स्वयंसेवक म्हणून मदतीला घेता येऊ शकते. संस्थांचे सदस्य किंवा संस्थांची वाचक मंडळी बाहेर समाजात संस्थांची प्रचारक बनायला हवीत. (इथे ग्रंथालय आणि साहित्यविषयक उपक्रम राबवणाऱ्या संस्था दोहोंना संस्था असेच संबोधले आहे.)

'आजकाल वाचकांना वेळच नसतो हो' हे एक सरसकट विधान ऐकू येते किंवा दुसरे विधान म्हणजे 'लोकांना वाचायची आवडच उरली नाही.' हे तितकेसे खरे नाही. कारण हे एका ठरावीक दृष्टिकोणातून केलेले विधान वाटते. आपल्याला जे हवे ते किती वाचक वाचतील आणि वाचकांना जे वाचायला हवे ते आपण किती प्रमाणात पुरवू शकतो; मुख्य म्हणजे वाचकांना काय प्रकारचे वाचायला आवडते याचा शोध आपण किती घेतो, या सगळ्यावर बरेच अवलंबून आहे. याचा अर्थ असा नव्हे की, वाचकांना हवे तेच देत राहा, वाचक अनुनय करा, मागणी तसा पुरवठा करा, असा माझ्या म्हणण्याचा बिल्कुल अर्थ नाही. मात्र, तुमच्या दारापर्यंत, तुमच्या पुस्तकांच्या कपाटापर्यंत वाचक यायला हवा, तर त्यासाठी नक्कीच काहीतरी आकर्षण हवे. जे सहजासहजी इतर माध्यमांद्वारे वाचकाला मिळणार नाही, असे त्याचे स्वरूप हवे. हे 'आकर्षण' काय असले पाहिजे? कसे असले पाहिजे हे ज्याचे त्याने ठरवायला हवे. आजकाल काही ठिकणी कॅफे दिसतात; जिथे चहा-कॉफी, काही किरकोळ न्याहारीचे पदार्थ आणि भरपूर पुस्तके ठेवलेली असतात. काही ठिकाणी वाय-फाय सुविधा आणि बसायला भरपूर वेळ/जागा अशा सवलती उपलब्ध करून दिलेल्या असतात. असे कॅफे अनेकदा ओसंडून वाहताना मी स्वतः पाहिले आहेत. मलाही अशा कॅफेमध्ये जाऊन बसून वाचायला, काम करत बसायला किंवा उगाचच वेळ घालवायला आवडते. अशी मोक्याची ठिकाणे तयार करता येतील का? तिथे येणाऱ्या तरुणाईला पुस्तकाच्या गोष्टी सांगता येतील का? असे काही प्रयोग करता येतील का? हे तपासून पाहायला हवे. रीडर ऑफ द वीक, रीडर ऑफ द मंथ असे छोटेखानी प्रोत्साहनपर पुरस्कारदेखील देता येतील.

मला प्रामाणिकपणे नमूद करावेसे वाटते की, वाचकांचे पुस्तकांशी नाते जुळण्याआधी ते लेखक, प्रकाशक, ग्रंथालय-संस्था अशांशी जुळावे लागते. राहता राहिला, या क्रमवारीतील शेवटचा; मात्र ज्यावर सगळ्यांचीच भिस्त आहे असा घटक म्हणजे, **५. वाचक –** हा वाचक कदाचित स्वतः लेखक, प्रकाशक, संस्थेचा अधिकारीदेखील असू शकतो किंवा वाचनाची आवड असलेला अगदी सामान्य वाचकदेखील असू शकतो. तर अशा वाचकाने काही मुलूभूत पथ्ये पाळणे वाचन संस्कृतीच्या गुणात्मक आणि संख्यात्मक वाढीसाठी आवश्यक आहेत.

१. पुस्तके सनदशीर मार्गाने विकत किंवा ग्रंथालय स्वरूपात घेणे.

२. आपण वाचलेले आपल्याला आवडलेले पुस्तक शक्य असल्यास अजून चार मित्रांना प्रती विकत घेऊन भेट म्हणून देणे. अगदी किमान वर्षातून एकदा असे नक्की करता येऊ शकते.

३. समाज माध्यमांवरून आपण वाचत असलेल्या पुस्तकाबद्दल माहिती कळवावी; जे सध्या अनेक मंडळी करत आहेत. काही मंडळी वाचन कट्टा किंवा फेसबुक, व्हॉट्सअप ग्रुपदेखील चालवताना दिसतात.

४. ज्या ग्रंथालयाचे आपण सदस्य आहोत, तिथे दर वर्षी किमान एक तरी नवा सदस्य आपल्या संपर्कातून जोडावा. इत्यादी.

असे सगळे प्रयत्न निगुतीने आणि एकमेकांच्या सहकार्याने केल्यास वाचकसंख्या खात्रीने वाढेल. ती तशी वाढली नाही, तर निराश न होता पुन्हा परखड आत्मपरीक्षणही करणे तितकेच गरजेचे आहे.

निसर्गाचा नियमच आहे की, जर तुम्ही बदलत्या काळाशी सुसंगत असे बदल स्वतःत केले नाहीत, तर आपोआप तुम्ही नामशेष होता. हा नियम लेखन-प्रकाशन-वाचन अशा एकूणच साहित्य व्यवहारालादेखील पुरेपूर लागू आहे.

**– अक्षय प्रभाकर वाटवे**
भ्रमणध्वनी : ९४२०२६०८०८




# लोकसहभागातून वाचनसमृद्धीकडे

प्रा. डॉ. फू.ला. बागूल

**म**राठी साहित्याचा प्रवाह दिवसेंदिवस समृद्ध होतो आहे. अनेक नवे-जुने लेखक आपापल्या मगदुराप्रमाणे साहित्याची सेवा करीत आहेत. नवे लेखकही नव्या उमेदीने येत आहेत. लिहिते हात वाढत आहेत ही समाधानाची बाब असली तरी वाचणारे डोळे मात्र संख्येने रोडावत आहेत. पूर्वी वाचक जास्त लेखक कमी होते. विशेषतः युवा वर्गाला वाचनाकडे वळविण्याचे मोठे आव्हान आपल्या पुढे आहे. अर्थात युवा वाचन करीत नाही असे नाही. फेसबुक, ब्लॉग, ई-बुक, ट्विटर, व्हॉट्सअॅप-वरील चुटकुले-कविता तो वाचतोच वाचतो. या युवा वाचकाला ग्रांथिक वाचनाकडे वळविता आले पाहिजे. ग्रांथिक वाचन उपरोक्त माध्यमांद्वारे होणाऱ्या वाचनापेक्षा जास्त महत्त्वाचे आहे.

ग्रंथालयांची चळवळ ही एक देशाच्या सर्वांगीण प्रगतीसाठीची चळवळ म्हटली पाहिजे. शासकीय अनुदान प्राप्त अशी ग्रंथालये खेडोपाडी सुरू आहेत. काही वाचनालये पक्षही चालवतात. मात्र या ग्रंथालयाच्या चालकांच्या समस्या आहेत. तुटपुंजे व अनियमित वेतन ही प्रमुख समस्या आहे. अशा ग्रंथालयांचे अनुदान वाढविल्यास ही ग्रंथालये अधिक सक्षम होऊन वाचकांची चांगली सेवा करू शकतील. ग्रंथालयांचे मोठे जाळे उभारणारे देश प्रगतीपथावर आहेत. शासनाखेरीज जनतेचा सहभागही या ग्रंथालयांना वाचवू शकतील. आपली वाचून झालेली पुस्तके अशा ग्रंथालयांना दान दिली पाहिजेत.

[redacted]

ग्रंथ विकत घेऊन वाचण्याचे संस्कार मुलांवर केले पाहिजेत. खाऊच्या पैशातून अथवा महागड्या शालेय वस्तू न घेता कमी किंमतीच्या वस्तू घेऊन बचत केलेल्या पैशातून मुलांना पुस्तकं विकत घेण्याची सवय आम्ही लावली पाहिजे. विविध उत्सवप्रसंगी देणगी देणाऱ्या दात्यांनी ग्रंथदानही केले पाहिजे. साहित्यिकांनी, पत्रकारांनी आपल्याला मिळालेल्या पुरस्काराच्या रकमेतून ग्रंथदान केले पाहिजे. वाचनाची चळवळ ही जनचळवळ झाली तर महाराष्ट्राची 'वाचनवेडा' ही पूर्वापार ओळख पुन्हा प्राप्त करता येईल.

जगातील उत्तमोत्तम साहित्य मराठीत भाषांतरित होत आहे. या वाङ्मयाकडे वाचकांना वळविले पाहिजे. साहित्यकलेचा आवाका, जीनवदर्शनातील सूक्ष्मता व व्यापकता, अभिव्यक्तीच्या पद्धती इत्यादी गोष्टी समजून घेण्यासाठी या वाचनाचे महत्त्व आहे. या खेरीज जागतिक वाङ्मयात आमच्या वाङ्मयाचे स्थान काय, आम्ही कुठे कमी पडतो, आम्ही काय आणि कसे लिहिले पाहिजे याचे दिग्दर्शन या भाषांतरित वाङ्मयातून होऊ शकते. स्वविकासाच्या सर्व वाटा आम्ही चोखाळल्या पाहिजेत. शेवटी मानवी जीवन उन्नत करणे हे देखील साहित्याचे एक प्रयोजन आहेच.

साहित्यिक उपक्रमांसाठी लोकसहभाग वाढविला पाहिजे. उठसूठ शासकीय मदतीवर अवलंबून राहू नये. लोकसहभागातून ग्रंथालये उभारता येतील. छोटे परिसंवाद गावातच आयोजित करता येतील. साहित्यिकांनीही अशा ग्रामीण स्तरावरील उपक्रमात विना मोबदला सहभाग दिला पाहिजे. ग्रंथालयांच्या वाचक सभासदांचे छोटे छोटे मेळावे घेता येतील. अशा मेळाव्यांना नवोदित लेखकांना तालुक्यातीलच साहित्यिकाने मार्गदर्शन केले पाहिजे. अस्मितादर्श, कवितारती या नामांकित नियतकालिकांच्या सभासदांचे मेळावे होत असतात. हा महत्त्वाचा वाङ्मयीन उपक्रम होय. महाविद्यालयातील मराठी वाङ्मय मंडळांनी लेखक तुमच्या भेटीला, ग्रंथप्रदर्शन भेट, ग्रामवाचनालय स्थापना असे उपक्रम राबविल्यास वाङ्मयाची चळवळ केवळ जिवंतच ठेवली जाणार नाही तर ती समृद्धही होत जाईल. वाङ्मयीन कार्यक्रमांना ग्रामीण भागात प्रचंड प्रतिसाद लोक देतात. मागे चाळीसगावला प्रा. साधना निकम यांनी अंकुरच्या बॅनरखाली घेतलेल्या कविसंमेलनाला हजार लोक दिवसा १० ते रात्री ८ असे सलग १० तास हजर होते. असे चित्र ग्रामीण भागात सर्वत्र आढळते, तेव्हा साहित्याची चळवळ अनागर लोकच जिवंत ठेवतात असे मान्य करावे लागते.

पुस्तकाच्या किंमतीबाबतही खरेदीदारांची तक्रार असते.

या किंमती कमी करण्यासाठी उपाययोजना सुचविणाऱ्या छोट्या बैठका, शिबिरे घेतली गेली पाहिजेत. गोरखपूरची गीता प्रेस बंद पडण्याची वार्ता कानी आली. या प्रेसची पुस्तके दर्जेदार छपाईची असूनही त्याच्या किंमती अत्यंत कमी आहेत. भक्तगण त्या प्रेसमध्ये विनामूल्य काही सेवा देतात. त्यामुळेही किंमतींवर नियंत्रण त्यांना शक्य होते. मग असा प्रयोग आम्हाला मराठी ग्रंथांबाबत का करता येऊ नये. हजारो बेरोजगार युवक आपला काही वेळ प्रकाशन संस्थांना देऊ शकतात. मुद्रित शोधन, टंकलेखन, बाईंडिंग इत्यादी कामे सेवाभाव म्हणून जर अशा युवकांनी हाती घेतली तर युवकांचे वाचनही होईल आणि सेवा करण्याचे अपार समाधानही त्यांना लाभेल. परिणामी पुस्तकांच्या किंमती आटोक्यात राहतील. मागे मुंबईतल्या विद्यार्थ्यांना शिवसेनेकडून लॅपटॉप देण्याची घोषणा केली गेली होती. लॅपटॉप देणं शक्य होत असेल तर ग्रंथ का देऊ नयेत? स्थानिक ग्रंथालयांना पक्षांनी ग्रंथ दिल्यास समुहाचे वाचन शक्य होईल. राज्याच्या अर्थसंकल्पात ग्रंथ प्रकाशन व्यवहारासाठीची स्वतंत्र तरतूद असायला हवी.

मुळात भाषेकडे आम्ही गांभीर्याने पाहतच नाहीत. भाषा हे केवळ संवादाचे माध्यम नाही. वैश्विक सत्तेच्या वाटा भाषेतून जातात हे नवे भान आम्हास यावयास हवे. जर्मनीत संस्कृत विद्यापीठ चालवले जाते आणि आम्ही संस्कृतबद्दल आस्था दाखवित नाही हा विरोधाभास होय. १०+२ स्तरावरील विज्ञान शाखेच्या विद्यार्थ्यांना मराठीला पर्याय म्हणून आय.टी. या विषयाची सोय आहे. विज्ञानशाखेचे ९९.९९ टक्के विद्यार्थी मराठी सोडून आय. टी. घेतात. बेस्ट फाईव्ह या निकाल प्रकारामुळे दहावीची टक्केवारी वाढली आहे. पालकही मग या सोकॉल्ड हुशार विद्यार्थ्यांना विज्ञानाकडे पाठवतात. फार मोठा विद्यार्थी वर्ग आय.टी. व्हाया ११वी विज्ञान मार्गे मराठीपासून दुरावत चालला आहे. तेव्हा मराठी हा विषय सर्व शाखांना सक्तीचा केला पाहिजे.

साधारणपणे समीक्षा आणि कोश यांचे वाचन नगण्य प्रमाणात होत आहे ते वाढविणे गरजेचे आहे. समीक्षा हा फक्त लेखकांनीच वाचायचा प्रकार आहे असा समजच दृढ होऊ पाहतो आहे. त्यातही समीक्षा लिहावी ती प्राध्यापकांनीच असेही चित्र आहे. यामुळे समीक्षा या प्रवाहाबद्दलची सूक्ष्मशी भीतीच सामान्यांच्या मनात बसली आहे. समीक्षकांनीच ही भीती घालविण्यासाठी जाणीवपूर्वक सोप्या शब्दांची योजना त्यांच्या समीक्षालेखनात करावी. समीक्षक मात्र प्रभाव पाडण्याच्या मोहातून जाणीवपूर्वक आकलनास कठीण असे शब्दप्रयोग करतात. व्यापक नजरेतून असे न म्हणता 'व्यापक परिप्रेक्ष्यातून' असे लिहिले की समीक्षक ताकदीचा ठरतो, ठरवला जातो पण यामुळे सामान्य वाचक समीक्षेपासून दुरावतो. समीक्षा मग साहित्यातही वर्णव्यवस्था आणणारी ठरते. विविध प्रकारचे कोश आता येत आहेत. कोशांचे पारंपरिक स्वरूप बदलले आहे. वाचकांनी केवळ गरजेपुरता कोश उघडू नये तर ज्ञानपिपासू वृत्तीने कोश वाचायला हवेत.

इंटरनेट, व्हॉट्सॲप, गुगल, ट्विटर, एकूणच सोशियल नेटवर्किंगच्या नको तितक्या आहारी गेलेल्या युवा पिढीस ग्रंथालयात आणण्याचे आव्हान आपल्या समोर आहे. नीतिवान, समर्थ, राष्ट्रउभारणीत योगदान देणारा नागरिक घडवायचा असेल तर केवळ माहिती संपन्न असून भागणार नाही तर तो ज्ञानसंपन्नही असला पाहिजे. जगातल्या सर्व देशांच्या अर्थव्यवस्था ज्ञानाधिष्ठित राहणार असल्याने ज्ञान देणारी ग्रंथालये अपरिहार्य आहेत. वाचनसंस्कृतीचे संरक्षण व संवर्धन हा प्राधान्यक्रमाचा अजेंडा असायला हवा. सासरी जाणाऱ्या विवाहितेने चार साड्या कमी नेल्या तरी हरकत नाही पण तिने दोन पुस्तकं सोबत घेऊन जायला हवीत. वाचन ही आपली जीवनशैली झाली पाहिजे. वाचनामुळे जीवन समृद्ध बनल्याची ग्वाही अनेक थोरांनी दिली आहेच. प्राचार्य भोसले म्हणत की, पुस्तकांना गंध असतो. पुस्तकं जीवनातला पेच सोडवितात. माणसं वाचायला शिकवतात. श्रीमंती पुस्तकांची हवी. वाचनाचा हेतू फार कमी विरंगुळा म्हणून असावा, जास्त करून ज्ञानाचे अद्ययावतीकरण, वैचारिक प्रगल्भता, स्पर्धेत टिकून राहण्याचे सामर्थ्य हा असावा. वाचनाचे बरेच हेतू सांगितले जातात. संवेदनशीलता वृद्धिंगत होण्यासाठी, आकलन क्षमता वाढण्यासाठी, जीवनातल्या खाच खळग्यांची पूर्व कल्पना येण्यासाठी, स्वलेखन निर्दोष होण्यासाठी, तत्त्वज्ञानाधारे मनाला स्थिरता मिळविण्यासाठी, व्यापक जीवनदर्शन घडण्यासाठी (निर्मिती क्षमता, जाणीव जागृती, भानवाविष्कार, विचारप्रक्षोभ) संस्कार होण्यासाठी, जीवनातील व्यामिश्रता व निबिडता कळण्यासाठी, जीवनाचा तळ शोधण्यासाठी, मृत्युचा अर्थ शोधण्यासाठी, मानवातल्या नात्यांचे पुनरुज्जीवन करण्यासाठी, गतकाळातील सांस्कृतिक वास्तव समजून घेण्यासाठी वाचन केले पाहिजे. तसेच सामाजिक न्यायाची संकल्पना समजून घेण्यासाठी, वैचारिक चर्चेत प्रभाव पाडण्यासाठी, अभिरुची समृद्ध करण्यासाठी, जीवनातल्या अगणित शक्यता ज्ञात करून घेण्यासाठी, मी कोण आहे हे जाणून घेण्यासाठी, जगाकडे पाहण्याचा दृष्टिकोन उदार होण्यासाठी, चिकित्सकपणा येण्यासाठी, जीवनमूल्य – सौंदर्यमूल्ये यांची जाणीव होण्यासाठी वाचन अपरिहार्य आहे.

पूर्वी मनोरंजनाची साधने सीमित असल्याने मराठी माणूस रोज सायंकाळी रामायण, महाभारत, हरिविजय, पांडवप्रताप अशी पौराणिक आख्यानकाव्ये वाचीत असे. आज माध्यम क्रांतीच्या युगात आमच्या सायंकाळ दूरदर्शनादि संस्थांनी हिरावून घेतल्या आहेत. अर्थकेंद्री जीवन, चंगळवादी जीवनशैलीमुळे वाचन कमी झाले.

साम्राज्य आणि शेक्सपिअर यातून एकाची निवड करायची म्हटली तर आम्ही साम्राज्य सोडू पण शेक्सपिअर सोडणार नाही असा ब्रिटिश जनतेचा निर्धार होता. वाचनामुळे फ्रेंच राज्यक्रांतीस बळ मिळाले, अमेरिकेतून इंग्रजीसत्ता नष्ट होण्यास साहाय्य मिळाले. आरंभ काळात देशभर ग्रंथालयांचे जाळे आणि महामार्गाचे जाळे या दोन प्रमुख कारणांमुळे अमेरिका महासत्ता बनली. भारतीय स्वातंत्र्य आंदोलनासही तत्कालीन निबंध वाङ्मयातील विचारांचे पाठबळ मिळाले.

जीवन तंत्रज्ञानाने ग्रासले आहे, माध्यमे आपल्या इच्छा नियंत्रित करू लागली आहेत, इतर माध्यमांनी जनमानसावर आपला प्रचंड पगडा बसविला आहे. जीवनाला गती आली आहे. जगणं हाच उद्योग झाला आहे अशा संक्रमणकाली आपले भांबावलेपण वाचनानेच दूर होईल.

हल्ली वाचनाचंही वय असावं अशा प्रतिक्रिया आहेत. संस्कारशील वाचन कुमारावस्थेतच आटोपलं पाहिजे. चाळिशीनंतर व्याधी बहुलतेमुळे डॉक्टरच लेखन–वाचन बंद करायला सांगतात. चांगले आरोग्य असेपर्यंत जसे पर्यटन आटोपून घ्यावे तसे वाचनाचेही होऊ घातले आहे. चांगली पुस्तकं वाचल्याशिवाय जगाचा निरोप घेऊ नका. पुस्तकांना हातात घेऊन जेव्हा वाचक वाचू लागतो तेव्हाच पुस्तकाचा जन्म होतो.

युवकांचे जगण्याचे संदर्भ बदलेले आहेत. त्याच्या सर्वच आकांक्षा विस्तारल्या आहेत. प्रगत देशात युवक काय वाचतात याचा सर्व्हे केला जातो. असा एक सर्व्हे आपल्याकडे २००९ मध्ये नॅशनल बुक ट्रस्टने केला होता. त्यात ४५ कोटी ९० लाख युवकांचे सर्वेक्षण केले. वयोगट होता १५ ते २५. यातील फक्त ८ कोटी ३० लाख युवकच वाचक होते. याचा अर्थ दर चार युवकांमागे फक्त एकच युवक वाचन करतो. मग सांगा गुणात्मक तरुणाई कशी साकारेल? फक्त ३५ टक्के युवक विज्ञान तंत्रज्ञान वाचतात. बहुसंख्य तरुणांना राजकारण, बातम्या वाचायला आवडतात. ४२ टक्के युवक ललित साहित्य तर २४ टक्के युवक ललितेतर साहित्य वाचतात. त्यातही फॅण्टसी, कॉमिक्स वाचणे पसंत करतात. आजचा युवक अनेक आवर्तात सापडला आहे. दैवशरणता, प्रवाह पतितता, स्थितिवादी वृत्ती, भावनिक लाटांवर हेलकावे खाणारी मानसिकता, समूहशरणता, इत्यादी आवर्तातून युवकाला बुद्धिप्रामाण्यच रोखू शकेल. ग्रंथवाचनानेच युवकांना बुद्धिप्रामाण्य येईल.

ग्रंथ काळजाची काहिली शांत करतात, मनातले क्षोभ, विकार मावळून टाकतात. आयुष्याकडे पाहण्याची नजर देतात. भागो नही बदलो हा संस्कार करतात. प्रेरणा देतात, जीवनातला अभाव दूर करतात, मानवाला मुक्त करतात. पुस्तकं जगाला आकार देतात. जगण्याला अर्थ देतात. जग ज्या संकल्पनांवर चालते त्या संकल्पना आपल्या पर्यंत पुस्तकेच पोहोचवितात. लंडनच्या ब्रिटिश म्युझियमच्या ग्रंथालयात बसून कार्ल मार्क्सने 'दास कॅपिटल' हा ग्रंथ लिहिला आणि या ग्रंथानं जगाचा इतिहास, भूगोल बदलून टाकला. रस्किनच्या 'अनटू द लास्ट' या ग्रंथानं महात्मा घडविला. प्रबोधनकार ठाकरे यांच्या वाङ्मयाने महाराष्ट्राच्या विचारामध्ये १८० अंशाचा बदल केला असे म्हटले गेले. पुस्तकं नसली तरी समाजाची धारणा खिळखिळी होते. नवे विचार स्फुरत नाहीत, समाज संवेदनाहीन होतो. कल्पनाशक्ती खुंटते, उरतो फक्त रानटी उन्माद म्हणून पुस्तकं असली पाहिजेत. ती वाचली पाहिजेत.

जसा युवकांचा विचार आपण केला तसा शेतकरी वाचक, खेळाडू वाचक, नवसाक्षर वाचक, बालवाचक, ग्राहक वाचक, व्यापारी वाचक यांचाही विचार केला पाहिजे. त्यांना उपयुक्त असे लेखन केले पाहिजे.

**– प्रा. डॉ. फू. ला. बागूल**
भ्रमणध्वनी : ९४२०६०५२०८

॥ग्रंथाली॥

[redacted]




[redacted]




# वाचन आणि माझ्यात अंतर पडत गेलं!

**सचिन वानखडे**

**वा**चन हा शब्दच मुळात मनाला सुखावह वाटणारा मनाची माती भुसभुशीत करणारा असा आहे. वाचनाने अंतर्मनाची मशागत होते. मुग्ध भावनांना वाचनाने योग्य वळण मिळते. वाचन कायम आपल्याला दातृत्वाने बरंच काही देत आलंय पण वाचनानं कुणापासून कधी काही हिरावून घेतलं असं आजपर्यंत माझ्यातरी ऐकिवात नाही.

काळ बदलला, जगण्याची साधने बदलली, प्रगतीच्या आवेगावर जग स्वार झालं, जागतिकीकरणानं त्यात अजून भर घातली. तंत्रज्ञानामुळे जग जवळ आलं पण दुर्दैवानं याचा परिणाम पूर्वाश्रमीच्या अनेक गोष्टींवर झाला. माणूस आपल्या आवडीनिवडी, छंद यांपासून दुरावत गेला. मग वाचन यापासून कसं वेगळं राहील?

बालपणी प्राथमिक शाळेत असताना शाळेचे टेकाळे मास्तर महिन्यातून एकदा शाळेच्या कामानिमित्त तालुक्याच्या गावी जात. तालुक्याचं गाव तसं अंतरानं जवळचंच पण सगळी कामं आटपून सकाळी ११ वाजता गेलेले टेकाळे मास्तर दुपारी तीन वाजेपर्यंत परत येत. आम्ही मुलं डोळ्यांत प्राण आणून त्यांच्या परतण्याची वाट पाहत बसू. बाजारात गेलेल्या बापाची खाऊच्या आशेनं पोरानं दारात उभं राहून आर्जवीपणानं वाट पहावी तशीच आम्ही मास्तरांच्या परतण्याची वाट पाहत असू. शाळेच्या गेटमधून ते परतून आत आलेले दिसताच आम्ही सगळी मुलं त्यांच्याभोवती कालवा करत उभे राहत असू आणि सर्वांचं लक्ष सरांच्या हातात असलेल्या कापडी पिशवीवर. मास्तर कधी पिशवीत हात घालतात नि त्यात आणलेल्या लाखमोलाच्या वस्तू आम्हा मुलांच्या हवाली करतात असं होऊन जाई. आम्ही व्याकुळतेनं मास्तरांकडे पाहत असू अर्थात त्या पिशवीत कुठलाच खाऊ वा पैसे नसायचेच. असले तरी त्या बालवयात पैशांची किंमत ती काय? पण पैशापेक्षा बहुमोल अशी पुस्तकं त्या पिशवीत मास्तरांनी तालुक्याच्या गावाहून आमच्यासाठी आणलेली असत. ती वाचण्यासाठीच मास्तरांची वाट पाहायचा तो अट्टहास केलेला असायचा. मास्तरांनी दिलेली पुस्तकं घेऊन आम्ही वर्गात धूम ठोकत असू. मास्तरांनी आणलेली पुस्तकं तशी मोजकीच आणि वाचणारी मुलं वीसेक असत. मग आळीपाळीने नंबर लावून आम्ही ती पुस्तके वात असू. वाचनाची स्पर्धा जणू आम्हा मुलांत लागलेली असायची. कधी कधी एखाद्या कडलं पुस्तक वाचून झालं तरी तो दुसऱ्याला देत नसत. अर्थात याला त्या मुलाबरोबर झालेले जुने वाद, भांडण कारणीभूत असे. जुने हवेदावे यावेळी उफाळून येत असत. अशावेळी त्या मुलाला संत्रागोळी, चॉकलेट, बोरं, चिंचा याचं आमिष दाखवून त्याची मनधरणी करावी लागे. एकदा असाच सुरेश अण्णांचा बबल्याही मला त्याच्याकडचं गोष्टीचं पुस्तक दाखवायला राजी होईना. खरं तर त्याच्यानंतर वाचण्याचा नंबर माझाच होता पण वर्गात कोणत्या कारणासाठी त्याला मी बुकलून काढल्याचा राग त्यानं मनात धरला. तो ऐकायला तयारच होईना. शेवटी त्याला आमच्या मळ्यातली खिसाभर बोरं नि गौळच्या जत्रेतून आणलेला माझा लाडका भोवरा लाच म्हणून द्यावा लागला तेव्हा कुठं तो पुस्तकं द्यायला तयार झाला. पण प्रकरण एवढ्यावरच थाबलं नाही. घरी आल्यावर वडिलांनी भोवरा कुठाय? असं विचारल्यावर तो शाळेत हरवला असा खोटा कांगावा मला त्यावेळी वडिलांसमोर करावा लागला. त्यावेळी त्यांनी मलाच बुकलून काढल्याचं चांगलंच आठवतंय. पण वाचनाच्या वेडापायी पाठीवर मिळालेला मार सपकं वाटायचं कारण त्या वयात वाचन माझ्या हाडामांसात भिनलं होतं. पुढे टेकाळे मास्तरांची शाळेतून बदली झाली आणि पुस्तकांसाठी आम्हा मुलांची परवड सुरू झाली. प्राथमिक शिक्षण संपल्यावर पुढे, माध्यमिक शाळेत प्रवेश घेतला. अभ्यासात स्पर्धा निर्माण झाली. एस.एस.सी. परीक्षेचा अभ्यास, वडिलांना हवा असलेला गुणांचा चढता आलेख या सगळ्याची पूर्तता करताना माझं वाचनाचं जग पारखं होऊ लागलं. गुण मिळत गेले, परीक्षा पास होत गेलो, पण मनातला वाचनाचा कप्पा रिताच राहत गेला.

महाविद्यालयीन शिक्षण घेतानाही अवांतर वाचनाचा संबंध अवचितच येत गेला. वाचन आणि माझ्यात अंतर पडत गेलं, ते कायमचंच. शिक्षण संपलं आणि जगण्याचा संघर्ष सुरू झाला, नोकरीचा शोध, कौटुंबिक जबाबदाऱ्या, ऐषारामी जगण्याची चाललेली धडपड या सगळ्यामुळे जगण्याचा संघर्ष बिकट होत जातो. आपलंच वर्तमान ढवळून निघतं आणि आकस्मिकपणे आपल्या अनेक आवडी आणि छंदांचं निर्दालन होत जातं, छंद


स्वस्थ बसू देत नाहीत आणि जगण्याचे प्रश्न तगू देत नाही. मनाची फरफट होते, पण हे कायमच होतं असं ही नाही.

आयुष्याच्या एखाद्या टप्प्यावर आपल्या जीवनाला स्थैर्य लाभतं. पोटापाण्याचा प्रश्न काही अंशी सुटलेला असाते. जगण्याचा संघर्षही काहीसा सोपा झालेला असतो. उसंतीचे क्षण मिळू लागतात आणि अशावेळी मनातल्या सुप्त इच्छा, छंद, आवडी नव्याने मनात नाचू लागतात. आपणही त्यांच्याकडे पुन्हा आकर्षिले जातो तसं वाचन माझ्या पाठसावली सारखं मागं येत राहीलं. परवाच कपाटात महत्त्वाची कागदपत्रं शोधत असताना कपाटातल्या 'बलुतं'वर नजर गेली. पुन्हा वाचून काढलं. हरवलेलं काहीतरी पुन्हा मिळाल्याचा फील आला. खरंतर पुस्तकं वाचण्यात जी तृप्ती आहे ती आजच्या मोबाईल, संगणक यावर वाचण्यात नाही. मोबाईलवरलं वाचन आलंय. ओंजळभर पाण्यानं आभाळभर तहान कधीच शमत नसते, म्हणून मोबाईल, संगणकावरलं वाचन मला तरी आवडत नाही. सांप्रत काळात तंत्रज्ञान सुधारलं. माणसांपेक्षा वस्तूंना, यंत्रांना अधिक मोल आलंय, गुगलवर जग पाहता येते, पण त्याने मनाला समाधान थोडीच मिळतं? कारण तुमचं काळीज गुगलला कनेक्ट करता येणारच नाही. या आभासी जगापासून वाचनाकडे माझी पावलं आपोआप खेचली जातायत, कारण माझं समाधान वाचनात दडलंय, नव्या पिढीतही वाचनाची उर्मी निर्माण होणं गरजेचं आहे. आजच्या शाळांमधूनही वाचनप्रेरणा दिनासारखे कार्यक्रम वर्षातून एकदा नव्हे तर दर महिन्याला किंवा आठवड्याला साजरे व्हायला हवेत. टेकाळे मास्तरांसारखे मास्तर प्रत्येक शाळेत निर्माण व्हायला हवेत. शाळकरी मुलांना वाचन-लेखनास उद्युक्त करायला हवे आणि वाचन संस्कृती लोप पावत चाललीये अशी ओरड न करता तिच्या संवर्धनासाठी स्वतःपासून प्रयत्न करायला हवेत आणि त्यासाठी आधी वाचनाचं झाड आपल्या मनातल्या आळ्यात लावायला हवे. कारण आयुष्याच्या वाळवंटात हेच वाचनाचं झाड आपल्यावर सावलीची तिरिप धरेल म्हणून वाचन मला पुन्हा खुणावतंय आणि मीही अनाहूतपणे नव्याने वाचनाकडे वळतोय...

**– सचिन वानखडे**

भ्रमणध्वनी : ९८८१४०४१४७


ग्रंथाली



> **If you only read the books that everyone else is reading, you can only think what everyone else is thinking.**
>
> – HARUKI MURAKAMI –

# वाचकांची संख्या रोडावत आहे!

**प्रा. श्वेतल अनिल परब**

**ए**कदा पु.ल. देशपांडे म्हणाले, ''माणसाला जेवणावरून उठवले तरी चालेल पण वाचन करताना उठवता कामा नये.'' यावरून वाचन ही माणसाची मूलभूत गरज आहे हे लक्षात येतं. जशी तहान आणि भूक या शरीराच्या नैसर्गिक गरजा असतात तशीच वाचन ही एक माणसाची मानसिक आणि बौद्धिक भूक आहे. ज्येष्ठ साहित्यिक डॉ. अनिल अवचट म्हणतात, ''प्रत्येक व्यक्तीमध्ये काहीतरी चांगले दडलेले असते, परंतु पैसा आणि उपभोगाच्या दडपणाखाली तो गेलेला असतो त्याला बाहेर काढण्यासाठी वाचन महत्त्वाचे आहे.'' गायन व नर्तन या नैसर्गिक मूलभूत प्रेरणा आहेत. ज्याकडे आपण नैसर्गिकरित्या ओढले जातो. पण वाचन करण्यासाठी आपल्याला बहुतांशी स्वयंप्रेरणेची गरज भासते. म्हणूनच वाचक हा स्वयंप्रेरित असावा लागतो किंवा त्याला वाचनाची गोडी लावतात. त्यानंतर शाळेतील गुरू हे विद्यार्थ्यांना वाचनासाठी प्रेरणा देतात. तरीदेखील अगदी हाताच्या बोटावर मोजता येतील एवढीच मुले वाचन करताना का दिसतात? किंवा हीच मुले पुढे मोठी झाल्यावर वाचन करताना का दिसत नाहीत? आणि ती वाचन करत असतील तर कोणत्या प्रकारचं वाचन करत असतील? त्यांना त्यावेळी खरोखरीच वाचनाचे लाभ होतात का? तसेच वाचन ही आवड करमणूक गटात मोडते का? तसेच वाचन आणि वाचक यात वाढ करण्यासाठी काय केले पाहिजे यासारखे असंख्य प्रश्न आपल्या मनात निर्माण होतात. त्याची उत्तरं नेमकेपणानं शोधणं कठीण असलं तरी प्रत्येक प्रश्नाला उत्तर हे असतंच, हे आपण जर मान्य केलं तर वाचक आणि वाचन खरंच कमी झालंय का याचंही उत्तर आपल्याला सापडू शकतं. म्हणूनच या लेखामध्ये या संदर्भातील काही मुद्यांची मांडणी करणं मला गरजेचं वाटतं.

एकूणच एकोणवीसशे नव्वदपर्यंतचा वाचकवर्ग हा अधाशी वाचकवर्ग होता. जे जे दिसेल, ते वाचण्याकडे त्यांचा कल होता. साहित्यिक अभिरुची जोपासणारे बरेच वाचक या काळात निर्माण झाले त्यामुळे या काळात लेखन करणारे बरेच साहित्यिक निर्माण झाले. त्यांच्या साहित्याचा कस त्या काळात लागत होता. त्या काळातील साहित्यलेखन हे बहुतांशी प्राचीन धर्मग्रंथातील मिथकांवर आधारित असायचे. स्वातंत्र्यानंतर विज्ञान-तंत्रज्ञावर आधारित शिक्षणपद्धती सुरू झाली. तेव्हापासून खऱ्या अर्थाने बौद्धिक अभिरुची असलेले वाचक निर्माण झाला. यामध्ये वैज्ञानिक कथा-कादंबऱ्या, प्रवासवर्णने वाचणारा वाचकवर्ग असा एक वेगळा गट निर्माण झाला. याच काळात संशोधनक्षेत्रात काम करणाऱ्या वाचकांचीही संख्या वाढली. एकूणच शिक्षण घेणारा वाचकवर्ग मोठ्या प्रमाणात असायचा. सर्वसामान्य माणूस हा वाचनापासून तेव्हाही दूर होता. शिक्षित लोकांमध्येदेखील वृत्तपत्रांचं वाचन करण्याखेरीज अन्य पुस्तकाचं वाचन करणाऱ्यांची संख्या अगदी दुर्मीळ होती.

एकोणवीसशे नव्वद नंतरच्या काळात अपवाद वगळता, शिक्षण घेतलेल्यांची साधारण तिसरी किंवा चौथी पिढी सुरू झाली. या काळातील वाचकवर्ग हा आपल्याला बदललेला दिसून येतो कारण संगणक क्रांती आणि सोशल मिडियाचं अवास्तव आकर्षण. शिकलेल्या लोकांना पुस्तकाखेरीज अनेक मनोरंजनाची साधने उपलब्ध झाली ज्यामध्ये दूरदर्शन, संगणकावरील खेळ, चित्रपट आणि व्हिडिओ खेळ यांचा प्रसार गावागावात झाला. साहजिकच वाचनालयाकडे वळणारी पावले अन्य मनोरंजन माध्यमाकडे वळू लागली. सुरुवातीला स्वत: वाचक असलेले पालक मुलांना सक्तीने वाचन करायला भाग पडायचे किंवा त्याला बक्षिसाच्या स्वरूपात पुस्तके आणून द्यायचे. पुस्तक वाचल्यास तुला सिनेमाला नेईन किंवा जत्रेला नेईन असे आमिष दाखवायचे. एकूणच पालकांच्या हातात पैसा कमी खेळत असल्याने आणि ज्ञान संपादनाचे दुसरे मार्ग नसल्याने पालक मुलांना वाचनासाठी प्रवृत्त करायचे.

नव्वदीनंतर मात्र उच्चशिक्षित पालकदेखील चंगळवादी जीवनशैलीकडे झुकल्याने मुलांना देखील आपल्याबरोबर पार्ट्या पिकनिकला घेऊन बाहेर पडू लागले. वीकेंडच्या निमित्ताने सार्वजनिक बागेत, सिनेमाला किंवा उपाहारगृहात नेऊ लागले. साहजिकच खाद्यपदार्थांची दुकाने वाढू लागली आणि वाचनालये ओस पडू लागली आहेत. आजकाल शिक्षण म्हणजे एखाद्या शिक्षण शाखेतील पदवी प्रमाणपत्र मिळवणे असे समजले जाते. उत्तमरीत्या जीवन जगण्यासाठी शिक्षण ही संकल्पना मागे पडू लागली आहे. उत्तमरित्या जगणे म्हणजे केवळ भौतिक सुखे अनुभवणे, असा

सार्वत्रिक समज झालेला आहे. त्यामुळे नोकरीधंदा करीत असताना आपल्या व्यक्तिमत्त्व विकासासाठी, आपले ज्ञान अद्ययावत ठेवण्यासाठी तसेच एक समाजशील माणूस म्हणून जगण्यासाठी वाचन करणे आवश्यक आहे, याचा त्यांना विसर पडतो. दुर्दैवाने ज्ञानदान करणारे शिक्षकदेखील वाचन करताना अपवादात्मकपणे आढळतात. किंबहुना वाचन करणाऱ्या माणसांची थट्टा उडवली जाते. वाचन म्हणजे डोकेदुखी समजणारे लोकच संख्येने जास्त आढळतात.


एकूणच आपण जर एखाद्या ग्रंथालयात गेलो तर पुस्तके वाचायला नेणारे लोक कोणत्या वयोगटातील असतात? तिथल्या ग्रंथपालाच्या नोंदवहीनुसार वय वर्षे दहापासून वय वर्षे वीस वर्षापर्यंतची मुले आणि पन्नाशीनंतरच्या बायका. तर हे सर्वसाधारण वाचक आहेत. तसेच तरुण वयोगटातील अभ्यासक आणि भौतिक गरज म्हणून संशोधन करणारी मंडळी ही बहुधा वाचक असतात. अपवादात्मक तरुण मंडळी निव्वळ ज्ञान संपादनासाठी किंवा बौद्धिक विकासासाठी पुस्तके वाचतात. पुस्तके, मासिके आणि वार्षिक दिवाळी अंकाचा वाचक हा आजकाल कमी कमी होत चाललाय असे म्हटले जाते, हे सत्य नाकारून चालत नाही याचे कारण म्हणजे ऑनलाईन पुस्तकांचे वाचक वाढलेले आहेत. नेटवरून पुस्तके डाउनलोड करून घेणे आणि ती वाचणे हे प्रकार सर्रास शहरी भागात आढळतात. पण याचे प्रमाण किती? अगदी सगळ्या वाचकांचा विचार केल्यास दहा टक्के एवढेच आहे. उरलेले नव्वद टक्के वाचक हे वाचनालयातील पुस्तके वाचणे पसंत करतात. काहीजण स्वत: पुस्तके खरेदी करतात त्यांची स्वत:ची लायब्ररी असते. म्हणूनच आपल्याला वाचकांची संख्या रोडावत आहे हे सरळसोट विधान करून चालत नाही. वाचकांच्या अभिरुचीमध्ये बदल होत आहे. वास्तववादी कथा, कादंबऱ्या, चरित्रात्मक पुस्तके, ऐतिहासिक कादंबऱ्या आणि वैचारिक पुस्तकांचा खप वाढत आहे. अलीकडे तर आत्मकथन किंवा आत्मचरित्रात्मक पुस्तके तसेच प्रेरणादायी अशी सकारात्मक ऊर्जा निर्माण करणारी पुस्तके वाचण्याकडे तरुण वर्गाचा कल आहे. आध्यात्मिक पुस्तकांचा वाचकवर्ग तुलनेने बराच कमी झाला आहे. त्याऐवजी सुसंस्कारित करणाऱ्या कथा आणि अनुवादित पुस्तके वाचन करणारे लोक जास्त दिसून येतात.

तरीदेखील असे म्हणावे लागेल की गेल्या दोन दशकात लहान मुले म्हणजे साधारण चौदा वर्षापर्यंतची मुले ही वाचनाकडे दुर्लक्ष करत आहेत. शाळा-कॉलेजात जाणाऱ्या मुलांमध्ये पाठ्यपुस्तकाखेरीज अवांतर वाचन करण्याची गोडी राहिलेली नाही. ज्या काळात मुलांचे लक्ष वाचनाकडे वळवणे आवश्यक असते त्याच काळात मुले वाचनापासून दूर राहिल्याने भावी काळात ते वाचन करतील असा तर्क करणे शुद्ध मूर्खपणाचे ठरेल. यासाठी याच वयोगटातील मुलांना वाचनाची गोडी लावण्याचे काम शिक्षक आणि पालक करू शकतात. दुर्दैवाने उच्चशिक्षित पालकवर्ग हा डोळ्यांवर झापड बांधून जगणे पसंत करतो. आम्हाला पुस्तके वाचायला सांगू नका, आम्ही फक्त आमच्या गुरूंनी सांगितलेले वाचतो आणि ऐकतो. असे म्हणणारे सूज्ञ समाजात किंवा देशात जे काही चालले आहे ते निमूटपणे पाहतात. त्यांना देशभरात होणाऱ्या विचारवंतांच्या हत्या, दलित व महिलांवर होणारे अत्याचार, आदिवासी आणि सामान्य जनतेच्या चळवळी याची यत्किंचितही माहिती नसते. आणि माणूस म्हणून ती जाणून घेण्याची गरजही त्यांना वाटत नाही.

असे म्हटले जाते की, एखाद्या देशाचे भवितव्य जाणून घ्यायचे असल्यास, त्या देशातील लहान मुले काय करतात ते बघा. म्हणजेच मुलाचे पाय पाळण्यात दिसतात. पाश्चात्य देशांमध्ये शाळकरी मुलांना आठवड्याला शंभर पुस्तके वाचण्यास सांगितले जाते. या सक्तीमुळे काही मुले आठवड्याला किमान तीस पुस्तके वाचत असल्याची कबुली देतात. पण भारतीय शिक्षणपद्धती ही वाचनप्रक्रियेस फारशी अनुकूल राहिलेली नाही. स्पर्धा परीक्षांचा बोजवारा वाढलेला आहे. त्या अनुषंगाने अभ्यास करण्याकडे विद्यार्थ्यांचा कल असल्याने अवांतर वाचन करण्यास वेळ कमी मिळतो. शाळा आणि शिकवण्या याला कंटाळलेली मुले इतर पुस्तकांचे वाचन करण्यापेक्षा मनोरंजनपर खेळ खेळण्यामध्ये रमून जातात. अशा मुलांना वाचनाची सवय लावणे हे आता शिक्षण व्यवस्थेच्या हातात आहे. या मुलांसाठी सामुहिक खेळ म्हणून कुणीतरी वाचलेल्या पुस्तकावर साभिनय सादरीकरणातून पुस्तकातील मजकूर त्यांच्यापर्यंत पोहोचवल्यास, वाचनाची आवड त्यांच्या अंतर्मनात झिरपत राहील आणि याचे दूरगामी परिणाम नक्कीच त्याच्या मनावर होऊन राहतील. यातूनच हळूहळू वाचकांची संख्या वाढेल. वेगवेगळ्या पुस्तक जत्रांचे, प्रदर्शनांचे, तसेच लेखक-लेखिकांच्या भेटींचे आयोजन करणे, पुस्तक सहली काढणे, तसेच वाचलेल्या पुस्तकावर दहा ते वीस ओळींच्या लेखनस्पर्धा घेणे, पाठ्यपुस्तकावर किंवा वाचलेल्या पुस्तकावर शाळा-महाविद्यालयात चर्चासत्र घडून आणणे इ. उपक्रम राबवल्यास वाचकांच्या संख्येत काही प्रमाणात वाढ होईल अशी आशा बाळगायला हरकत नाही. तसेच आपण वाचलेल्या पुस्तकांचे बुद्धिजीवी माणसांनी परिक्षण लिहून वर्तमानपत्रांमध्ये किंवा मासिकांमध्ये प्रसिद्धीसाठी दिले तर वाचकांना ते पुस्तक वाचावेसे वाटेल.

एकूणच जर वाचकांची संख्या रोडावली तर, माणसाची विचारशक्ती कुंठीत होईल. 'का आणि कसे?' हे वाचनातून प्रश्न निर्माण होतात, ते प्रश्न पडणेच बंद होईल. आणि हे कुतूहल जागृत ठेवण्यासाठी वाचन अद्ययावत ठेवणे ही प्रत्येक माणसाची नैतिक जबाबदारी आहे, हे समजून देण्याची आज वेळ आली आहे.

**– प्रा. श्वेतल अनिल परब**
भ्रमणध्वनी : ९४२३३०१८९२




# वाचाल तर वाचाल! रियली?

**धनंजय गांगल**

**ग**ल्लीत भटकणारं कुत्रं कोपऱ्यावरच्या कचराकुंडीशी वास घेतं घुटमळतं. तिथे कोणीतरी फेकून दिलेल्या एका जुन्या सिनेमाच्या रिळांच्या भेंडोळ्या दिसतात. तो कुतूहलानं त्या तोंडात घेऊन चावून गिळू पाहतो. तेवढ्यात दुसऱ्या गल्लीतील त्याचा दोस्त शेपटी हालवत तेथे पोचतो. हा नवीन पदार्थ आपला मित्र प्रयत्नपूर्वक चावून चावून गिळू पाहतोय, हे बघून तो विचारतो, ''काय रे कशी आहे चव?'' तोंडातील फिल्म थुकून पहिला म्हणतो, ''नाही रे - गेल्या आठवड्यात या कुंडीत टाकलेले पुस्तक यापेक्षा चवीला बरं होतं!''

माध्यमांच्या मनुवादी त्रिशंकूत, लिखित म्हणजे उच्च आणि दृश्यम म्हणजे कमी प्रतीचं हा पूर्वग्रह साहित्यविश्वातून सतत प्रसवला जातो. पुस्तकरुपात लिखित म्हणजे सर्वश्रेष्ठ! आणि बाकी टेलिव्हिजन आणि त्यावरच्या मालिका, नेट, मोबाईल, फेसबुक, व्हाट्सअप, वेबसिरीज, हे सगळं थिल्लर! अशी मांडणी केली जाते. एक समजून घ्यायला पाहिजे की ही सगळी माध्यमं म्हणजे वाहक आहेत. प्रत्येक माध्यमाचे स्वतःचे असे वेगवेगळे सामर्थ्य आहे. पुस्तक हेही अन्य माध्यमांसारखं एक माध्यम आहे. त्याला दिड-दोन शतकांचा इतिहास आणि परंपरा आहे. त्या तुलनेत बाकी माध्यमं नवखी आहेत. तरी त्यांनी 'वाचाल तर वाचाल' म्हणण्याची वेळ आणली आहे. लेखकांनी त्यांची व्यक्त होण्याची हौस म्हणून पानेच्या पाने लिहायचं. कोणीतरी ते छापायचं. ठीक आहे. पण म्हणून आम्ही ते का वाचायचं? आणि तेही विकत घेऊन? हा मूलभूत प्रश्न आहे? आपल्या फ्रेंड-फिलॉसॉफर गुगलवर का बरं वाचावं, हे शोधलं तर अनेक लिंक्स मिळतात. त्यात मनाची मशागत, मेंदूचा विकास, बुद्धीला खाद्य अशी अनेक स्फूर्तिदायक कारणं मिळतील. टॉल्स्टॉयपासून गांधींपर्यंत अनेक थोरामोठ्यांचे वाचनासंबंधीचे विचार मिळतील. पण हे सगळे अनेक दशकांपूर्वीचे. गेल्या तीन ते चार दशकात तंत्रज्ञानाने आणि बहुविध माध्यमांनी एवढ्या वेगाने आपल्या जीवनाला व्यापून टाकलाय की आता हे सगळे इर्रिलेव्हन्ट अर्थात अप्रस्तुत झाले आहेत. शिवाय हे विचार इतर माध्यमांनाही तेवढेच लागू आहेत. तेव्हा 'वाचाल तर वाचाल' हा सुविचार शाळेतल्या फळ्यावर लिहायला छान! पण प्रत्यक्षात वाचलं नाही तरी आयुष्यात काहीही बिघडत नाही! हां मात्र, दिल बहेलाने के लिये गालिब, तुम्हारा खयाल अच्छा है!

जीवनाच्या विविध क्षेत्रात संवाद, चर्चा, वाद-विवाद, संशोधन, इतिहास, भविष्यवेध, स्मृतिरंजन, ज्ञान, नीती आणि मतभिन्नता यातूनच आपल्या सगळ्यांचे जीवन समृद्ध होत असते. माहितीचे आदान-प्रदान, स्मृती-रंजन , सौंदर्य, कुतूहल, जिज्ञासा, ज्ञान, विवेक, संवेदना, चांगुलपणा, सुसंस्कृतपणा या सगळ्यांना कवेत घेणारा एक छान शब्द आहे, तो म्हणजे 'जाणिवा'. मनुष्याच्या या जाणिवा रुंदावण्याचे आणि त्याला प्रगल्भ करण्याचे काम ही सगळी माध्यमं करत असतात. 'अ फ्यू गूड मेन' या एका कोर्ट-मार्शलवर आधारित चित्रपटात, कर्नल जेस्सप लेफ्टनंट कॅफेला म्हणतो (तुला माझ्याशी संवाद साधायचा असेल तर) टॉक टू मी नाइसली - माझ्याशी विनम्रपणे बोल, गर्विष्ठपणे नाही! नाटक किंवा कादंबरी यावर आधारित नाटक, मालिका, चित्रपट आला की तो मूळ कलाकृतीएवढा-कादंबरीएवढा सरस नाही, असं सांगून आपलं अभिजातपण आणि पुस्तकांचे महत्त्व ठसवण्याची प्रथा आहे. शेवटी पुस्तक हेही एक माध्यमचं आहे इतर माध्यमासारखं! त्यामुळे साहित्यविश्वाने आपण श्रेष्ठ असल्याचा हा अहंमन्य आडमुठेपणा सोडायला हवा आणि इतर माध्यमांशी त्या पातळीवर येऊन संवाद साधायला हवा. प्रत्येक माध्यमाचं बलस्थान वेगवेगळं आहे तसा त्यापासून मिळणारा आनंदही वेगवेगळा आहे. पुस्तकं वाचण्यातही एक वेगळा आनंद आहे. ते आपल्या कल्पनाशक्तीला, सृजनतेला जास्त वाव देतं. पण त्यापलीकडे श्रेष्ठत्वाचा गंड बाळगू नये.

या प्रचंड लोकसंख्येच्या लोकशाहीत, होणाऱ्या विकासात, जास्तच जास्त वाटा आपल्याला मिळावा आणि कमीत कमी कर्तव्य करायला लागावीत यासाठी प्रत्येकजण कार्यरत असतो. त्यासाठी कधी जात तर कधी धर्म, कधी भाषा तर कधी प्रदेश अशा वेगवेगळ्या आधारावर एकत्र येत तो दबावगट बनवून आपले इप्सित साध्य करण्याच्या प्रयत्नात असतो. यात संख्येला अवास्तव महत्त्व प्राप्त होते. आंदोलनं, मोर्चे, उपास याला जमणाऱ्या संख्येवरून त्या आंदोलनाचे नैतिक अधिष्ठान ठरवले जाते. जेवढी संख्या मोठी तेवढे नैतिक अधिष्ठान मोठे आणि ग्राह्य! या संख्येने आपण पछाडलो आहोत. आपण ज्याला सुजाण वाचक म्हणतो




तो कुठल्याही समाजात पाच ते दहा टक्केच असतो. धाव काढताना जितक्या जास्त तितकं चांगलं पण मुलांचं मात्र तसं नाही - तेव्हा अख्या समाजाला वाचायला लावायची उगाच अवास्तव स्वप्नं बघू नयेत आणि त्यात आपली ऊर्जा वाया घालवू नये. गर्दी आली तर चांगलंच नाहीतर दर्दींची गुणवत्ता टिकवण्याकडे लक्ष देऊया.

अजून एका काळजीने आपण सतत चिंतित असतो. तरुणाई वाचत नाही! एकतर आजचा तरुण आपल्या परीक्षा, शिक्षण आणि करियरमध्ये बुडालेला असतो. शिवाय तारुण्यसुलभ ऊर्जेला वाव देण्यासाठी त्यांचा ओढा कृतिशील उपक्रम आणि माध्यमांकडे (नाटक, टीव्ही, सिनेमा) असतो. त्यासाठी अगदी गरज पडेल तेवढेच तो वाचतो. मग संसारात पडल्यावर आर्थिक, सांसारिक एवढी व्यवधानं असतात की सहसा त्याच्या आधी कार्यरत असणाऱ्या कृतिशील उपक्रमातूनही तो अंग काढून घेतो. तेव्हा त्याच्याकडून फार अपेक्षा ठेवणं म्हणजे कवळी बनवायच्या दुकानात तरुणाई येण्याचं स्वप्नं बघण्यासारखं अवास्तव आहे. हल्लीचे तरुण फार हुशार आहेत; चांगलं काम करताहेत; त्यांच्याकडून माझ्या फार अपेक्षा आहेत वगैरे वाक्य, आपली सकारात्मक, आशावादी प्रतिमा जपण्यासाठी जरूर भाषणात, मुलाखतीत टाकावीत. मी तर असली दोन चार वाक्य नेहमीच हाणतो! पण त्यापलीकडे त्याला विशेष अर्थ नाही. 'आजच्या तरुणांना काय हवाय ते द्या, म्हणजे ते वाचतील' असा सोपा युक्तिवादही केला जातो. म्हणजे 'त्यांना काय हवंय ते तुम्हीच शोधा आणि तुम्हीच ते त्यांना द्या' - हे आयजीच्या जीवावर बायजी उदार! दुसरीकडे, आजची तरुणाई निराशेच्या गर्तेत सापडली आहे आणि त्यांना योग्य दिशा मिळत नाहीये असा (गैर)समज करून आणि त्यांना त्यातून बाहेर काढायची जबाबदारी आपलीच आहे हे 'व्हाईट मॅनस बर्डन' घेऊन सतत स्फूर्तिदायी पुस्तकांचा मारा होत आहे. सध्या प्रचंड सुळसुळाट झालेल्या सहसा आत्मचरित्रात्मक असलेल्या अशा पुस्तकांना प्रेरणादायी लेबल लावलं की सामाजिक भान जपण्याचं कर्तव्यही पार पडतं. डॉक्टर कलामचे पुस्तकं हे त्यातलं बेस्ट-सेलर. ते तरुणांना भेट दिलं गंगेत स्नान केल्याचे आत्मिक समाधान लाभतं! तेव्हा तरुणाईकडून अवास्तव अपेक्षा करणं सोडून द्यायला हवे. काही घडलं तर वरिष्ठ नागरिकांकडूनच घडणार आहे. त्यांच्याकडे आर्थिक स्वास्थ्यही असतं आणि पुरेसा वेळही.

पाच दशकापूर्वी क्रिकेट समालोचन केवळ आकाशवाणी म्हणजे रेडिओपुरते मर्यादित होते. तेव्हा आपण धृतराष्ट्र आणि तो समालोचक संजयच्या भूमिकेत असायचा. त्यावेळी बहोतही सुझ-बुझ और ताल-मेल के साथ म्हणत एकेका धावेसाठी सात ते आठ वाक्य खर्च व्हायची! माध्यम बदललं. टेलिव्हिजनवर क्रिकेट दिसायला लागल्यावर पुन्हा तेवढी वाक्य समालोचकाने बोलणे कंटाळवाणे झाले असते. समालोचकांनी आपल्यात बदल घडवून आणला, प्रेक्षकांना सगळे दिसूनही जे लक्षात येत नाही ते शोधून सांगण्याची भूमिका आता समालोचकांनी घेतली! पण साहित्य-लेखक मात्र बदलत नाहीये. माध्यमांच्या या कोलाहलातही पूर्वीसारखेच पसरट, कंटाळवाणं लिहिण्यावर तो ठाम आहे!

अठराव्या शतकात औद्योगिकीकरणामुळे कुटुंबव्यवस्था विस्कळीत होत होती. जात, धर्म, भूगोल, इतिहास या कारणांमुळे माणसामाणसांत वितुष्ट निर्माण होत आहे. म्हणून साहित्य ही समाजात बंधुभाव निर्माण करण्याचे कार्य करू शकते, असे लिओ टॉलस्टॉय म्हणायचा. गांधीवादी विचारसरणीनुसार साहित्याने सत्य, अहिंसा, त्याग, जीवनशुद्धी, थोडक्यात नैतिकतेला अधिष्ठान द्यावे, असे अपेक्षित आहे. मार्क्सवादी विचारसरणीवर भर देणारे साहित्याच्या सामाजिक उपयुक्ततेला महत्त्व देतात. ना. सी. फडके यांचे साहित्य रंजनवादी असे मानले जायचे. इमॅन्युअल कांटसारखे अनेक विचारवंत हा 'कलेसाठी कला' या विचारसरणीचे पुरस्कर्ते होते. 'साहित्यनिर्मिती' ही कला असल्याने 'कलेसाठी कला, की जीवनासाठी कला' हा वादही होता फ्रॉइड या समाजशास्त्रज्ञाने भावनांचे विरेचन या संकल्पनेची मांडणी केली. मनातील दडपलेल्या गोष्टी कलात्मक पद्धतीने व्यक्त केल्या तर त्यातून स्वत:ला व इतरांना आनंद देणारे साहित्य निर्माण करता येते! प्रत्यक्ष अनुभवातून आलेले साहित्य श्रेष्ठ की अनुभवापासून अलिप्त राहून निर्माण झालेले साहित्य हेही मतभेद होते. निव्वळ सौंदर्यनिर्मिती करणे हा साहित्याचा हेतू नसून जीवनसंघर्ष करणे हा साहित्याचा मुख्य हेतू असावा. साहित्यातून ज्ञानात्मक आणि नैतिक मार्गदर्शन असावे. रे ब्रॅडबरी म्हणायचा, ''एखादी संस्कृती नष्ट करायची तर त्या संस्कृतीची देवालय, राजवाडे, विद्यापीठं नष्ट करायची काही जरूर नाही'' - त्यांचे वाचन थांबवा, ती संस्कृती आपोआप नष्ट होईल! ते मोठं-मोठे लेखक आणि त्यांचे साक्षेपी संपादक. अशा अनेक चर्चा चालायच्या. गेल्या दोन-अडीच दशकातील इतक्या प्रचंड वेगाने तंत्रज्ञान आणि बहुविध माध्यमं आपल्यावर अशी कोसळतायत की त्यात हे सगळे वाद वाहून गेलेत.

तीन दशकापूर्वी जेव्हा एवढ्या माध्यमाची रेलचेल नव्हती तेव्हा वृत्तपत्राच्या पहिल्या पानावरील अगदी डावीकडे शीर्ष असलेल्या जाई काजळाच्या जाहिरातीपासून ते शेवटच्या पानाच्या तळाशी मालक संपादकपर्यंत संपूर्ण वृत्तपत्र वाचणारे अनेक महाभाग होते. नंतर शेजारूनही दुसरं वृत्तपत्र आणत - तेही तसंच संपूर्ण वाचत. मग कुठल्या वृत्तपत्रात शिळ्या बातम्या असतात हे

अधिकाराने सांगत. आज अनेक घरात वृत्तपत्र येतं पण ते वाचलं जातंच असं नाही! साहित्यनिर्मितीमुळे साहित्यिकाला आपोआप प्रसिद्धी आणि प्रतिष्ठा प्राप्त होते. शिवाय वृत्तपत्रात, टेलिव्हिजन, नेट वरील आलेले लेख, मुलाखती, फोटो पट्कन समोरच्याला दाखवता येतातच असं नाही. पण पुस्तकं झोळीतून काढून लगेच समोरच्याच्या हातात हा सूर्य आणि हा जयंद्रथ असं म्हणत ठेवता येतं. जाडजूड ऐवज हातात आल्यावर समोरचाही भारावून जातो. लेखकाचे जाडजूड व्हिजिटिंग कार्ड ही पुस्तकाची उपयुक्तताच भावी काळात पुस्तक या माध्यमाला तगवणारे.

'अनलेस यू मेजर यू कॅन नॉट मॅनेज' हे व्यवसायाचे, व्यवस्थापनशास्त्राचे मूलभूत तत्त्व! मराठीत तरी सध्या अशी काही मोजणी होत नाहीये. एकीकडे पुस्तकाची दुकाने बंद पडत आहेत. दुसरीकडे खोऱ्याने पुस्तके प्रकाशित होत आहेत. चांगल्या मोठ्या व्यावसायिक प्रकाशनांची मिळून महिन्याला पन्नास ते शंभर नवी पुस्तके बाजारात येतात. व्यक्तिगत पातळीवर प्रकाशित होतात ती वेगळीच. साहित्य संमेलनात कोटीच्या कोटी उड्डाणे ऐकायला मिळताहेत. पुस्तकांवर आधारित अभिवाचन स्पर्धांना शाळा-कॉलेजमधून चांगला प्रतिसाद मिळतोय. कधी डॉ. ए. पी.जे. अब्दुल कलाम यांचा जन्मदिन हा 'वाचन प्रेरणा दिन' म्हणून साजरा केला तर अनेकवेळा आपले स्नेही, मित्र, कुटुंबातील सदस्यांना किमान पुस्तक भेट द्यावे, पुस्तकभिशी असे काही कार्यक्रम राबवण्याचा प्रयत्न होतात. आणि तरीही वाचन-संस्कृती झपाट्याने कमी होतंय हे जाणवतंय. कसलीच कशाला 'टोटल' लागत नाहीये. मार्क ट्वेन मिश्कीलपणे म्हणायचा, 'क्लासिक्स अर्थात अभिजात साहित्य म्हणजे ज्याचं सगळे कौतुक करतात पण वाचत कोणीच नाही.' यातला विनोद सोडून देऊ. पण खरोखरच वाचन-संस्कृती टिकवायची इच्छा असेल तर पालक, शिक्षक, माध्यमं, समाजातील मान्यवर यांच्यावर मोठी जबाबदारी आहे. व्यक्तिगत उत्कर्षात गुंतलेल्या आपल्या व्यग्रतेतून वेळ काढून, आयुष्याला थोडा ठेहराव देऊन, आपल्या कंपूच्या पलीकडे जाऊन, बहुविध माध्यमातील चांगल्या कलाकृतीचा आस्वाद घेतला पाहिजे आणि मुख्य म्हणजे ते विद्यार्थ्यांना, मित्रांना, समाजाला सांगितले पाहिजे! ही त्यांची ऐतिहासिक जबाबदारी आहे. नाहीतर एक दीड दशकात - सोयीसाठी २०३२ साल घेऊया - यावर्षी व्यवसाय म्हणून शेवटचे पुस्तक छापले जाईल! त्यानंतर पुस्तके किरकोळ छापली जातील पण ती व्यक्तिगत पातळीवर, आपण काहीवेळा ग्रीटिंग कार्ड्स हाताने तयार करून पाठवतो तशी.

**- धनंजय गांगल**
भ्रमणध्वनी : ९८२१०३२८३०
dhananjay.gangal@gmail.com

[redacted]



# जगण्याचं प्रयोजन सापडलं! - श्याम जोशी

**मुलाखतकार : किरण येले**

**भा**रतीय लोकांची गंमत अशी आहे की ते चित्रपट पाहतात आणि त्यातल्या नायक नायिकांवर बोलतात. चित्रपटात नायक-नायिकेने म्हटलेले संवाद त्यांना पाठ असतात पण ते संवाद कुणी लिहिलेत हे त्यांना माहीत नसतं. त्या चित्रपटाचा लेखक माहीत नसतो. ते गाणं गुणगुणतात. गायकाच्या आवाजाचं कौतुक करतात पण गीत कुणी लिहिलं हे जाणून घेण्याचा प्रयत्न करीत नाही. कोणतंही शिल्प, किल्ला, पर्यटन स्थळ, इमारत ते पाहतात त्याची तारीफ करतात पण ते कुणी बांधलंय याची माहिती करून घेण्याची त्यांना गरज वाटत नाही. या सगळ्याचा अर्थ असा होतो की आपले लोक ऐंद्रियसुखातच रममाण असतात. याचं कारण ऐंद्रियसुख हे तत्कालिक असतं हे नाशिवंत असतं आणि शाश्वत असतं ते बौद्धिक सुख हे संस्कार भारतीय मनावर झाले नाहीत. विचारांना मिळालेलं सुख हे चिरंतन असतंच पण ते नेहमी वृद्धिंगत होत जाणारं आणि प्रसारित होत जाणारं असतं हे त्यांना माहीत नसतं. आणि असं कायम वृद्धिंगत होत राहणारं, प्रवाहीपणाचा गुणधर्म असलेलं एक साधन म्हणजे ग्रंथ याची त्यांना जाणीवच नसते. परंतु या अशीही काही झपाटलेली माणसे आहेत ज्यांना ग्रंथांचं आणि वाचनाचं महत्त्व माहीत ग्रंथांचं महत्त्व इतरांना उपलब्ध करून देण्याचं काम देशभरात जी काही मोजकी माणसे करीत आहेत त्यापैकी एक नाव श्यामसुंदर जोशी. चौदा वर्षापूर्वी स्वेच्छानिवृत्ती घेऊन आपल्याकडे असलेली सगळी संपत्ती ग्रंथांच्या हाती सुपूर्द करीत वाचनालय काढण्याचा ध्यास घेताना अनेकांनी त्यांना वेड्यात काढलं. त्यांना परावृत्त करण्याचे अनेकांनी प्रयत्न केले. त्यांच्या पत्नीलाही काहींनी समजावलं की आजकाल कुणी वाचत नाही. लाखो रुपयाची जागा घेऊन त्यात वाचनालय काढण्यापेक्षा दुकान टाका. श्रीमंत व्हाल. पण श्यामसुंदर जोशी यांना स्वत:ला श्रीमंत करायचं नव्हतंच. त्यांना लोकांना श्रीमंत करायचं होतं. त्यांनी ते केलं. आजही करताहेत. त्यांच्या बोलण्यात पुस्तक आणि संस्कृतीचं जतन करण्याच्या वेडाने झपाटलेल्या भारतातल्या गोविंदराव केळकर, परदेशातले हेन्री ग्रे, विलियम जोन्स, अॅबॉट, करैं, अशा अनेक माणसांचे उल्लेख आणि किस्से येतात. एखाद्या पुस्तकाने पोटतिडिकीने सांगावं तसं या माणसांच्या झपाटलेपणाच्या कथा श्यामसुंदर जोशी अभिमानानं गौरवपूर्ण आवाजात सांगत राहतात. ते ऐकताना एकदा वाटलं की हा श्यामसुंदर जोशी नावाचा माणूस आणि गोविंदराव केळकर, हेन्री ग्रे वा करैं यांच्यात काहीच फरक नाहीय. जे झपाटलेपण त्यांच्याकडे होतं तेच झपाटलेपण या माणसाकडेही आहे. जो त्याग त्यांनी केला, जी जोखीम त्यांनी घेतली तीच जोखिम याही माणसाने घेतलीय. जे यश त्यांनी खेचून आणलं तेच यश या माणसानेही खेचून आणलं. आणि इतक करूनही ज्या साधेपणात ती माणसे जगली त्याच साधेपणात हा माणूसही जगतो आहे. हा विचार मनात आला आणि तत्क्षणी ठरवलं की या अवलियाची मुलाखत घ्यायची. कारण श्याम सुंदर जोशी यांनी बदलापुरात जे काम आज केलं आहे. तसं काम महाराष्ट्रभर कुठे झालेलं ऐकिवात नाही. आज बदलापूरसारख्या शहरात त्यांच्या 'ग्रंथसखा वाचनालया'चे पाच हजार सभासद आहेत. त्यांनी चालू केलेल्या मराठी स्वायत्त विद्यापीठात मराठी भाषेतील अत्यंत महत्त्वाची मानली गेलेली दीड लाख पुस्तके आहेत. जेजे महाविद्यालयतातला एक बुजरा विद्यार्थी, ते फिनले मिलमधला कामगार आणि नंतर मराठी स्वायत्त विद्यापीठाची संकल्पना सत्यात आणणारा तसेच भिलार येथील 'पुस्तकाचे गाव'च्या आखणीत महत्त्वाचा सहभाग असलेला झपाटलेला वेडा विचारवंत हा त्यांचा प्रवास जितका रोचक आहे तितकाच आपल्याला वाचक म्हणून समृद्ध करणाराही आहे अशा या श्यामसुंदर जोशी यांची ही आजवरची पहिली मुलाखत..

[redacted]

**मी : तुमचा आणि पाठ्यपुस्तकेतर पुस्तकांचा संपर्क कधी आला.**

**श्याम जोशी :** माझं गाव अंमळनेर. साने गुरुजींचं गाव. माझ्या वडिलांना साने गुरुजी शिकवायला होते. प्रताप हायस्कूलमध्ये.

त्यामुळे साने गुरुजी म्हणजे वडिलांचे दैवतच. साने गुरुजींनी केलेले संस्कार त्यांच्यात भिनलेले. साहजिकच वाचनाचे संस्कारही झालेले. घरात तेव्हापासून पुस्तके होतीच. माझे वडील बीए झालेले आणि माझी आई व.फा. म्हणजे काय सांग? व्हर्नाक्युलर फायनल. वफा झालेल्या व्यक्तीला त्या काळात कुठेही नोकरी मिळे. पण आईनं नोकरी नाही केली पण तिचंही वाचन दांडगं होतं. नोकरीच्या निमित्ताने आम्ही १९७० साली कल्याणात आलो. वडिल फक्त वाचन नाही तर लेखनही करायचे. चरित्रलेखन करायला त्यांना आवडत असावं. मोठमोठ्या व्यक्तींवर त्यांनी एक पुस्तक लिहीलं. मला आठवतंय एकदा त्यांनी पुलंना पत्र लिहिलं त्यांना दहा बारा पुस्तके हवी होती पण ती मिळत नव्हती. म्हणून त्यांनी एकदा पुलंना पत्र लिहिलं. त्यात लिहिलं की तुम्ही म्हणता वाचन वाढवायला हवी पण ही पुस्तके मला शोधूनही सापडत नाहीत तर तुम्ही सांगा मला ही पुस्तके कुठे सापडतील. झंकार नावाचं मासिक त्यांनी काही काळ काढलं होतं. साने गुरुजींचा प्रभाव असल्याने समाजसेवेचंही त्यांनी व्रत घेतलं होतंच. स्वप्रेरणेने ते सगळं करीत असत. तेव्हा सार्वजनिक गणेशोत्सव नव्यानेच होऊ लागले होते आणि त्यात शेवटच्या दिवशी सत्यनारायणाची पुजा असे. माझे वडील प्रत्येक पुजेला जात. पण पाया पडण्यासाठी नाही तर ते खूप सारे चमचे सोबत ठेवीत पूजेला जाताना आणि प्रसाद वाटायला जी मुले बसवलेली असत त्यांना एक चमचा देऊन सांगत की आपले हात दिवसभर काम करून त्यावर धूळ बसलेली असते. तुम्ही इतक्या लोकांना प्रसाद वाटता तेव्हा त्या धुळीतून रोगराई पसरविणाऱ्या जंतूंचा प्रसार होतो तेव्हा चमच्याने प्रसाद वाटण्यासाठी हा चमचा. त्या काळात अनेक रोगांवर औषधे नव्हती हे लक्षात घेतलं तर या छोट्या कामाचं महत्त्व कळेल.

आमच्या घरी चॉकलेट लिमलेट हा प्रकारच नव्हता. रडलास वा हरलास तरीही पुस्तक मिळायचं आणि काही जिंकलास, चांगल्या मार्कांने पास झालास तरीही पुस्तकच मिळायचं. आम्ही चार भाऊ आणि आईवडिल असं कुटुंब. आमच्या घरी जेवताना जेवणातली भाजी वा पदार्थांवर चर्चा व्हायची नाही तर कोणतं पुस्तक वाचलंस यावर चर्चा चालायची. त्यात काय आवडलं काय नाही आवडलं यावर मत मांडायची मुभा होती. पुस्तक आपल्याला विचार देतात आणि ते विचार मुद्देसूदपणे मांडण्याची बैठक तयार करतात हे तेव्हा कळलं. आमचं घर ग्रंथप्रेमी नव्हतं तर ग्रंथलोभी होतं. मिशी आणि मतं ही सगळ्यांनाच अठराव्या वर्षात फुटतात. तशी ती मलाही फुटली पण माझ्या मत फुटण्याला पुस्तक वाचनाचा पाया होता, वर्तमानपत्र वाचनाचा पाया होता, अरे वर्तमानपत्रावरून आमच्या घरात रस्सीखेच चालायची. विशेषत: रविवारी लोकसत्ता आणि मटा आला की ज्याच्या हाती लागेल तो शौचालयात जाऊन बसायचा. तेव्हाची वृत्तपत्रे अग्रलेखांसाठी वाचली जायची. आजही त्यावेळचे अनेक अग्रलेख आणि अग्रलेखांची शीर्षके मी सांगू शकतो इतकी ती मनात ठसलीत. गोविंदराव तळवलकरांचा रमणा नावाचा अग्रलेख अजून माझ्या लक्षात आहे रमणा म्हणजे काय माहीत आहे? पेशव्यांच्या काळात ब्राह्मणांना दक्षिणा म्हणून जो प्रकार दिला जायचा त्याला रमणा म्हणत. या रमणासाठी कुणाचीही पात्रता कुणी पाहत नसे अंगावर एक जानवं असलं की तो पेशव्यांच्या दरबारी जाई आणि पेशवे त्या घटात हात घालून हाताला येतील तितक्या मुद्रा त्या ब्राह्मणाला दान करीत त्याला म्हणत रमणा! तर काही वर्षापूर्वी शरद पवार सत्तेत असताना, शरद पवारांनी मराठी साहित्यिकांचा असा मेळा भरवला आणि सरसकट सगळयांना एक लक्ष रुपये दिले गेले. या घटनेवर गोविंदराव तळवलकरांनी आजचे शासनकर्ते नावाचा अग्रलेख लिहिला आणि त्यातून शरद पवारांवर खरपूस टिका केली. वास्तविक पाहता शरद पवार, गोविंदराव तळवलकर, विनायक पाटील, हे सगळे मित्र. पण संपादक आणि अग्रलेख यांची भूमिका काय असावी हे त्यातून सिद्ध व्हायचं. बरं, या त्यांच्या भूमिका फक्त वृत्तपत्रीय नसायच्या तर त्यांचं जगणंही सैद्धांतिक असायचं. मे. पु. रेगेंची गोष्ट ऐक. मेपुंना दोन मुली.. त्यापैकी एका मुलीने तिचं लग्न स्वत:च ठरवलं आणि त्यांना तसं सांगितलं. तर मेपुंना मुलगा आवडला नाही. तर मेपु रेगे म्हणाले, ''तुझं लग्न ठरवण्याचा अधिकार तुला आहे. पण मुलगा मला आवडला नाही.'' नंतर त्याची कारणे सांगत ते म्हणाले, ''आता तू विचार तू कर आणि तुझा निर्णय तूच घे.'' बरं या सगळ्यांच्या तत्त्वनिष्ठ जगण्याचा परिणाम आम्हा वाचकांवरही होत होता. म्हणजे 'साधना'च्या यदुनाथ थत्तेंचा किस्सा. यदुनाथ थत्तेंचं लग्न ठरलं. त्यांनी ते रजिस्टर लग्न करायचं ठरवलं. रजिस्ट्रारच्या ऑफिसने त्यांना साडेबाराची वेळ दिली. मग ज्या दिवशी लग्न होतं त्या दिवशी अकरा वाजता यदुनाथ थत्ते साधनाच्या ऑफिसमधून निघाले. सायकलवर आपल्या वाग्दत्त वधूला डबलसीट बसवलं आणि रजिस्ट्रारच्या ऑफिसमध्ये गेले. लग्न लागलं, रजिस्ट्रारसमोर सह्या झाल्या. हार घातले आणि परत नव्या बायकोला डबलसीट बसवून त्यांनी बायकोला घरी आणून सोडलं आणि गेले साधनेत पुन्हा कामाला. हे संस्कार झाले आमच्यावर. संस्कृती-संस्कृती म्हणतात ती ही असते. विचार मांडण्याची, त्या विचारांप्रमाणे आपले स्वत:चे आचार ठेवण्याची. ही संस्कृती परकोलेट होत आमच्यात आली. हे सगळं पाझर संस्कृतीचं देणं आहे. पाणी बघ कुठेतरी असतं आणि ते पाझरत पाझरत विहिरीत येऊन पोहोचतं तसं. त्याच काळात बाळासाहेब ठाकरेंची भाषणेही ऐकली. मीही तरुण होत होतो आसपासचा बकालपणा मग तो समाजातला असो की विचारांतला की संस्कृतीतला, मला डाचत होताच. कल्याणचा शाखाप्रमुख म्हणून नेमला गेलो. साबिर शेखसारख्या जिवलग मित्राची भेट झाली. त्याला दुर्गभ्रमणाचं वेड. त्याच्यासोबत कित्येक गड-किल्ले पालथे घातले. एक दिवस भिवंडीचा दत्ता पाटील नावाचा गुंड शाखेत आला आणि म्हणाला, ''मी शेजारच्याचा हात तोडला. आपल्याला वकील करायचाय.'' तेव्हा मी म्हटलं, संघटनेसाठी तू त्याचा हात तोडला नाहीस. तू तुझ्या फायद्यासाठी आणि भांडणातून त्याचा हात तोडलास. टोव्हा तुझं तू बघ. पण ते वरिष्ठांना पटलं नाही आणि वरिष्ठांना माझं मत पटलं नाही हे मला

पटलं नाही. म्हणून मी शिवसेना सोडली.

**मी : तुम्ही वाचनालय पहिल्यांदा कधी पाहिलं?**

**श्याम जोशी :** त्याचं असं झालं की मला सायकल हवी होती. सायकल चालवायला मला आवडायचं. आम्ही राहायचो पारनाक्यावर. आता वडिलांकडे सायकल कशी मागायची आणि वडील ती का देतील? गंमत म्हणून मागितलं तर निश्चितच वडील देणार नव्हते. मग मी वडिलांना सांगितलं कल्याणच्या सार्वजनिक वाचनालयात मला सभासद व्हायचंय. तिथे पुस्तक बदलायला जायला सायकल लागेल. कारण त्यावेळी असं रिक्शा वगैरे साधनं फार नसायची. तर असं सांगताच वडिलांनी सायकल घेऊन दिली. खरंतर मी वाचनालयाचं कारण सायकलसाठी सांगितलं होतं. पण झालं असं की मी सार्वजनिक वाचनालयात गेलो आणि तिथली पुस्तकांचं भांडार पाहून चक्रावूनच गेलो. इतकी पुस्तकं? आणि लोक एवढं वाचतात? आणि मग सायकल नेहमी कल्याणच्या सार्वजनिक वाचनालयाकडे पळवू लागलो. आणि त्या वाचनालयात मला परिस सापडला.

**मी : त्याकाळात कोणती पुस्तके तुम्ही वाचलीत?**

**श्याम जोशी :** सगळेच वाचलेत. जे जे मिळेल ते ते वाचत होतो. वि. स. खांडेकर, ना. सी. फडके, अत्रे, दुर्गा भागवत, पण या सगळ्यात मला मी सापडत नव्हतो. तू मला सांग साहित्य वाचन करताना साहित्यात काय शोधत असतो वाचक? आपण त्यात कुठे सापडतोय का हे शोधत असतो. तिथलं एखादं पात्र आपल्याशी जुळतंय का हे शोधत असतो. आपल्या विचारांशी, आचारांशी वागण्या बोलण्याशी एखादं पात्र वा परिस्थिती जुळत गेली की मग वाचक त्यात हरवू लागतो. ती कथा, कादंबरी, ललित, कविता वा नाटक मग त्याला आपलं वाटू लागतं. मग ती साहित्यकृती त्या लेखकाची उरत नाही, ती साहित्यकृती त्या वाचकाची होऊन जाते. त्यात तो हरवून जातो आणि ती साहित्यकृती तो सगळ्यांना सांगू लागतो कारण त्याला ती साहित्यकृती नाही तर त्याचं स्वत:च जगणं सांगायचं असतं जे त्याला लिहिता येत नसल्याने सांगता येत नसतं. त्याचं म्हणणं तुम्ही मांडलंत की मग तुमचं म्हणणं तो आपलं म्हणणं म्हणून इतरांना सांगू लागतो. ते पुस्तक वाचा म्हणून सांगू लागतो कारण त्याला वाटत असतं की तुम्ही त्या निमित्तानं त्याचं जगणं वाचावं. तर मी मघाशी म्हटलं तसं मतं आणि मिशी फुटू लागली होती. आपण काहीतरी वेगळा विचार करतोय असं वाटू लागलेलं होतं आणि मी मला जाणवू लागलेलं संस्कार, रुढी परंपरांची घुसमट या साहित्यात शोधत होतो पण दुर्दैवानं मला त्यात कुठेही ती घुसमट दिसत नव्हती. मला पडणारे प्रश्न त्या कथा कादंबऱ्यांतल्या नायकांना पडत नव्हते. मला जाणवणारं शरीराचं आणि संस्कारांचं भांडण तिथे कुठेच नव्हतं. त्यातला नायक माझ्याच वयाचा होता पण सगळं छान छान, गोड गोड आणि संस्कारांच्या चौकटीत राहून. मग ते प्रेम असो विवाह असो की आणखी काही. मी वाचत तर होतो पण अस्वस्थ होतो. दत्त रघुनाथ कवठेकर नावाचे एक लेखक होते. त्यांच्या साहित्यात मला हवा असलेला नायक होता. पण ते तितकंच. नेहमी माणसं वाचताना स्वत:ला शोधतात. सहजधर्म आहे हा. वाचक जे वाचतो त्यात स्वत:ला शोधण्याचा प्रयत्न करत असतो.

[redacted]

**मी : मग ही घुसमट कोणत्या पुस्तकाने बाहेर काढली.**

**श्याम जोशी :** पुस्तकाने नाही ही घुसमट वाफेसारखी बाहेर पडली ती जेजेमुळे. दहावी पास झालो ते जेमतेम. त्यावेळी आम्हाला तीनच म ार्ग माहीत होते दहावीनंतरचे. आर्टस कॉमर्स आणि सायन्स. पहिल्या दहा बाकावरची मुलं सायन्सला जात, अकरा ते पंधरा बाकावरची मुलं कॉमर्सला आणि शेवटची मुले आटर्सला. नुकताच रिझल्ट लागला होता. मी आणि वडील एकदा पारनाक्याच्या बाजारात भाजी घेत होता. तर तिथे शाळेतले शिक्षक भेटले. बरं त्यावेळचे शिक्षक मुलांना सोड, पालकांना नाव आणि चेहऱ्यानिशी ओळखत असत आणि पालकही आपल्या पाल्याच्या शिक्षकांना ओळखत असत. तर शिक्षकांनी माझ्या वडिलांची चौकशी केली आणि माझे मार्क्स विचारले. माझे मार्क्स ऐकून ते म्हणाले तू चित्र छान काढतोस. अक्षरही छान आहे. तू 'जेजे' मध्ये जा. आणि मी आयुष्यात कधी व्हिटी स्टेशन न पाहिलेला मुलगा जेजेमध्ये जाऊ लागलो. आठवडाभर माझे वडील कल्याणहून मला कॉलेजमध्षे सोडायला येत. जेजेमध्ये गेलो आणि तिथलं वातावरण पाहून अवाक झालो. तिथली ती श्रीमंती, मोकळेपणा, मग तो कलेतला असो की आचारविचारातला. पाहून एकदम हबकलोच. माझ्या अंगावर वडीलभावाची अल्टर केलेली बेलबॉटम आणि पोटावर कुठेतरी फाटलेला शर्ट व समोर थेट पॅरिस फॅशनचा शर्ट घालणारी मुलं. मी आयुष्यभर अंगभर नेसलेली बाई पाहिलेली आणि समोर पँटमधल्या मुली. टेन्शन आलं आणि वॉशरुममध्ये गेलो तर सगळ्या भिंतींवर चित्रे. कामशास्त्रातले सगळे प्रकार तिथे सृजनशीलतेच्या अंगाने मांडलेले. (मी हसतो.) अरे हसतोय आपण आता पण त्यावेळी मी बधीर झालो आणि मग भानावर आलो तेव्हा जेजेकर झालो होतो. तिथेच मला सरिता चौगुले भेटली. थेट खांद्यावर हात टाकून बोलणारी. सिगारेट ओढणारी. ती कॉलेजला एका गाडीने यायची आणि कॉलेज सुटल्यावर तिला न्यायला दुसरी गाडी असायची. अशी सरिता चौगुले आपल्याला मित्र मानतेय हे आमच्यासाठी अभिमानास्पद होतं रे! बरं त्याकाळात मुलींनी मुलांशी मैत्री करणं हेच आश्चर्य होतं. पहिले सहा महिने तर मी मुलींशी खाली मान घालून बोलायचो. मुलींशी बोलायचं म्हणजे चारित्र्याचा प्रश्न, पण त्या मुली मग सरिता असो की मिस बार्बा

असो परदेशात जाऊन आलेल्या. त्यामुळे त्यांच्यासाठी त्यांच्यात आणि माझ्यात काहीच भेद नव्हता त्या आमच्या खांद्यावर हात ठेवून बोलायच्या. तो मोरपिशी स्पर्श सुखवायचा. त्या स्पर्शाने मला आधी पुरुष केलं आणि नंतर हळूहळू स्त्रीपुरुष भेद मिटवून टाकले. लिंगभेदाचा अडसर आपल्या संस्कृतीत प्रत्येक वेळी आडवा येतो. तो अडसर दूर झाला. त्यानंतर भागवत मॅडम भेटल्या स्लीव्हलेस ब्लाऊज घालून शिकवणाऱ्या. स्लीव्हलेस ब्लाऊज? ज्या काळात अंग झाकण्याचे संस्कार होते त्या काळात स्लीव्हलेस ब्लाऊज? आम्ही त्यांच्याकडे नुसतं पाहातच राहायचो. त्या काय शिकवतायत काय बोलतायत काही कळायचं नाही. शारिरीक भूक वैगेरे नव्हती पण समोर 'ताजमहाल' दिसल्यावर पाहात राहावं तसं काहीतरी आश्चर्य पाहात राहायचो. तिथे मला एडवर्ड भेटला. आईवडिलांना सोडून मैत्रिणीला पत्र लिहिणारा. खिशात शंभर शंभरच्या नोटा बाळगणारा. त्याच्यासाठी ट्रीपल फायच्या सिगारेटी मला सरिताच्या पर्समधून चोरायला लावणारा. तिथे न्यूड पाहिली, न्यूड मॉडेल्स पाहिली आणि मग अंगावरची सगळी खोट्या संस्कारांची लक्तरं गळून पडली. मी माणूस म्हणून जगायला शिकलो. माणसासारखं बोलायला शिकलो. वागायला शिकलो खरं खरं. मन काय म्हणतंय ते नीट ऐकायला शिकलो. ब्राह्मणत्वाची सगळी वस्त्रं उतरवून निसर्गानं दिलेल्या जाणिवांना सामोरं जायला शिकलो. मैत्र शिकलो. श्याम-एडवर्ड ही जोडी बनली होती जेजेमध्ये. माझं वागणं आता बदललं होतं. मी बदललो होतो. आता मला कळलं होतं की वास्तव जगण्यातले नायक पुस्तकसिनेमात नसतात त्यामुळे पुस्तकात न सापडलेला नायक मी स्वत:च झालो होतो. जो आसपास होताच माझ्या प्रत्येक तरुणात. त्याम ुळे घरातून बहिष्कृतही झालो होतो पण फिकिर नव्हती. माझ्या लक्षात आलं होतं की तिथल्या त्या मोकळ्या वातावरणात मला सगळ्या प्रश्नांची उत्तरे मिळत होती. जगताना प्रत्येक अनुभवाला कसं सामोरं जायचं ते कळलं होतं. त्यानंतर मग परीक्षा आली. मी जेजेमधनं टेक्स्टाईल डिझायनिंग इन डाईंग, व्हिविंग अँड प्रिंटींगची परिक्षा दिली आणि मला दोन बातम्या एकाच वेळी कळल्या त्या अशा की मी सेकंड रँक इन मेरीटमध्ये पास झालो आणि एडवर्ड भारत सोडून गेला. त्यावेळी या बातम्या वर्तमानपत्रात येत. मी सेकंड रँक इन मेरीट आलो हे नावानिशी वर्तमानपत्रात आलं होतं पण आनंद नाही झाला. मी रडलो खूप एडवर्ड मला न कळवता निघून गेला म्हणून. माझ्या हातात डिग्री होती पण जगणं शिकवणारा एडवर्ड नव्हता याचं मला खूप दु:ख झालं. त्यानं मला मैत्र शिकवलं होतं. माणूसपण शिकवलं होतं त्यादिवशी डिग्री मिळूनही मी ढसढसा रडलो, कारण मैत्र हरपलं होतं.

[redacted]

**मी : मघाशी तुम्ही म्हणालात की स्त्रीपुरुष भेद मिटले हे तुम्हाला त्यावेळच्या कोणत्याही पुस्तकात मिळाले नाहीत?**

**श्याम जोशी :** तू तो लेख वाचलायस का मेघना पेठेचा तू वाचला असशीलच, तुझं वाचन चांगलं आहे. 'प्राणांवर नभ पांघरले'. त्या लेखाचं अभिवाचन मी करतो. मी मेघनाला म्हटलं, 'या एका लेखासाठी मी तुला काहीही द्यायला तयार आहे.' त्या आधी पुशि रेगे.

१८३८ सालापासूनची पुस्तके आमच्याकडे आहेत. मिसेस फेरारी म्हणून 'यात्रेकरूंचा वृत्तांत' नावाचं पुस्तक आहे. शिळा प्रेसवरचं पुस्तक आहे. पहिलं प्रवासवर्णन.

**मी : या तुमच्या कामाने तुम्हाला काय दिलं?**

**श्याम जोशी :** माझ्या जगण्याला प्रयोजन दिलं. तुला सांगतो किरण, कित्येक वर्षे आपल्या समाजाकडे जगण्याला प्रयोजनच नव्हतं, नाहीय. म्हणून आपण पारतंत्र्य भोगलं, म्हणून आपण परकीय आक्रमणं भोगली म्हणून आजही हा भ्रष्टाचार आपण भोगतोय कारण.. जगण्याला प्रयोजनच नाही कुणाच्या.

**मी : हे ग्रंथसखा आणि मराठी स्वायत्त विद्यापीठाचं तुमच्या मनात कसं काय आलं?**

**श्याम जोशी :** सन २००३ साली कुणी विचारलं असतं तर वाचनालय काढण्याचा विचारही माझ्या मनात नव्हता. सन २००३ साली वडील गेले. आणि सगळी पुस्तकं पोरकी झाली रे! त्या पुस्तकांच्या आठवणी पोरक्या झाल्या. त्या पुस्तकांचे किस्से पोरके झाले. आता या सगळयाचं करायचं काय वाटू लागलं. ही निगुतीनं सांभाळलेली, शब्द लक्षात घे हं, ही निगुतीनं सांभाळलेली पुस्तकं टाकून द्यायला जीव धजावेना. दान करायचं म्हटलं तर आपलं मूल दुसरा त्याच मायेने सांभाळील याची शाश्वती काय? बरं मला पुस्तकांपासून सुटकारा नको होता, मग विचार आला की हे जतन करायला हवं आणि जतन करायचं ते वडिलांच्या नावानं नाही कारण पुस्तकांचा बंध हा माझा आणि वडिलांचा खासगी विषय आहे. त्यात पुस्तक ही सामाजिक गोष्ट आहे. ही पुस्तके वडिलांच्या मालकीची असली त्यासाठी पैसे आम्ही खर्च केले असले तरी त्यातलं ज्ञान हे माझं नाही. त्यातलं ज्ञान त्या त्या लेखकाचं, समाजधुरिणाचं आहे. त्यामुळे ती समाजापर्यंत पोहोचायला हवीत आणि समाजाच्या मालकीची व्हायला हवीत म्हणून सन २००४ साली मी स्वेच्छानिवृत्ती घेतली. आधी ट्रस्ट केला. त्याचं नाव निसर्ग ट्रस्ट. कारण निसर्ग ही सुद्धा सामाजिक गोष्ट आहे. आता या ट्रस्टच्या मालकीची ही पुस्तकं आहेत. माझ्या नाही. म्हणजे कुणाला मोह झाला, समजा, माझ्या मुलाला मोह झाला, त्यानं कुणाला बोलवलं की मला एक कोट



रुपये द्या. तरी ती पुस्तके तो विकू शकत नाही. आता ही पुस्तकं मी दुसऱ्या संस्थेला देऊ शकतो पण विकू शकत नाही. आणि या पुस्तकांनी इतकी माणसं दिली. जवळपास ५००० कार्यकर्ते माझ्याकडे आहेत आज. मला कुठून कुठून फोन येतात. चंद्रपूर म्हणू नको, नागपूर म्हणू नको, महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून फोन येतात की सर असं असं जुनं पुस्तक आहे. त्यात कितीतरी साहित्यिकांनी त्यांच्याकडची पुस्तके दिली. मग गंगाधर गाडगीळ असतील, काही नावे लागतील. पण वाचनालयाची सुरुवात करण्याआधी तुला सांगतो जवळपास एक वर्षभर मी सगळ्या वाचनालयांचा अभ्यास केला. सगळीकडे वर्षभर नुसता फिरत अभ्यास करत होतो की त्यांची मांडणी कशी आहे, पुस्तकं देण्याची पद्धत कशी आहे. काय अडचणी आहेत कोणत्या सुविधा लागतात.

[redacted]

**मी : पण हे सगळं सुरू करताना तुम्हाला लोकांनी वेड्यात काढलं असणार?**

**श्याम जोशी :** वेड्यात? मूर्खात काढलं. अनेकांनी समजावलं, अरे काय करतोयस, रिटायरमेंटचे पैसे चांगल्या बँकेत टाक, शेअरमध्ये टाक, दुकान घे, बुडायचंच आहे तर धंदा करून बघ. पण मी ठरवलं होतं. पण त्याआधी मी वर्षभर सर्वेक्षण केले होते. मी बडोद्याला गेलो होतो, कुठे कुठे जाऊन नुसतं पाहून आलो होतो वाचनालये. आणि तेव्हा ठरवलं की या सगळ्या वाचनालयापेक्षा वेगळं वाचनालय बनवायला हवं. लोकांनी आता मला समजावणं सोडून माझ्या घरच्यांना समजवायला सुरुवात केली होती. याला आवरा. हा वेडा झाला आहे. याच्या मनातलं हे खूळ काढून टाका. याला अपयश येणार आहे हे कुणीही सांगेल. मी म्हणायचो, अपयश आलं तर जवळच आहे की रेल्वेट्रॅक, पण त्याआधीच मी आत्महत्या करणार नाही. जीव देणार नाही.

**मी : क्या बात!!**

**श्याम जोशी :** एकदा माझे सासरे घरी आले आणि बायकोला म्हणाले, ''तू तरी समजाव त्याला. एवढे लाखो-करोडो रुपये ओततो आहे याच्यात. यातनं काय मिळणार आहे त्याला आणि तुम्हाला? एवढा मोठा गाळा घेतला पुस्तकांसाठी. ती पुस्तकेही कोणती? तर रानोमाळ धूळ खात पडलेली जुनी पुस्तके. जी कुणीही वाचत नाही. वाचण्यासारखी असती तर त्या गावीच नसती का वाचली गेली?'' त्यांचा विचार रास्त होता. काळजीपोटी त्यांनी तो केला होता. पण वेड डोक्यात घुसलं होतं.

**मी : आणि असं काही काम कर यचं असेल तर डोक्यात वेडच असायला हवं.**

**श्याम जोशी :** कारण सर्किट माणूसच काहीतरी करू शकतो. माझं काम अजून खूप बाकी आहे. आणि मी काहीच काम केलं नाही. माझ्या आधी कितीतरी लोकांनी काय काम करून ठेवलंय. तुला सांगतो.

१८७४ च्या काळात गावोगावी जायचा. चावडीवरच्या गप्पा ऐकायचा. कशा तऱ्हेने ब्रिटिश सरकार चालू आहे. काय करत आहे? आणि हे सगळं त्या काळात, स्वत:च्या मनाने, त्याला कुणी टिए डिए दिला नाही, सोयी नाहीत.

राजवाडे दोन गोणी घेऊन जायचे. एका गोणीत स्टोव्ह आणि एका गोणीत जमा केलेली पुस्तकं. प्रवासाची सोय नाही राहण्याची सोय नाही. उतरण्याची सोय नाही राहणार कुठे? धर्मशाळेत. स्वैपाक पाण्याची काही सोय नाही मग कुठल्यातरी झाडाखाली स्टोव्ह पेटवायचा. शिधा घेऊन जायचे बरोबर. शिधा मिळणार कुठे? अशा परिस्थितीत या लोकांनी काय काम केलंय.

राहुल सांस्कृत्यायन नावाचा माणूस होऊन गेला. केदार पांडे नाव. काय काम केलंय! सात जन्म घेतले तरी त्याच्याएवढं काम शक्य नाही. त्यानं बावीस याक सोबत घेतले आपण वाचलेलं असतं चीनमधले भिक्खू इथे आले, ब्रह्मदेशातले लोक इथे आले आणि इथलं सगळं पाहून त्यांनी काही ग्रंथ लिहिले. या माणसाने तिथल्या देशात जाऊन त्यांचा शोध घेऊन महत्प्रयासाने त्यांची हस्तलिखितं मिळवून ती बावीस याकवर टाकून मजल दरमजल करत इथे आणली. सांग काय मनोनिग्रह असेल या माणसाचा? कोणती प्रेरणा असेल त्याच्या मागे? त्याला कोणीही सांगितलं नााही की तुला पद्मभूषण देईन, पद्मश्री मिळेल, पुरस्कार मिळेल. नाही. पण काम केलं. पाटण्याला जर गेलास तर 'खुदाबक्श ग्रंथालय' आहे. तिथे जा.

बंगालमध्ये 'विल्यम कॅरे' नावाचा एक माणूस होता तो निळीच्या शेतीत कामगार म्हणून काम करायचा. त्याचं स्वप्न होतं की बायबलचं तेहतीस भाषात भाषांतर करायचं. त्याचा राज्यकर्त्यांशी काही संबंध नव्हता. मेजर कँडी, मेकॉले यांच्याशी त्याचा काही संबंध नव्हता. उलट हा इकडे आला म्हणून

राज्यकर्त्यांनी त्याच्यावर बंदी आणली. त्यांच्यामते याने मिशनऱ्यांचं कार्य केलं तर या प्रदेशावर राज्य करणं कठीण जाईल. म्हणून त्याला काहीही सहकार्य दिलं नाही. तरीही तो बधला नाही. सकाळपासून संध्याकाळपर्यंत तो शेतात काम करायचा आणि रात्री भाषांतर. मग त्याने कोलकात्यामध्ये स्वत:चा प्रेस काढला आणि मराठीतलं पहिलं पुस्तक हे मिशनऱ्यांनी काढलं ज्याचं नाव होतं, 'द ग्रामर ऑफ मरहट्ट लँग्वेज' एतद्देशीयांचं व्याकरण हे त्या लोकांना कळावं म्हणून त्यांनी हे पुस्तक काढलं. त्याआधी दोन हजार वर्षात असा प्रयोग कुणीही केला नव्हता.

त्यानंतर आपल्याकडे संस्कृतमधनं आलेल्या ओव्या होत्या, अभंग होते पण गद्य नव्हतं आपल्याकडे, 'प्रोज' ज्याला म्हणतात ते नव्हतं. तेव्हा मेजर कँडी नावाचा माणूस होता त्याने संस्कृततज्ञ विव्दानांची सभा घेतली आणि त्यात सांगितलं तुमच्याकडे पंक्च्युएशन नाहीय. विरामचिन्हे, प्रश्नचिन्ह, उदगारचिन्ह, अवतरणचिन्ह, इत्यादी. कारण आपल्याकडे प्रोजच नाहीय. आपल्याकडे जे ग्रंथ झाले ते काव्यशैलीत. शिवाजी महाराजांवर असो की महाभारत, रामायण सगळं कवितेतच आपण सांगत होतो.

अशी खूप कामं झाली आहेत आधी आणि विशेषत: सन १८००चा काळ. सुवर्णकाळ होता तो पुस्तकांच्या बाबतीत आणि तो ब्रिटिशांनी आणला होता हे मान्य करावंच लागेल.

[redacted]

गोविंदराव केळकरांचं काम मोठं आहे. गोविंदराव केळकर म्हणजे पुण्यात राजा केळकर म्युझियम आहे ते. तुला एक किस्सा सांगतो त्यांचा. काय माणसांचं डेडिकेशन असतं. गोविंदराव केळकरांना जुन्या वस्तू जमवण्याचा छंद होता. त्यात त्याचे सगळे पैसे जात. घरात हलाखीची परिस्थिती. एकदा गोविंदरावांचा मुलगा राजा आजारी पडला. औषधासाठी पैसे नाहीत. शेवटी बायकोनं कुठूनतरी जमवाजमव केली आणि पैसे गोळा करून गोविंदरावांच्या हातावर पैसे ठेवत राजासाठी औषधे आणायला पाठवलं. गोविंदराव निघाले आणि त्यांना वाटेत एक माणूस भेटला. गोविंदरावांना पाहताच तो म्हणाला, 'अरे गोविंदरावजी तुम्हालाच शोधत होतो मी एक नायाब चीज आली आहे माझ्याकडे. बघायचीय का?' गोविंदरावांना उत्सुकता वाटली. म्हणाले, 'हो कुठेय?' तो माणूस म्हणाला, 'चला सोबत. खूप जुनी वस्तू आहे.. तुम्हाला नक्की आवडेल. गोविंदराव त्या माणसासोबत गेले आणि रात्री घरी परतले ते एक जुनं झुंबर घेऊन. त्यांच्या चेहऱ्यावर अनन्वित आनंद आपल्याला काहीतरी अनमोल गवसल्याचा. आपल्या पत्नीला कधी एकदा दे पुरातन झुंबर दाखवतोय असं त्यांना झालेलं. ते जवळपास धावतच बायकोला हाका मारत घरात शिरले आणि उंबरठ्याजवळच थबकले. समोर त्यांचा राजा मुलगा औषधाअभावी गतप्राण झाला होता आणि बायको रडत होती. गोविंदरावांच्या हातात ते पुरातन झुंबर होतं आणि समोर गतप्राण मुलगा.

त्यानंतर काही वर्षानी हैद्राबादचा नवाब सालारजंगला गोविंदरावांच्या पुरातन वस्तूंच्या संग्रहालयाची बातमी समजली आणि ते पुण्यात आले. गप्पा झाल्या. सालारजंग नवाबाने गोविंदरावांचा पुरातन वस्तूंचा संग्रह पाहिला आणि तो ते सगळं पाहून हरखून गेला. जेवायला बसलेले असताना सालारजंग नवाबाने गोविंदरावांना विचारलं, 'या सगळ्याची किंमत काय असेल?' गोविंदरावांना काही सुचेना. हैद्राबादच्या नवाबान त्यांच्या पुढे कोरा चेक ठेवला आणि म्हणाला, 'तुम्हाला वाटेल ती किंमत यावर टाका. आणि हा तुमचा संग्रह मला विकत द्या' घरात अठराविश्व दारिद्र्य असलेल्या गोविंदरावांनी माजघरात बसलेल्या पत्नीकडे पाहिलं. त्यावेळी बायका माजघरातून बाहेर काय हवं नको ते पाहात. गोविंदरावांनी खुणेनं विचारलं, काय करू? तसं त्यांच्या बायकोनं भरल्या डोळ्यांनी हात हलवून सांगितलं. (श्याम जोशी उजवा हात नकारार्थी हलवतात. त्यांचा आवाज फुटत नाही. काही क्षण ते थांबतात. सगळी पुस्तकं अप्रुपानं आपल्या हळव्या बापाकडे पाहत राहतात. मी पाहत राहतो. जोशी पुढे बोलू लागतात.)

नवाब गेल्यावर गोविंदरावांनी पत्नीला विचारलं, ''तू नको का म्हणालीस. अगं राजाची राणी झाली असतीस एवढा पैसा मिळाला असता हे सगळं विकून.'' तसं गोविंदरावांची बायको म्हणाली, ''पण आपला राजा नसता मिळाला. हे सगळं मिळवण्यासाठी आपण आपला राजा दिलाय.'' (त्यांचे डोळे पाणावतात.)

अबॉट नावाचा एक माणूस होता तो मिशनरी होता. तो इथे आला होता इथल्या माणसांचं धर्मांतर करण्यासाठी. पण तो इथल्या माणसात राहिला. काम करू लागला आणि त्याला हिंदू धर्माची ओढ लागली त्यानं ठरवलं की मी माझ्या देशात जाईन आणि तिथल्या लोकांना हिंदू करेन. त्यांना हिंदू धर्म समजावून सांगेन. त्याने लिहून ठेवलं होतं की 'माझ्या मृत्यूनंतर माझ्या शरिराचं दहन करावं आणि ती राख हिंदू धर्माच्या रिवाजाप्रमाणे वाहत्या पाण्यात विसर्जित करावी.' तर त्याच्या मृत्यूनंतर भांडारकर प्राच्य मंदिरमध्ये एक सभा चालू असताना पोस्टाने एक लिफाफा आला आणि त्यात अबॉटचं पत्र की हिंदू धर्मातील अनेक ग्रंथांचं जतन करणं हे काम मला महत्त्वाचं वाटतं आणि म्हणून माझ्या संपत्तीतला काही वाटा मी भांडारकर प्राच्य विभागाला देत आहे. त्यात बत्तीस हजार डॉलर्रा? याला म्हणतात ज्ञाननिष्ठा. मला जर देवाने पुनर्जन्म दिला आणि विचारलं तू कुणाच्या पोटी जन्माला येण्याची इच्छा आहे तर मी सांगेन अबॉटच्या.. असा बाप असावा, ज्ञाननिष्ठा बाळगणारा.

दुसरा एक किस्सा सांगतो. ग्रे हे नाव ऐकलं असशील. मेडिकल सायन्समध्ये आजही 'ग्रेज अनॉटॉमी' हे पुस्तक 'बायबल' मानलं जातं. खूप पुरातन ग्रंथ आहे तो. त्यावेळी ख्रिश्चन धर्मात डिसेक्शनला परवानगी नव्हती. आणि या ग्रेला सात मुले होती.

या ना त्या कारणाने ती मुले मेली. कुणी दहाव्या वर्षी मेलं कुणी तेवीसाव्या कुणी इतर वयात. पण ख्रिश्चन धर्मात शरीर फाडण्याची परवानगी नसल्याने हा ग्रे आपल्या मुलाचं शव माळ्यावर लपवून ठेवायचा. हे बायकोला माहीत नसायचं. रात्री मग हा ग्रे हळूच माळयावर जायचा आणि आपल्या मुलाचं शवविच्छेदन करायचा. विचार कर काय होत असेल त्याच्यातल्या बापाचं? पण ज्ञाननिष्ठा. हे असायला हवं..

**मी : तुम्ही तुमच्या ग्रंथसखा आणि मराठी स्वायत्त विद्यापीठात काय काय जमवलं आहे?**

**श्याम :** आज मराठी स्वायत्त विद्यापीठात जवळपास दीड लाख पुस्तके आहेत आणि ही सगळी पुस्तके काळावर ठसा उमटवणारी पुस्तके आहेत. ही पुस्तके अशी आहेत की तुम्ही याचा उल्लेख केल्याशिवाय तो साहित्यकाळ मांडू शकणार नाही. आणि फक्त पुस्तके नाही, त्यात नियतकालिके आहेत, अनियतकालिके आहेत. मग त्यात पहिला दिवाळी अंक 'मनोरंजन' आहे, 'शाळापत्रक' आहे, 'रत्नाकर' आहे, 'नवयुग वाचनमाला' आहे, १९५० पासूनचे सत्यकथेचे सगळे अंक आहेत. या सगळ्यांच्या अभ्यासासाठी अशोक नायगांवकर येतात, अरुण म्हात्रे येतो, अंजली कीर्तने 'रवींद्र गुर्जर', असे सगळे येत असतात. पुस्तकांमुळे माझं जगणं समृद्ध झालं. जगण्याला प्रयोजन मिळालं.

ज्या काळात तलवार हेच लढाईचं हत्यार होतं त्या काळात ज्याने मुस्लीम धर्म निर्माण केला त्याची तलवार आणि त्या काळातल्या सगळया तलवारी गोळा करून त्याचा अभ्यास करून एक पुस्तक लिहिलं गेलं. हे पुस्तक मराठीत आहे. याचं नाव आहे 'प्रताप शस्त्रागार' त्याची एकच प्रत आहे देशात. माझं व्याख्यान झालं कोल्हापुरात तेव्हा 'रणजितसिंह' हे राजे खासदार होते ते म्हणाले, 'तुमच्या वाचनालयाला मी काय मदत करू?' तर मी म्हणालो, 'मला काही नको, फक्त प्रताप शस्त्रागार पुस्तक द्या.' ते म्हणाले, 'एकच प्रत आहे, आणि ती देणं शक्य नाही.' शेवटी दादूमिया नेने जे त्यांचे स्वीय सहायक होते त्यांनी मध्यस्थी केली आणि त्या पुस्तकाची नक्कल प्रत दिली. ती तुला दाखवतो. अरे तलवारीचे किती प्रकार असावेत. लाखो? ह्या वेळेस आपण इतके प्रगल्भ होतो विज्ञानात की शिकलगार समाज जो पोलादावर काम करायचा त्यांनी अनेक वेगवेगळे पोलादाचे प्रकार तयार केले होते. अशा कितीतरी अचंबित करणाऱ्या गोष्टी या पुस्तकात सापडतात. हे बघ.. (ते प्रताप शस्त्राभाट ग्रंथ उघडत म्हणतात) ढालीचे प्रकार खाली दिल्याप्रमाणे

आत्मसंरक्षणाच्या ढाली

१. गेंड्याची,
२. कासवाची,
३. सिलेटची,
४. चामड्याची,
५. हत्तीपगी पोलादाची,
६. लाकडाची,
७. लोखंडाची.

आता हे सिलेटची म्हणजे काय? आपल्याला काहीच माहीत नाही रे!!

बाणाचा शोध लागण्यापूर्वी दगडाचा उपयोग करत लढाईत. तर ते दगड मारण्याचे प्रकार कोणते ते बघ.

१. एकल काजा
२. डुबडुबराजा
३. तिन्नातानी
४. चारचौकडी
५. पाचकपेंडू
६. छत्ताचेंडू
७. शातकसुता
८. आठकुठा
९. णवमेगोद
१०. अग्यारकुराठा
११. बारमराठा

अशी नावे आहेत. बघा काय मजा आहे नं!

[redacted]

**मी : नंतरच्या काळात असे काही वेगळे प्रयोग झालेत असं तुम्हाला वाटतं का?**

**श्याम जोशी :** नंतर र.धो. कर्वे यांनी 'समाजस्वास्थ'मध्ये वेगळं काम केलंय. समाजस्वास्थ्याचे सगळे अंक आपल्याकडे आहेत. नंतर वि. का. राजवाडेंचं 'विवाह संस्थेचा इतिहास' हे पुस्तक आहे. ते डांग्यांमुळे आलं. ते मागे लागले राजवाड्यांच्या म्हणून. पण तरीही ते परिपूर्ण पुस्तक नाही. त्यातले काही कागद गहाळ झालेत. राजवाडेंनाही काही लिहायचं होतं तेही राहिलं. राजवाडेंचं समग्र साहित्य आहे. हे पुस्तक आपल्याकडे आहे. त्यानंतर अरुणा ढेरेंचं 'प्रेमाकडून प्रेमाकडे' हे पुस्तक. हे पुस्तक विश्लेषणात्मक नाही, इन्फर्मेटिव्ह आहे, त्यात साहित्यातील जी दिग्गज मंडळी आहेत त्यांच्या आयुष्यातील स्त्रीचं स्थान काय आहे, यावर लेख आहेत. जसं खुशवंतसिंग यांचं 'माझ्या आयुष्यात आलेल्या स्त्रिया' हे पुस्तक आहे तसंच आहे ते. या विषयावर खूप कमी लोकांनी काम केलंय. मराठीत तर खूपच कमी. आपण जर वाङ्मयाचा इतिहास तपासत मागे गेलो तर स्त्रीविषयक जाणिवा, मते काय तुम्ही म्हणाल ते, कशा कशा अभिव्यक्त झाल्या ते कळतं. एकविसाव्या शतकाचं देणं काय असेल तर सुप्रीम कोर्टाचा निर्णय की स्त्रीने केलेलं प्रेम वा संबंध हे चूक नाही. हा कशाचा परिणाम? याला म्हणतात 'परकोलेशन थियरी'. शंभर वर्षापूर्वी विचारवंतानी मांडलेला थिसीस परकोलेट होऊन

प्रतलावर आला आहे. या विचारवंतांच्या मते नातं नाहीच. असलं तर त्या व्यक्तीचा जो मनोव्यापार आहे. त्याच्याशी जो जुळला जाईल तिथे आकर्षण निर्माण होईल. धर्मानं नैतिक अनैतिक वर्ग केलेत. याला शास्त्र काय? धर्म कुणी लिहिला? कोणत्या काळात लिहिला गेला? कोणत्या संदर्भात लिहिला गेला? हे सगळं बाद झालं आता. म्हणून आता 'पॉलीअँब्री' हा विषय आलेला आहे. यात विचारवंतांनी असा विचार के ला आहे की एका वेळेला स्त्री एकाशीच प्रेम करू शकते का? आणि प्रेम म्हणजे काय? आणि मग आता निरंजन घाटे यांनी या विषयावर भरपूर रिसर्च करून लिहिलं आहे की प्रेम आकर्षण या सगळ्या रासायनिक क्रिया. आणि या शरीरातील रासायनिक पराकियांच्या अभ्यास म्हणजे डिकोडिंग. आता डीएनएचा नकाशा शास्त्रज्ञांनी निर्माण केला आहे. विज्ञान इतकं प्रगत होत आहे की आता यापुढे बाईला विचारलं जाईल की तुला कसा मुलगा हवा? निळे डोळे हवे, केस सोनेरी हवे जसं हवं तसं डिकोडिंग करून मुलाला जन्म देता येईल. आणखी दहा वर्षानंतर मूल विवाहानेच जन्माला घालण्याचा काळ बाद होईल. 'स्पर्म' म्हणजे वीर्यदानातून खूप अभिनेत्यांनी मुलं जन्माला घातल्याचे आपण आताच पाहतो आहे त्यामुळे येत्या काही काळात विवाहसंस्था मोडकळीस येईल. हे सगळं साहित्यात यायला हवं. निरंजन घाटेने ते आणलंय. हाही प्रयोगच आहे.

[redacted]

आणखी एक वेगळा प्रयोग तुला सांगेन. तू 'परीघ' नावाचं पुस्तक वाचलंयस का? तुला माहीत आहे मन्या ओक, गुरुनाथ धुरी, श्रीकांत तिळवे, असे पाच जणाचं टोळकं होतं जे मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालयाच्या पायरीवर बसायचे. दारु आणि कविता हे त्यांच्या जिव्हाळ्याचे विषय. तर ते एकदा पीत बसले होते आणि विषय निघाला. नक्की कुणी प्रश्न विचारला आठवत नाही. बहुतेक मन्या ओक असावा. म्हणाला, 'द्रौपदी कशी काय राहिली असेल पाच जणांसोबत?' 'काय झालं असेल तिच्या मनात आणि त्यांच्याही मनात?' प्रत्येकाने तारे तोडले. त्या तारेतच होते ते. (मी हसतो.) अशी चर्चा रंगली आणि मग एक प्रस्ताव आला की आपण असा प्रयोग करून का नाही पाहात? आणि मग एक किंचित लेखिका त्यांच्या संपर्कात आली. 'किंचित 'लेखक-लेखिका' म्हणजे काही लोकांना भ्रम असतो की आपण लेखक आहोत' लेखिका आहोत वगैरे वगैरे. या पाच जणांनी तिच्याकडे प्रस्ताव ठेवला आणि तिने तो मान्यही केला. आणि मुंबईला त्यावेळी मोठमोठ्या पाईपलाईन होत्या. त्यात बसून एकीकडे दारु आणि दुसरीकडे हा प्रयोग. आणि तिनं मग त्यावर आत्मचरित्र लिहिणं. आत्मचरित्र लिहिणं म्हणजे स्वत:ला मारून टाकणं. सगळं जाहीर सांगणं. हे असं धाडस त्या बाईनं केलं. हा प्रयोगच आहे. ते पुस्तक आपल्याकडे आहे.

हे असे प्रयोग आपल्याकडे होताना दिसत नाहीत याचं कारण धार्मिकतेचा, श्लील-अश्लीलतेचा पगडा. अरे दारुवर 'मद्यपान विशेषांक' निघालाय. हा प्रयोगही झालाय.. संपादक लक्ष्मणशास्त्री जोशी. हाही प्रयोगच आहे. तुला तो अंक पाहायचा असेल तर आमच्याकडे आहे. आम्ही तो पुनर्मुद्रित करतोय.

रॉय किणीकरांनी तसा एक धाडसी प्रयोग केला होता. दिवाळी अंक काढताना त्यांनी ठरवलं की अंक खपायचा असेल तर न्यूड टाकायला हवं, सगळं कर्ज फिटून जाईल. आणि मग 'धरती'चा अंक त्यांनी काढला ज्यावर न्यूड फोटो होता. पण त्यांना कळलं नाही की दिवाळी म्हणजे समाजाच्या मनात एक मंगल भावना असते. पवित्र, शुचिर्भूत आणि निर्मळतेची भावना असते. आणि आपल्या समाजाच्या मनात तर अजूनही न्यूड फोटो म्हणजे 'अश्लीलता' हेच समीकरण आहे. त्यामुळे आपला समाज आपल्या घरी न्यूड फोटो असलेला अंक कसा नेईल? परिणाम असा झाला की न्यूड फोटो असलेला तो धरतीचा दिवाळी अंक सपाटून आपटला. मुश्किलीने दहा बारा प्रती संपल्या. अफाट कर्ज वाढलं आणि रॉय किणीकर भ्रमिष्ट झाले. तो अंक तुला पाहायचा असेल तर आपल्याकडे आहे.

**मी : कोणतं काम आपल्याकडच्या साहित्यात व्हायला हवं असं तुम्हाला वाटतं?**

**श्याम जोशी :** आपल्याकडे अजूनही 'शरीराचं सौंदर्य' हे 'अश्लील' म्हणूनच पाहिलं गेलंय. श्लील-अश्लील झगड्याचा इतिहास कुणीतरी साहित्यात मांडायला हवा. अनंत रंगरतीशास्त्रपासून आजपर्यंत, आपल्याकडे कुणी लिहितच नाही. भानगडीत पडेल कोण?

**मी : कारण?**

**श्याम जोशी :** धार्मिक भावना! कर्जतचे 'मुळे' नावाचे एक गृहस्थ आहेत त्यांनी कोर्टात एक खटला भरला. संस्कृत ग्रंथाचं त्यांनी मराठीकरण केलं. त्यावर कोर्टात खटला भरला गेला की त्यात चौऱ्याऐंशी आसनं वगैरे वगैरे. त्यावर कोर्टात खटला भरल्यावर, हा मास्तर. पैसे कुठून आणणार केस वकिलाला? पण त्यानं स्वत:ची केस स्वत: लढवली. कितीतरी दाखले दिले कोर्टात आणि तो निर्दोष सुटला. त्या पुस्तकाचं नाव अनंतरंगरतीशास्त्र. ते पुस्तक आपल्याकडे आहे. हा मोठ्ठा विषय आहे. पाच खंड होतील इतकं साहित्य आहे माझ्याकडे.

'रम्य कथा प्रकाशन' नावाचं प्रकाशन पुण्यात होतं एकेकाळी. ते 'प्रेयसी' वगैरे अंक काढायचे. ते सगळे अंक आपल्याकडे आहेत. परदेशात काय स्थिती आहे. म्हणजे चीनमध्ये काय मतप्रवाह आहे, जापानमध्ये काय प्रवाह आहे त्यांची पुस्तके माझ्याकडे आहे मी चोरबाजारात जायचो आणि तिथला पुस्तक विक्रेता सांगायचा,

हळूच, दबक्या आवाजात की 'सर आपका वो आया है हा. बढिया चीज है एकदम. आता मला सांग चोरबाजारातला पुस्तक विकणारा. त्याच्या मनातही तोच न्यूनगंड. कुणी निर्माण केला? ती कोंडी अजून फुटली नाही. ते काम व्हायला हवं.

दुसरं काम व्हायला हवं की पठडीबाहेरचं साहित्य अजून मराठीत झालं नाही. म्हणजे मी पुण्याला जातो तेव्हा साहित्य परिषदेमध्ये उतरतो सिंहगड रोडला. आणि पहिली झोप झाली की साडेबारा एकला जाग येते मग काय करायचं? तर तिथून निघतो आणि जातो ओंकारेश्वरला. तिथे स्मशान आहे. तिथे सगळे गुर्दुल्ले येतात. आणि ते त्यांच्या विषयात इतके मास्टर आहेत की दोन-अडीचला एखादी बॉडी आली जाळायला तर तो मयत व्यक्ती कोणत्या रोगाने मेलाय याविषयी त्या गर्दुल्ल्यात पैज लागते. शरीराला एकदा अग्नी दिला की शरीर आक्रसत जातं आणि त्यातल पाणी काही वाफ होतं काही गळून खाली पडू लागतं या पडणाऱ्या पाण्याचा रंग पाहून त्यांना कळतं. आणि कवटी फुटण्याच्या आवाजावरनं ते ओळखतात की हा कॅन्सरनं मेलाय, हा काविळीनं मेलाय, हे सगळे धड उभंही राहू शकत नसतात बरं! पण आयुष्यभर तेच केलंय न? त्यांना इंटरेस्ट कशात तर त्या मयताचे कपडे मिळतात. पडलेल्या काठ्या विकणं वगैरे. हे सगळं यायला हवं न साहित्यात. त्यांची स्वत:ची फिलॉसोफी असते. त्यांच्यासाठी तुम्ही कोणी मोठा नसता. त्यांचं म्हणणं तू कुणीही मोठा असं, तुला शेवटी इथंच यायचंय. सगळ्या संतांनी धर्मानी सांगितलेलीच फिलॉसॉफी आहे ही. ते ती फिलॉसॉफी जगतात आणि सांगतात. हा मनोव्यापार कुठेच दिसत नाही मराठीत. त्यांचं विश्व कुठेच नाही मराठीत.

[redacted]

'मृत्यू' या विषयावर काम होणं गरजेचं आहे. आम्ही 'मृत्यू महोत्सव' घेणार आहोत. माझा मृत्यूवर काही अभ्यास आहे. जिथे प्रेत जळतं तिथे जर मी योगायोगाने असलो तर हजर राहण्याचा प्रयत्न करतो. माणूस मेल्यावर इतर जिवंत माणसं त्याला कशी सामोरी जातात, हे पाहणं मला आवडतं. शिरीष प्रयाग नावाचे डॉक्टर होते. प्रयाग नावाचं हॉस्पिटल आहे. विजय तेंडुलकरांचे डॉक्टर. विजय तेंडुलकर शेवटच्या काळात हॉस्पिटलमध्ये होते. सारखं म्हणायचे, 'मला काहीतरी देऊन मारा रे.' त्याच दरम्यान डॉ. प्रयाग यांना एका सेमिनारसाठी परदेशात जावं लागलं. आणि इथे विजय तेंडुलकर अस्वस्थ झाले. त्यावेळी विजय तेडुलकर आणि डॉ. प्रयाग यांच्यात फोनवर झालेला संवाद म्हणजे मृत्यूवरचं महाकाव्य आहे. इतका सुंदर संवाद होता तो. मृत्यू हा जगण्याचाच एक भाग आहे. त्याला कसं सामोरं जायचं असा त्या चर्चेचा गाभा. मृत्यूचं तत्त्वज्ञानच ते!

विज्ञानानंद नाव धारण केलेला एक मोठा माणूस होता त्यांचं नाव भिडे. ज्यांनी मन:शक्ती केंद्राची स्थापना केली. ते नेहमी गोणत्याच्या कापडाची वस्त्रे परिधान करायचे. एका दिवशी त्यांच्या लक्षात आलं की आपलं जगणं संपलंय. जे करायचं ते करून झालं. आहे. जसं सिगारेटचा पहिला कश हीच अभिलाषा असते आणि नंतर फक्त रिपिटीशन तसं. ते पुण्यात होते. ते सुनिताबाईंच्या घरी गेले. सुनीताबाईंचा त्यांचा बऱ्यापैकी संवाद होता. त्यांनी एका कागदावर लिहिलं की 'मी निघालोय. शेवटचा प्रवास. माझ्या सुहृदांना शेवटचं भेटून घेऊ म्हणून तुला भेटायला आलोय' आणि सुनीताबाईंच्या घरात पाठवलं. पण सुनीताबाई म्हणजे वेगळं प्रकरण! त्यांनी ते एन्व्हलप पाहिलं आणि नंतर वाचू म्हणून ठेवून दिलं. आज भेटायला वेळ नाही सांगितलं, तर हे निघून गेले आणि ते सचिवालयात गेले आणि तेराव्या माळ्यावरनं त्यांनी उडी घेतली. बघ हं मी 'उडी घेतली' म्हणतोय. ही आत्महत्या नाही. पाण्यात चालत जाण्याला काय म्हणतात?

**मी : जलसमाधी!**

**श्याम जोशी :** तशी त्यांनी प्रकाशात उडी घेतली म्हणून 'प्रकाशसमाधी'. मग बातम्या आल्या. मोठा माणूस होता भिडे. त्या बातम्या पाहून सुनीताबाईंनी ते एन्व्हलप पाहिलं आणि त्यांना कळलं की हे यासाठी आले होते. वसंत नारगोलकर नावाचा एक माणूस होता. समाजवादी माणूस होता. मी माझ्या कुटुंबीयांना मृत्यूचा अनुभव देणार नाही म्हणून जसा गौतम बुद्ध मध्यरात्री निघाला तसं वसंत नारगोलकरांनी बॅग भरली आणि म्हणाले, 'मी कुठे असेन माहीत नाही.' आणि ते गेले आजही कुणालाही माहीत नाहीत ते कुठे आहेत. जगलेत, वाचलेत, गेलेत की त्यांचं काय झालं. मृत्यूचा आवाज तुम्ही नीट ऐकलात तर मृत्यू तुम्हाला ज्ञान देतो. संतुष्टीचं, परिपूर्णतेचं, अंतिम समाधानाचं.

'कृष्णाचे अभंग' नावाचं पुस्तक आहे. ते लिहिले एका अठरा वर्षाच्या मुलानं. दहावी-बारावीतला मुलगा. एकदा झाडाखाली बसला आणि त्याला अभंग सुचू लागले. तो लिहित गेला. काही काळाने त्याची अभंगाची वही पूर्ण झाली आणि त्यानं निर्णय घेतला की माझं जिवित संपलं. झालं, रानातलं सरपण गोळा केलं, स्वत:चं सरण स्वत: रचलं आणि शांतपणे समाधी घेतली. एकविसाव्या शतकातली गोष्ट सांगतोय तुला मी. आहेस कुठे! मृत्यू तुम्हाला प्रगल्भ करतो. हा कृष्णा म्हणजे कृष्णा भांड. साहित्य संस्कृती मंडळाचे अध्यक्ष बाबा भांड यांचा पुतण्या. कृष्णावर बाबा भांड यांनी फार सुरेख पुस्तक लिहिलंय 'योगी' नावाचं. सगळ्यांनी वाचायला हवं. साहित्यिक हा सुद्धा एक वाचक असतो आणि माणूसच असतो. त्यानं माणसासारखं राहणं हे मला महत्त्वाचं वाटतं. म्हणजे सांगायचं तर पु.भा. भावेंचं अक्षर अत्यंत खराब. म्हणजे मराठी साहित्यिकात खराब अक्षर असलेल्या साहित्यिकांची यादी काढली तर त्यात पहिलं नाव पु. भा. भावे असेल. आणि हे त्यांना माहीत होतं आणि मान्यही होतं. ते स्वत: विनोद असं करायचे, मला म्हणायचे, श्याम माझे कोंबडीचे पाय वाचलेस का

तू? त्याचा अर्थ लागला का तुला? इथे मला माणूसपण सापडतं. अत्तराचा छंद म्हणजे किती असावा माणसाला. अत्तराचा घमघमाट आणि अत्तराचा दर्प यात फरक नाही करायचे. अत्तराने आंघोळ करायचे रे?

बरं, कुणाच्या घरी गेलो तर दारात उभं राहायचे. खिशातनं रुमाल काढायचे. दारावरल्या बेलचं बटण पुसायचे आणि मग बेल वाजवायचे. आता बोल!!.. हे यांचं असं तर तिथे दभिंचं वेगळंच. त्यांच्या दारावर घंटा बांधलेली असायची. देवळात वा शाळेत असते तशी. बाहेरनं कुणी गेलं की त्या माणसानं घंटा वाजवायची. मग दभि आतनं कुठूनतरी बाहेर येत आणि त्यांच्या घराबाहेर चौरस अंगण होतं त्यात झोपाळा होता त्यावर बसून चर्चा होत. प्रत्येक माणसाचे काही गंड असतात तसे या माणसांचेही होते आणि ही माणसे ते गंड वा जे काही होतं ते लपवीत नव्हते हे 'माणूसपण'. एकदा आम्ही दभिंच्या घरी गेलो आणि घंटा वाजवतोय तर घंटा कुणी दार उघडत नाही. हे सगळं रस्त्यावरला एक माणूस पाहात होता. त्यानं आम्हाला सांगितलं, तुम्ही दभिंना भेटायला आला आहात का? नुकतेच दभि या रस्त्यानं कुठेतरी गेले. माझ्यासोबत बाबा म्हणजे रविंद्र गुर्जर होते. काम तातडीचं होतं म्हणून आम्हीही त्या रस्त्यानं दभिंचा माग काढत निघालो आणि मला दभि दिसले. तू सांग कुठे दिसले असतील दभि? एक सलूनचं दुकान होतं. त्यात एक माणूस तोंडावर सगळं सफेद लावून डोळ्यांवर काकडीच्या चकत्या ठेवून बसला होता. मी बाबांना म्हटलं, 'बाबा, ते दभि आहेत का हो?' बाबांनी पाहिलं आणि म्हणाले, 'चला जवळ जाऊन पाहू.' आम्ही जवळ गेलो आणि एकदम ओरडलो, 'दभि? तुम्ही फेशियल करताय?' (दोघेही हसतो) दभिंची पत्नी शिवरंजनी खूप गोरी होती आणि दभिंना आपण काळे आहोत याचा खूप न्यूनगंड होता म्हणून ते दर आठवड्याला फेशियल करायचे. मी विचारलं, 'अहो दभि, दर आठवड्याला फेशियल केलं तरी गोरं होऊन होऊन किती गोरं होणार माणूस?' तर दभि म्हणाले, 'फार गोरं होत नाही रे, पण मनाची समजूत तर होते.' इथे मला माणूसपण सापडतं. जे आहे ते सांगणं, जसं आहे तसं वागणं हे माणूसपण. प्रत्येक माणसाच्या मनात काही न्यूनगंड असतातच. ते शारिरीक असू शकतात, मानसिक असू शकतात.

**मी : तुमच्या वाचनालयात सभासदांची संख्या ५००० आहे. आज १४ वर्षे या पुस्तकांच्या जगात राहिल्यावर तुम्हाला काय वाटतं की वाचकांच्या वाढत आहे की रोडावत आहे? वाढत असेल तर तो प्रगल्भ झाला आहे का? आणि कमी झाली असेल तर का कमी होत आहे? आणि यावर उपाययोजना काय?**

श्याम जोशी : नाही. नाही. आम्ही वाचक कोण याची व्याख्या आपल्याला करावी लागेल. ज्याला अभिजात साहित्याचं वाचन करणारा तो वाचक अशी एकेकाळी व्याख्या होती. त्यात नाटक येत असे, कविता येत असे, ललित गद्य-पद्य वैचारिक असं सगळं येत असे. आणि एकेकाळी या सगळ्याचं वाचन जास्त होत असे. हल्ली काय झालंय वाचक आहे की वाचक आहे पण ते वाचतात वेगवेगळं. तो काय वाचतो. कुणाला पाकशास्त्राची आवड आहे. कुणाला वास्तुशास्त्राची आवड आहे, कुणाला सौंदर्यविषयक पुस्तके वाचण्याची आवड आहे पण ललित साहित्य जे आहे त्याचा वाचक शंभर टक्के कमी झाला आहे. दुसरा प्रश्न तू विचारलास की वाचन कमी झाला असलं तर त्याचं कारण काय? तर लोक म्हणजे वाचक असं सांगतात की आम्हाला डोकं दुखवणारं साहित्य नको. उदाहरणार्थ ग्रेसची पुस्तकं नको कारण त्याची कविता कळत नाही. ती कळून घ्यायला विचार करावा लागतो. जीएचं नको. साधं-सरळ-सोपं डोक्याला त्रास न देणारं पुस्तक आम्हाला वाचायला द्या असं वाचकांचं म्हणणं आहे. याचा अर्थ जी नात्यांची वीण आणि जगण्याचा जो एक मागोवा ज्या साहित्यिकांनी घेतलेला आहे, नातेसंबंधांतल्या ताणतणावांचा आणि नियतीने मांडलेल्या खेळाचा माग, जो जी.ए. कुलकर्णींनी घेतलाय, ग्रेसांनी घेतलाय आणि इतरही अनेकांनी घेतलाय त्याचा मागमूसही आपल्याला नकोय. वाचकांना नकोय आणि मग जे काही लाखो पुस्तकं साहित्य संमेलनात खपतात, ती कोणती आहेत? तर पाककृतीची, आध्यात्माची, सौंदर्य फुलवण्याची, व्यक्तिमत्त्व विकासाची, डिक्शनरी, निबंध, करियर घडविण्याची. ही पुस्तकं तुमचं वैचारिक उन्नयन करतात का? तुमचं मन घडवतात का? यावर वाचक कोण? हे ठरवायला हवं. लोकांचा कल आता वैचारिकतेकडून सुलभीकरणाकडे झुकू लागला आहे. नातवाला किंवा मुलाला शाळेच्या डब्यात कोणते पदार्थ द्यावेत या विषयीची पुस्तके लोक शोधतात. व्यक्तिमत्त्वात बदल कसे घडवून आणावेत या विषयीची पुस्तके लोक शोधतात. लोकांना कळत नाही की साहित्य वाचल्याने व्यक्तिमत्त्वाचा विकास आपोआप होत असतो.

**मी : पण ही परिस्थिती पूर्वीही होती का?**

**श्याम जोशी :** नाही. पूर्वी करमणुकीचं एकच एक साधन होतं ते म्हणजे पुस्तक वाचन. करमणुकीसाठी विविध पर्याय नव्हते. आता करमणुकीला अनेक पर्याय निर्माण झाले आहेत. दूरचित्रवाहिन्यांचे आक्रमण हे मुख्य कारण आहे वाचन कमी होण्याचं. आणखी एक कारण मालिका. पण माझा स्वत:चा त्याबद्दल आक्षेप नाही याचं कारण कथा-कादंबऱ्यांत जे नाट्य असतं, नाटकामध्ये जे नाट्य असतं ते सगळं सिरियल, मालिकांत आहेच फक्त मालिका वाचता येत नाहीत पाहाव्या लागतात पण त्यात जे कंटेन्ट आहे, तेही कथानक आहे कुणाला हे पटेल न पटेल पण तेही साहित्य आहे. ते कुणाला साहित्य नाही असं वाटू शकेल पण करमणूक करण्याचं कसब त्यात आहे. निश्चित आहे. त्यामुळेच जो होता तो वाचक तिथे गेला आणि येणारा नवा वाचकही तिथे गेला. साहित्याचा उद्देश समृद्ध होणं आहे. माणूस होणं आहे. मला चांगलं जगता आलं पाहिजे. हे जे समृद्ध होणं जे आहे ते पूर्वी फक्त पुस्तकं, व्याख्यानमाला, संगीताच्या मैफली यातून व्हायचं. आता अनेक पर्याय आले आणि लोक पांगले. या सगळ्या माध्यमांबाबत माझी

तक्रार अशी आहे की मराठीच्या विकासाच्या पाऊलखुरा नष्ट होत आहेत. यात मराठीपण शिल्लक नाही. या माध्यमांमुळे ग्लोबल झालो आपण पण ग्लोबल होणं म्हणजे काय तर वैश्विक गोष्टी माझ्या दारात, घरात, जगण्यात आलीत. पण भाषा शिल्लक कशी राहते संस्कृती शिल्लक राहिली तर. मराठी भाषा मरते याचा अर्थ असा की मराठी संस्कृती मरते आहे. आपल्याला सकाळी नाश्त्याला पिझ्झा लागतो. मुलं भोवरा, लगोऱ्या खेळताना दिसत नाहीत. ज्याच्याज्याच्यात मराठीपण होतं ते लोप पावत आहे, हे आधुनिकीकरण नाही तर सांस्कृतिक सपाटीकरण आहे. उदाहरणच घ्यायचं झालं तर पूर्वी नवरात्रौत्सवात आपल्याकडे सगळीकडे व्याख्यानमाला व्हायच्या. आता दांडिया होऊ लागले. मला आठवतंय किमान १५-२० व्याख्यानमाला अशा असायच्या ज्यात हजारो श्रोते असायचे. विचारांचं आदानप्रदान व्हायचं. भाषेविषयी कढ काढणं सोपं आहे पण हे वांझोटे उसासे आहेत. आम्ही हे जपलं नाही कारण ग्रंथालये जपली नाहीत. आमच्या ग्रंथालयात ही हे ग्लोबलायझेशनचे परिणाम दिसू लागतात. आम्ही लेट फी घेत नाही. आमच्याकडे कडक निर्बंध नाहीत. लोकांनी यावं आणि वाचावं हा एकच उद्देश.

ही सांस्कृतिक पडझड आहे आणि सांस्कृतिक पडझड म्हणजे माणुसकीची पडझड. हा ऱ्हासाचा दृश्य परिणाम म्हणजे शेजारी मरून पडला असेल तर आम्ही घड्याळ पाहतो. गाडी पकडतो. आमच्याकडे वेळ नाही. ग्रंथ न वाचल्याचा हा परिणाम. म्हणून हे ग्रंथ टिकायला हवेत. दुसऱ्यावरचं संकट हे आपल्यासारख्या जीवावरचं संकट आहे हे कळत नाही. पूर्वी आपण माणूस म्हणून सगळे जगायचो आता आपण 'मी' म्हणून जगतो. हे दगड बनल्याचं लक्षण आहे.

**मी : या सगळ्यावर, वाचक वाढवण्यासाठी काय उपाय दिसतात का?**

**जोशी :** उपाय खूप आहेत पण आपण करत नाही. जेवणाचं टेबलही ग्लोबल झालं. जेवायला बसतानाही आपण एकत्र बसून सासू-सून-मुलगा-आई-बाप जेवताहेत आणि टेबलवर चर्चा होते हे चित्र दिसत नाही. संवाद संपला. मोबाईल आले. संवादातून संवेदना संपल्या. कोरडेपण आले, माणसं आहेत पण माणूसपण संपलं. बोलणं सुरू आहे पण भावना संपल्या. त्यामुळे हे सुधारायचं असेल तर अनेक ठिकाणी अनेकांनी प्रयत्न करावे लागतील. एका ठिकाणी फाटलं असेल तर ठीक हे आभाळच फाटलंय. शासन स्तरावर अनास्था आहे. साहित्य संस्थांना ५० लाख देऊन सांस्कृतिक जडणघडण होत नसते.


**मी : पण शासनाने भिलारसारख्या चांगला प्रोजेक्ट केला की?**

**जोशी :** हो पण हे लोकांनी करायला हवंय, तर लोक काम करतात वर्गणी काढून मंदिर बांधतात, मशीद बांधतात, चर्च बांधतात, ज्ञानदानाचं काम करणारी शाळा, ग्रंथालय, वाचनालय बांधायला हवं. तेव्हाही मानसिकता बदलली हे सांस्कृतिक अध:पतन संपलं तरच काही होईल करावा लागलं हे सांस्कृतिक अध:पतनच आहे. समाजाची मानसिकता किती खालावली आहे याचंच उदाहरण आहे. शासनाला लोकांनी करावयाची कामं करावी लागली तर हे शासनासाठी भूषणावह आहे पण लोकांनी आत्मपरिक्षण करावे असे आहे.

**मुलाखतकार : किरण येले**

भ्रमणध्वनी : ९८६९२६०७८०

ग्रंथाली




[redacted]

# अजूनही नव्याने शिकवणारे पुस्तक

लहान मुलासाठी विविध प्रकारच्या आवडत्या खाऊच्या ढिगातून एकाच खाऊची निवड करणे कठीण आहे, तसेच वाचनाची आवड असलेल्याला एका आवडत्या पुस्तकाची निवड करणे कठीण आहे. पण मी ज्या पुस्तकाबद्दल लिहिणार आहे ते जरा 'युनिक' आहे. हे मी खूप लहानपणी वाचलेलं, खरं तर माझ्या आयुष्यात वाचलेलं पहिलं पुस्तक आहे. फक्त मीच नव्हे, माझ्या पिढीतील प्रत्येक सुशिक्षित मराठी व्यक्तीने वाचलेले हे पुस्तक आहे, इयत्ता पहिलीचं 'बालभारती'! लहानपणीच आवडलेलं हे पुस्तक, मी मोठा झाल्यावर पुन्हा वाचलं तेव्हा, चालता (वाचता) न येणाऱ्या मुलाला चालायला (वाचायला) शिकवत, हाताला धरून सांभाळत, हळूहळू साहित्य आकलनाच्या जिन्याने वर नेणाऱ्या पुस्तकाच्या मी प्रेमातच पडलो.

यातले सुरुवातीचे धडे 'हे बघ, ते बघ. हे आण, ते आण .' असे शब्दांची आणि आज्ञा पालनाची ओळख करून देणारे आहेत. मग हळू हळू त्यात अभय, जगन, शरद, कमल, आई, बबन यांच्या जोडीला पाऊस येतो. गारा येतात. वडा, शिरा खाऊन खुशीने चिवचिवणारी चिऊताई, भाजी करणारी आज्जी , शेतात खपणारे हैबत गैबत आणि नाचणारे मोर येतात. झाडांबद्दलचा धडा 'झाडेच झाडे लावूया..फळेच फळे खाऊया.' असे म्हणत वृक्षारोपणाचा द्रष्टा संदेश (१९६५ साली बरं का!) देतो. चौकातला हौद सहकार्याची शिकवण देत कामातला आनंद लुटायला शिकवतो. मग दिवाळी येते. पाहुण्यांची गर्दी येते. पिंजऱ्यातला पोपट स्वातंत्र्याची आस धरतो. मनीमाऊ उंदराची आस धरते. या पुस्तकात विनोदही आहे, उत्कट भावनाही आहेत आणि नात्यांची ओढ सुद्धा आहे. घड्याळबाबांचा मजेशीर धडा वेळेचे महत्त्व सांगतो. रविवारी मात्र मुले घडयाळबाबांचे ऐकत नाहीत. ते रागाने टण टण टोले देत सोमवारची वाट बघतात. रविवारची वाट बघणारी मुलं, आणि सोमवारची वाट बघणारे घडयाळबाबा! आणि तो रविवारचा धडा? मुलं आईला सुट्टी देण्यासाठी घरातली कामे करतात. भाजी कच्ची, पोळी करपलेली, भाताची खीर झालेली, तरी आईबाबा कौतुकाने, आनंदाने जेवतात.

मामाच्या कवितेतला भाच्यांसाठी केळीचे घड धाडणारा, मे महिन्यात गावी बोलवणारा मामा, नकळत आपल्याला बालपणाच्या आजोळी घेऊन जातो. 'मी कोण?' हा धडा पोस्टमन, डॉक्टर, कामगार, सैनिक, शेतकरी अशा निरनिराळ्या व्यावसायिकांची माहिती देतानाच, कोणतही काम हीन नसतं. समाजाला उपयोगी पडणारे सारेच घटक सारखेच महत्त्वाचे असतात, ही शिकवण देऊन जातो.

छोट्या आणि सोप्या शब्दांत हे पुस्तक आपल्याला जगाची आणि जगण्याची ओळख करून देते. साहित्याच्या अंगणात आपले दुडके पाऊल टाकते. शुद्धलेखन, व्याकरण आणि वाचना पलीकडेही काही शिकवून जाते. काही प्रश्नांची उत्तरे देताना मनात काही प्रश्न निर्माणही करते.

पहिला प्रश्न आहे पिंजऱ्यातल्या पोपटाबद्दल.

'पोपटा पोपटा बोलतोस गोड, पण झालास रोड. खा ना जरा पेरूची फोड.' असे म्हणणाऱ्या मुलाला, दार उघड आणि मला सोड. असे उत्तर देणारा, स्वातंत्र्य मिळाले की माझा रोडपणा जाईल असे सांगणारा पोपट, आपले घरटे शोधणाऱ्या चिऊताईला आपल्या पिंजऱ्यात का बोलवतो? अर्थात चिऊताई जळो तुझा पिंजरा मेला, त्याचे नाव नको मला. असे ठणकावून उडून जाते. पण पोपट तिला फसवत होता की समदुःखी शोधत होता?

अनेक हळवे प्रश्न निर्माण करणारा आणखी एक धडाही पेरुशी संबंधीत आहे. पेरूची फोड.. या नाटिकेत एक आई आहे आणि तिची उषा, माधव आणि सुधा अशी तीन मुले आहेत. (नकळत दोन किंवा तीन पुरेत हा संदेश?) मुलांच्या हट्टामुळे आई दारावरून जाणाऱ्या पेरूवाल्याला बोलवते. तीन पेरू विकत घ्यायला सांगते. त्या पेरूंच्या चार चार फोडी करून तिन्ही मुलांना देते. माधव आणि सुधा लगेच पेरू खाऊ लागतात. पण उषा आईला विसरत नाही. आपल्यातल्या दोन फोडी ती आईला देते. ते पाहून सुधा आणि माधवही दोन दोन फोडी आईला देतात. आता आईजवळ पुष्कळ फोडी झाल्याने आई त्यातली एक एक फोड तिन्ही मुलांना परत देते. सुधा आणि माधव पेरू गोड आहे म्हणतात. पण उषा म्हणते, पेरूची फोड लागली गोड, आईची फोड तर फारच गोड.

आईची फोड फारच गोड, कारण तिच्यात आईची माया आहे. किती खोल भावार्थ भरलाय या इटूकल्या नाटूकल्यात? आपल्यासमोर चौघांचेही स्वभाव स्पष्ट होतात आणि पुढे मुले मोठी झाल्यावर काय झालं असेल? हा प्रश्न निर्माण करतात. निदान मोठेपणी माझ्या बाबतीत हे घडलं.. आणि मी त्या प्रश्नांची उत्तरं शोधली. माधव हिशोबी, जरा स्वार्थीच. लग्नानंतर वेगळाच झाला असेल. सुधा स्वार्थी नाही, पण ती लग्नानंतर तिच्या संसारात, पोराबाळांत रमली असेल. उषा मात्र आईला आणि त्या पेरुच्या फोडीला कधीच विसरू शकणार नाही. तिच्या मुलांतल्या कोणी चॉकलेट किंवा गोळीचा तुकडा दिल्यावर तिला आई आठवेल, ती फोड आठवेल. घसा दाटून येईल. संधी मिळताच ती मुलांना घेऊन आईकडे येईल. मुलं आपआपल्या घरट्यात गेल्यामुळे एकाकी उदास झालेली आई उषाला पाहून हरखेल. पुन्हा कोणी पेरूवाला

दारावरून जाईल. उषा पेरू विकत घेईल, फोडी करेल. पण तिची मुलं तर चुइंग गम, नूडल्स असा कृत्रिम खाऊ आवडणारी. पेरूचं अप्रूप आई आणि उषालाच. मग आई सर्व फोडी उषालाच देईल. उषा त्यातली एक फोड आई नको नको म्हणत असताना आईला देईल. दात नसल्याने आई ती फोड उष्टावून, फक्त चाखून उषाला परत देईल. ती उष्टी फोड खात उषा रडत, हसत आईला म्हणेल, पेरूची फोड.. लागली.. गोड... आईची फोड तर फारच गोड!

आता अभ्यासक्रम बदललाय. माझ्या मुलांच्या वेळी सुद्धा हे पुस्तक नव्हतं. आता कुठे प्रत आहे की नाही माहीत नाही. पण माझ्या मनातून हे पुस्तक कधीच जाणार नाही. बालभारती, इयत्ता पहिली. मी वाचलेलं पहिलं पुस्तक. मला आवडलेलं पहिलं पुस्तक. या पुस्तकाने मला वाचायला शिकवलं.. विचार करायला, प्रश्नांची उत्तरं शोधायला शिकवलं, आणि.. लिहायलाही शिकवलं. वाचक आणि लेखकही बनवलं.

**– सागर कुलकर्णी**

भ्रमणध्वनी : ९७६९३८३४२१

# मुखपृष्ठ पाहिलं अन तिथेच मी अडखळले

अगदी पूर्वीची लाकडाची ठकी- बाहुली, आकार-बिकार नसलेली, त्रिकोणी ठोकळ्यावर चितारलेली, दोन हात जोडलेली, मोठे डोळे, मोठं कुंकू, अगदी टिपिकल जुन्या काळातली ठकी.

पण, ओठांवर पांढऱ्या चिकटपट्टीची फुली. अन् अशा या ठकीची डावीकडे हलके हलके धूसर होत गेलेल्या तीन प्रतिमा अन उजवीकडे आर्जव, बोल माधवी! मोठ्या डोळ्यांतले ते भाव..

मनात धस्स झालं, अन् धडधडतच पान उलटलं. आत घोडेच घोडे, महत्त्वाकांक्षेचे प्रतीक, पुरुषी अहंकाराचे प्रतीक, जेत्यांचे प्रतीक. कितीतरी घोडे,घोडे अन घोडे.... अन् त्यानंतर येणाऱ्या काही ओळी.

माधवी<br>
मृत्यू, दुःख, पराभव कुणाचाही असो<br>
सर्व पराभूतांसाठी<br>
मी विचलित होईन<br>
तुझ्यासारख्या प्रत्येक आयुष्यासाठी<br>
मला पाझर फुटेल

माधवी ? कोण माधवी ?

महाभारत आपण जाणतो. कौरवांना आपण ओळखतो. ययाती आपल्याला माहिती आहे. त्याचे दोन पुत्र पुरु आणि यदु आपल्याला नवीन नाहीत. पण माधवी? नाहीच माहिती आपल्याला. माधवी ययातीची मुलगी, पुरु आणि यदूची बहीण!

महाभारतातल्या उद्योग पर्वातल्या गालवविषयक उपाख्यानात माधवीबद्दल उल्लेख सापडतो. मुळातच किती शोकात्मक कथा या माधवीची! तिच्या आयुष्याच्या परवडीची ही कहाणी अतिशय क्लेश देणारी, अतिशय अंतर्मुख करणारी, हृदय पिळवटून टाकणारी ही कथा. विश्वामित्र ऋषींचा गालव हा शिष्य. त्याचे शिक्षण पूर्ण झाल्यावर तो गुरुदक्षिणा घेण्याबद्दल आग्रह धरतो. तेव्हा विश्वामित्र त्याच्याकडे आठशे श्यामकर्णी अश्वमेधी घोड्यांची मागणी करतात. मग हे घोडे मिळवण्यासाठी गालव ययाती राजा कडे जातो. पण हे घोडे किंवा ते विकत घेण्याइतके द्रव्य ययातीकडे नसते.

पण याचकाला विन्मुख कसे पाठवायचे हा विचार करून ययाती एक अभिनव कल्पना मांडतो. ययातीच्या मुलीला, माधवीला एका वेदऋषीकडून वर मिळाला असतो, ज्यामुळे ती चक्रवर्ती पुत्रांना जन्म दिल्यावरही कुमारी होणार असते. म्हणून ययाती, आपली मुलगी माधवी, जी सर्वसंपन्न आहे तिला, गालवाला देऊ करतो, ज्यान्वये गालव इतर राजांकडे जाऊन माधवीच्या बदल्यात श्यामकर्णी घोडे मिळवू शकेल. मग गालव माधवीला घेऊन प्रथम अयोध्यापती हर्यश्वाकडे जातो. त्याला प्रलोभने दाखवून, माधवी देऊन तिचे शुल्क सांगतो. आठशे श्यामकर्णी घोडे. पण हर्यश्वाकडे फक्त दोनशेच असे घोडे असतात. मग माधवीला फक्त वर्षभारासाठी, एक पुत्र होईपर्यंत ठेवण्याचे ठरते. अन गालव परततो.

एक वर्षाने तो परत येतो आणि माधवीला घेऊन काशी नरेश दिवोदासाकडे जातो. पुन्हा त्याच्याकडेही दोनशेच असे घोडे असल्याने, पुन्हा वर्ष आणि एका पुत्राचा सौदा होतो. पुन्हा पुढच्या वर्षी भोजनगराचा राजा उशीनर! पुन्हा तेच तेच... शेवटी देशातले सर्व श्यामकर्णी घोडे संपल्यामुळे गालव माधवीला विश्वामित्रांकडे घेऊन येतो, तोच ठरलेला सोपस्कार विश्वामित्राकडेही होतो. माधवी विश्वामित्रांना एक पुत्र देते, अन् मग गालव तिला ययातीला परत करतो. आता ययाती माधवीचे स्वयंवर ठरवतो. पण स्वयंवरात कोणालाही न वरता माधवी तपोवनात निघून जाते. अन् संपूर्ण आयुष्य तपामध्ये घालवते.

आहे ना अंगावर येणारी कथा? उच्च संस्कृती, उच्च संस्कृती म्हणत आपण आपल्या गतैतिहासाला कित्ती नावाजत असतो.... ही आपली उच्च संस्कृती? असो. याबद्दल नंतर चर्चेत बोलू.

कवी चन्द्रप्रकाश देवल म्हणतात, माधवीला कसं समजून घ्यायचं, तिच्यापर्यंत कसं पोहोचायचं? स्मृती, श्रुती, महाभारत यातून खोदून खोदून काढायचं कसं? त्या काळाचे संदर्भ, निकष, सरकार, परंपरा या सर्वांपर्यंत पोहचायचं कसं? पण हे अवघड नव्हतंच! माधवी अन् महाभारत आजही समकालीनच आहेत. आजही काही समाजातले काही लोक हे त्या काळातल्याच विचार अन संस्कारांच्या स्तरावर आहेत.

पुढे एका ठिकाणी ते लिहितात, विनिमयाचे साधन बनलेल्या

माधवीचे, माणसाचे एक वस्तू होणे, अचेतन होणे हे अमानवीकरण आहे.

हे काव्य लिहिताना देवलांनी वेगवेगळ्या पातळ्यांवर विचार केलेला दिसतो. विषय, त्यासाठीचा अभ्यास, शोध, विषयाच्या खोलात जाणे, त्याचा गाभा बरोबर ओळखणे, एकूणच काव्य निर्मिती या सर्वांवर त्यांनी अतिशय जाणीवपूर्वक विचार केलेला दिसतो. एकूणच कविता आणि तिची निर्मिती याबाबतचे त्यांचे विचार मुळातूनच वाचले पाहिजेत. कवी, त्याची वाचक म्हणून रसिकता, काळाचे भान असणारा एक भाष्यकर्ता, शब्दांवर प्रेम करणारा भाषातज्ज्ञ, सहसंवेदना जाणणारी सहृदय-समंजस व्यक्ती, एक विचारवंत, एक समीक्षक, एक संगीतकार अन या सर्वांवर भरभरून कोसळणारा एक सृजन कवी! अशा वेगवेगळ्या स्तरावराचे त्यांचे विचार मला तर प्रेमात पाडून गेले.

मुळात एवढ्या गंभीर विषयावर लिहिणे, त्यातही काव्य अन ते पुन्हा विचारपूर्वक, जाणीवपूर्वक केलेले काव्य! अनेक तारांवरची ही कसरत, पण काय पेललीय सांगू!

तसेच, एका अर्थी हे शिवधनुष्य, अन् त्यातून ते मराठीत अनुवादित करायचे! हेही तितकेच किंबहुना अधिक जबाबदारी अन सृजनाचे काम! पण आसावरी काकडेंनी ते ज्या रीतीने पूर्ण केलेय... हॅट्स ऑफ टू हर!

मी मुळातून बोलो माधवी वाचलं नाही. पण 'अनुवादिकेच्या मनोगत' मध्ये आसावरी काकडेंनी अनेक उदाहरणे मूळ काव्यातली (हिंदीतील) दिलीत. ती वाचताना आणि त्यांचे अनुवाद वाचताना मला सारखीच अनुभुती आली. एका स्त्रीची वेदना समजून ती मांडण्याचे काम चन्द्रप्रकाश देवल यांनी केलय तर हिंदी सारख्या सुमधुर, गोड भाषेतून मराठी सारख्या राकट भाषेत ते काव्य आणण्याचे काम आसावरी काकडे यांनी केलंय. मला तर हा योग फार फार चकित करून गेला. या दोन्ही कविता मला एकमेकींचे प्रतिबिंबच; नाही, नाही.. त्या मला एकमेकींच्या जुळ्या बहिणीच वाटल्या.

देवल लिहितात,
न जान पाने की यातना
तेरी पीडा से बडी होने लगी हैं
और माधवी हो कर जानना
एक दुसरी जात की दिल्लगी हैं!
तर आसावरी लिहितात :
तुला न समजू शकण्याची यातना
तुझ्या दु:खापेक्षा भयंकर होत चाललीय,
आणि माधवी होऊन समजून घेणं
तर उपमर्द आहे एक प्रकारचा

देवल केवळ माधवीची व्यथा मांडत नाहीत तर त्याचे उत्तरदायित्वही ते स्वीकारतात.

माधवी तुझं काय करू आता
तुझ्याशी निगडीत, तुझ्याशी बांधलेला अपराध
आपले बाहू पसरून
हलके हलके खेचतो आहे मला...
किंवा
आज उरिन होना चाहता हूं पितृऋणसे
प्रायश्चित के कितने चातुर्मास चाहिये,
बोलो माधवी ...

वेगळा विषय मांडत असताना त्यात येणारे संदर्भ मात्र सर्वसामान्यांना माहिती असलेले द्यायचे, पण देताना त्यांचा संदर्भ मात्र एकदम बदलून टाकायचा ही देवलांची खासियत आहे. उदाहरणच द्यायचं तर 'किती काळ निद्रिस्त राहशील' या कवितेचं देता येईल. कृष्ण, कदंब आणि गौळणी यांच्याबद्दलची कथा आपल्याला माहिती आहे. 'दे रे कान्हा चोळी लुगडी' हा अगदी अध्यात्मिक पातळीवरचा संदर्भही आपल्याला नवीन नाही. पण देवल त्याचे फार वेगळे रूप आपल्या समोर उभे करतात. कधी कधी त्यांच्या चार ओळीच, पण खाड्कन आपल्याला जागं करतात.

पुस्तकाच्या शेवटी परिशिष्टात महाभारतातील गालवो-पाख्यानातले मूळ संस्कृतातले अन त्याचे भाषांतरही दिले आहे. हे संपूर्ण पुस्तक मी नाहीच वाचू शकले; एका झटक्यात. अनेकदा डोळ्यातल्या पाण्याने अडवले तर अनेकदा गळ्यातल्या आवंढ्याने थांबवले. कधी संतापाने मन भरून आले तर कधी उद्वेगाने. सर्वात आश्चर्य वाटलं ते एका पुरुषातली ही सहसंवेदना पाहून. कोण कुठली माधवी, जिच्या बापालाही कणव आली नाही तिच्यावर हा पुरुष इतके जीव तोडून लिहितोय...

माधवी
मृत्यू, दु:ख, पराभव कुणाचाही असो
सर्व पराभूतांसाठी
मी विचलित होईन
तुझ्यासारख्या प्रत्येक आयुष्यासाठी
मला पाझर फुटेल.....
परहितासाठी, परक्या आगीत
जळत असेल एखादी ी...
एखादी माधवी...
त्या प्रत्येक वेळी मी व्यथीत होईन !

आसावरीताईंनीही कमाल केलीय. कवीचा प्रत्येक बाज, प्रत्येक भावना अन प्रत्येक विचार आपल्यासमोर कसा लख्ख आणि स्पष्ट करून ठेवलाय त्यांनी. अगदी प्रत्येक स्त्री आणि पुरुषाने वाचावेच असे हे काव्य !

***

**मूळ पुस्तकाचे नाव : बोलो माधवी**
**कवी : चंद्रप्रकाश देवल, अनुवादित : बोल माधवी**
**अनुवाद : आसावरी काकडे**
**प्रकाशक : दिलीप माजगावकर राजहंस प्रकाशन, पुणे**

# Wings Of Fire

## मराठी अनुवाद :- 'अग्निपंख'

भारतरत्न डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम व समूहनिर्मित तत्कालीन शक्तिशाली क्षेपणास्त्र, ज्याचं नाव, 'अग्नी!' परकीय राष्ट्रांच्या विरोधाची क्षिती न बाळगता, सलग दोन वेळा अपयश येऊनही, प्रसारमाध्यमे, राजकीय नेतेमंडळी व संपूर्ण भारतभर होणाऱ्या टीकेच्या दबावाखाली ५०० शास्त्रज्ञांच्या धैर्यशील प्रयत्नांमुळे २२ मे १९८९ रोजी 'अग्नी' अवकाशात झेपावले! शीर्षकाची उकल करून सांगायचं झाल्यास, 'अग्निपंख' म्हणजे 'अग्नीचे उड्डाण!' डॉ. कलाम यांचं व्यक्तिगत आयुष्य, व्यवसायिक संघर्ष, जागतिक शस्त्रस्पर्धा, तत्कालीन राजकारण व तंत्रज्ञान यांचं वर्णन केलेलं, आपल्यातील आत्मशक्तीची जाणीव करून देणारं हे स्फूर्तिदायी खंडकाव्य तथा आत्मचरित्र! लहानपणी ज्यांना शास्त्रज्ञ व भारताचे राष्ट्रपती म्हणून मी पाहिलं ते डॉ. कलाम एक माणूस म्हणून कसे होते हे मी 'अग्निपंख'मधून पाहिलं. स्वयंशिस्त, चिकाटी, समयनियोजन, कार्यव्यवस्थापन, निश्चयशक्ती, धार्मिक वृत्ती व अनुभवातून शहाणं होत जाण्याची क्षमता! डॉ. कलाम यांचे हे गुण मी 'अग्निपंख'मध्ये अनुभवले.

'अग्निपंख' ही रंजक कथा नाही. सनसनाटी डायलॉगबाजी, उत्कंठावर्धक प्रसंगवर्णन असं काहीही यांत नाही; असं असूनही हे पुस्तक वाचतांना डोळ्यांखालून गेलेल्या असंख्य ओळी मला पुन्हा वाचाव्या लागत होत्या. वाचल्यानंतर त्यातील सत्यता, सहजभाव यामुळे श्वास रोखला जाऊन ऊर भरून येत होता ओळींमध्ये दडलेला गर्भितार्थ तात्काळ माझ्या लक्षात येत होता! शरीराच्या नसा-नसांमधील उष्ण रक्तसंचार स्पष्टपणे जाणवत होता! तळपायाशी एक विलक्षण ऊर्जाप्रवाह निर्मित होऊन तो विद्युतवेगाने सरसरत जाऊन धाडदिशी मेंदूला धडकल्याचा व नंतर शरीरभर पसरल्याचा साक्षात्कार मला होत होता! संपूर्ण काया अनामिक अशा सकारात्मक ऊर्जेने भरभरून एक आगळाच उत्साह अंतरंगात उत्पन्न करत होती. खरोखर, 'अग्निपंख'मधील लेखन हे इतकं सत्य, मोहक आणि मार्मिक आहे की ते वाचताना मी 'मंत्रमुग्ध' होत होतो. 'अग्निपंख'मधील या ओळी मला 'Goosebumps' देऊन गेल्या- येणाऱ्या चांगल्या वाईट दिवसांसाठी तयार रहा, त्यांना सारखेच सामोरे जा. जेव्हा ऐरण असशील तेव्हा घाव सोस अन् हातोडा होशील तेव्हा घाव घाल!

'अग्निपंख'मधून मला समजलेल्या ज्ञानरुप गोष्टी :-

वेदनांना सामोरे गेल्याशिवाय यशनिर्मिती अशक्य!

माणसानं कामाविषयी संतुष्ट पण प्रगतीविषयी असमाधानी असावं.

संवाद साधला तर विरोधालाही शरण आणणं शक्य असतं.

दुसऱ्यांना समजणारा माणूस सुशिक्षित समजला जातो. पण स्वतःला समजून घेण्यातच खरं शहाणपण आहे.

प्रयत्नांद्वारे नियती देखील बदलता येते, फक्त आपण ती बदलू शकतो असा दृढविश्वास असायला हवा.

कोणतंही काम केवळ वेळापत्रकाप्रमाणे होत आहे एवढंच न पाहता ते अधिकाधिक उत्कृष्ट कसं करता येईल याकडे आपलं लक्ष असायला हवं.

आपल्या स्वतःच्या चुकांचं मूल्यमापन कठोरपणे करावं मात्र इतरांच्या चुकांच्या बाबतीत भरपूर सहनशील असावं.

कोणाचंही कौतुक करतांना ते जाहीररीत्या करावं मात्र चुका दाखवताना खासगीपणा ठेवावा.

'मला हे जमत नाही' असं म्हणून एखाद्या कामातून अंग काढून घेणं सोपं असतं, पण या जगात स्वतःचं अस्तित्व निर्माण करू इच्छिणाऱ्या प्रयत्नशील व्यक्तीला असं बोलणं शोभा देत नाही.

आपल्या शिक्षणक्रमामध्ये लिहायला, वाचायला, बोलायला शिकवतात पण लक्षपूर्वक ऐकावं कसं हे कधी कुठेही शिकवलं जात नाही. बोलण्यापेक्षा समोरच्या व्यक्तीचं म्हणणं ऐकूनही घेता यायला हवं.

प्रार्थनेमध्ये मनाला नवनव्या कल्पनांना जन्म देणारी, सृजनशक्ती निर्माण करणारी शक्ती असते. जीवनात यशस्वी होण्याकरिता जे संचित गरजेचं आहे, ते सर्व आपल्यामध्ये पूर्वीपासूनच असतं. नवनवीन कल्पना निद्रिस्तावस्थेत आधीच आपल्या मनात असतात, प्रार्थनेमुळे त्या जाग्या होतात, मुक्त होतात. कष्टाचे खतपाणी घालून त्या कल्पना जेव्हा आपण सत्यात उतरवतो तेव्हा यशाची निर्मिती होते.

चुका सुधारण्याची, शंकांचं निरसन करण्याची आणि संकटांवर मात करण्याची आत्मविश्वासू वृत्ती आपण बाळगायला हवी. माझी कुणाला कदरच नाही, मला कोणी धार्जिनच नाही अशा शब्दांमध्ये रडगाणी गात बसू नये. माझ्या अडचणींपेक्षा मी मोठा आहे असा स्वतःशीच युक्तिवाद करत, देवावर विश्वास ठेवून न डगमगता कायम पुढे जात रहावं.

माणसानं आयुष्यात क्षणिक आनंद व ऐषआराम यांमागे न लागता काहीतरी भरीव, शाश्वत मिळवण्यासाठी अखंड कार्य करायला हवं.

जी माणसे श्रेय घेण्याच्या बाबतीत निरपेक्ष असतात, त्यांच्या हातून देव प्रचंड मोठी कामे घडवून आणतो. यश मिळवण्यासाठी ते हाताळण्यास आपण विनम्र आहोत असे आपल्याला देवाकडे सिद्ध करावे लागते.

प्रत्येक माणूस हा इतरांपेक्षा वेगळा असतो. तरीही त्या सर्वांना बांधणारा दैवी अंश प्रत्येकात असतो. संकटे आली, दुःखे भोगावी लागली तरी माणसाने धीर सोडू नये. न घाबरता त्यांना सामोरे जावे. आपल्या दुःखाला समजून घेण्याचा प्रयत्न करावा.

संकटे ही माणसाला आत्मपरीक्षण करण्याची संधी देतात.

If you deeply Observe, Each Everything is your Teacher ! या वाक्याचा प्रत्यय 'अग्निपंख' वाचतांना येईल. सूक्ष्म निरीक्षण करत वाचल्यास या पुस्तकाचं प्रत्येक पान आपल्याला काहीतरी सांगून जाईल. एक अशी गोष्ट जी आपल्या सर्वांच्या आयुष्यातून कधीच चुकत नाही प्रत्येकाला त्यातून जावंच लागतं, एक अशी अवस्था जी आपल्याला स्वतःच्या मृत्यूपेक्षाही जास्त भयावह वाटते, ती म्हणजे, आप्तस्वकीयांचा विरह! डॉ. कलाम यांच्या आयुष्यातील जवळच्या व्यक्ती सोडून जाण्याच्या दुःखद प्रसंगांचे वर्णन केलेली, ती पाच पानं (पान क्र. ८५ ते ९०) माझ्या मनाला चटका लावून गेली. अनेक अप्रिय घटनांच्या स्मृती ज्यांचे दुःख कित्येक दिवसांपासून मनी साचून होते. ही पान पानं वाचताना मी त्या दुःखाला डोळ्यांमधून बाहेर पडण्यास वाट मोकळी करून दिली. त्या पाच पानांनी माझे डोळे स्वच्छ करून मनात जमलेला अनावश्यक कचरा, पालापाचोळा साफ करत ते पुन्हा नव्याने निर्मळ केलं. जेवढं संपूर्ण पुस्तकानं सांगितलं तेवढंच या ५ पानांनी मला सांगितलं त्या ५ पानांविषयी सांगणं मला जास्त गरजेचं वाटतं, कारण मी 'अग्निपंख' वाचण्याचा नव्हे, तर जगण्याचा अनुभव लिहीत आहे! या पुस्तकाचं नाव 'अग्निपंख' हेच का असावं? याचा मी खूप विचार केला. शेवटी या प्रश्नाचं उत्तर डॉ. कलाम यांच्याच शब्दांमध्ये मिळालं :- स्वतःला कधीही लहान अथवा निराधार समजू नका. आपण सगळे दैवी शक्तीच्या अग्निबिंदूचा अंश स्वतःमध्ये घेऊनच जन्माला येतो. त्या अग्नीला पंख लाभावेत यासाठी आपण आयुष्यभर प्रयत्न करत रहावे अन् त्या प्रकाशाने हे जग मांगल्याने भरून जावे.

देवाचे आशीर्वाद सदैव तुम्हावर बरसत राहो.

**– प्रणव उन्हाळे**

भ्रमणध्वनी : ९१५८९६०१००

ग्रंथाली

[redacted]







[redacted]



ग्वादेर बंदर

# चीनचा साम्राज्यवाद : नवीन रेशिम रोड

**डॉ. अनंत पां. लाभसेटवार**

**मू**ळचा जवळजवळ ७००० मैल लांबीचा रेशिम रोड रोमन साम्राज्यकाळी बांधण्यात आला होता. त्याचा एक फाटा भारतातदेखील आला. उंटावरून चीनच्या रेशिमाची निर्यात इतर देशांना करणं शक्य झालं. मग सागरी मार्ग उघडले. ते तुलनेनं स्वस्त असल्यामुळे हा आंतरराष्ट्रीय भूमार्ग शेकडो वर्ष अडगळीत पडला आणि उंट बेकार झाले. मग २०१३ मध्ये क्सी जिनपिंग सत्तेवर आले आणि त्यांनी चीनचं व्यापारी वर्चस्व पुर्नप्रस्थापित करण्यासाठी या जळमटं व कोळिष्टकं लागलेल्या दळणवळण मार्गाचं पुनरुज्जीवन करण्याचं ठरवलं. त्यासाठी त्यांनी ९०० अब्ज डॉलर्सची तरतूद देखील केली. याशिवाय त्या देशानं रेशिम रोडची व्याख्या विस्तारित केली. आता चीनच्या पूर्व किनाऱ्यावरून माल जलमार्गानं मायनार, श्रीलंका, पूर्व आफ्रिका, मध्यपूर्व तेलसमृद्ध देश, पूर्व युरोप आदी देशांना पाठवण्यात येतो. त्यात रशियाचा देखील समावेश झाला. या रस्त्यांच्या जाळ्याला OBOR (One Belt One Road) असं अकाव्यमय नाव देण्यात आलं. यात बेल्टचा भूपृष्ठमार्ग व रोडचा जलमार्ग असा अर्थ करून चीननं इंग्रजी आपली मातृभाषा नाही असं जगाला दाखवून दिलं.

गेल्या ५ वर्षात एकूण ७४ पेक्षा जास्त देश जोडण्यात येऊन त्यामधील व्यापाराला पुष्टी मिळाली. पण चीनला त्याचा जास्त फायदा झाला. त्या देशाचा पश्चिम भाग पूर्व भागापेक्षा मागास समजण्यात येतो. पण या रेशिम रोडमुळे त्या भागाचं झपाट्यानं औद्योगिकीकरण होत आहे. या योजनेचे जगाच्या ६५ टक्के लोकसंख्येवर व जवळजवळ ३३ टक्के जागतिक ढोबळ उत्पन्नावर सकारात्मक परिणाम झाले असं काही तज्ज्ञ म्हणतात. तरीही दोन मुख्य देशांनी याला कडाडून विरोध केला. एक म्हणजे आपले पंतप्रधान नरेंद्र मोदी व दुसरे म्हणजे अमेरिकन सरकार. हा रेशिम रोड पाकिस्तानव्याप्त काश्मिरमधून जात असल्यामुळे तो भारताच्या पचनी पडणं शक्यच नव्हतं. आपलं प्रभुत्व जगभर पसरवून अमेरिकेला डावलणं हा यामागचा खरा हेतू म्हणून त्या महासत्ताक राष्ट्रानं रोष दर्शवला. गेल्या ५ वर्षात ज्या घडामोडी झाल्या त्यावरून अमेरिकेचं म्हणणं खरं निघालं हेच म्हरावं लागेल. जागतिकीकरणाच्या नावाखाली जगाचं शोषण करून चीन श्रीमंत झाला हे विवाद्य. त्यासाठी अमेरिकेनं भारी किंमत भरली. दरवर्षी जवळजवळ ३७५ अब्ज डॉलर्सचा त्रुटीचा व्यापार केल्यामुळे अमेरिकेतले हजारो कारखाने बंद पडले व दशलक्षावधी मजूर निष्कासित झाले. म्हणून ट्रंपने हा व्यापार समतोल करण्यासाठी चीनच्या निर्यातीवर जबरदस्त आयात शुल्क आकारून व्यापारयुद्धाचा धुरळा उडवला. जागतिकीकरणाचा फायदा भारताला देखील तेवढा झाला नाही. एकट्या चीनशी ५१ अब्ज व जगाशी १५० अब्ज डॉलर्सचा त्रुटीचा व्यापार आपण दरवर्षी करतो. त्यामुळे देशांतर्गत उद्योगांवर गदा पडून रोजगारनिर्मिती जवळजवळ बंदच झाली. आपल्या अर्थकारणाचा नेत्रदिपक ७.५ टक्के वाढदर वांझोटा आहे असंच म्हणावं लागेल. या वस्तुस्थितीमुळे ट्रंपनी जागतिकीकरणाला ठोकर मारली तर चीननं त्याला कवटाळलं. या विस्तारित रेशिम रोडमुळे महासत्ताक होऊन अमेरिकेला मागे टाकण्याच्या त्याच्या स्वप्नांना पंख फुटले.

या रेशिम रोडच्या बांधणीमुळे चीनला अनेक फायदे झाले. त्यासाठी चिनी कंपन्या व चिनी मजूर वापरणं बंधनकारक आहे.

नाहीतर तो देश कर्जच देत नाही. स्थानिक लोकांना या योजनेतून फार कमी नोकऱ्या मिळतात. त्यामुळे चीनच्या बेरोजगारीचा प्रश्न मिटला. पण त्याहीपेक्षा महत्त्वाचं म्हणजे चीनमधल्या कारखान्यात निर्माण झालेलं सिमेंट, पोलाद, तांबं वगैरे वापरण्यात येत असल्यामुळे हे उद्योग तग धरू शकले. चीन गरजेपेक्षा ही संसाधनं जास्त प्रमाणात निर्माण करीत असल्यामुळे व इतर देशांनी त्यावर आयात शुल्क आकारल्याम ुळे चीनचे कारखाने मरणप्राय झाले होते. या सिल्क रोडमुळे त्यांच्या उत्पादनांना आयती बाजारपेठ मिळाली आणि बेरोजगारीची गदा दूर झाली. चीनची ही वसाहती वागणूक जरी क्षम्य मानली तरी त्यानंतर त्या देशानं ग्राहक राष्ट्रांना जी वागणूक दिली ती बघून साम्राज्यवादाची आठवण होते. असं म्हणतात की देशांना जिंकण्याचे दोन मार्ग आहेत. एक म्हणजे युद्धात पराभूत करून त्यांच्यावर सत्ता गाजवणे. दुसरा म्हणजे त्यांना अफाट कर्ज देऊन शरण जाण्यास भाग पाडणे. चीनने दुसरा मार्ग पत्करून नवीन साम्राज्यवाद सुरू केला हे अलीकडच्या अनेक उदाहरणांवरून सिद्ध झालं.

आपल्या शेजारील मुस्लीम देशाची अवस्था बघा. दुतोंडी, अविश्वासार्ह व दहशतवाद्यांना आश्रय देणारा देश म्हणून अमेरिकन पाकिस्तानच्या परदेशी मदतीत लक्षणीय कपात केली. तो मुस्लीम देश लगेच चीनच्या काखेत जाऊन बसला. दोन देशांतील संबंधांचं वर्णन करण्यास विशेषणं कमी व अकार्यक्षम ठरली. पाकिस्ताननं नवीन मित्राचं वर्णन कुठल्याही परिस्थितीत आपला खरा मित्र (Friend of all seasons) असं केलं. प्रशंसेच्या बाबतीत तो लाल देश मागे राहिला नाही. दोन देशातल्या अद्वैताचं वर्णन 'दात आणि ओठ' असं करण्यात आलं. आपल्या नवीन मित्राला खूश करण्यासाठी चीननं चायना-पाकिस्तान इकॉनॉमिक कोरायडर (China Pakistan Economic Corridor) योजना आखली व त्यासाठी पाकिस्तानला ४६ अब्ज डॉलर्सचं कर्ज दिलं. चीननं स्वत:चं मजूर व स्वत:च्या कंपन्या वापरून अनेक पायाभूत सुविधा बांधण्यास सुरुवात केली. चिनी कामगार पाकिस्तानी लोकांत कधीच मिसळले नाही. सौहार्दाऐवजी दोघांत साम्राज्य व वसाहती संबंध निर्माण झाले. बलुचिस्तानमध्ये चिनी कामगारांचा खून केल्यामुळे पाकिस्तानी सेनेनं परकीयांना संरक्षण पुरवलं.

या योजनेतील दोन मुख्य घटक म्हणजे चीनच्या पश्चिम सरहद्दीवरून निघून पाकिस्तानव्याप्त काश्मिरमध्ये शिरणारा व तिथून दक्षिणेला कराची व ग्वाडेर बंदर या ठिकाणांना जोडणारा बहुपदरी महामार्ग. त्याबरोबर स्वहितासाठी वायू व तेलवाहिन्याही बांधल्या. त्यामुळे मध्यपूर्व तेलसमृद्ध देशातलं तेल व वायू ग्वाडेर बंदरात आणून ते उत्तरेला चीनच्या पश्चिम भागाचं औद्योगिकीकरण करण्यास पोहचवणं शक्य झालं. पण ग्वाडेर बंदर विकसित करण्यात चीनचा अंतस्त हेतू होता ते आता सिद्ध झालं. चीनला आपल्या योजनेचा एवढा अभिमान की त्या देशानं ''काही देश भिंत उभारतात तर आम्ही मैत्रीचे पूल बांधतो'' असा शालजोडीतून ट्रम्पला टोला मारला.

मग अलीकडे बांधकाम एकदम ठप्प झालं. चीननं पाकिस्तानला दिलेल्या कर्जातून चिनी मजुरांना पगार मिळेनासा झाला. इतर देयकंही वाढली. या भ्रष्टाचारामुळे चीननं अतिरिक्त कर्ज देणं बंद केलं. जर दिलंच तर ते लष्करी अधिकाऱ्यांमार्फत दिल्या जाईल अशी घोषणा केली. शासनावर दाखवलेल्या या अविश्वासामुळे दोन देशात द्वैत निर्माण झालं. तेव्हाच चीननं ४ अब्ज डॉलर्सच्या कर्जाची व व्याजाची परतफेड करा म्हणून मागणी केली. वाटाघाटी झाल्या तेव्हा नबाब शरीफ सत्तेवर होते. पनामा पेपर्समुळे त्यांना कारावासात कोंडून त्यांच्या जागेवर एकेकाळचे क्रिकेटपटू इमरान खान निवडून आले. रिकामी तिजोरी व भरपूर देयकं बघून फलंदाजी केल्यावर धावा मिळवण्यासाठी ज्या वेगानं ते धाव घेत त्यापेक्षा जास्त गतीनं त्यांनी आंतरराष्ट्रीय नाणेनिधी (IMF) कडे धाव घेतली व १८ अब्जापेक्षा जास्त डॉलर्सची मागणी केली. या विहिरीकडे जाण्याची पाकिस्तानची ५ वर्षातील दुसरी खेप. IMF वर अमेरिकेचं प्रभुत्व. चीनचं स्थगित कर्ज फेडण्यासाठी ही आंतरराष्ट्रीय वित्तसंस्था कर्ज देणार नाही अशी घोषणा परराष्ट्र सचिव माईक पॉंपिओंनी केली. त्यामुळे पाकिस्तानचा चेहरा बघण्यासारखा झाला. पण चीन खूश झाला. कर्ज डोईजड होणार हे त्या देशाला अगोदरच माहीत होतं म्हणून ते हलकं करण्यास चीननं अंतिम फळाची मागणी केली. ग्वाडेर हे व्युहात्मक ठिकाणी असलेलं बंदर आमच्या स्वाधीन करा ही त्या लाल देशाची मागणी पूर्ण करणं पाकिस्तानला भाग पडलं. कर्जाच्या डोंगराखाली चेंगरून लक्ष्य देशाला वश करण्याचा नवीन साम्राज्यवाद चीननं सुरू केला. पाकिस्तानची आर्थिक स्थिती अगोदरच नाजूक. परदेशी चलनाची गंगाजळी फक्त १० अब्ज डॉलर्सची म्हणजे अवघी दोन आठवड्यांची आयात करण्याएवढी. अशा वेळी तो देश चीनसमोर कसा उभा राहील?

या साम्राज्यवादी धोरणात कापलेला दुसरा बकरा म्हणजे श्रीलंका. त्या बेटरूपी देशानं विकासासाठी प्रथम भारताला कर्ज मागितलं कारण तो देश आपल्या प्रभाव वर्तुळात असे. पण ऋणको दुर्बल असल्यामुळे इंडियानं ते नाकारलं. तत्कालीन अध्यक्ष-महिंद्र राजपक्ष, चीनकडे वळले. तो देश चेकबूक हातात घेऊन तयारच होता. त्यानं हॅमबॅनटोटा (Hambantota) बंदर दक्षिण भागात बांधून ते महामार्गानं इतर शहरांना जोडलं. चीननं त्यासाठी चिनी मजूर वापरलं आणि भरपूर कर्ज दिलं. पण ते बंदर व्यावहारिक दृष्ट्या अपयशी ठरलं. आज त्या रस्त्यावर वाहनांपेक्षा हत्तींची गर्दी जास्त. महत्त्वाचं म्हणजे तिथे फारशा बोटी थांबत नाही. त्या उत्तरेला असलेल्या कोलंबो बंदराचा उपयोग करतात. त्यामुळे ते तोट्यात जात असलं तरी कर्जावरचं व्याज सुरूच. मग चीननं अतिरिक्त कर्ज देऊन नवीन विमानतळ बांधला. त्याला 'जगातला सर्वाधिक रिकामा हवाईअड्डा' असा किताब मिळाला. कर्जाचा बोजा एवढा वाढला की हप्ते व व्याज भरण्यासाठी राष्ट्रीय ढोबळ उत्पन्नाचा ९० टक्के हिस्सा वापरणं आवश्यक होतं. ते कसं शक्य आहे? २०१५च्या निवडणुकीत राजपक्ष त्यामुळे हरले आणि नवीन अध्यक्ष जागेवर आले. चीननं पुन्हा डोईजड कर्ज हलकं करण्यासाठी ते नवीन बंदर व त्या भोवतालचे १५,००० एकर जमीन जुलै २०१७ मध्ये ताब्यात घेतली. चीन या समुद्रामार्गे ८० टक्के तेल आयात

करीत असल्यामुळे त्या देशाला हे ठिकाण फार महत्त्वाचं आहे. तिथे लष्करी छावणी उभारू नये असं करारात लिहिलं आहे. पण चीननं त्या अटीचं उल्लंघन केलं. तिथे चिनी पाणबुड्या नेहमी येतात. पैशाच्या लालसेमुळे श्रीलंकेला घरातला दागिना तर विकावा लागलाच. पण त्यामुळे भारताला डोकेदुखी झाली. चीन तिथून भारतावर हेरगिरी करू शकेल.

OBOR या महायोजनेचे पंख बे ऑफ बेंगालमधून मायनार या देशांपर्यंत पसरले. चीनचा डोळा क्याउकप्यू (Kyaupya) नावाच्या बंदरावर बसला. तिथून दक्षिणपूर्व चीनला जोडणारी तेलवाहिनी बांधली तर त्या भागाची भरभराट होईल असा त्या देशानं हिशेब केला. हे क्याउकप्यू (Kyaupya) मायनारच्या पश्चिम किनाऱ्यावरील गाव म्हणजे एक मास्यांच्या व्यापाराचं ठिकाण. पण २०१५ मध्ये चीननं तिथे ७.७ अब्ज डॉलर्सचं कर्ज देऊन आधुनिक बंदर बांधल्याचा प्रस्ताव मांडला पण श्रीलंकेची दयनीय स्थिती बघून इथले लोक असोईस्कर प्रश्न विचारू लागले. या विकसित बंदराचा मायनरला फायदा होईल की चीनला? कर्जफेड केली नाही तर ते बंदर चीनच्या हाती पडेल याची त्या देशाला भीती वाटली. म्हणून ते कमी खर्चात क्याउकप्यू बांधण्याचा प्रयत्न करीत आहे. मायनारनं चीनचा नवीन साम्राज्यवाद ओळखला व तो देश शहाणा झाला.

मोठं धरण बांधून जलविद्युत निर्माण करण्याचा प्रकल्प रोखला कारण फक्त ३७ टक्के घरांत वीजसज्ज होत असल्यामुळे या योजनेपासून देशाला फारसा फायदा होणार नव्हता. पण त्यासाठी काढलेलं कर्ज मात्र वाढतच राहील. म्हणून मायनार सरकार ती योजना ठप्प करून चीनच्या औदार्याला राम राम ठोकण्याच्या विचारात आहे. असं केलं तर देशाला ८०० दशलक्ष डॉलर्सचा भुर्दंड सोसावा लागेल. पण पैशापुढे देशाचं सार्वभौमत्व महत्त्वाचं हे त्या देशाच्या लंडनशिक्षित आँग सान की (Aung San Kyi) मुख्यांना चांगलं ठाऊक.

हॉर्न ऑफ आफ्रिका म्हणून ओळखल्या जाणाऱ्या भागात रेड सीच्या (Red Sea) तोंडाशी जिबुटी (Djibouty) नावाचा एक चिमुकला देश आहे. त्याचं आपल्या देशाला एवढंच महत्त्व की केंद्रिय लोकसेवा आयोगाच्या परिक्षेस बसलेल्या विद्यार्थ्यांना या देशावर प्रश्न विचारून त्यांच्या भौगोलिक ज्ञानाची परीक्षा करणे. पण चीननं या देशाच्या व्युहात्मक ठिकाणाचं महत्त्व ओळखलं, कारण तिथे आशिया, आफ्रिका व युरोपचे जलमार्ग एकत्र येतात. म्हणून या नव्यानेच फ्रान्सपासून स्वातंत्र्य मिळालेल्या १० लाख लोकवस्तीच्या देशात छावणी स्थापन केली तर चीन आपली लष्करी शक्ती प्रक्षेपित करू शकतो. म्हणूनच अमेरिकेनं या भागात तसं केलं. चीनलाही तसं करावंसं वाटलं. पण छावणीसाठी जागा विकत घेतो म्हटलं तर तो देश थोबाडीत मारून हाकलून देण्याची शक्यता. म्हणून चीननं साम्राज्यवादाचं शस्त्र वापरून आपला हेतू साध्य केला. त्यानं जिबुटीला कर्जाच्या पिंजऱ्यात अडकवलं. OBOR च्या नावाखाली तिथलं बंदर सुधारण्यासाठी व रस्ते बांधण्यासाठी त्या चिमुकल्या देशाला प्रचंड कर्ज दिलं. त्या देशाचं राष्ट्रीय ढोबळ उत्पन्न ४ अबज डॉलर्स. तेवढंच कर्ज त्या देशाच्या उरावर लादलं. राष्ट्रीय उत्पन्नाचा ८० टक्के भाग मुद्दल व व्याज फेडण्यासाठी जातो. त्यामुळे पूर्वी श्रीलंका, पाकिस्तानची झाली तशी जिबुटीची स्थिती झाली. चीननं ते महत्त्वाचं बंदर ताब्यात घेऊन २०१८ मध्ये तिथे लष्करी तळ उघडला व आपला हेतू साध्य केला.

चीनचा हा डाव इतर देशांनी ओळखला. त्यांना त्या औदार्याचं अजीर्ण झालं. म्यानमारनं योजनेचा विस्तार कमी करून तो २ अब्ज डॉलर्सच्या आसपास आणला व कर्जबाजारी होण्याचं टाळलं. त्यामुळे चीन नाखुश झाला. नाही तर कर्जवाटप न झाल्यामुळे नाखुश झालेला सावकार जगात शोधूनही सापडणार नाही. मलेशियाला आपल्या सापळ्यात अडकवण्याचे प्रयत्नही फसले. तो साम्यवादी देश मुस्लीम देशाला २२ अब्ज डॉलर्स उसने देऊन रस्ते बांधणार होता. त्या देशानं तशा करारावर सह्या देखील केल्या. पण नवीन प्रधानमंत्री महाथिर मोहम्मद यांनी ती योजना बासनात गुंडाळून ठेवली. या कर्जाचा धोका त्यांनी ओळखला. आता प्रकल्पावर पाणी सोडल्यामुळे मलेशियाला दंड भरावा लागेल. पण देशाच्या सार्वभौमत्वापुढे तो मामुली आहे. थायलंडचेही वेळेवरच डोळे उघडले. या प्रकल्पात सर्व चिनी माल व चिनी मजूर वापरला जात असल्यामुळे त्याचा स्थानिक मजूरनिर्मितीत फारशी भर पडत नाही हे थायलंडनं केव्हाच ओळखलं. म्हणून त्या देशानं एक रोड व एक बेल्टमधून अंग काढून घेतलं. कर्जाचं गाजर नाकारल्यामुळे चीनचं नाक कापलं गेलं.

भारताच्या पश्चिम दक्षिणेला १३०० मैल दूर इंडियन समुद्रात असलेला ३०० लहान-लहान बेटांचा समूह आपल्याला मालदीव म्हणून चांगल्या ओळखीचा आहे. या मुस्लीम देशाच्या चलनाचं नाव रूफिय्या. पण त्या देशाचं व्युहात्मक ठिकाण त्यापेक्षा महत्त्वाचं आहे. हे ओळखून चीननं या देशाचे अध्यक्ष अब्दुल्ला यामीनला लाच देऊन कर्ज घेण्यास उद्युक्त केलं. यामागचा उद्देश कर्ज डोईजड करून तिथला भुखंड काबीज करणं व तिथे लष्करी छावणी उभारणं हे त्या देशाच्या लोकांनी ओळखलं व सप्टेंबर २०१८ मध्ये झालेल्या निवडणुकीत यामीनचा पराभव करून या योजनेला विरोध करणारे नवीन इब्राहिम मोहम्मद सोले यांना निवडून आणलं. याप्रमाणे विस्तारीत रेशिम रोडला मालदीवनं चाप लावला. आता पाकिस्तान देखील जागा झाला. दोन दात व ओठ एवढे जवळ असलेले देश दूर झाले. कारण नवीन पंतप्रधानांनी चीनचा डाव ओळखून अनेक योजनांना कात्री लावली.

चीनची राजनैतिकता आता जगानं ओळखली. भारतावर कर्जाची मोहिनी घालून आपल्या देशाला वश करण्याचे प्रयत्न सध्या चीन करीत आहे. भारतात शररेल्वे (Bullett Train) बांधून तो आणल्यास कृतज्ञ करण्यास तयार आहे. त्या मागचा अंतस्त हेतू आपण कधी विसरू नये म्हणजे झालं.

**– अनंत पां. लाभसेटवार,** Ph.D.
anantlabh@gmail.com
(लेखक 'फर्स्ट नॅशनल बँक आणि ट्रस्ट कंपनी', कॅन्सास अमेरिका या वित्तसंस्थेचे १४ वर्षं 'चेअरमन ऑफ दी बोर्ड' होते.)

# पुण्यातील 'घातसूत्र'च्या प्रकाशन कार्यक्रमानिमित्ताने...

२६ जानेवारी रोजी संध्याकाळी पावणेसहालाच पुणे हॉलवर पोचलो. आमच्या मित्राच्या पुस्तकाचं प्रकाशन होतं. पुस्तक- 'घातसूत्र', प्रकाशक-ग्रंथाली आणि लेखक-दीपक करंजीकर! दीपक दारातच भेटला. याच पुस्तकाच्या प्रकाशनाचा, मुंबईत झालेला कार्यक्रम खूपच रंगल्याचं कळलं. मला आणखी एका ठिकाणी जायचं असल्यानं पुस्तक ताब्यात घेऊन त्यावर दीपकची स्वाक्षरी घेतली. पुस्तकाचा आकार दांडगोबा, पृष्ठसंख्या ८६०, मी जरा दबकूनच गेलो!

'घातसूत्र' ही कादंबरी नाही. इतिहास नाही. अर्थशास्त्रीय-राजकीय ग्रंथ नाही. निबंध नाही. प्रबंध नाही. आंतरराष्ट्रीय घडामोडींचे संकलन नाही. तत्वज्ञान नाही. अध्यात्मिक प्रवचन नाही वा क्लिष्ट चिंतनाचे तथाकथित निरुपण नाही. पुस्तकाच्या मलपृष्ठावर कुमार केतकरांच्या शब्दात अशी ग्वाही दिलेली. साराच प्रकार उत्कंठावर्धक!

कार्यक्रमाची सुरुवातच पुस्तकातल्या काही भागांच्या अभिवाचनानं झाली. प्रदीप वैद्य, अभिराम भडकमकर आणि धनंजय गांगल यांनी तीन उतारे वाचले. पहिला उतारा आपल्याला घेऊन जातो १८१५ सालात. वॉटर्लू येथे नेपोलियन आणि ड्युक ऑफ वेलिंग्टन समोरासमोर ठाकलेले. या पार्श्वभूमीवर आपली ओळख होते, नाथन रॉथशिल्ड्सच्या आर्थिक षडयंत्राची. दुसरा उतारा भीतीनं गोठवून टाकणाऱ्या टायटॅनिकच्या जलसमाधीचा. साल १९१२. फेडरल बँकेला अमेरिकेत विरोध करणारे तीन धनाढ्य टायटॅनिकसोबत जलसमाधी घेतात. १९१३ अफेडरल बँकेची स्थापना झाली. अपघात की षडयंत्र? तिसरा उतारा साल १९४० हिटलर आणि IBM यांचे संबंध, उघडउघड षडयंत्र. 'दिसतं तसं नसतं' या उक्तीवर माझा गाढ विश्वास! कार्यक्रमाच्या सुरुवातीलाच 'घातसूत्रा'नं माझ्या उत्कंठेला झपाटून टाकलं!

यानंतर दीपक त्याचं मनोगत व्यक्त करण्यासाठी उभा राहिला. मला तो एक अभिनेता, लेखक म्हणून ओळखीचा, पण त्याची व्यावसायिक कारकीर्द मोठी उल्लेखनीय आहे. व्यवस्थापन, समाजशास्त्र, अर्थशास्त्र यातील तज्ज्ञ, ३० वर्षं भारत आणि परदेशात वास्तव्य, ५० देश फिरलेला, अशीही त्याची ओळख. २६/११ रोजी न्यूयॉर्कमधे तो त्याच्या ऑफिसात होता. ट्विन टॉवर्स कोसळत होते. एका सुन्न अवस्थेत हा त्याच्या अमेरिकन सहकाऱ्याबरोबर खाली उतरून रस्त्यावर आला. प्रचंड भूकंपानंतरची अवस्था. एका भयानक अतिरेकी हल्ल्याच्या जागतिक ग्रहणाची वेळ. ग्रहणाच्या वेळेस इतर पक्ष्यांबरोबर कावळेसुद्धा शांत होतात, तशी भीषण शांतता. सबवेमधील सँडविच घेऊन निघता निघता अमेरिकन सहकारी म्हणाला, 'तू एक काम कर, शेयर बाजार सुरू होईपर्यंत डिझास्टर रिकव्हरी कंपन्यांचे जास्तीत जास्त शेयर विकत घेऊन ठेव!' ट्विन टॉवरचा धुरळा अजून बसला नव्हता आणि अमेरिकन मेंदू त्यातून होणाऱ्या आर्थिक नफ्याच्या मागे लागला होता! इथून दीपकच्या 'घातसूत्रा'च्या शोधप्रवासाची सुरुवात झाली.

कुठेही सखोल संशोधन, व्यासंग, पुरावे असा आव न आणता केलेलं आणि मांडलेला हा शोधप्रवास. त्याने पाचशेच्यावर पुस्तकांचा धांडोळा घेतला आहे. १९१२ ते २०१६, टायटॅनिक ते डोनाल्ड ट्रंप असा हा कालखंड. एकीकडे असंबध्द वाटणाऱ्या, जगाला कलाटणी देणाऱ्या घटना आणि खोलात जाऊन शोध घ्यायला लागल्यावर जाणवणारं भयप्रद षडयंत्र! सामान्य माणसाचं अस्तित्व कमॉडिटी झालंय आणि यामागे एक भयानक 'घातसूत्र' आहे हे लक्षात आल्यावर, त्याचा शोध घेणारा, खरोखर घाबरलेला दीपक जाणवत होता. त्याच्या काहीशा खरखरीत आवाजात प्रामाणिकपणा होता. या आंतरराष्ट्रीय कारस्थानात आपला बळी जाणारच तर तो अज्ञानात न जाता उघड्या डोळ्यांनी, एक साहस मनात घेऊन प्रश्न विचारात या कारस्थानाला, 'घातसूत्रा'ला सामोरं का नाही जायचं? - असा आर्तपणे प्रश्न विचारणारं, त्याचं आक्रंदणारं मन जाणवत होतं. त्यात शहाणपण शिकवण्याचा किंवा स्वतःचा मोठेपणा मिरवण्याचा आव नव्हता आणि ते कुठेतरी मनाला भिडलं! धुळ्याच्या ह्या बहाद्दराला, ह्या शोधप्रवासाच्या धुळीत उमटलेल्या त्याच्या पाऊलखुणा पुसल्या गेल्या तरी फिकिर नाही. पण त्यामुळे कुठेतरी या प्रवासाची चालना इतरांना मिळावी अशी तळमळ जाणवत होती.

ॲमेझॉनच्या निबिड अरण्यात एखाद्या महाकाय वृक्षाच्या पायथ्याशी उभं असावं आणि अचानक क्ष-किरण दृष्टी प्राप्त झाल्याप्रमाणे जमिनीच्या पोटातील मुळांची अगम्य गुंतागुंत पुसटपणे दिसू लागावी, त्याप्रमाणे माझं झालं होतं. गाडी घराकडे निघाली होती. एकीकडे कुतूहल, उत्कंठा, 'घातसूत्रा'चा शोधप्रवास मला स्वस्थ बसू देत नव्हता तर दुसरीकडे ८६० पानं वाकुल्या दाखवत होती. दीपक मित्रा, अभिनंदन आणि शुभेच्छा!

**- वसंत वसंत लिमये**

# घडलेल्या घटनांचा अन्वयार्थ लावणे हे तुमच्या हातात आहे - कुमार केतकर

दीपक करंजीकर यांचे प्रचंड मोठा आंतरराष्ट्रीय उलथापालथींचा आवाका उलगडरारे 'घातसूत्र' हे पुस्तक मुंबईत २५ जानेवारी २०१९ रोजी पु.ल. अकादमीत प्रकाशित झाले. 'ग्रंथाली'च्या सुदेश हिंगलासपूरकरांनी या कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले आणि प्रकाशक म्हणून या पुस्तकाच्या मागे उभे राहण्याची ग्रंथालीची भूमिका स्पष्ट केली. मान्यवरांच्या उपस्थितीत 'घातसूत्र'चे कादंबरीकार रंगनाथ पठारे व संपादक कुमार केतकरांच्या हस्ते प्रकाशन करण्यात आले. सुदेश हिंगलासपूरकर, सई हिंगलासपूरकर आणि अभिनेत्री-कलावंत विद्या करंजीकर यांच्या हस्ते व्यासपीठावर उपस्थित मान्यवरांना स्नेहभेटी देण्यात आल्या.

त्यानंतर ज्येष्ठ अभिनेते-कलावंत मोहन जोशी, प्रशासकीय अधिकारी भूषण गगराणी, चित्रकार रघुवीर कुल, लेखक-नाटककार अभिराम भडकमकर, अर्थशास्त्र-समाजशास्त्राचे अभ्यासक धनंजय गांगल यांनी 'घातसूत्र'मधील निवडक भागांचे प्रभावी अभिवाचन केले.

याप्रसंगी अत्यंत मोकळेपणाने पुस्तकाचे लेखक दीपक करंजीकर यांनी लेखक म्हणून आपले मनोगत व्यक्त केले. ९-११च्या हल्ल्याच्या वेळचा प्रत्यक्ष अनुभव साकारत करंजीकर यांनी या पुस्तकाच्या जन्माचा प्रवास उभा केला.

जस्टिस आणि कवयित्री मृदुला भाटकर यांनी दीपक करंजीकर जोडल्या गेलेल्या ऋणानुबंधाचा संदर्भ देत लेखक म्हणून त्यांच्या परिश्रमांचे मनापासून कौतुक केले.

याप्रसंगी आपले मनोगत व्यक्त करताना रंगनाथ पठारे म्हणाले की पूर्वी आपल्याकडे मोठे ग्रंथ झाले आहेत पण आताशा आपल्याला मोठे ग्रंथ वाचण्याची किंवा लिहिण्याची सवय राहिलेली नाही. प्रत्यक्ष घटनांचे धागेदोरे घेऊन एक मेजर ऑर्ग्युमेंट करणे ही काही सोपी गोष्ट नाही आणि दीपक करंजीकर यांनी ती केली आहे.

हे नुसतं संशोधनात्मक, ललित असं लेखन नाही तर क्लिष्ट विषयावरचं सहज भाषाशैलीत लिहिलेलं, आपल्याला अभिमान वाटावा असं पुस्तक आहे.

करंजीकर यांनी एका बाजूला भयावह असं चित्र निर्माण केलं आहे. जगभर मानवी समुहातले व्यवहार कसे चालले आहेत. काय आहे ही राक्षसी महत्त्वाकांक्षा? आपण ओळख नसलेली प्यादी आहोत, ही जाणीव होणं आपल्या दृष्टीने महत्त्वाचे आहे. आपण काय काय खावं, काय प्यावं, कसं राहावं, विचार कसा करावा हे ठरवणारी एक जगड्व्याळ यंत्रणा जगभर उभी राहिली आहे.

आपण कुठून कुठे आलो आहोत याविषयीची जागरूकता आणण्याचे काम हे पुस्तक करते आहे. झपाटून जाऊन अशा प्रकारचे या विषयावरचे काम दुसऱ्या भाषेनं झाले असेल असे वाटत नाही.

ज्येष्ठ संपादक कुमार केतकर यांच्या भाषणाने या कार्यक्रमाचा समारोप झाला. मिस्किल शैलीत आपल्या भाषणाला सुरुवात करत



संपादक-पत्रकार कुमार केतकर यांचा सत्कार



जस्टिस मृदुला भाटकर आणि सई हिंगलासपूरकर



मैत्रीचा बंध जपणारे रंगनाथ पठारे




दीपक करंजीकर आणि सुदेश हिंगलासपूरकर

केतकर यांनी या पुस्तकाची बलस्थाने उगलडून दाखवली. ते म्हणाले, ''दीपक करंजीकरांना या पुस्तकाची नेपथ्यरचना आयती मिळाली असली तरी ती कशा पद्धतीने सादर करायची यामागे विलक्षण कौशल्य असावे लागते आणि ते करंजीकरांना साधले आहे. 'घातसूत्रा'त घात असतो व कुणीतरी त्याच्यामागे असतो. भारतीय उपखंडात असे काय झाले आहे? हेही आपण तपासले पाहिजे. जगभर कट होतायत व आपल्या देशात ते होत नाहीयत या भ्रमात राहता कामा नये. अर्थकारण व बँकिंगचा जगभरातला मोठा पट उभ करण्याचं काम या पुस्तकातून करंजीकरांनी केलंय. कोणतेही उत्पादन न करता बँकिंगमार्फत पैसा उभा तरी कसा केला जातो? हे मांडताना प्रत्यक्षात घडलेल्या घटना निवडल्यात. या घटनांमध्ये काल्पनिक काही नाही. घडलेल्या घटनांचा अन्वयार्थ कसा लावायचा हे तुमच्या हातात आहे. कदाचित तो चुकीचा असू शकेल पण तो लावायला हवा. आपल्या आजूबाजूलाही घातसूत्र घडतायत. त्यांच्यावर वॉच ठेवायला हवा.

याप्रसंगी अच्युत गोडबोले, प्रतिमा कुलकर्णी, अतुल परचुरे, सुनील बर्वे, उषा पुरोहित, अरुण काकडे, किरण येले, चांगदेव काळे, विनायक कुलकर्णी इत्यादींसह समाजातील वेगवेगळ्या क्षेत्रांतील मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाचे अर्थवाही सूत्रसंचालन डॉ. वीणा सानेकर यांनी केले.

## विचारांना प्रवृत्त करणे ग्रंथांचे काम – रंगनाथ पठारे

''अस्वस्थता देणे, विचारांना प्रवृत्त करणे हे चांगल्या ग्रंथांचे काम असते. संपूर्ण मानवी संस्कृतीचा घात करणारे सूत्र सापडावे आणि ठामपणे मांडावे ही भाषिक सांस्कृतिक इतिहासातील फार मोठी घटना आहे,'' असे मत ज्येष्ठ लेखक रंगनाथ पठारे यांनी व्यक्त केले.

लेखक, अभिनेते, दिग्दर्शक दीपक करंजीकर लिखित 'घातसूत्र' या ग्रंथाचे प्रकाशन पठारे यांच्या हस्ते झाले. ज्येष्ठ संरक्षण तज्ज्ञ प्रा.डॉ. श्रीकांत परांजपे, अभिनेते अभिराम भडकमकर, प्रदीप वैद्य, 'ग्रंथाली'चे विश्वस्त धनंजय गांगल उपस्थित होते. सुदेश हिंगलासपूरकर यांप्रसंगी उपस्थित होते.

पठारे म्हणाले की, कोणत्याही मानवी समूहाला अमेरिका सोडून स्वतःचा विचार करणे अशक्य झाले आहे. आपलं जगणं काडीचंही आपल्या हातात नाही. त्याच्या पाठीमागे सूत्र हलवणारे बलशाली लोक आहेत. याची जाणीव घातसूत्र हा ग्रंथ करून देतो. आपण जगायचं की मरायचं हे आपल्याला ठरविता येत नाही, मानवी आयुष्य आपल्याला न दिसणाऱ्या सूत्रधारांवर अवलंबून आहे हे करंजीकर यांनी जागतिक स्तरावरील विविध घटनांच्या माध्यमातून उलगडून दाखविले आहे.


प्रा. परांजपे म्हणाले की, जगात सर्वत्रच प्रखर आणि आक्रमक राष्ट्रवाद समोर येताना दिसत आहे. त्यावर उजवेपणाचा शिक्का मारला जातो; मात्र प्रत्येकच राष्ट्रवाद म्हणजे उजवेपणा नाही. मार्क्सवादी किंवा भांडवलशाही विचारधारेच्या चौकटीत न अडकता तटस्थपणे विविध घडामोडींचा अभ्यास करत या ग्रंथाची मांडणी केली आहे.

प्रत्येक जागतिक घटनेचा विचार केवळ आर्थिक चौकटीत करून चालणार नाही. त्यासाठी सामाजिक, सांस्कृतिक मुद्देही लक्षात घ्यायला हवेत. अनेकवेळा राष्ट्रीय सुरक्षा राष्ट्राची नव्हे, तर येथील राजवटीची असते. व्यापारी युद्धाची झळ चीनला बसत आहे. जर चीनची अर्थव्यवस्था खाली गेली, तर कम्युनिस्ट राजवटीला धोका निर्माण होणार आहे. करंजीकर यांनी अनेक घडामोडी सविस्तर मांडून त्याद्वारे घातसूत्र मांडण्याचा प्रयत्न केला आहे.

दीपक करंजीकर म्हणाले, अस्वस्थ क्षणांच्या कुशीतून या पुस्तकाचा जन्म झाला आहे. टायटॅनिकला जलसमाधी ते ट्रम्प यांचे सत्तेवर येणे या एकशेचार वर्षांतील घटनांचे धागे जुळविण्याचा प्रयत्न आहे. त्यामध्ये जे जे सूत्र आहे तेच घातसूत्र आहे. यामधील कॉन्स्पिरसी थिअरी उलगडण्याचा प्रयत्न केला आहे. लेखकाची लिबर्टी घेऊन मला कादंबरी लिहिता आली असती, मात्र घटनांच्या नोंदी संदर्भांसह पुढे ठेवल्या आहेत. यातून चर्चा घडावी, खंडण-मंडण-संश्लेषण व्हावे हाच उद्देश आहे.

प्रारंभी अभिराम भडकमकर, प्रदीप वैद्य आणि धनंजय गांगल यांनी ग्रंथाच्या काही भागांचे अभिवाचन केले. सुदेश हिंगलासपूरकर यांनी 'ग्रंथाली'ची भूमिका मांडली. अस्मिता पांडे यांनी सूत्रसंचालन केले. राजू कुलकर्णी, शिवाजी चव्हाण, मुकुल रत्नपारखी यांनी संयोजन केले.

ग्रंथाली



## 'प्रतिबिंब' काव्यसंग्रहाचे यवतमाळ येथे प्रकाशन



यवतमाळ येथील अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनात प्रा. संजीव वाडीकर यांच्या 'प्रतिबिंब' या काव्यसंग्रहाचे प्रकाशन संमेलनाध्यक्ष अरुणा ढेरे यांच्या हस्ते आणि अनुपमा उजगरे यांच्या उपस्थितीत संपन्न झाला.

यवतमाळ येथे ९२व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनातील प्रकाशन मंचावर प्रा. संजीव मनोहर वाडीकर यांच्या कवितांचा संग्रह 'प्रतिबिंब'चे प्रकाशन या संमेलनाच्या अध्यक्षा डॉ. अरुणाताई ढेरे यांच्या हस्ते झाले. या वेळी साहित्य संघाच्या वरिष्ठ पदाधिकारी श्रीमती अनुपमा उजगरे व्यासपीठावर उपस्थित होत्या. या काव्यसंग्रहाला प्रसिद्ध समीक्षक, २०१६च्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष डॉ. श्रीपाल सबनीस, प्रसिद्ध गीतकार प्रवीण दवणे यांची प्रस्तावना लाभली आहे.

हा काव्यसंग्रह 'ग्रंथाली' प्रकाशन संस्था, मुंबई यांनी प्रकाशित केला आहे. या प्रकाशनाकामी 'ग्रंथाली'चे वरिष्ठ विश्वस्त सुदेश हिंगलासपूरकर, धनश्री धारप, त्यांच्या सहकाऱ्यांचे बहुमोल सहकार्य लाभले. यवतमाळ येथे प्रकाशन समारंभास श्री. हिंगलासपूरकर, धनश्री धारप उपस्थित होते.

काव्यसंग्रहाच्या प्रकाशन समारंभास डॉ. उमरे (यवतमाळ), सुरेश फुले, संजय पवार, सुभाषराव हवाळ यांचेही सहकार्य लाभले.

## 'मनीमानी' पुरस्कार



संगीता अरबुने यांच्या ग्रंथाली प्रकाशित 'मनीमानसी' या ललित लेखसंग्रहाला सातारा येथील ग्रंथमित्र डॉ. शिवाजीराव चव्हाण सार्वजनिक ग्रंथालयाचा पुरस्कार प्राप्त.

नामवंत कवी प्रदीप पाटील यांच्या हस्ते सातारा येथील नगर वाचनालयाच्या पाठक सभागृहात हा पुरस्कार प्रदान समारंभ संपन्न झाला.

यावेळी मसाप सातारा शाखेचे कार्यवाह डॉ. महेश गायकवाड, साहित्यिक डॉ. राजेंद्र माने, सातारा येथील कला वाणिज्य महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. यशवंत पाटणे, ग्रंथालयाच्या अध्यक्षा सुनीता उतेकर, कार्यवाह नीला उतेकर, कोषाध्यक्ष सुनीता कदम, डॉ. शिवाजीराव चव्हाण यांचे कुटुंबीय, तसेच साताऱ्यातील अनेक मान्यवर उपस्थित होते.

याच समारंभात साहित्यिक पत्रकार संजय आवटे, कवी लेखक प्रदीप आवटे आणि प्रवीण कुलकर्णी यांना देखील पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. हर्षल राजेशिर्के आणि अंजली ढमाळ यांनी परीक्षक म्हणून काम पहिले.

# लिहिणं ही थेरपी आहे मला स्वत:ला बरं करण्याची

व्यासपीठावरील आदरणीय डॉ. अनंत लाभसेटवार, लता लाभसेटवार, डॉ. उषा तांबे, संजय भास्कर जोशी, 'ग्रंथाली'चे विश्वस्त सुदेश हिंगलासपूरकर आणि सभागारातील माझे मित्र आणि साहित्यिक.

सर्वप्रथम मी 'लाभसेटवार फाउंडेशन'चे आभार मानतो की या सन्माननीय पुरस्कारासाठी डॉ. अनंत लाभसेटवार, लता लाभसेटवार आणि त्यांचे परीक्षक यांनी 'मोराची बायको' या कथासंग्रहाची निवड केली. हा पुरस्कार सन्माननीय यासाठी आहे की गेली अनेक वर्षे देशात विद्यासंस्कृती वृद्धिंगत करण्याचे काम 'लाभसेटवार फाउंडेशन' अमेरिका आणि 'डॉ. अनंत लाभसेटवार', 'लता लाभसेटवार ट्रस्ट' नागपूर करीत आहे. मान्यवर साहित्यिकांच्या व्याख्यानमालांपासून विद्याक्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्यां संस्था आणि व्यक्तींचा सन्मान करण्याचं कार्य लाभसेटवार फाउंडेशन आणि ट्रस्ट करत आहे. सांप्रत काळात चित्र असं दिसतं की गल्लीगल्लीतली छोटी छोटी मंडळे मोठमोठ्या रकमा देऊन कुणाचा सन्मान करतात तर फक्त फेसव्हॅल्यू असलेल्या सिनेमा-मालिकेतल्या लोकांचा.

मला या ठिकाणी प्रदीप साहील या मित्राची गजल आठवतेय. तो लिहितो,

*कभी ख्वाबो खयालों में भी जो सोचा नही होगा,*
*अब वही होगा यहा जो अक्सर होता नही होगा.*
*यही होगा देखना इस शहरमें भी एक दिन,*
*हजारो लोग होंगे कोई चेहरा नही होगा*

तर चेहरेच नसलेल्या आजच्या काळात, नसलेल्या चेहऱ्यांचा सन्मान होण्याचा हा काळ आहे. मानसिक बळ आणि एक आत्मीय साद ही आजच्या काळात प्रत्येक माणसाची गरज आहे आणि ती साहित्यच पुरवू शकतं हे लाभसेटवार यांना माहीत असावं आणि म्हणूनच ते गेली अनेक वर्षे साहित्यासाठी पुरस्कार जाहीर देत आहेत. अशा 'फेस'च्या जमान्यात लाभसेटवार फाउंडेशन 'नॉलेज, इमॅजिनेशन आणि सोलेस' देणाऱ्यांचा सन्मान करते आणि म्हणून मला हा सन्मान महत्त्वाचा वाटतो. या पुस्स्कारासाठी परीक्षक समितीचे म्हणजेच डॉ. लतिका भानुशाली, चांगदेव काळे आणि अरुण शेवते यांचेही आभार. हे लोक मला आता गुप्तहेर खात्यातले लोक वाटू लागले आहेत. सतत सोबत असतानाही मला या तिघांनी ताकास तूर लागू दिला नाही आणि गेल्या आठवड्यात अचानक कळवलं की या पुरस्कारासाठी 'मोराची बायको'ची निवड झाली आहे. कळवण्यात आलं की आपल्याच पुस्तकाला पुरस्कार कसा द्यावा, लोकांना ही निवड पक्षपाती वाटेल का असा विचार करून आणखी पुस्तके मागवली गेली आणि तीही वाचून झाल्यावर 'मोराची बायको' कथासंग्रहावर शिक्कामोर्तब झालं. परिक्षक म्हणून तिघांनी जे परिश्रम घेतले आहेत ते कळल्यावर मी पुढे कधीही परीक्षक न राहण्याचं ठरवलं आहे. तिघांचेही मन:पूर्वक आभार.

या क्षणी मला अनेक सुहृदांची आठवण येत आहे त्यापैकी काही समोर बसलेले आहेत. काही मंचावर आणि काहीतर मंचाच्या मागे आहेत. त्यात अग्रणी आहेत 'ग्रंथाली'चे विश्वस्त सुदेश हिंगलासपूरकर ज्यांचा ठाम विश्वास आहे की कवितासंग्रह विकले जात नाहीत, पण तरीही त्यांनी किरण येलेचा 'बाईच्या कविता' हा कवितासंग्रह आधी प्रकाशित केला आणि नंतर 'मोराची बायको' हा कथासंग्रह. हा कथासंग्रह वाचून सगळ्यात पहिला संदेश ज्येष्ठ समीक्षक अवधूत परळकर यांचा आला की 'मराठी साहित्याला नेमाडेंनी कोसला दिली तू मोराची बायको'. संदेश वाचून मला जरा आश्चर्य वाटलं. ते गंमत करतायत असंही वाटलं. पण त्यानंतर आजवर प्रज्ञा दया पवार, अविनाश कोल्हे, उदय कुलकर्णी, संजय भास्कार जोशी, यासारख्या जवळपास ४७ मान्यवर लेखक वाचकांनी या पुस्तकावर लिहिलं आणि आपण जे लिहिलंय ते लोकांच्या आत पोहोचतंय याचं समाधान वाटलं.

खरंतर मला कधीच कथा लिहायची नव्हती. कविताही मी कधी लिहीन असं मला वाटलं नव्हतं. भांडुपसारख्या वस्तीत जिथे रोजच्या जगण्याचा लढा सकाळी चाळीतल्या एकमेव नळाला येणाऱ्या पाण्याच्या रांगेत सुरु व्हायचा आणि रात्री रस्त्यावर तलवारी घेऊन धावणाऱ्या तरुणांना पाहत संपायचा, तिथे कविता कशी उगवली ते मला आजही कळलं नाही. त्यात मी बऱ्यापैकी कबड्डी खेळायचो. नाक्यावर रात्री उशिरापर्यंत उभं राहायचो. त्यामुळे साहित्याशी अगदी दुरान्वयेही संबंध यायचा नाही. नाही म्हणायला आमच्या चाळीत एक 'बब्या' नावाचा मुलगा राहायचा. तो गोदरेज कंपनीत कामाला होता. तिथे युनियन लिडरही होता. पण तरीही थ्रिल म्हणून हुमा टॉकिजवर ब्लॅक करायचा. मारामाऱ्या करायचा. तो कंपनीत 'भाई' होता. मी त्याच्यासोबत असायचो. तर या बब्याला वाचायची सवय होती. 'एरियात लफडी नाही करायची' हा त्यावेळच्या सगळयाच भाईलोकांचा उसूल होता. या उसूलप्रमाणे हा बब्या कामावरुन घरी आला. हातपाय धुऊन चाळीत घरासमोरच्या अंगणात खुर्ची टाकून सुहास शिरवळकर, गुरुनाथ नाईक, बाबूराव अर्नाळकर वाचत बसायचा. त्याला अशी पुस्तके वाचण्याची आवड होती. त्यामुळे बब्यासोबत लायब्ररीत जाण्यापुरताच काय तो माझा संबंध यायचा. पुढे कंपनीत झालेल्या एका हाणामारीत या बब्याचा डोक्यात कुदळ घालून मर्डर झाला आणि तो संबंधही संपला. पण रात्रंदिवस नाक्यावर उभं राहणं चालू होतं. मी ज्या नाक्यावर उभं राहायचो ते सुधीर कदम, दीपक परकर, राजा विचारे, महेश सुर्वे, अनिल दरवेस, बाळा मंचेकर आज इथे आलेत. आम्ही रात्री अगदी उशीरापर्यंत नाक्यावर चर्चा करत राहायचो. कोणताही विषय आम्हाला वर्ज्य नव्हता. श्याम बेनेगलच्या आर्ट फिल्मपासून

ओशोच्या प्रवचनावर आणि विभागातल्या के.टी. थापाभाईपासून आणि त्याचा मर्डर करणाऱ्या अवधूत बोंडे अशा सगळ्या गोष्टींवर आमच्या चर्चा चालायच्या. या नाक्यावर डीवायएफआयची मुलं यायची आणि आम्हाला कम्युनिझम सांगायची. शेखर सावंतसारखा मित्र डाव्या हातात जळती सिगारेट आणि उजव्या हातात पुस्तक घेऊन यायचा आणि जाणिवांविषयी बोलत राहायचा. या मित्रांच्या संगतीत कदाचित त्या सगळ्याची घुसळण होत राहिली असावी आणि नेमाडे म्हणतात तसं त्या दिवसभरच्या जगण्याचं उर्ध्वपातन होऊन एक ओळ आली असावी. 'आम्ही चिल्लर सुटे पैसे', ही कविता म्हणजे माझ्या आणि त्या हलाखीत जगणाऱ्या सगळ्यांचा आवाज होता. पिचलेल्यांचा आवाज होता. या वर्षी चेन्नई येथे झालेल्या राष्ट्रीय कवीसंमेलनात मराठी भाषेचं प्रतिनिधित्व याच कवितेनं केलं आणि बावीस भारतीय भाषात आता ही कविता अनुवादित झाली आहे.

कवी राजन साटम लिहितात, 'कविता म्हणजे होतं काय? खदखदणारं घुसमट वादळ, तवंग धरतं बनतं साय.'

तर ही माझ्यावर आलेली कवितेची साय भांडुपच्या श्याम पेंढारी नावाच्या निर्मळ माणसानं अलगद बाहेर काढली आणि त्यांच्या 'कुसुमाकर' प्रकाशनतर्फे प्रकाशित केली. 'चौथ्यांच्या कविता' आणि शकुन या नावानं सन २००० साली साहित्याचा प्रवास सुरू झाला. चौथ्यांच्या कविता म्हणजे क्लास फोरच्या कविता. शकुन नाव धारण करण्यामागे माझी एक भूमिका होती. माझ्या कवितेनं मला मंचावर ओढत न्यावं आणि सांगावं की मला लिहिणारा कवी तो 'हा'. दुसरं कारण हे की माझं साहित्यात असणं नसणं माझ्या कवितेनं आणि रसिकांनी ठरवावं. माझ्या कवितेत जर काही असेल तर ती जगेल, नसेल तर ती मरेल आणि साहित्यातून शकुनही. 'चौथ्यांच्या कविता' हा संग्रह प्रकाशित होत होता. मंचावर मी लिहिलेली चिल्लर कविता आणि टोपण नावामागची भूमिका संदेश ढगे वाचून दाखवत होता आणि त्यावेळी प्रेक्षकात मी सरबत वाटत होतो. मग पुढे पण कवितेनं माझी ओळख करून दिली आणि शकुनचा मी किरण येले झालो. दरम्यान साहित्याचं वाचन सुरू झालं आणि तेव्हा लक्षात आलं की आपण ज्यांच्यासोबत इतका काळ जगलो नाक्यावर उभं राहिलो मारामाऱ्या केल्या ती एक एक व्यक्ती मग तो शेखर सावंत असो की बब्या एक एक कविताच आहेत आणि मी त्यांच्यावर लिहू लागलो पण त्या व्यक्तीवर लिहिताना कवितेचा फॉर्म मला अपुरा पडू लागला आणि कथा अवतरली. त्यामुळे हे जे सगळं जे आहे ते त्यांचं देणं आहे माझं काही नाही.

योगायोग असा की या कथा संग्रहाला मागील महिन्यातच एक महत्त्वाचा पुस्कार कथाकार शांताराम पुरस्कार दिला गेला आणि तो योगायोगाने याच सभागारात आणि आदरणीय प्रा. उषा तांबे यांच्या हस्ते. आज पुन्हा प्राध्यापक उषा तांबे यांच्या हस्ते आणि मुंबई मराठी साहित्य संघातर्फे मला हा पुरस्कार मिळतो आहे याचा आनंद आहे. कारण या संस्थेतील उज्ज्वला मेहेंदळे, अशोक बेंडखळे, चंद्रशेखर गोखले, एकनाथ आव्हाड, प्रतिभा सराफ, प्रतिभा विश्वास सारखी अनेक निर्मळ मनाची माणसे माझ्या परिचयातील आहेत.

नुकतंच 'महाराष्ट्र टाईम्स'च्या श्रीकांत बोजेवारांनी विचारलं, एक लेख हवा आहे दोन दिवसात. विषय आहे, 'मी का लिहितो? जमेल का? मी म्हटलं हा प्रश्न तर प्रत्येक लेखक कवी स्वत:ला विचारातच असतो. मी तर कित्येकदा स्वत:ला विचारून झालो आहे. मी का लिहितो? या प्रश्नाचं उत्तर देताना सआदत हसन मंटो हा माझा आवडता लेखक म्हणाला होता, ''आप पुछ रहे है के मै खाना क्यो खाता हूँ? सिगारेट शराब क्यौं पिता हूँ। झक क्यों मारता हूँ'' 'लिहिणं' ही मंटोसाठी नैसर्गिक क्रिया होती, माझ्यासाठी ती प्रतिक्षिप्त क्रिया आहे. रिस्पॉन्सिव्ह ॲक्शन आहे.

'मी का लिहितो' हा प्रश्न, मी स्वत:ला अनेकदा विचारून झालो आहे आणि प्रत्येक वेळी मला स्वत:ला एकच उत्तर मिळालंय 'त्यांना लिहिता येत नाही म्हणून'. मंटो लिहितो की, 'अफसाना मेरे जेबमें पडा रहता है.' मला वाटतं, कथा आणि त्यातील पात्र माझ्या अवतीभवती रेंगाळत असतात. माझं लक्ष जावं म्हणून कधी माझा अनुनय करत असतात, तर कधी माझा अपमान. माझ्या आत आणि बाहेर सतत ते सगळे गलका करत असतात, कधी मला जोजवतात, कधी शिवीगाळ करतात. त्यांचे आवाज, बोलणं, रडणं, हसणं, खिदळणं आणि विक्षिप्त वागणं पाहता-पाहता कधी कधी माझ्याही नकळत मी त्यांच्यासारखं बोलून पाहतो, त्यांच्यासारखं जगून पाहतो. यामुळेच कदाचित त्या पात्रांची भाषा, वागणं, बोलणं, कथात्म परिसराचे बारीकसारीक तपशील माझ्या कथांतून जास्त येत असावेत. आजही 'मी का लिहितो' विचार करतो तेव्हा मला अनेक घटना आठवतात. त्यातल्या दोन घटना-

रात्री खूप उशिरा परतताना मी लगेज डब्यातनच प्रवास करतो. या वेळेस डब्यात माथाडी कामगार असतात, समोसे विकून परतणारे असतात, केक बिस्किटे विकणारे असतात, बारमधल्या मुली आणि त्यांना सोडायला निघालेले तरुण असतात, तृतीयपंथी असतात. पोटातला इवलासा खड्डा भरण्यासाठी 'शरीरातला घाम आणि राम' विकून परतणारी ही माणसे त्यावेळी संपूर्ण दिवसाचा लेखाजोखा एकमेकांना सांगत असतात. हा लेखाजोखा म्हणजे त्यांचा लढा असतो त्या दिवसाचा, दु:खाशी, नियतीशी. तो लढा मला जगणं शिकवतो. तो ऐकण्यासाठी मी लगेजमधनं प्रवास करतो. एक दिवस असाच उशिरा परतत होतो. दारावर दोन तरुण दारुच्या हलक्या नशेत लटकत होते. एक दुसऱ्याला म्हणाला, ''सच बोल रहा हूँ भाईजान. एकदम सेम थी. मेरेकू तो लगा सायराच तुम्हारी.'' आणि माझे कान तातडीने धावत जाऊन त्या दोन तरुणांशेजारी उभे राहिले. पहिला नुकताच मुंब्र्यातल्या चांगल्या वस्तीत गुपचुप वेश्याव्यवसाय करणाऱ्या एका ठिकाणी जाऊन आला होता. दुसरा क्षणभर गप्प राहिला, मग ठाम आवाजात म्हणाला, ''कल मै जाएगा उधर.'' तसं पहिला तरुण दचकला, ''क्या? पागल है क्या तू? ऐसी जगह नै जानेका बोलता रहा आजतक. अब निकाह है तो उदर जाएगा? क्यों?'' दुसरा म्हणाला, ''उस्कू छुडाने.'' पहिला

म्हणाला, ''इत्ता आसान नै रैता भाईजान किसीको छुडाना. परसो निकाह है तुम्हारा. और उस्कू छुडाने क्यौ? वो तुम्हारी क्या लगती है.'' ''लगती नहीं. वह सायरा जैसी दिखती है इसलिये.'' आणि मी मुळातून हादरलो. आपण ज्याच्यावर प्रेम करतो त्या माणसासारखंच दिसणाऱ्या कुणाचंतरी दु:खानेही कासावीस होणारा तो तरुण मला 'ग्रेट' वाटला. मी त्या रात्री अस्वस्थपणात जे लिहिलं, ती माझी पहिली कथा, 'कुछ भी हो सकता है.' मला वाटतं मी ती लिहिली कारण त्या तरुणाला लिहिता येत नव्हतं.

दुसरा प्रसंग : माझी एक खूप सुंदर मैत्रीण होती. काळासावळा वर्ण, तकतकीत त्वचा, लांबसडक केस, सुडौल शरीर, वागण्या–बोलण्यात तडफदार. घरच्यांच्या मनाविरुद्ध प्रेमविवाह करून ती पळून गेली. मग एकदोन वर्षानंतर मी घरात पुस्तकांचा पसारा मांडून काही करत असताना दारात एक बाई आली. कळकटलेली साडी, केसांचा वेडावाकडा बॉबकट, पिवळेशार दात, जाड भिंगाचा चष्मा. म्हणाली, किरण, कसा आहेस? मी आश्चर्यचकित. म्हटलं, कोण तुम्ही? तर म्हणाली, अरे ओळखलं नाहीस? मी भारती. आणि मी हबकलोच. नंतरचे दोन तास ती एकच विनंती करत होती, मला आयकार्ड बनवून दे. माझ्याकडे आता काहीच नाहीय स्वत:चं. कुणी विचारलं की कशावरनं तू भारती, तर काय सांगू? या घटनेनंतरच्या अस्वस्थतेतून ज्या कविता आल्या. त्या मी लिहिल्या असाव्यात, 'त्यांना लिहिता येत नव्हतं म्हणून.'

मी स्वत:साठी लिहितो पण मी स्वत:साठी लिहित नाही. लिहिणं ही माझी गरज आहे. मी नाही लिहिलं तर माझ्या आतली पात्र मला जगू देणार नाहीत. ती सतत मला काही सांगत, दाखवत असतात, ''ते बघ, तिकडे बघ, काय चाललंय? हे बघ इकडे बघ तो कसा वागतोय.'' मी नाही लिहिलं तर माझं अस्वस्थपण मला माणसांतून उठवेल. अनेक वेळा मी स्वत:शी बोलत असतो, इतका की कधी कधी लक्षात येतं की घरात असूनही दोन दिवसात मी घरातल्या कुणाशी एक शब्द बोललो नाहीय, अस्वस्थपणे फक्त लिहितोय आणि स्वत:शी बोलतोय. 'लिहिणं' हा माझ्यासाठी स्वत:शी संवाद साधणं असतं स्वत:च स्वत:च्या प्रश्नांना उत्तरं देणं असतं. माझं हे अस्वस्थपण माझी बायको, मुलगा समजून घेतात. बायको अनेकदा झोपेतून उठवत विचारते, 'काय बोलताय?' झोपेत बहुतेक मी नाही, माझ्याआतली पात्रं बोलत असावीत. ती पात्रे किंवा त्यांच्यातला मी शोधत असतो आसपासच्या एखादया कृतीचे वा घटनेचे आंतरिक संदर्भ, त्या घटनेतले गुंते. कधी मला जगायचं असतं त्या त्या पात्रांचं जगणं, अनुभवायच्या असतात त्या त्या पात्रांच्या वेदना, कधी मला पळायचं असतं त्यापासून खूप दूर, म्हणून मग मी रडतो, भेकतो, गळाठल्यासारखा पडून राहतो दिवस दिवसभर काही न करता हरल्यासारखा. मला माहीत आहे की हे आजारपण आहे माझं. 'कवी–लेखक असणं' मला कधीही भूषणावह वाटलं नाही, तो शापच वाटला दिलेला, की 'जा आजपासून तुला इतरांपेक्षा जास्त त्रास होत राहील सगळ्याच गोष्टींचा.' हा त्रास टाळण्याचा मी खूप प्रयत्न करतो. पण ते जमत नाही.

एक सुप्रसिद्ध वाक्य आहे, A little realing is all the therapy a person needs sometime. मला वाटतं, माझ्यासाठी 'लिहिणं' ही थेरपी आहे. मी लिहितो कारण तोच एक पर्याय आहे माझ्याकडे, स्वत:ला बरं करण्याचा, म्हणून मी लिहितो. गंमत म्हणजे मी या त्रासातून थोडा मोकळा होऊ लागलो की भूषण तेलंग, सुधाकर वसईकर, सुधीर चित्ते सारखे मित्र मागे लागतात नवं काय लिहिलंस दाखव म्हणून. लिहिलं नसेल तर राम दौंड सारखा मित्र विविध माणसांच्या कथा सांगत, 'नाटक लिही' म्हणून मागे लागत राहतो. अनेक जण मला विचारतात, 'मोराची बायको' ही कथा कशी सुचली. एक हिंदी भाषिक कवयित्री मागे मला म्हणाली, 'बचपनसे मेरे सपने मे मोर आता है' आणि मी म्हटलं, 'यह तो स्टोरी है।' ती म्हणाली, इसमे क्या स्टोरी है? मी म्हटलं, 'पता नही.. पर इसमे स्टोरी है. आप लिखो.' ती म्हणाली, कुछ स्टोरी वोरी नही है. आपही लिखो. आणि तेव्हापासून माझ्या मनातल्या स्त्रीच्या स्वप्नात तो मोर येऊ लागला. वयाच्या सात आठ वर्षापासून लग्न झाल्यावरही एखाद्या स्त्रीच्या स्वप्नात मोर येत असेल तर तिच्या मनात मोररुपात नेमकं काय आहे याचा मी शोध घेऊ लागलो आणि कथा आली 'मोराची बायको'. मांदळकर बाई या कथेचंही तसंच. एकदा अत्रे थिएटरबाहेर बोलत असताना राम दौंड म्हणाला, 'आम्हाला एक बाई होत्या शिकवायला. त्या कविता शिकवताना अचानक खूप सुंदर दिसू लागायच्या. शिकवता शिकवता कवितेच्या लयीत नाचू लागायच्या.' आणि मी रामला म्हटलं, 'राम ही कथा आहे यार. तू लिही.' राम म्हणाला, 'तू नाटक लिही यावर.' मग ती बाई माझ्या आत घुमू लागली. त्रास देऊ लागली. लक्षात आलं की कविता शिकवू लागत असतानाच सुंदर दिसू लागणारी मनात किती सुंदर असेल? बाहेर कुरुप असेल पण जेव्हा संवेदनांचा स्पर्श शब्दातून त्या स्त्रीला होतो तेव्हा ती अचानक सुंदर दिसू लागते कवितेसारखी. हे तिचं सौंदर्य दुर्दैवानं तिच्या आसपासच्या कुणाला कळत नाही.

आज परिस्थिती अशीच आहे. आपल्या आसपास आणि आपल्या आत चांगल्या गोष्टी आहेत याचं भान आपल्याला नाहीय. लेखक–कवी त्या जपण्याचा प्रयत्न करत असतात. चूक घडत असेल तर ते सांगण्याचा प्रयत्न करत असतात. पण त्यांचा आवाज दाबला जातो, त्यांना बोलू दिलं जात नाही. मला कळत नाही आपण इतके भित्रे कधीपासून झालो. कुणी आपल्या विरोधात बोलत असेल तर त्यातलं योग्य अयोग्य ऐकणारे ठरवतात ही गोष्ट आपण का विसरू लागलो. आपली संस्कृती वैचारिकतेची आहे. हिंदू धर्म वैचारिकतेतून जन्माला आला आहे. हाच एक धर्म असा आहे की पुराणग्रंथांतून देवांवरही टीका करतो आणि देवातले दोषही दाखवतो. हा धर्म आपल्याला ऐकून घेण्याचं भान देतो पण आपण नेमकं याउलट वागत आहोत आणि तरीही स्वत:ला धर्माचे कट्टर अनुयायी म्हणवून घेत आहोत.

इ एल डोटोरोव्ह नावाचा लेखक म्हणतो, Writing is a socially accepted form of schizophmenia याच वेडेपणातून

विचार करताना मला दिसलेली गोष्ट. 'फिटेस्ट टू सर्व्हायव्हल' हा या जगाचा नियम आहे असं म्हटलं जातं. जो बलवान आहे, सशक्त आहे त्यालाच ज्गण्याचा अधिकार आहे हा नियम आहे सृष्टीचा आपण पाहतो की प्राण्यांत, बलवान नर त्या कळपाचा प्रमुख होतो. हरलेला नर कळप सोडून जातो. प्रवास करताना कळपातले कमकुवत आणि म्हातारे प्राणी कळपाच्या मागे असतात. मागनं हल्ला झाला तर प्रथम तो हल्ला या प्राण्यांवर होतो. तसंच थकले-अडकले तर या प्राण्यांना मागे ठेवून कळप निघून जातो. झाडांचंही तसंच आपल्या सावलीत छोटं झाडं, मोठी झाडं वाढू देत नाहीत. एकमेकांपासून अंतरावर झाडं लावावी लागतात. म्हणजे जो बलवान आहे त्यालाच जगण्याचा अधिकार आहे हा सृष्टीचा नियम आहे हे खरंच पण इथेच माणसांचं वेगळेपण आहे. माणसाचं वेगळेपण या एकाच गोष्टीत आहे की आपण हा नियम नेमका उलट करतो. माणूस कमकुवत, खचलेल्या, पिचलेल्या माणसाला तगवण्याचा प्रयत्न करतो. दु:खिताला आधार देण्याचं काम करतो म्हणून तो माणूस आहे. प्रवास करताना प्राण्यांच्या कळपाच्या केंद्रभागी असतात माद्या आणि पिले. माणूस त्याच्या केंद्रभागी गरीब, दलित, पिचलेले, मागासलेली माणसे ठेवतो म्हणून तो माणूस आहे. आणि मला वाटतं हे माणूसपण या काळात टिकवण्याची जबाबदारी लेखक कवींची आहे. तुमच्या सगळ्यांच्या शुभेच्छांचं बळ पाठीशी घेऊन मी ती जबाबदारी पेलण्याचा प्रयत्न करतो आहे. माणसाला माझ्या साहित्यात केंद्रस्थानी ठेवण्याचा प्रयत्न करतो आहे. आपण सगळे असेच माझ्या पाठीशी उभे असा, अशी प्रार्थना करतो आणि थांबतो.

**– किरण येले**

## लाभसेटवार फाउंडेशनचा 'उत्कृष्ट ललित साहित्य पुरस्कार २०१८' वितरण सोहळा

डॉ. अनंत लाभसेटवार-लता लाभसेटवार फाउंडेशन (US) गेली अनेक वर्षे मराठी साहित्यातील उत्कृष्ट साहित्यकृतींना पुरस्कार देऊन गौरव करते. शाल, श्रीफळ आणि रु.५०००० असे या पुरस्काराचे स्वरुप असते. या वर्षी या पुरस्कारासाठी 'मोराची बायको' या कथासंग्रहाची निवड करण्यात आली. डॉ. लतिका भानुशाली, अरुण शेवते आणि चांगदेव काळे या निवड समितीने वर्षभरात प्रकाशित झालेल्या अनेक ललित साहित्यग्रथांतून या ग्रंथाची निवड केली. पुरस्कार वितरण सोहळा दिनांक २७ जानेवारी २०१८ रोजी सायंकाळी सहा वाजता, मुंबई मराठी साहित्य संघ, गिरगाव येथे डॉ. अनंत लाभसेटवार यांच्या प्रमुख उपस्थितीत प्रा. उषा तांबे यांच्या शुभहस्ते, संपन्न झाला. या सोहळ्याची सुरुवात डा. लाभसेटवार यांनी लिहिलेल्या 'ट्रंप' या पुस्तकाचे प्रकाशनाने झाली. याप्रसंगी केलेल्या मनोगतात डा. अनंत लाभसेटवार म्हणाले, अमेरिकेतील राजकीय परिस्थितीचे चुकीचे चित्रण भारतात केले जात असल्याने 'ट्रंप' हे पुस्तक लिहिणे गरजेचे वाटले. लाभसेटवार फाउंडेशनची भूमिका मांडताना त्यांनी साहित्यविषयक मुद्दे मांडले. त्यानंतर वक्ते संजय भास्कर जोशी यांनी चांगल्या कथालेखनातील सौंदर्यस्थळे सांगत, किरण येले लिखित 'मोराची बायको' कथासंग्रहातील सौंदर्यस्थळांचा मागोवा घेतला. पुस्तक पेठेत मी नेहमी वर्षभर होणाऱ्या पुस्तक विक्रीचा लेखी मोजदाद ठेवत असतो. त्या नोंदीनुसार 'मोराची बायको' हा कथासंग्रह 'बेस्ट सेलर' ठरला आहे. त्यानंतर किरण येले यांनी त्यांच्या कथांतील पात्रांच्या, कथानिर्मितीमागील घटना सांगितल्या. या सोहळ्यास सुदेश हिंगलासपूरकर, धनश्री धारप यांच्यासह अवधूत परळकर, प्रा. रोहिणी गोविलकर, अभिनेता भूषण तेलंग, अशोक बेंडखळे, डॉ. प्रफुल्लता सुखटणकर, प्रा. दीपा गोखले, अभिनेते सुधाकर वसईकर, सुधीर चित्ते, अपर्णा बन्नगरे, नरेंद्र म्हात्रे, विभावरी म्हात्रे, संतोष खाड्ये इत्यादी सन्माननीय व्यक्ती उपस्थित होत्या. भरलेल्या सभागारातील या सोहळ्याची सांगता करताना कथालेखनावर झालेल्या चर्चेचे प्रा. उषा तांबे यांनी कौतुक केले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अस्मिता पांडे यांनी केले.



**कुमार केतकर, गजानन सबनीस 'ग्रंथाली'च्या टायकलवाडी येथील नवीन कार्यालयास सदिच्छा भेट. श्रीधर पाटील, गजानन सबनीस, सुदेश हिंगलासपूरकर, कुमार केतकर आणि धनंजय गांगल**

# ‘पु.लं.’चा गाळीव इतिहास

संपादक लोकरंग–लोकसत्ता
सप्रेम नमस्कार,

मुकुंद संगारोम यांनी ‘भाई’ चित्रपटाला भंपक ठरवून टाकलं आहे. मला वाटतं हे त्यांच्या फस्ट्रेशनचं लक्षण आहे. पु.लं.वर फक्त काही ठराविक लोकांचाच अधिकार आहे असं मानणाऱ्यातले ते एक असावेत असे वाटते. नाही तर एवढ्या सर्वांगसुंदर चित्रपटाचा फक्त पूर्वार्ध पाहून त्यांनी दिग्दर्शक व पटकथा व संवाद लेखक यांना झोडपून काढलं नसतं.

मुकुंदरावांच्या एक गोष्ट लक्षात येत नाही की इतिहासाचे सतत पुन:र्लेखन होत असते. संपूर्ण इतिहास (एखाद्या व्यक्तीचाही) फक्त आपल्याला व अन्य काही थोड्या लोकांनाच माहीत आहे असा कोणीच दावा करू नये.

आजचे आघाडीचे दिग्दर्शक व पटकथा–संवाद लेखक यांनी या चित्रपटाचा भार उचलला आहे. त्यांचा आवाका केवढा मोठा आहे हे तुमच्या कसे लक्षात येत नाही?

आता आपल्या भारतीयांच्या पुरातन आणि ऐतिहासिक मद्यपान संस्कृतीविषयी (पुराण व इतिहासातील मद्यपानाचे पुरावे जर आनंद साधले हयात असते तर त्यांनी नक्कीच ते दाखवले असते) मद्यपान संस्कृती हा आपला सांस्कृतिक जीवनाचा गेली हजारो वर्षे अविभाज्य भाग आहे हे मुकुंदरावांच्या लक्षात आलेले दिसत नाही. फक्त भारतीयांची विवेकबुद्धी जागृत असल्याने लहान मुलांसमोर याची चर्चा होऊ नये याची काळजी घेतली जात असते. बालमानसशास्त्रामधील अलिकडच्या काळामध्ये झालेल्या जागतिक संशोधनानुसार मद्यपान व धुम्रपान याची चित्रे पाहिल्यामुळे बालमनावर काहीच विपरित परिणाम होत नाही असं सिद्ध झाल्याचे ऐकले आहे. त्यामुळे तो धोकाही आता संपला आहे. उलट पु.ल., वसंतराव व भीमसेन जोशी यांना मद्यपानामुळेच कलेची प्रेरणा मिळाली असे सिद्ध होऊ शकेल. मद्यपानामुळे हे तीन कलाकार जागतिक पातळीवर नावाजले गेले हे भारतीयांच्या मद्यपान संस्कृतीला अभिमानास्पदच आहे हे मुकुंदरावांना केव्हा कळणार?

मध्यंतरीच्या काळात महात्मा गांधींमुळे मद्यपान संस्कृतीची पीछेहाट झाली खरी. परंतु आता नव्या जोमाने आणि विशेष करून सरकारी पाठिंब्यामुळे ही संस्कृती नव्याने पसरते आहे हे पुरोगामी भारताचे एक वैशिष्ट्यच ठरेल. पु.लं.नी त्यांच्या आईसमोर सिगारेट ओढताना दाखवल्यामुळे त्यांचं व आईचं नातं किती मित्रत्वाचं होतं हेच अधोरेखित होतं. (त्यात आईच्या तोंडावर गेलेला धूर चुकून वाऱ्याची दिशा बदलल्यामुळे गेला असावा) लग्न समारंभामध्ये कॉकटेल पार्टी यात विशेष ते काय? आणि अंतूबर्वाकडे दारू प्यायला मिळणं म्हणजे ही मद्यपान संस्कृती किती तळकोकणात पोचली होती हे समजून येते. अशी ही अभिमानास्पद मद्यपान संस्कृती चित्रपटातून भारतभर पसरविण्याचे काम कदाचित सरकारनेच या पटकथा व संवाद लेखक व दिग्दर्शक यांच्याकडे सोपविले असावे. पु.ल., वसंतराव व भीमसेन यांचा आणि चंपूताईचा एकमेकावर केवढा विश्वास होता! त्यामुळे त्यांच्या घरात मद्यपानाची नक्की सोय होईल या खात्रीने ते तिथे गेले असावेत. त्या काळात दारूबंदी असल्यामुळे दारू एकेक घरात साठवून ठेवली जात असावी.

आता आपल्या लक्षात आले असेल की मुकुंदरावांनी केलेली टीकाच किती भंपक होती. आता हा चित्रपट जगभर गाजणार हे नक्की. असा हा ‘पु.लं.’चा गाळीव इतिहास नव्याने माहीत करून दिल्याबद्दल दिग्दर्शक, पटकथा व संवाद लेखक यांचे मन:पूर्वक आभार!

ता.क. या चित्रपटाला या वर्षीचे सुवर्णकमळ मिळणार असे विश्वसनीय सुत्रांकडून कळते.


**विनायक गोखले**
झिराळ आळी, पेण
रायगड ४०२१०७

ग्रंथाली





[redacted]



## विनता कुलकर्णी
लिखित
# पुस्तकचोर




**मूल्य ६०० रु.**
**सवलतीत ५२० रु.**

आजवर आपण हिटलरच्या विचारांमुळे झालेल्या ज्यू लोकांच्या हालअपेष्टांबद्दल वाचत आलोय. 'पुस्तकचोर' ह्या कादंबरीत त्याच्यामुळे झालेली जर्मन कुटुंबाची ससेहोलपट दिसते. राजकीय दडपण, त्रास विविध प्रकारे होत असतो. ह्या स्थितीत युद्ध, वेदना, जखमा, उपासमार अशा वातावरणातील ही कादंबरी. आपल्याला अपरिचित असा हा सारा माहोल. म्हणूनच त्याची पार्श्वभूमी समजून घेणं गरजेचं आहे. अनुवादिकेने तो अत्यंत समर्पकपणे अनुवाद करून शब्दांच्या समर्पक छटा शोधत सादर केला आहे.

**– संजीवनी खेर**




## ज्योति जोशी
लिखित
# सात पावलांचा प्रवास

**मूल्य ४०० रु.**
**सवलतीत ५२० रु.**

चार पावलांची आमची ही जोडी! ४७ वर्षांनी बघता बघता अचानक दोन पावलं मध्येच अडखळली. त्याच्या हातांची घट्ट पकडही सैल होऊन निसटायला लागली. माझा अनुभव, मला होणारं दुःखच फक्त या पुस्तकात लिहिलंय. त्याचं भरकटलेलं मन, भ्रम हे सारं पॅण्डॉराच्या पेटीसारखं होतं. ते नोंदवताना डोळ्यांतलं पाणी शब्दांना पुसू लागलं. त्याला काय क्लेश होत असतील, ही कल्पनाही मला करवेना. माझं आयुष्य सामान्य आहे. तरीही वाटतं, प्रत्येकाचं जीवन ही एक आगळीच कथा, त्याची एकच दुर्मीळ प्रत.

**– ज्योति जोशी**

**प्रणयाच्या विविध रंगांची मुक्त उधळण...**

इंग्रजी साहित्याची जी काही वैशिष्ट्यं आहेत, त्यातलं एक वैशिष्ट्य म्हणजे, काही साहित्यकृतींतून स्त्री–पुरुष शृंगाराचं मुक्त चित्रण केलेलं असतं. 'फिफ्टी शेड्स...' या मालिकेतील 'फिफ्टी शेड्स ऑफ ग्रे', 'फिफ्टी शेड्स डार्कर' आणि 'फिफ्टी शेड्स फ्रीड' या तीन कादंबऱ्या हेच वैशिष्ट्य अधोरेखित करतात. या तीनही कादंबऱ्यांतून ॲनेस्टेशिया (ॲना) स्टील आणि ख्रिश्चन ग्रे यांच्यातील कामक्रीडेचं मुक्त वर्णन केलं आहे. या कादंबऱ्यांचं लेखन केलं आहे, ई. एल. जेम्स यांनी. अनुवाद केला आहे, शोभना शिकनीस आणि शुचिता नांदापूरकर–फडके यांनी.


उपरोल्लेखित तीनही कादंबऱ्यांतून ॲनेस्टेशिया (ॲना) स्टील आणि ख्रिश्चन ग्रे यांची कथा रंगवली आहे. 'फिफ्टी शेड्स ऑफ ग्रे'मध्ये ॲनाची पत्रकारितेच्या क्षेत्रात असलेली मैत्रीण केट, ॲनाला एकदा प्रसिद्ध उद्योगपती असलेल्या ख्रिश्चन ग्रेची मुलाखत घ्यायला पाठवते. पहिल्याच भेटीत ख्रिश्चन आणि ॲना एकमेकांच्या प्रेमात पडतात; पण ॲना थोडीशी लाजरी असल्यामुळे आपल्या मनातली ग्रेविषयीची प्रेमभावना स्वीकारायला संकोचत असते; पण ग्रेच्या देखण्या व्यक्तिमत्त्वामुळे ती त्या प्रेमभावनेला रोखू शकत नाही आणि ग्रेच्या प्रेमप्रस्तावाला होकार भरते. कौमार्य अबाधित असलेल्या ॲनाला ख्रिश्चन, शरीरसंबंधाचे धडे द्यायला लागतो; मात्र कामक्रीडा करताना त्याच्या काही अटी असतात. त्या ॲनाला जाचक वाटायला लागतात आणि हळूहळू त्यांच्यात दुरावा निर्माण व्हायला लागतो. शेवटी ते एकमेकांपासून वेगळे होतात. एक यशस्वी उद्योजक आणि चांगला माणूस असलेला ग्रे कामक्रीडेच्या वेळी विकृत होतो. त्याच्यातला माणूस आणि त्याच्यातला कामविकृत पुरुष यांच्यातील द्वंद्व ॲनाला अस्वस्थ करत असतं.

ॲनाची ही अस्वस्थता 'फिफ्टी शेड्स ऑफ डार्कर'मधूनही अधोरेखित होत राहते. ख्रिश्चन आणि ती वेगळे झाले तरी त्यांना एकमेकांशिवाय चैन पडत नसतं. ख्रिश्चनचं बालपण त्याच्या आईच्या वासनांधतेमुळे करपलेलं असतं. त्यामुळे प्रणयात तो काही वेळेला विकृत पातळीवर जातो. ही विकृती आणि हक्क गाजवण्याची वत्ती जर ख्रिश्चनने त्यागली तर मात्र ॲना परत त्याच्याकडे जायला तयार असते. मग ते परत एकत्र येतात आणि त्यांचा प्रणय रंगायला लागतो. ते विवाहबंधनात अडकायचं ठरवतात.

'फिफ्टी शेड्स फ्रीड'मध्ये त्यांच्या विवाहोत्तर कामक्रीडेचं वर्णन येतं. ते दोघं विवाहबद्ध होतात आणि त्यांच्या प्रणयाला उधाण येतं. एलिना रॉबिन्सन नावाच्या स्त्रीचा ख्रिश्चनला आलेला मेसेज पाहून ॲना खूप दुखावते. या मेसेजवरून तरी तिला असं वाटतं, की ख्रिश्चनचे आणि त्या स्त्रीचे शरीरसंबंध आहेत. त्याबद्दल जेव्हा ती ख्रिश्चनला विचारते, तेव्हा तो तिला एक धक्कादायक सत्य सांगतो, ज्याचा संबंध त्याच्या कामक्रीडेत डोकावणाऱ्या विकृतीशी असतो. ख्रिश्चनच्या या खुलाशामुळे ॲना आणि ख्रिश्चनच्या संबंधात अधूनमधून येणारा तणाव नाहीसा होतो आणि ॲना मनाने त्याच्या आणखी जवळ जाते. यथावकाश त्यांना पुत्रप्राप्तीही होते आणि त्यांचं कौटुंबिक जीवनही बहरतं.


मेहता पब्लिशिंग हाऊस

**फिफ्टी शेड्स ऑफ ग्रे,**
**फिफ्टी शेड्स डार्कर,**
**फिफ्टी शेड्स फ्रीड**
**ई एल जेम्स**










फिफ्टी शेड्समधल्या मैथुनाच्या हजार तऱ्हा एका बाईनं सांगितल्या आहेत. ॲनाचं निर्णयस्वातंत्र्य विकत घेऊन ग्रे तिला लैंगिक समाधानाची चरमसीमा दाखवू पाहता; पण जगातली सारी सुखं पायाशी लोळण घेत असतानाही ती अभिव्यक्तीचा बळी देत नाही. बाईला हातपाय न हलवता सुख हवं असतं, या समजाला ती छेद देते. शरीरसुखातल्या देवाण–घेवाणीतली तिची भूमिका ती मांडते. अगदी कठोर शिक्षेची जाणीव असूनही स्पर्शाचा हक्क वापरते, ही 'फिफ्टी शेड्स ऑफ ग्रे'ची पार्श्वभूमी; पण 'डार्कर'मधलं ग्रेचं रूप रोमांचक आहे.

'फिफ्टी शेड्स ऑफ ग्रे', 'फिफ्टी शेड्स डार्कर' आणि 'फिफ्टी शेड्स फ्रीड' ही ई.एल.जेम्सची ईरॉटिक प्रकारातली जगभर गाजलेली पुस्तकं...ही आता मराठीत उपलब्ध झाली आहेत. अशा प्रकारच्या इतर पुस्तकांत 'मेल ओरिएन्टेड सेक्स'चीच वर्णनं अधिक वाचायला मिळत होती; पण ई.एल.जेम्स, बाईला कशा प्रकारची कामक्रीडा हवी असते, याचं नेमकं चित्रण करते. अवतीभवतीच्या विखारी नजरांनी बाई भलेही विटत असेल; पण तिला हव्या असलेल्या जोडीदाराबरोबर तिचा शृंगार कसा बहराला येतो, याचं बिनधास्त वर्णन जेम्स करते.

एक प्रेमिका म्हणून सुरुवातीला ॲनाचं गोंधळणं, बावरणं, ग्रेचं तिला मिश्किलपणाने चाचपणं, ग्रेच्या खूप जवळ गेल्यावर त्याच्याविषयीच्या उलट–सुलट भावनांनी तिच्या मनात उठलेला कल्लोळ, एका बाजूला लैंगिक सुखाचं आकर्षण आणि दुसऱ्या बाजूला ग्रेची वाटणारी भीती, यामुळे या कादंबऱ्यांमध्ये भावनांची एक लय अनुभवायला मिळते.

तर कामक्रीडेने रंगलेला, ख्रिश्चन आणि ॲना यांचा हा प्रेमप्रवास शरीर–मन यातील द्वंद्व अधोरेखित करणारा आहे. त्या द्वंद्वासाठी तो अनुभवला पाहिजे. अतिशय नाजूक आणि बिनधास्त असा हा विषय शुचिता नांदापूरकर–फडके आणि शोभना शिकनीस यांच्या कुशल अनुवादामुळे बीभत्सतेकडे झुकत नाही. त्यांच्या अनुवाद कौशल्याला दाद द्यावी लागते.

**– अंजली पटवर्धन**

फिफ्टी शेड्स ऑफ ग्रे, फिफ्टी शेड्स डार्कर, फिफ्टी शेड्स फ्रीड : मूळ लेखक – ई. एल. जेम्स
पृष्ठसंख्या : ६२८, किंमत : ७००
अनुवाद : शोभना शिकनीस, शुचिता नांदापूरकर–फडके

**'ग्रंथाली' येथे सभासदांना सवलतीत ५०० रुपये**


## ग्रंथपान

**चांगदेव काळे**

**संपर्क : ९८६९२०७४०३**

**शिवाची शक्ती**

**शिल्पा जितेंद्र खेर**




**हिमालयाएवढी तिची सावली**

राष्ट्रप्रेम, राष्ट्रभक्ती आणि अभिमान यांनी भारावून टाकलेले, त्या नात्यात गुंफलेले दोन शब्द आहेत सैनिक, सैन्यदल. आपली अस्मिता, आपली जाज्ज्वल्यता पूर्णपणाने जोपासण्याची प्रेरक शक्ती म्हणजे हे दोन शब्द! सैनिक आणि सैनिक दल हा प्रत्येकाचा श्वास आहे, त्यांच्याविषयी वाटणारा आदर, प्रेम, जिव्हाळा आपल्या संस्कृतीचा एक अविभाज्य भाग म्हणता येईल, इतके आपण त्यांच्याशी समरस झालेलो आहोत. तीच समरसता शिल्पा खेर त्यांच्या लेखनातून व्यक्त करीत आलेल्या आहेत. आतापर्यंतचे त्यांचे बहुतेक लेखन हे सैनिक, राष्ट्रप्रेम यांच्या धाग्यांनी गुंफलेले दिसून येते. 'सत्यमेव जयते', 'सोल्जर इन मी भाग १ व भाग २', 'जस्ट बिलिव्ह', 'ए मेरे वतन के लोगो' या त्यांच्या कादंबऱ्या यापूर्वी प्रकाशित झालेल्या आहेत. त्याच मालिकेतील पुढचा भाग म्हणजे 'शिवाची शक्ती' ही कादंबरी होय. 'भाग्यश्री फाउंडेशन' या संस्थेच्या संस्थापक असून तिच्यामार्फत करीत असलेल्या विविध शैक्षणिक व सामाजिक कार्यातूनही त्यांचे समाजप्रेम आणि राष्ट्रप्रेम दिसून येते.

सैनिकी कामगिरीवर गेलेला वीर सुखरूप परत येईल की, तिरंग्यात लपेटून येईल याविषयी अनिश्चितता. कधी कुठला प्रसंग येईल, याचा नेम नाही. परंतु या अनिश्चिततेला कायम आपल्या मुठीत ठेवणारा, धैर्याने पुढे जाणारा, मातृभूमीसाठी सर्वस्व अर्पण करायला तयार असणारा सैनिक वेगळाच असतो. साहस, धाडस, पराक्रम, शौर्य यांनी परिपूर्ण असलेल्या सैनिकाची आणखी एक शक्ती वेगळी असते, तिचे नाव सौभाग्यवती, अर्धांगिनी, पत्नी, सहधर्मचारिणी, पार्वती! पतीच्या सोबत असू दे अथवा मागे असू दे, ती मनाने, कर्तव्याने कायम त्याच्या हृदयात असते. ती त्याची पत्नी असते, त्याच्या मुलांची माता असते, कुटुंबाची देखपाल करणारी कुटुंबप्रमुख असते आणि तरीही ती सैनिकाची शक्ती असते. या स्त्रीला आपल्या पतीविषयी काय वाटते, भवितव्याबाबत काय वाटते, त्याच्याशी विवाह करण्यात चूक झाली का, खरे सुख मिळते का, की पश्चाताप होतो, असे अनेक प्रश्न सैनिकाच्या पत्नीसोबत येतात. या प्रश्नांना वाचा फोडण्याचे काम लेखिकेने केलेले आहे. सैनिकी पेशा वेगळा आहे, वातावरण सतत दडपणाचे आहे, अशा माणसाशी नाते जोडलेल्या स्त्रीचे प्रश्न पूर्णपणे वेगळे आहेत. ते समजून घेण्याचा, त्यामागील मानसिकता समजून घेण्याचा हा प्रयत्न आहे. त्यासाठी लेखिकेने सर्वोच्च पदे भूषविलेल्या, १९६२,१९७१ च्या युद्धात सहभागी झालेल्या, कारगील युद्धाचा अनुभव घेतलेल्या आणि युरी हल्ल्याच्या जखमा अंगावर बाळगलेल्या वीरांच्या, त्यांच्या धिरोदात्त पत्नींच्या मुलाखती घेतलल्या आहेत. यात दोघांचाही सहभाग असला तरी प्रामुख्याने दुसऱ्या शक्तीवर सगळे लक्ष केंद्रित केलेले आहे. मेजर जनरल अशोक तासकर यांच्या पत्नी सुहासिनी तासकर, मेजर जनरल शशिकांत पित्रे यांच्या पत्नी मीरा पित्रे,मेजर सुभाष गावंड यांच्या पत्नी उर्मिला गावंड, विंग कमांडर निखिला पामकर, उरीच्या अतिरेकी हल्ल्यात शहीद झालेले मेजर कुणाल गोसावी यांच्या पत्नी उमा गोसावी, कॅप्टन मैत्रेयी दांडेकर, कॅप्टन सुरेश वंजारी यांच्या पत्नी सुनीता वंजारी, गोळीबारात कायमचे पॅराप्लेजिक झालेले मीन बहादूर थांपा यांच्या पत्नी गीता थापा, अशा तेरा मुलाखती आहेत. शौर्य, प्रेम, आपसातले नाते, विश्वास, या गोष्टी यातून कळतात.

अनेक शंका, प्रश्न, गैरसमजुती यांना इथे छेद मिळतो. सैनिक सगळ्यांना आपले कुटुंब मानतात. सैनिकाच्या पत्नीचा सन्मान सैन्यात सर्वोच्चस्थानी असतो. कुठल्याही सैनिकी समारंभात पत्नीसोबत असणे आवश्यक असते. प्रथम भोजन करण्याचा मान महिलांना दिला जातो. कितीही मोठा अधिकारी असू दे, सैनिकाची पत्नी कार्यालयात आली तर तो उठून उभा राहतो. सैनिकाप्रमाणेच त्याच्या वैयाक्तिक दप्तरात पत्नीविषयी देखील नोंद केली जाते. मागे राहिलेल्या पत्नीचा सर्वतोपरी सन्मान राखला जातो. तसा पतीइतकेच राष्ट्रप्रेम, शिस्त, गणवेश यावर या स्त्रिया प्रेम करतात. साहस, कणखरपणा त्यांच्या अंगी आपोआपच येतो. आपला निर्णय चुकला असे त्यांना कधीही वाटत नाही. उलट अभिमान वाटतो. पतीच्या सुखात त्याही तितक्याच सुखी असतात. महत्त्वाचे म्हणजे तिची शक्ती ही त्याची शक्ती असते, म्हणूनच तो खऱ्या अर्थाने त्याचे कर्तव्य बजावण्यास पुढे होतो, हे सारे कळते ते हे पुस्तक वाचल्यानंतर.

शिल्पा खेर यांच्या लेखनात असलेला ओघवता प्रवाहीपणा वाचकाला खिळवून ठेवणारा आहे. कथानक फुलवत नेण्याची हातोटी त्यांना साधलेली आहे. विषयाशी नाते जुळले की लेखनाशीही नाते जुळते, याचा अनुभव हे लेखन देते. विषयाचा सखोलपणा, त्याच्याशी असलेले भावनिक आणि कर्तव्याचे पैलू, यांचा शोध घेण्याचा प्रयत्न तर स्तुत्यच म्हणायला हवा. पाण्याच्या पृष्ठभागावर दिसणाऱ्या हिमनगापेक्षा पाण्याच्या आत असलेला हिमनग मोठा असतो, त्याचा तळ शोधण्याची जिज्ञासा आणि प्रयत्न या लेखनातून कल्पकतेने आणि तितक्याच परिश्रमपूर्वक केलेला दिसून येतो.

'रणांगणात किंवा चकमकीच्या वेळी शत्रूचा सामना करताना आपल्या शरीराच्या बाजूने बंदुकीची गोळी सपकन् जाते तेव्हा स्वतः ची लायकी क्षणात कळून येते. मग मी कोणीतरी श्रेष्ठ आहे किंवा मी कुणीच नाही, असे विचार मनात येत नाहीत.' 'जर तुम्हाला किंगसाईज आयुष्य जगायचं असेल, आयुष्याचा आनंद घ्यायचा असेल , ॲडव्हेंचर तुम्हाला आवडत असेल, तर फौजीशी लग्न नक्की करा.' यासारखी वाक्ये बरेच काही शिकवून जातात.

या लेखनामागची प्रेरणा आणि ध्यास या विषयी लेखिकेने मनोगतात मन मोकळे केलेले आहे. सुप्रसिद्ध लेखिका प्रतिभा रानडे यांची सुंदर अशी प्रस्तावना या पुस्तकाला लाभलेली आहे. हळवा आणि कणखर या दोन तटांचा सुंदर संगम काळजापर्यंत पाझरत जावा, असे मनोरम मुखपृष्ठ चित्रकार सतीश भावसार यांनी सजवले आहे.

**मूल्य ३५० रुपये सवलतीत २५० रुपये**

## ग्रंथपान

**मोराची बायको**
**किरण येले**




**रंग पिसाऱ्याचे**

हा आहे सात कथांचा इंद्रधनुषी कथासंग्रह; प्रेमाचा, भावनांचा, नात्यांचा, जगण्यांचा, संवेदनांचा, फसगतीचा आणि खूप काही असूनही त्यापलीकडच्या विचारांचा. हा संग्रह घेऊन आले आहेत किरण येले. 'बाईच्या कविता' या काव्य संग्रहाने स्वतःची वेगळी ओळख निर्माण केलेले कवी. नाट्य चळवळीतले कलाकार आणि 'प्लॅटफार्म नं. ९'चे नाटककार. 'लक्ष्य', 'शुभंकरोती' सारख्या टीव्ही मालिकांचे लेखक. त्यांच्या या ओळखीच्या नावाखाली अधोरेखिताची ठसठशीत रेष ओढणारा संग्रह म्हणजे 'मोराची बायको'.

'मोराची बायको' हे शीर्षक याच नावाच्या कथेवरून घेतलेले आहे. कुतूहल निर्माण करणारे हे शीर्षक केवळ संग्रहाची उत्कंठा वाढवत नाही, तर प्रत्येक कथा त्याचा प्रत्यय देते. कथा वाचून झाल्यावर उत्कंठा शमते खरी, परंतु वेगळीच हूरहूर, पोकळी निर्माण होते, नजरेसमोर मनातल्या आंदोलनांचे मोठी आवर्तने भिरभिरू लागतात, पोकळीतल्या खळाळाचे उंचावरून झेपावणारे प्रपातासारखे आवाज वेढून टाकतात. कल्पना आणि वास्तव यांच्या पातळ्या नेहमीच वेगवेगळ्या असतात, प्रत्येक घटकागणिक त्या बदलत जातात. भास –आभास, जळ –मृगजळाचा हा खेळ म्हटला जातो. त्या खेळाला एका पातळीवर आणणे कठीणच किंवा अपवादात्मक. त्यासाठी लेखकाजवळ केवळ प्रतिभा असून चालत नाही, त्या प्रतिभेला बळ देणाऱ्या प्रातिभ सामर्थ्याची जोड असावी लागते. किरण येले यांच्याकडे हे सामर्थ्य आहे. 'तू मला शोधत येशील तेव्हा सगळ्या प्रश्नांची उत्तरं मिळतील' आणि ' मनातलं चित्र बाहेर शोधू नये आणि दिसलं तरी जुळवून पाहू नये.' ही दोन वाक्ये आहेत. त्याचं उदाहरण एखाद्या पर्वताची दोन शिखरे असावीत अशी. ज्यांची कधीच भेट होत नाही तशी ती त्या पर्वतापासून दूरही करता येत नाहीत. या सूत्रावर आधारलेली 'मोराची बायको' ही कथा उभी आहे. प्रत्येकाच्या मनात त्याच्या स्वप्नाचे रंगीत पीस असते. या पिसावरून त्या पक्षाचा शोध घेणारे मन प्रत्येकाजवळ असते. पण त्याच्या शोधाच्या ध्यासाचा प्रवास प्रत्येकालाच झेपतो असे नव्हे. त्यात यशापशाचे, ऊनसावलीचे अनेक खाचखळगे असू शकतात. किरण येले या कथेत 'ती'चा हा प्रवास रेखाटतात तेव्हा मन थक्क होते.

या संग्रहातील प्रत्येक कथा ही खणखणीत नाणे आहे. स्वतंत्र अवकाश असलेले. स्वतःचा पूर्ण परीघ असलेले. 'साईन आऊट' या कथेत केंद्रस्थानी आहे आदित्य. त्याच्याभोवतीचा परीघ म्हटला तर त्याचे ऑफीस, रस्ता आणि घर. या परिघात इतर पात्रे आहेत मृदुला, यग्ना, स्वाती, प्रतिभा, जयंती, चंद्रमाला, शेजारच्या शर्माकाकू आणि जो. ही सगळे पात्रे त्यांच्याभोवती आहेत ती त्यांच्या जगण्याच्या दृष्टिकोनातून कॅलिडोस्कोपच्या मिती दाखवणारी. एकात एक मिसळलेली, जशी घोड्यांच्या चित्रात कुणाचे पाय कोणते हे ओळखता येऊ नये अशी. ही कथा वाचत असताना आपण रंगमचांवरचे एक नाटक अनुभवत आहोत, असे वाटत राहते. नात्याच्या आवर्तात 'साईनइन' झालेला नायक एकटा साईनआऊट नाही, कथा वाचून झाल्यावर आपणही साईनइनच्या वेदना अंगभर झेलत गरगरत राहतो, 'आऊट' झाल्यासारखे.

राजन आणि तनयच्या दरम्यानच्या व्यासात टोललंबकासारखी सापडलेल्या रजनीची कथा म्हणजे 'अवशेष'. ओढ ही मनाची असते की शरीराची? मनाला आवर घातला तो योग्य की अयोग्य? ती शोध घेतेय स्वतःचा, स्वतःच्या वागण्याचा आणि त्याचवेळी तिच्यासमोर असलेल्या व्यासाच्या टोकांवरील दोन ध्रुवांचा. 'कोपऱ्यातलं टेबल' या कथेतला सरोळकर म्हणजे आगीच्या धगीत होरपळलेल्या झाडाच्या सावलीतले रोपटे. त्याची सावली झाडासोबत करपून जाते, सोबत त्याचे जगणे करपून गेल्यासारखे होते. त्याला दिसत राहते ती सतत सर्वत्र धग, त्यालाच होरपळून टाकणारी. तिच्यापासून दूर पळू पाहतो. वेगळ्या वातावरणात जगणाऱ्या माणसांची मानसिकता वातावरणाशी कशी निगडित राहते, याचे यथार्थ असे वर्णन ही कथा करते. 'ती आणि ती' या कथेत समाज,संस्कार, वय यांच्या वळणात सापडलेल्या तिला कळत नाही, इतरांचे वागणे आणि आपल्या मनात येणारे विचार हे संवादी असतात की विसंवादी? वयाच्या चाळिशीतही सुंदर असूनसुद्धा वरुण आपल्याला का सोडून गेला? दोन जणांशी संबंध असणाऱ्या सईशी त्याने संबंध जोडले. का?

'अमिबा आणि स्टील ग्लास', 'मांदळकरबाई' या कथाही तितक्याच उत्तम आहेत. या सर्व कथांची संवादी शैली काव्यासारखी मनाचा ठाव घेत जाते. कथांना दिलेली शीर्षके मैलाच्या दगडासारखी अचूक आणि नेमकी असल्याची साक्ष देतात.

किरण येले यांच्या कथा या दृश्यमितींचा प्रत्यय देतात. प्रतिमांच्या बेटांशी बांधून ठेवतात. विचारांची आवर्तने मानसशास्त्राच्या विविध सूत्रांच्या पातळींची ओळख करून देतात. उत्कट अनुभवांची संयमीत अनुभूती देतात. अवतीभवतीच्या निरीक्षणांचे परिवर्तन विचारदर्शनातून घडवतात. स्त्री–पुरुष यांच्या जगण्याच्या संदर्भांना त्यांच्या नजरेतून वाचकांपर्यंत पोहोचवतात. एखाद्या विषयाकडे वेगवेगळ्या दृष्टिकोनतून किती खोलवर जाऊन पाहता येते, याची जाणीव करून देतात. एक चांगला कथासंग्रह वाचल्याचे भरभरून समाधान देतात. वाचकाच्या मनावर कायम कोरला जाईल असा हा कथासंग्रह आहे, मोराच्या बहुरंगी आकर्षक पिसासारखा. नवीन कथालेखकांनी अभ्यासाचा संदर्भ म्हणून या कथासंग्रहाकडे पाहायला हवे.

मनाचे विविध कप्पे म्हणजे एक निबिड अरण्य. त्यात आशेचा, अपेक्षेचा, भासाचा, आनंदाचा एक सुंदर मनोहारी पिसाऱ्याचा मोर नाचत असतो. तेच नेमके मुखपृष्ठावर हळुवारपणे अलगद उतरवले आहे कल्पक चित्रकार सतीश भावसार यांनी.

**मूल्य १८० रुपये   सवलतीत ११० रुपये**

## ग्रंथपान

**माध्यमरंग**
**रविराज गंधे**




**दूरचे जवळून होणारे दर्शन**

'अहो! इतक्या थोड्या वेळात पुस्तकांच्या सर्व वैशिष्ट्यांसह सुंदर अन् नेमका परिचय तुम्ही कसा करता? पूर्वी तुम्ही कुठल्या मासिकात वा दैनिकात संपादक म्हणून काम करीत होता का?' राजहंस प्रकाशनाचे दिलीप माजगावकर यांनी हा प्रश्न रविराज गंधे यांना विचारला होता. या प्रश्नाला दोन कारणे होती. एक कौतुक आणि दुसरे कामातले नेटकेपण. 'अमृतवेल' हा साहित्य विषयक कार्यक्रम त्यावेळी दूरदर्शनवर चांगलाच लोकप्रिय होता. स्वतः रविराज गंधे तो सादर करीत. लेखक, त्याची साहित्यकृती आणि इतर बाजारात आलेली पुस्तके यांचा परिचय, असे त्याचे स्वरूप होते. विविध वृत्तपत्रांतून सुंदर असे सदर लेखन केलेले आहे. विविध महाविद्यालयात व्याख्याता म्हणून काम केलेले आहे. दूरदर्शनवर तीस वर्षाहून अधिक काळ कार्यक्रम निर्माता, संवाद लेखक, संवादक, अशी भरीव कामगिरी पार पाडलेली आहे. त्यांच्या या भरीव कामगिरीचा अनेक सन्मानांनी त्यांचा गौरव केलेला आहे.

भारतात प्रथम दूरदर्शन सुरू झाले तो दिवस होता १५ सप्टेंबर १९५९. आजमितीस सर्व वाहिन्यांसह ही संख्या झाली ८५७. भारतातील पहिल्या दूरदर्शन केंद्रावरील पहिला कार्यक्रम पु.लंनी तयार केलेला प्रसारित झाला होता. दूरदर्शनचा स्वतःचा एक सुवर्णकाळ होता. मराठी बातम्यांचा खात्रीशीरपणा तर आजही टिकून आहे. बातम्या देणारे निवेदक हे प्रेक्षकांच्या गळ्यातले ताईत होते. रामायण –महाभारताच्या प्रक्षेपणाच्यावेळी रविवारी रस्ते ओस पडत. या संगळ्यांचे रविराज साक्षीदार आहेत.

दूरदर्शन हे दृश्य आणि श्राव्य असे संवादाचे माध्यम आहे. मनोरंजनाबरोबरच उद्‌बोधन करणे, माहितीसाक्षर करणे हा त्याचा उद्देश आहे, जो सकारात्मकेतेशी जोडलेला आहे. त्याचा वापर स्थळकाळानुसार, विषयानुसार परिस्थितीचे गांभीर्य ओळखून करायचा असतो. काय दाखवायचे त्यापेक्षा काय दाखवणे अनिष्ट आहे, याचे भान राखायचे असते. साधा विषय मेकअपचा. तो सर्व ठिकाणी सारखाच करायचा नसतो, त्यालाही औचित्याचे भान असावे लागते. कार्यक्रमाचे स्थळ, विषय, भावभवना यानुसार तो करावा लागतो. त्यामुळे तिथे काम करणाऱ्याकडे स्वतःचे कौशल्य आणि प्रभुत्व असणे आवश्यक बाब ठरते. मुलाखत घ्यायची असेल तरी, तिची तयारी करावी लागते. ती कशी, याचे जगजीतसिह, नाना पळशीकर यांच्या मुलाखतीचे तपशील देत त्यांनी स्पष्ट केले आहे. दूरचित्रवाणी – दृश्यकला– साहित्यमूल्य या प्रकरणात त्यांनी अनेक नामवंत साहित्यिकांच्या साहित्यावर सादर झालेल्या कार्यक्रमांचे स्मरण करून दिलेले आहे. 'तमस', 'हमलोग', 'यात्रा', ' भारत एक खोज' या सारख्या गाजलेल्या मालिका, यांच्या बरोबरच मराठीत जयवंत दळवी, यांची 'आव्हान', 'ना.धों. ताम्हणकरांचा 'गोट्या', चि.वि. जोशींचा 'चिमणराव गुंड्याभाऊ', गो.नी. दांडेकराची 'पडघवली' अशा अनेक उत्तम साहित्यकृतींवर आधारलेल्या गाजलेल्या मालिकांचे संदर्भ दिले आहेत. 'शरदाचं चांदणं', 'प्रतिभा आणि प्रतिमा'च्या आठवणी ताज्या केल्या आहेत. त्यात साहित्यावर आधारित कार्यक्रमांना कसे प्राधान्य असते, हे यातून दिसून येते. परंतु त्याचपेळी साहित्याचा आणि वाचनसंस्कृतीचा प्रसारही त्यातून साधण्याचा स्तुत्य प्रयत्न होता, हे अधोरेखित होते.

रविराज गंधे यांची वाणी जितकी मृदू आणि रसाळ आहे, तितकीच त्यांची लेखणी. वाचत असताना जणू ते आपल्याशी समोर बसून संवाद करीत आहेत असे वाटत राहते, दूरदर्शनवरील कार्यक्रमाप्रमाणे. स्टुडिओ ते आऊटडोअर; कॅमेरा, रेकार्डिंग ते सुंदर असा सुसंवाद यांचे त्यांना आलेले अनुभव, त्यांनी केलेली आतापर्यंतची मुशाफिरी, ही एका युगाची साक्ष आहे. ती अदभुत आहे तशी तितकीच रम्य आहे. एका ओळखीच्या परंतु अनोळखी अंतरंगाची ही सफर आहे. हातात हात घालून फेरफटका मारावा, तशी त्यांनी या विश्वाची ओळख सोप्या पद्धतीने करून दिलेली आहे. एक चांगला निवेदक, संवादक, मार्गदर्शक एक चांगला लेखकही असू शकतो, त्याचा गोड अनुभव हे पुस्तक देते. या माध्यमावरील संदर्भांची ओळख करून देते. त्यांच्यासोबत कुणी कुणी सहकारी म्हणून काम केले, त्यांच्याविषयी देखील स्नेहभावाने लिहिले आहे.

माध्यमातील माणूस ही संकल्पना अतिशय रम्य आणि तितकीच भूरळ घालणारी. तिचा पाठलाग करणाऱ्यांची संख्या मोठी, तितकीच दमछाक करणारी. काहींना यश येते, नाही असे नाही. परंतु त्यांची संख्या बोटावर मोजण्याइतपतही भरत नाही. याची कारणे अनेक असू शकतात, त्यापैकी एक आहे मार्गदर्शन. कुठल्याही स्पर्धेत यश मिळवायचे तर मार्गदर्शनाला (गाईड) पर्याय नसतो. 'माध्यमरंग' हे पुस्तक म्हणजे एकप्रकारचे गाईड म्हणता येईल, संदर्भासहित अनुभवांनी समृद्ध असलेले. ते मार्गदर्शकाची उणीव नक्की भरून काढील. या पुस्तकातील लेखकाचे अनुभव हे या क्षेत्रात येऊ पाहणाऱ्यांसाठी उपयुक्त ठरतीलच तसे या माध्यमाविषयी कुतूहल असणाऱ्यांनाही अंतरंगात डोकावल्याचे समाधान देईल, असा विश्वास वाटतो.

पुस्तकाची मांडणी करताना मुद्दाम विषयवार अशी प्रकरणे दिली आहेत. सोबत फोटो आहेत. मात्र यात लेखकाची अलिप्तताही लक्षात यावी अशी आहे. माध्यम एके माध्यम, इतकाच विषय मर्यादित ठेवलेला आहे, त्यात स्वतःच्या चरित्राचे अंश, वा स्वतःचे मोठेपण दाखवण्याचा कुठेही प्रयत्न केलेला नाही. त्यामुळे पुस्तकाचे शीर्षक खऱ्या अर्थाने सार्थ ठरते.

सतीश भावसार यांनी या पुस्तकाचे मुखपृष्ठ सजवले आहे. माध्यमांचे जे विविध पर्याय आज उपलब्ध झालेले आहेत आणि ज्यांनी संपूर्ण समाजमनावर गारूड केल्यासारखा प्रभाव टाकलेला आहे, त्याचे दर्शन मुखपृष्ठावर होते.

**मूल्य २०० रुपये सवलतीत १२० रुपये**

कथारंग

'कॅनव्हास' हा डॉ. स्मिता दातार यांचा नवा लघुकथासंग्रह ग्रंथालीने प्रकाशित केला आहे. यात एकूण सोळा कथा आहेत. कथासंग्रह वाचताना प्रत्येक कथेचे वेगळेपण लक्षात येते. 'एक निर्णय असाही' या कथेतील ओंकार आणि गार्गी. सुशिक्षित, सुस्थितीत असलेले जोडपे. परंतु वंशवेल रूजवण्यात अपयशी. तसे अनेक पर्याय समोर असतात, तरीही ते वेगळा पर्याय स्वीकारतात. 'आपलंच मूल हवं, हा अट्टाहास न धरता एखाद्या संस्थेला पैसे देऊन काही मुलांच्या शिक्षणाचा भार उचलू. नाहीतरी हल्ली मुलं आईबाबांच्या सोबत असतात कुठं?' एक वेगळा विचार ही कथा समोर ठेवते. 'एक चमेली के मंडवेतले' ही एक निखळ आणि नितळ संबंधाची कथा आहे, कुतूहल, प्रेम आणि जिव्हाळा, यांची अलवार गुंफण असलेली. अलका आणि मधुकर या दोघांची. सहचराशिवाय जगणाऱ्यांची. राहुल आणि मिष्ठीच्या दृष्टीने आजीआजोबांची. काटे आणि फुले यांच्या सलगीची.

'कॅनव्हास' ही कथा एका चित्रकाराची, लहान शालेय मुलांना चित्र काढायला शिकवणाऱ्याची, कुलदीप उर्फ केडीची. तो एकटा आहे, अविवाहित. शिक्षकाच्या मायेने, पितृवात्सल्याने मुलामुलींना केलेले स्पर्श हे विकृतीचे लक्षण ठरवून सोसायटी त्याच्या विरोधात उठते. त्यावेळी होणाऱ्या मानसिक यातना कलाकारासाठी किती क्लेषकारक असतात, त्याचे वर्णन ही कथा करते. मनाचा होणारा कोंडमारा मोकळा करण्यासाठी जवळ कुणी नाही. एक ताई आहे तीही दूरदेशी. तिच्याजवळ तो स्वतः चे मन मोकळे करतो ई मेलच्या माध्यमातून. ही कथा फुलत जाते ती याच ई मेलच्या तंत्राने. हळुवारपणे केलेले वर्णन अंतर्मुख करते. यातले कुलदीपच्या तोंडी आलेले वाक्य त्याची अवस्था व्यक्त करण्यास पुरेसे आहे,'माझं असं झालंय ना, कॅनव्हासवर कोणीतरी काळ्या रंगाचे शिंतोडे उडवलेत आणि मला चित्र काढायला सांगितलंय.' 'सौदा' ही कथा वेगळे रूप घेऊन येते. एक मोठा पट असलेली ही कथा म्हणावी लागेल. ती गुंफलेली आहे, राधिका या व्यक्तिरेखेभोवती. फारसे शिक्षण नसलेल्या राधिकाचा नवरा दीपक एक दिवस तिला सोडून घराबाहेर निघून जातो. उदरनिर्वाहासाठी तिला आपले गर्भाशय भाड्याने देण्याची वेळ येते. विचित्र दैवयोग असा की, गर्भाशय ज्यांना भाड्याने घ्यायचे आहे, ते अतिश्रीमंत दांपत्य दीपेन चौधरीचे आहे आणि हा दीपेन म्हणजेच तिचा एकेकाळचा तिला सोडून गेलेला नवरा दीपक आहे. दुसरे लग्न करून तो तिच्यासमोर खरेदीदार म्हणून उभा आहे. नात्याची ही गुंतागुंत आणि मानसिक पातळीवरचा संघर्ष यातून ही कथा एका वेगळ्याच पातळीवर जाऊन उभी राहते.

इतरही कथा मनाला स्पर्शून जाणाऱ्या आहेत. जगण्याच्या विविध स्तरांचे दर्शन घडवतात. 'ती' ची गोष्ट, पिंडदान, शिनेमा शिनेमा, हॅपी ॲनिवर्सरी, आयसीयूच्या खिडकीतून, अशा वेगवेगळ्या आशयांच्या कथा कायमच्या लक्षात राहाव्यात अशा आहेत.

॥ ग्रंथाली ॥

# ग्रंथपान

**कॅनव्हास**

**डॉ. स्मिता दातार**



'कॅनव्हास' हा डॉ. स्मिता दातार यांचा पहिलाच लघुकथांचा संग्रह. त्यामुळे त्यातले अल्लडपण लक्षात येणारे आहे. परंतु पुढच्या मोठ्या प्रवासाची ग्वाही ठरावी, अशा या कथा आहेत. कथांचा आकार लहान आहे, लघुकथा शोभाव्यात असा, परंतु त्यांचा आवाका मोठा आहे. एखादा अनुभव चपखलपणे पकडणे अवघड असते, तो सहजपणा लेखिकेकडे आहे. आपल्याला जे सांगायचे आहे, जे भावले आहे, त्याचे वर्णन त्या सहज सोप्या शैलीत व्यक्त करतात. अनअलंकृत शैली म्हणावी अशी. मुळातच सुंदर असणाऱ्याला अलंकारांची गरज ती काय, असे म्हणतात, त्याचा प्रत्यय देणारी ही शैली आहे. या कथांमागे जगण्याचे सूत्रही आहे. आपल्या भवतालचा समाज, घडणाऱ्या घटना, व्यक्तिरेखा, यांचे निरीक्षण करण्याची, त्यानुसार त्यांचे कथेत मांडणी करण्याची कलाही त्यांनी आत्मसात केलेली दिसून येते. स्वतः डॉक्टर असल्याने पेशंटसाठी कौशल्य पणाला लावतात, तितकेच कौशल्य कथालेखनात त्यांनी दाखवलेले आहे. काही वाक्ये त्या इतक्या सजपणे लिहून जातात की, कथा आणि त्या व्यक्तिमत्त्वाचे संपूर्ण चित्र नजरेसमोर उभे राहते. काही वाक्ये पहा, 'सियाचेन ग्लेशियर खरी तर हिमनदीच ती; पण न वाहता बर्फ होऊन पडलेली परशुरामाची अहिल्याच जणू.' 'आपण दोघी झाडाच्या तुटलेल्या फांद्या... एकत्र राहिलो तर मोळी बनेल.' 'आईचा स्पर्शसुद्धा मुलांच्या भावनिक वाढीसाठी महत्त्वाच असतो, असं तिचं शास्त्र सांगायचं.' 'करमणूक पुरुषाला लागते, आणि बाईला नाही?'

एक स्तुत्य असा हा प्रयत्न आहे, चटकन मनाची पकड घेणारा. या आपल्याच कथा आहेत, असा अनुभव वाचकाला देणारा कथासंग्रह, असे याचे वर्णन करता येईल.

सुप्रसिद्ध कथालखिका, मोनिका गजेंद्रगडकर यांची सुंदर अशी प्रस्तावना लाभली आहे. त्यांनी कथांचे विश्लेषन तर केले आहेच, परंतु लेखिकेच्या प्रयत्नांचे कौतुक देखील केले आहे, काही सूचना केल्या आहेत. या सूचना केवळ दातार यांच्यासाठीच आहेत, अशा नव्हेत; तर कथालेखन करणाऱ्या प्रत्येकासाठी त्या मार्गदर्शक ठराव्यात.

सतीश भावसार स्वतः उत्तम चित्रकार आहेत. चित्रकाराच्या हातात असलेली रंगाची प्लेट आणि लेखिकेच्या हातात असलेली कथांची प्लेट यांचे नाते समानच ठरते. रंगांच्या प्लेटवर मांडून ठेवलेले विविध रंग, आणि कथांमधील व्यक्तिरेखांच्या स्वभावांतील विविध रंग यातही साम्यच असते. कॅनव्हास हा रंगांनी चितारलेला असतो, जीवनही एक कॅनव्हासच आहे, विविध घटना, व्यक्तिरेखांनी रंगलेला. हे समान नाते सांगणारे सूचक असे मुखपृष्ठ भावसार यांनी सजवलेले आहे.

**मूल्य १३० रुपये सवलतीत ८० रुपये**

## पुस्तक प्रकाशन क्षणचित्रे






दीपक करंजीकर लिखित 'घातसूत्र' हे पुस्तक, मुंबई येथे प्रकाशित झाले. पुस्तक प्रकाशनसमयी रंगनाथ पाठारे, विद्या करंजीकर, दीपक करंजीकर, कुमार केतकर, सुदेश हिंगलासपूरकर, डॉ. वीणा सानेकर, रघुवीर कुल, मोहन जोशी, भूषण गगराणी, अभिराम भडकमकर आणि धनंजय गांगल.






दीपक करंजीकर लिखित 'घातसूत्र' हे पुस्तक, पुणे येथे प्रकाशित झाले. पुस्तक प्रकाशनसमयी प्रदीप वैद्य, अभिराम भडकमकर, रंगनाथ पाठारे, दीपक करंजीकर, श्रीकांत परांजपे, दीपक करंजीकर, धनंजय गांगल आणि सुदेश हिंगलासपूरकर. सूत्रसंचालन अस्मिता पांडे





डावीकडील छायाचित्रात 'लाभसेटवार फौंडेशन (अमेरिका) यांचा 'उत्कृष्ट ललित साहित्य पुरस्कार २०१८' स्वीकारताना किरण येले (कथासंग्रह मोराची बायको). उजवीकडील छायाचित्रात डॉ. अनंत लाभसेटवार यांच्या 'ट्रंप : एक वादळी जीवनपट' या पुस्तकाच्या प्रकाशनसमयी सुदेश हिंगलासपूरकर, किरण येले, डॉ. अनंत लाभसेटवार, प्रा. उषा तांबे आणि संजय भास्कर जोशी

RNI No. MAHMAR/2013/50137
Published on 10th of Every Month.

Postal Registration No. MCW/310/2019-2021
Posted at Mumbai Patrika Channel Sorting Office, Mumbai-400001 on 10th & 11th of Every Month.




मुद्रक, प्रकाशक, संपादक : सुदेश राजाराम हिंगलासपूरकर यांनी ग्रंथाली विश्वस्त संस्थेच्या वतीने, 'शब्द रुची' हे मासिक इंडिया प्रिंटिंग वर्क्स, इंडिया प्रिंटिंग हाऊस, ४२, जी.डी. आंबेकर मार्ग, वडाळा, मुंबई ४०००३१ येथे छापून ग्रंथाली विश्वस्त संस्थाच्या वतीने, वुलन मिल म्युनिसिपल स्कूल, खोली नं. ९, तळमजला, जे. के. सावंत मार्ग, यशवंत नाट्यमंदिराशेजारी, माटुंगा (प), मुंबई ४०००१६ येथे प्रकाशित केले.